अर्वाचीन महाराष्ट्राची जडणघडण

# काकासाहेब कालेलकर

## व्यक्ती आणि कार्य

मृणालिनी जोगळेकर




राज्य मराठी विकास संस्था

अर्वाचीन महाराष्ट्राची जडणघडण

# काकासाहेब कालेलकर

## व्यक्ती आणि कार्य

मृणालिनी जोगळेकर

राज्य मराठी विकास संस्था

अनुक्रमणिका

# अर्वाचीन महाराष्ट्राची जडणघडण — क्र. ४
ARVACHIN MAHARASHTRACHI JADANGHADAN NO. 4

# काकासाहेब कालेलकर
# व्यक्ती आणि कार्य

KAKASAHEB KALELKAR
VYAKTI AANI KARYA

**आय. एस. बी. एन. क्रमांक :** 81-87889-56-X
**संगणकीय आवृत्ती :** २७ फेब्रुवारी, २०१५

**पहिली आवृत्ती :** फेब्रुवारी १९९८

**© राज्य मराठी विकास संस्था**

**प्रकाशक**
**राज्य मराठी विकास संस्था**
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय,
३ महापालिका मार्ग, धोबीतलाव, मुंबई ४००००१.
दूरध्वनी : - ०२२-२२६३१३२५, फॅक्स : ०२२-२२६५३९६६
ई-मेल : - rmvs_mumbai@yahoo.com
संकेतस्थळ : rmvs.maharashtra.gov.in

**अक्षरजुळणी व मांडणी**
**कुमार कॉम्प्यूटर्स**
'अनुष्का' सर्वे नं.१३/४/१, लेन नं.३०,
धायरी, मुक्ताई गार्डनजवळ, सिंहगड रोड, पुणे ४११ ०४१.
ई-मेल : - nandu@kumarcomputers.in
संकेतस्थळ : www.kumarcomputers.in

**इ-पुस्तक रूपांतर**
**सीडॅक, पुणे**
सीडॅक-प्रगत संगणक विकास केंद्र,
वेस्टएण्ड सेंटर – III, स.नं. १६९/१, सेक्टर – II
औंध, पुणे – ४११००७

## विनामूल्य वितरणासाठी
ह्या इ-पुस्तकाचे सर्व अधिकार राज्य मराठी विकास संस्थेच्या अधीन असून हे पुस्तक जनतेसाठी विनामूल्य स्वरूपात संस्थेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले आहे. हे पुस्तक आपण स्वतःसाठी विनामूल्य उतरवून घेऊ शकता. परंतु त्याची प्रत करताना अथवा दुवा इतरांना देताना पैसे आकारणे, ह्या पुस्तकाची नक्कल करून त्याची विक्री करणे, किंवा या इ-पुस्तकाची प्रत आपल्या संकेतस्थळावर घालणे इ. गोष्टी करणाऱ्या व्यक्ती वा संस्था आढळल्यास त्यांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

अनुक्रमणिका

*सा सौम्या ऋजुता विवेकपटुता सारस्वतीभव्यता*
*आमोदं तनुते सरोजसदृशं लोकोत्तरं जीवनम् ।*
*तस्मै पर्यटकाय संस्कृतिपथि प्रीत्या नमस्कुर्महे*
*कर्तारं तु समन्वयस्य निपुणं सम्प्राप्य मोदामहे ॥*

ती सौम्य ऋजुता, ती विवेकशीलता, ते वाङ्मयीन भव्य कर्तृत्त्व, कमलाप्रमाणे अवतिभवती आनंद पसरवणारे ते लोकोत्तर जीवन- हे सारे ज्याला लाभले आहे त्या संस्कृतिपथावरील भटक्या प्रवाशाला आमचा प्रेमपूर्वक नमस्कार! संस्कृतिसमन्वय साधणारा असा हा निपुण कर्ता लाभल्याने आम्हांला मनस्वी आनंद होत आहे.

['समन्वयके साधक' या काकासाहेब कालेलकर अभिनन्दन ग्रंथामधील श्रीशंकरदेव विद्यालंकार विरचित 'अभिनंदन प्रसूनांजलि :' मधून उद्धृत्त]

अनुक्रमणिका

# अनुक्रमणिका

जडणघडण मालिकेविषयी ........ 6
मनोगत ........ 8
पार्श्वभूमी ........ 11
बालपण ........ 14
ध्येयशोध ........ 25
दोन गुरू ........ 32
राजकीय व शैक्षणिक कार्य ........ 43
राष्ट्रीय शिक्षण ........ 56
राष्ट्रभाषाप्रसार ........ 62
प्रवासी साहित्यिक ........ 71
ललित व अनुवादित साहित्य ........ 86
वैचारिक साहित्य ........ 97
समन्वय साधना ........ 110
महाराष्ट्र व काकासाहेब ........ 121
उत्तरायण ........ 135
परिशिष्ट - १ ........ 146
परिशिष्ट - २ ........ 149
परिशिष्ट - ३ ........ 156

## जडणघडण मालिकेविषयी

श्रीमती मृणालिनी जोगळेकर या मराठीतील एक मान्यवर लेखिका आहेत. त्यांनी जसे संशोधनात्मक स्वरूपाचे वैचारिक लेखन केले आहे तसेच थोडेफार ललित लेखनही केले आहे. एखादा विषय अभ्यासासाठी हाती घेतल्यावर त्यासाठी आवश्यक असणारे सर्व प्रकारच्या वाङ्मयाचे वाचन करण्याचे अभ्यासक – लेखकाचे वळणही त्यांच्या वृत्तीत आहे. त्यातच सुदैवाने, भारताच्या विविध प्रांतांमध्ये (आणि परदेशातही) राहण्याची जी संधी वेळोवेळी त्यांना मिळत गेली तिचाही त्यांनी हिंदी, बंगाली, गुजराती अशा विविध भाषा शिकून घेण्यासाठी योग्य तो उपयोग करून घेतला आहे. मृणालिनीबाईंच्या या व्यक्तिविशेषांचा लाभ घ्यावा ह्या हेतूने मी त्यांना 'आधुनिक महाराष्ट्राची जडणघडण' या आमच्या पुस्तकमालेतील 'काकासाहेब कालेलकर : 'व्यक्ती आणि कार्य' हे पुस्तक लिहिण्याची विनंती केली आणि त्यांनीही ती उत्साहाने मान्य केली. काकासाहेबांचे कार्यक्षेत्र व्यापक असल्याने आणि त्यांचे लेखनही अनेक भाषांमध्ये झालेले असल्याने, त्यांच्याविषयी लेखन करणारी व्यक्ती बहुभाषिक असण्याची गरजच होती; त्याखेरीज त्यांच्या कार्याचा आणि त्यांच्याविषयी अनेकांनी व्यक्त केलेल्या अभिप्रायांचा परामर्श घेणे शक्य होणार नव्हते. आज असे वाटते की मृणालिनीबाईंनी काकासाहेबांचे लेखन आणि कार्य समजून घेण्यासाठी करावयाच्या प्रयत्नांमध्ये फारशी कसर राहू दिलेली नाही. काकासाहेबांचे प्रदीर्घ काळात आकाराला आलेले विविध क्षेत्रांतील जीवनकार्य त्यांनी आपल्यापुढे या ग्रंथात त्याच्या अनेक परिमाणांसह उभे केले आहे. या पुस्तकामुळे मराठी वाचकांना प्रथमतःच पुष्कळशी समग्रतेने काकासाहेबांची ओळख होत आहे.

आमची विनंती मान्य करून मृणालिनीबाईंनी जे सहकार्य केले त्याबद्दल मी त्यांची मनःपूर्वक आभारी आहे. वेळोवेळी चर्चा करून आणि अधिकाधिक मेहनतीची तयारी दाखवून ग्रंथ दर्जेदार व्हावा याची काळजी त्यांनी घेतली आहे. राज्य मराठी विकास संस्थेचे हे नवे प्रकाशन जिज्ञासू वाचकांच्या अभिरुचीला पटेल असा विश्वास मला वाटतो.

'अर्वाचीन महाराष्ट्राची जडणघडण' या पुस्तकमालेची आखणी राज्य मराठी विकास संस्थेने एक विशिष्ट उद्दिष्ट डोळ्यांपुढे ठेवून केली आहे. ज्यांच्या कर्तृत्वातून, प्रयत्नांतून आणि प्रभावांतून आजचा महाराष्ट्र सामाजिक आणि सांस्कृतिक संदर्भात आकाराला आला आहे अशा व्यक्ती, संस्था आणि विचारप्रवाह यांचा परिचय या मालेतून सर्वसामान्य शिक्षित वाचकांना आम्हांला करून द्यावयाचा आहे. त्यासाठी निश्चित केलेल्या विविध विषयांवर मान्यवर लेखकांकडून जसजशी पुस्तके लिहून हाती येतील तसतशी ती संस्थेकडून प्रसिद्ध केली जातील.

या मालेतील पहिले पुस्तक 'महाराष्ट्र साहित्य परिषद' (म. श्री. दीक्षित) हे महाराष्ट्रातील एका विख्यात साहित्य संस्थेच्या कार्याविषयीचे आहे. दुसरे पुस्तक 'मोरो केशव दामले : व्यक्ती आणि कार्य' (कृ. श्री. अर्जुनवाडकर) हे दामल्यांच्या 'शास्त्रीय मराठी व्याकरणा' ला मध्यवर्ती ठेवून मराठी व्याकरणविचाराची आजवर झालेली वाटचाल सांगणारे आहे. महाराष्ट्राच्या साहित्यिक व शैक्षणिक विश्वात महत्त्वाचे स्थान असणाऱ्या प्रा. गं. बा. सरदारांच्या कार्याची ओळख करून देणारे 'प्रा. गं. बा. सरदार : व्यक्ती आणि कार्य' (हेमंत इनामदार) हे या मालेतील तिसरे पुस्तक आजच प्रकाशित होत आहे. 'काकासाहेब कालेलकर : व्यक्ती आणि कार्य' हे या मालेतील चौथे पुस्तक असून त्याच्यासोबतच, 'बालगंधर्व : व्यक्ती आणि कार्य'

अनुक्रमणिका

(मोहिनी वर्दे) हे पाचवे पुस्तकही प्रकाशित होत आहे. आता या आमच्या पुस्तकमालेला हळूहळू भरीवपण येत चालले आहे असे म्हणता येईल.

‘जडणघडण’ मालेतील सर्व पुस्तकांचे बाह्यांग सारखेच राहणार आहे. तथापि या पुस्तकांचे व्यक्ती, संस्था आणि विचारप्रवाह असे तीन गट असतील आणि त्यानुसार मुखपृष्ठांचे तीन वेगवेगळे रंग राहतील.

**सरोजिनी वैद्य**

अनुक्रमणिका

## मनोगत

‘राज्य मराठी विकास संस्थे’ने आयोजिलेल्या ‘अर्वाचीन महाराष्ट्राची जडणघडण’ ह्या मालिकेत आचार्य काकासाहेब कालेलकर यांचे व्यक्तित्व व कार्य याबद्दल लिहिण्यास डॉ. सरोजिनी वैद्य यांनी मला सुचविले. प्रदीर्घ सेवाव्रती जीवन जगलेले, गांधीवादी विचारांचे प्रवक्ते असणारे आणि राष्ट्रोद्धारासाठी जन्मभर नानाप्रकारची कामे करून मनन, चिंतन, लेखन यांद्वारे मार्गदर्शन करीत राहिलेले काकासाहेब मूळचे मराठी. त्यांचे शिक्षण पुण्यात झालेले. तथापि त्यांचे पुढील सर्व कर्तृत्व महाराष्ट्राबाहेर फुललेले. त्यांचे बहुतेक मूळ लेखनही गुजराती-हिंदीतून झालेले. मराठीत जे लेखन आहे ते प्रामुख्याने अनुवादित. त्यालाही मराठी वाचकांचा भरघोस असा प्रतिसाद लाभलेला नाही; पण अनेक जाणकारांच्या दृष्टीने मात्र ते महत्त्वाचे आणि वैशिष्ट्यपूर्ण असलेले असे असल्याने हे काम मी करावयाचे असे ठरले. पण लेखनाचा विचार करताना पहिला प्रश्न पडला की महाराष्ट्राच्या जडणघडणीत त्यांचे योगदान किती आणि कसे असेल?

त्या दृष्टीने वाचन सुरू करून पहावे म्हटले तर अनपेक्षितपणे पहिली ठेच लागली. मी नव्यानेच पुण्यात आले होते; पुस्तके कुठून मिळवायची? काकासाहेबांचे शिक्षण पुण्यात फर्गसनमध्येच झालेले. त्यांनी स्वतः आपल्या या महाविद्यालयाला स्वतःच्या लेखनकृतींचा पूर्ण संच भेट म्हणून दिल्याचे, काकांच्या शिष्या श्रीमती कुसुम शहा यांच्याकडून कळले होते. परंतु दुर्दैवाने फर्गसनमध्ये आज त्यांचे एकही पुस्तक उपलब्ध होऊ शकले नाही! मग मदतीला आला मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाचा संदर्भ विभाग आणि तेथील वाङ्मयव्यवहारात आस्था असलेले निरलस सेवकवर्ग. काकासाहेबांची बहुसंख्य पुस्तके त्यांनीच मला आपल्या संग्रहातून काढून दिली. पुणे विद्यापीठातील सहायक ग्रंथपाल श्री. फरांदे व श्री. सोनावणे ह्यांनी त्यांच्याकडे असलेली काकासाहेबांची पुस्तके व इतर संदर्भग्रंथ, मी सर्वस्वी नवीन असूनही, अतिशय तत्परतेने उपलब्ध करून दिले. मुंबईच्या ‘मणिभवन’ने देखील सर्वतोपरी साहाय्याचा हात पुढेच ठेवला. ह्या सर्वांची मी मनःपूर्वक ऋणी आहे.

त्यानंतर शोधाशोध सुरू झाली ती काकासाहेबांच्या प्रत्यक्ष सहवासात आलेल्या व्यक्तींची! प्रथम जाऊन भेटले ते काकासाहेबांचे सचिव म्हणून अनेक वर्षे त्यांच्याजवळ राहिलेल्या श्री. श्रीपाद जोशींना. ते स्वतः सतत लेखन-वाचनात मग्न असतात; तरीही त्यांनी मला भरपूर वेळ दिला. आपल्याजवळची माहिती व पुस्तके दिली, अनुभव सांगितले. वेळोवेळी विचारलेल्या माझ्या शंकांना, प्रश्नांना मनमोकळी आणि सविस्तर उत्तरे दिली. माझ्या मनातील काकासाहेबांच्या व्यक्तिचित्रात विविध रंग भरून ते चित्र अधिक स्पष्ट व उठावदार करण्यात मोठे साहाय्य केले. न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी यांनी एक मनमोकळी मुलाखत दिली. त्यामुळे काकासाहेबांवरील काही आक्षेपांची दुसरी बाजू जाणून घेण्यास मदत झाली. जवळचे एक-दोन संदर्भग्रंथ देखील त्यांनी वाचावयास दिले. त्यांच्या भेटीत काकासाहेबांच्या तत्वचिंतक, अध्यात्मिक वृत्तीचा, नैष्ठिक व सात्त्विक जीवनसरणीचा वारसाच जणू अनुभवायला मिळाला. दुसरे महत्त्वाचे म्हणजे त्यांनी, काकासाहेबांची मानसकन्या सरोजबेन नानावटी ह्यांच्याशी माझी भेट घडवून दिली. त्या वृद्ध झालेल्या. स्मरण सुटत चाललेले. पण त्यांनी त्यांच्या सहकारी इंदुताई टिकेकरांच्या मदतीने काकांच्या काही महत्त्वाच्या आठवणी सांगितल्या. त्यांच्या रूपाने मला काकांच्या अस्तित्वाचा आभासात्मक का होईना आनंद मिळाला. दुर्दैवाने त्यानंतर थोड्याच दिवसात त्या दिवंगत झाल्या.

अनुक्रमणिका

काकासाहेबांचे एक वयोवृद्ध अनुवादक श्री. भाऊ धर्माधिकारी यांनाही मी भेटले. त्यांना काकासाहेबांच्या फारशा आठवणी नसल्या तरी त्यांनी पुण्याचे एक वयोवृद्ध गांधीवादी कार्यकर्ते कांतीभाई परीख ह्यांचा परिचय करुन दिला. कांतीभाईंनी काकांच्या भेटीचा स्वतःवरील प्रभाव तर रंगवून सांगितलाच, पण मुख्य म्हणजे काकांची दुसरी मानसकन्या आलूबेन ड्रायवर ह्यांचा स्नेह जुळवून दिला. तिच्या स्मृतीतील काकासाहेबांचे चित्र तर अतिशय लोभसवाणे होते. काकांचे एक सहकारी श्री. भाई धोत्रे यांच्या पत्नी श्रीमती अक्का धोत्रे व वर्ध्यातील काकावाडी समोरील महिलाश्रमात पस्तीस वर्षे संचालिका म्हणून काम केलेल्या श्रीमती वत्सलाबाई थत्ते ह्या दोघींचे पत्ते नाशिकचे श्री. अशोक टिळक यांच्याकडून मिळाले. त्या दोघीही काकासाहेब, तसेच त्यांच्या मानसकन्या सरोजबेन व रैहाना तय्यबजी ह्यांच्या सहवासात राहिलेल्या आहेत. मी त्यांना जाऊन भेटले. त्यांची काकासाहेबांविषयीची संस्मरणे अजूनही ताजी आहेत. काकासाहेबांच्या दिल्लीतील ‘सन्निधी’ मधील सध्याच्या उत्तराधिकारी श्रीमती कुसुम शहा यांनी काकासाहेबांची छायाचित्रे, पुस्तकांची यादी व इतर माहिती आनंदाने उपलब्ध करून दिली.

काकासाहेबांचे एक अत्यंत निकटचे अनुयायी श्री. रवींद्र केळेकर ह्यांनी पत्रलेखनाचा कंटाळा असूनही मला सविस्तर पत्र पाठवून जी हवी होती ती माहिती पुरवली. शंकानिरसन केले, ते केवळ काकासाहेबांवरील अनन्य भक्ती व प्रेमामुळेच! त्यांच्या काकासाहेबांवरील दोन पुस्तकांचा मला या लेखनात खूपच उपयोग झाला आहे.

प्रसिद्ध कवी कै. बा.भ.बोरकर काकासाहेबांचे अनुयायी होते,काही अंशाने स्नेहीही.दोघेही गांधीभक्त. बोरकरांच्या अप्रकाशित आत्मवृत्तात काकासाहेबांच्या सहवासातील काही संदर्भ नक्कीच असणार, म्हणून मी त्यांची कन्या श्रीमती पद्मा वज्रम् यांच्याशी संपर्क साधला. त्यांनी त्यांच्या गोव्यातील बहिणीकडून मला संबंधित लिखाण तत्परतेने उपलब्ध करून दिले.

प्रसिद्ध कवी श्री. मंगेश पाडगावकर व प्रसिद्ध ललितगद्य लेखक श्री.रवींद्र पिंगे यांनी भेटीत काकासाहेबांच्या काही आठवणी सांगितल्या; तसेच काकासाहेबांचे आपल्यावरील ऋणही प्रांजळपणे व्यक्त केले.

ह्या सर्व मंडळींनी त्यांच्या जवळ काकासाहेबांच्या संदर्भातील लहान-मोठ्या अनुभवांचे जे काही संचित होते ते मोकळेपणाने समोर ठेवले. ह्या सर्वांशी झालेल्या गप्पांमधून, काकासाहेब व त्यांचा काळ ह्याबाबतच्या माझ्या पुस्तकी आकलनाला जिवंतपणाचा स्पर्श झाला आणि परिणामतः मला काकासाहेबांचे महाराष्ट्रावरील, मराठी भाषेवरील व साहित्यावरील ऋण हळूहळू उलगडत गेले.

माझी मैत्रीण व महिला विद्यापीठातील गुजराती विभागप्रमुख प्रा. नलिनी मांडगावकर यांनी काकासाहेबांच्या साहित्यावरील गुजरातीतील समीक्षेची पुस्तके मला मिळवून दिली. तसेच माझे महाविद्यालयातील सहकारी प्रा. विवेक जोग यांनी हे लेखन साक्षेपाने वाचून काही बहुमोल सूचना केल्या. डॉ. सरोजिनी वैद्य व श्री. वसंत आबाजी डहाके यांनी पूर्ण हस्तलिखित बारकाईने वाचून काही बहुमोल सूचना केल्या. त्या लक्षात घेऊन मी पुनर्लेखन केले. नवी भर घातली.

वरील सर्वांचे ऋण मोकळेपणाने मान्य करण्यात मला मनःपूर्वक आनंद होत आहे.

अनुक्रमणिका

या साऱ्या धडपडीत मला व्यक्तिशः खूप वाचनानंद मिळाला. काकासाहेबांच्या ‘हिमालयातील प्रवास’ ह्या पुस्तकाने प्रवासाची गोडी लावली होती. तेव्हापासून ते आवडते लेखक बनलेले. त्यावेळी झालेल्या धावत्या वाचनातून आवडून गेलेला हा लेखक या लेखनाच्या निमित्ताने मनसोक्त भेटला. दर भेटीत मनात आनंदाची व आदराची नवनवी परिमाणे उलगडत गेली. ‘काकासाहेब म्हणजे गुजराती साहित्याचा मानदंड आहे,’ असे म्हणणारा गुजराती मित्र भेटला की मला आतून अभिमानाचे भरते येते. तर्कशुद्ध आणि भावनिक अशा दोन्ही अंगांनी कालेलकर जेव्हा सर्व भारतीय भाषांचा ‘मायबोली’ म्हणून ठामपणे पुरस्कार करतात तेव्हा आपलाही भाषिक आत्मविश्वास वाढतो.

माझ्यासारखेच काकासाहेबांचे इतरही अनेक मराठी चाहते असणार याची मला खात्री आहे. आज हे पुस्तक वाचकांपुढे ठेवतांना मला विश्वास वाटतो की, हे वाचून अन्य वाचकांना पण काकासाहेबांचे महाराष्ट्राशी असलेले आंतरिक नाते जाणवेल. काकासाहेब आपले लेखक आहेत असे ते मानू लागतील आणि काकासाहेबांच्या ‘आनंदयात्रे’चा अभिमानाने अनुभव घेऊ शकतील.

मराठी रसिकांच्या मनात या उपेक्षित पण थोर मराठी साहित्यिकाला रास्त असे मानाचे स्थान मिळू शकले तर माझ्या धडपडीचे सार्थक होईल.

- **मृणालिनी जोगळेकर**

अनुक्रमणिका

## पार्श्वभूमी

एकोणिसावे शतक हे भारताच्या इतिहासातील संक्रमण शतक म्हणून ओळखले जाते. १८१८ मध्ये ब्रिटिश सत्ता भारतात दृढमूल झाली. इंग्रजी शिक्षण व इंग्रजी वाङ्मयातून पाश्चात्य आचारविचार व संस्कृती यांचा परिचय सुशिक्षितांना होऊ लागला. त्यातून सुरू झालेल्या पौर्वात्य व पाश्च्यात संस्कृतींच्या अभिसरणाने येथील समाजजीवनात अनेक पातळ्यांवर अनेक अंगानी परिवर्तन सुरू झाले.

सुरुवातीचा काळ पराभूत भावनेतून आलेल्या न्यूनगंडाचा काळ होता. ब्रिटिशांचे रंगरूप, शौर्य, शिस्त, वैज्ञानिक प्रगती, राज्यकारभारकुशलता इत्यादींमुळे लोक भारावून जाऊन त्यांना देवदूतच मानू लागले होते. परंतु लवकरच विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या ओजस्वी निबंधमालेने, न्यायमूर्ती रानड्यांच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक, औद्योगिक अशा सर्व आघाड्यांवरील प्रगतीच्या डोळस प्रेरणेमुळे, क्रांतिकारकांच्या तळपत्या देशप्रेमाने, समाजाचे आत्मभान जागे होऊ लागले. १९ व्या शतकाच्या अखेरीस लोकमान्य टिळकांच्या जाज्वल्य राष्ट्रवादाने समाज स्वातंत्र्याकांक्षेने पेटून उठला.

ह्याच कालखंडात, तशाच राष्ट्रहिताच्या जाणिवेने व स्वातंत्र्याच्या उर्मीने भारलेला, पण थोडा सौम्य, विवेकी सूर राजकारणात व समाजजीवनात स्वतःचे वेगळे अस्तित्व दाखवीत होता; तो होता न्या. रानडे. ना. गोपाळ कृष्ण गोखले आदी सुधारकांचा. त्यांची सामोपचाराची समतोल भूमिका काही तरुणांना भावत होती. नवविचारांचे, नवचेतनेचे, नवयुगाचे वारे ह्या तरुणांना झपाटून टाकत होते.

थोडक्यात, जहाल व मवाळ अशा नावाने दोन प्रभावी परंपरा एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्राच्या समाजजीवनात प्रभावीपणे कार्यरत होत्या. अशा या नवजागरणाने भारलेल्या कालखंडात वेगवेगळ्या क्षेत्रात अनेक थोर व्यक्ती उदयास आल्या. त्या साऱ्यांचा आधुनिक भारताच्या जडणघडणीत महत्त्वाचा सहभाग आहे. ह्या राष्ट्रशिल्पकारांच्या प्रभावळीत आचार्य काकासाहेब कालेलकरांचे वैशिष्ट्यपूर्ण स्थान स्वतंत्रपणाने लक्षात घ्यावे असे आहे.

१९२० मध्ये लो. टिळकांचे देहावसान झाल्यावर राजकरणाच्या क्षितिजावर महात्मा गांधींचा उदय झाला. त्यांच्या अभिनव अशा जीवनदृष्टीमुळे राजकारणाला वेगळे परिमाण लाभले. जहाल पंथ हळूहळू मागे पडला आणि रानडे-गोखले ह्यांची विचारधारा गांधी तत्त्वज्ञानाच्या मुशीतून नवे रूप घेऊन राजकीय मंचावर एक अननुभूत नाट्य साकारू लागली. गांधीजींच्या प्रभावामुळे अवघा भारत ह्या नव्या प्रयोगात सामील झाला. राजकारणाच्या जोडीने समाजपरिवर्तनासाठी विधायक कार्ये धडाक्याने सुरू झाली. देशहितार्थ तुरुंगात जाण्याला विरोध होण्याऐवजी त्याचे स्वागत होऊ लागले.द्वेषाऐवजी अद्वेषाची,सहकाराऐवजी असहकाराची नीती वाढू लागली. जनतेची निर्भयता वाढली. संघाटनात्मक कार्य प्रभावी व गतिशील बनले. खादीप्रसार, हरिजनोद्धार, ग्रामोद्धार, श्रमप्रतिष्ठा या कार्यक्रमांतून लोकांमध्ये चैतन्य निर्माण झाले. राजकारणाची सूत्रे गांधीजींनी हाती घेतली आणि त्यांनी खऱ्या अर्थाने राजकारण सामान्य जनतेपर्यंत पोहोचवले. निरपवादपणे ह्यानंतरच्या काळाचे युगपुरुष गांधीजीच ठरले. जीवनकलेच्या सत्य व अहिंसा ह्या दोन अभिन्न बाजू आहेत असे त्यांनी मानले. ह्या दोन व्यापक तत्त्वांचा भक्कम आधार त्यांच्या संपूर्ण राजकीय, सामाजिक, आर्थिक व नैतिक जीवनदृष्टीला लाभला होता. गांधाजींच्या ह्या कार्यप्रवासात काकासाहेब कालेलकर हे त्यांचे

अनुक्रमणिका


प्रथमपासूनचे सहकारी होते. सुरुवातीला गांधीविचारांकडे चिकित्सेने बघणारे काकासाहेब, पुढे गांधीजीवनदृष्टीचे मूलग्राही आकलन झाल्यावर तिचे भक्त बनून गेले.

त्यामुळे आज काकासाहेब गांधीविचाराचे महान प्रवक्ते व विचारवंत भाष्यकार म्हणूनही ओळखले जातात. सर्वात जुने व जाणते गांधीवादी असा त्यांचा उल्लेख होतो.

पण हा झाला त्यांच्या बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचा एक पैलू. ह्याव्यतिरिक्त प्रतिभावंत व शैलीदार लेखक, समन्वयसंस्कृतीचे उद्गाते, राष्ट्रभाषेचे डोळस व कुशल प्रचारक, एक निसर्गवेडे परिव्राजक अशा अनेक रूपांनी ते सुशिक्षित भारतीय माणसाच्या मनावर आपला ठसा उमटवून आहेत.

काकासाहेब कविमनाचे व कलात्मक वृत्तीचे असल्याने ते जीवनातील सर्वप्रकारच्या घटना, प्रसंग, घटकवस्तू यांच्याकडे रसिकवृत्तीने पाहू शकत; त्यांतील मर्म व सौंदर्य पकडू शकत. त्याचबरोबर ते तत्त्वज्ञानाचेही विद्यार्थी असल्यामुळे सर्व गोष्टींचा व्यापक व मूलगामी वेध घेऊ शकत. काकासाहेबांचे जीवन हे संवेदनशील व्यक्तीच्या झालेल्या आंतरिक विकसनाचे उत्तम उदाहरण आहे; तसेच ते परार्थ प्रवृत्ती व आनंदमय निवृत्तीच्या ऊन-सावलीच्या खेळाचे मनोज्ञ दर्शन घडविणारेही आहे.

अनुक्रमणिका



**दत्तात्रय बाळकृष्ण उर्फ काकासाहेब कालेलकर**
१८८५-१९८१

[अनुक्रमणिका]

# १.
# बालपण

काकासाहेबांचे पूर्ण नाव दत्तात्रय बाळकृष्ण कालेलकर. त्यांचा जन्म १ डिसेंबर १८८५ रोजी सातारा इथे झाला. त्यांच्या पूर्वजांचे मूळ आडनाव राजाध्यक्ष होते. गोव्याच्या उत्तर सीमेजवळील सावंतवाडी संस्थानातील कालेली नामक छोट्याशा गावात त्यांच्या अनेक पिढ्यांनी वास्तव्य केल्यामुळे त्यांचे कुटुंब पुढे कालेलकर या आडनावाने ओळखले जाऊ लागले. संस्थानातील अंदाधुंद कारभार व घरातील आर्थिक ओढगस्तीची अवस्था या कारणांमुळे बाळकृष्ण कालेलकरांनी बेळगाव येथे स्थलांतर केले. तेथे त्यांनी इंग्रजी शिक्षण घेतले. त्यामुळे पुढे ते सातारच्या जिल्हाधिकाऱ्यांचे प्रमुख लेखापाल झाले. सामान्यत्वे त्याकाळी सारस्वत माणसे व्यापार व सावकारी करीत असत. त्या तुलनेत सरकारी नोकरीत सन्मानाने स्थिरावलेल्या बाळकृष्णपंतांना खूप मान मिळत असे. बाळकृष्णपंत व त्यांच्या पत्नी दोघेही धार्मिक वृत्तीचे होते. त्यांची जीवनसरणी शुद्ध, पवित्र व सदाचरणाची होती. घरात व्रतवैकल्ये, यात्रा, उत्सव, कुलाचा, कुलधर्म यांचे अत्यंत कसोशीने पालन केले जाई.

बाळकृष्णपंतांना सात मुलगे व एक मुलगी होती. या सर्व भावंडांची व्यक्तिमत्वे, रुची, छंद अगदी वेगवेगळे होते. आचार्य काकासाहेब कालेलकर हे नामाभिधान प्राप्त झालेला दत्तात्रय उर्फ दत्तू हा त्यांचा धाकटा मुलगा. बालपणीच आईवडिलांच्या धर्माचरणाचा चांगला संस्कार त्याच्या मनावर झाला.

दत्तू घरात सगळ्यात धाकटा असल्याने तसा सर्वांचा लाडका होता. तथापि वडील भावंडांची दादागिरी फार चाले. त्यामुळे तो भावांपासून जरा अलगच राहत असे. स्वतःच्या उद्योगात रमणे किंवा वडिलांबरोबर फिरतीला जाणे तो अधिक पसंत करीत असे. कामानिमित्त बाळकृष्णपंतांना कोकण, कारवार परिसरात बरेच फिरावे लागे. तो सारा परिसर निसर्गसौंदर्याने नटलेला होता. दत्तू पण वडिलांसोबत खूप भटकत असे. त्यामुळे लहानपणापासून त्याला डोंगर, नद्या, पशुपक्षी, वृक्षवेली,भरती-ओहोटी, ऋतूंची बदलती रूपे ह्यांचे जवळून दर्शन झाले. ह्याचा त्याच्या मनावर फार मोठा संस्कार झाला. त्यातूनच निसर्गवेड व प्रवासप्रेम त्याचात रुजत गेले.

आपल्या एकुलत्या एका वडील बहिणीवर- अक्कावर- त्याचा फार जीव होता. तिनेच त्याला लिहा-वाचायला शिकवले. पण पुढे दुर्दैवाने ती लवकरच विषमज्वराने वारली. आपल्या 'स्मरणयात्रेत' काकासाहेब म्हणतात. "मनुष्याचे आईशी नाते असाधारण असते. पत्नीचे नाते एकमेवाद्वितीय – मुलीचे नाते वैशिष्ट्यपूर्ण. पण जे नाते सहजपणे व्यापक होऊ शकते, ज्यात साऱ्या स्त्रीजातीचा अंतर्भाव होऊ शकतो, असे नाते भावाबहिणीचे. पण माझ्या आयुष्यात ही उणीव राहून गेली. (बहीण नसल्याने नव्यानव्या बहिणी मला जोडता आल्या नाहीत.) मन सदैव बहिणीच्या प्रेमासाठी भुकेलेच राहिले."

एकुलती एक मुलगी गेल्याने आईला अपरंपार दुःख झाले. तिचे दुःख हलके व्हावे म्हणून दत्तू आईच्या भोवती भोवती राही. आक्काची उणीव भासू नये म्हणून तिला घरकामात मदत करीत असे. ह्या परोपकारी मातेचा त्याच्यावर खूप प्रभाव होता. तिच्यामुळेच त्याच्या मनात वडिलांविषयी नितांत आदर व श्रद्धा निर्माण झाली होती. तो वडिलांची मनोभावे सेवा करायचा. पुढील आयुष्यात अज्ञेयवाद स्वीकारला तरी वडिलांच्या श्रद्धापूर्ण व्यक्तिमत्वाचा प्रभाव मनात कुठेतरी राहून गेला होता. "आपण अनाथ नाही. कुणी

सर्वसमर्थ शक्ती आपली देखभाल करते आहे. आपल्याला काय चांगले काय वाईट हे तिला कळते. एखादी घटना वरवर अनिष्ट व दुःखदायक वाटली तरी ती तशीच असेल असे नाही"- ही वडिलांची धारणा त्याच्या मनावर खोल ठसा उमटवून गेली होती. त्यामुळेच की काय, पण पुढील जीवनात दुःखाचे अनेक प्रहार झेलावे लागले तरी कधी हताश वाटले नाही. त्याची ही श्रद्धा वाढत्या वयाबरोबर अधिक सखोल होत गेली. त्याचा आणखी एक परिणाम म्हणजे त्या परमसत्तेजवळ त्याने कधीही सकाम प्रार्थना केली नाही. तो सर्व जाणणारा आहे. तो जे करतो ते भल्याकरताच, ही श्रद्धा त्याने ठेवली. 'ही श्रद्धा अभंग ठेव'- हेच देवाजवळ त्याचे मागणे असे.

मोठ्या भावांची लग्ने झाली. भावजया घरात आल्या. त्यांच्याशी तो मिळून मिसळून वागत असे. भावजयींचा माहेरचा ओढा, नवऱ्याचा धाक, घरात दबून राहणे या गोष्टी तो पाहत, अनुभवत होता. "कौटुंबिक जीवन एकापरी स्वर्ग आहे आणि दुसऱ्या बाजूने अखंड चालणारी अंतविहीन कारुणिका आहे हे मला लहानपणीच कळून चुकले," असे दत्तूने पुढे लिहिले आहे.

आपल्या या धारणेविषयी गांधीवादी समाजसेवक पुंडलिकजी कातगडे ह्यांच्या एका प्रश्नाला उत्तर देताना काकासाहेब लिहितात, "लहानपणी मी स्वतः बरेच सहन केले असल्याने माझ्यामध्ये सहानुभूतीची मात्रा वाढली. उदा. स्त्रियांचे जीवन परस्वाधीन असते. आईबाप, सासूसासरे, दीरनणंदा, सर्वांची कुरघोडी त्यांना सहन करावी लागते. यामुळे त्यांची स्थिती कशी होत असेल याची बरोबर कल्पना येऊन त्यांच्याविषयी सहानुभूती वाढली. मी सर्वात लहान असल्यामुळे, 'ह्याला काय कळतंय', असे वाटून माझ्यासामोर सर्व मंडळी मोकळेपणाने बोलत. त्याने एकूण मानवी संबंधांची माझी समज वाढून लहानपणीच आंधळ्या उत्साहाची भूमिका सुटली. अकाली पोक्तपणा आला. पोरकटपणा असा कधी मला शिवलाच नाही." पुढे स्वतःच्या संसारातही ते काहीसे अनासक्त राहिले, त्याला ही धारणाच कारणीभूत असावी.

बाळकृष्णपंत वृत्तीने निवृत्तिपरायण होते. त्यांच्याकडे लोकांचे जाणेयेणे कमीच असे. साताऱ्याला सारस्वत समाजही खूप कमी होता.त्यामुळे दत्तूला लहानपणापासून लोकांमध्ये मिसळण्याचा सराव झाला नाही. तशात मनाने तो खूप हळवा. कुणी काही बोलले की त्याला खूप दुःख होई. त्यामुळे तो थोडा एकलकोंडा होत गेला. "आजसुद्धा सार्वजनिक समारंभात लोकांत मिसळताना मी अवघडून जातो. अपरिचित लोकांत मी अस्वस्थ असतो. मला समजू शकतात त्यांच्याजवळ मी मोकळा होतो. ज्याला सार्वजनिक सेवा करायची त्याला ही एक मोठी उणीवच मानायला हवी." असे पुढे एकदा त्याने लिहिले आहे. ही उणीव असूनही दत्तूने पुढे आपले पूर्ण आयुष्य राष्ट्रसेवा, राष्ट्रभाषासेवा, राष्ट्रशिक्षणसेवा अशा सामाजिक कार्यांना वाहिले. पण या एकलकोंडेपणाचा एक चांगला परिणाम असा झाला की त्याची दबलेली अंतःशक्ती कल्पकतेच्या रूपाने विकसित होत गेली.

"लहानपणी प्रेम, प्रसन्नता, मोकळेपणा ही अधिक हवी असतात. त्या वेळी माझेवर एक दडपण पडले गेले. बाह्य विकास बराचसा खुरटला. वृत्ती आतला अवकाश शोधू लागल्या. आत्मविश्वासाचे मातेरे झाले. पण त्याचबरोबर शांतपणे निरीक्षण करण्याची व तटस्थपणे निर्णय बांधण्याची सवय लागली. प्रत्यक्ष बऱ्याच गोष्टी करता न आल्याने मानस पराक्रम, मानस प्रयोग, मानस योजना वगैरे गोष्टी वाढल्या. जीवनाचा मोठा भाग मानसिक क्षेत्रात विकास करण्यात जाऊ लागला. त्यामुळे सृष्टीसौंदर्याकडे माझे अंतर्मुख मन चटकन आकर्षित होत असे. आजोळच्या गावाजवळून वाहणाऱ्या मार्कंडी नदीच्या घाटावर बसून, गार झुळुका अंगावर

अनुक्रमणिका

घेत, प्रवाहाकडे एकटक बघत बसण्यात, तिच्याशी गप्पा मारण्यात माझे कल्पक मन रममाण होत असे...” असे पुढे त्याने लिहिले आहे.

उंच पहाड, किल्ले, मंदिरे, रात्रीचे आकाश पाहण्यात, त्यांच्याशी काल्पनिक संवाद साधण्यात तो तास न् तास घालवीत असे. ह्या निसर्गवेडामुळेच दत्तूने पुढे पुष्कळ प्रवास केला, प्रवासवर्णनपर लेखन केले. त्याचा आणखी एक परिणाम त्याच्या वृत्तीवर झाला.

“निर्दोष आनंद लुटण्याची कला अशा प्रकारे मला लाभली. नदीचे पूल, घाट, जहाज पाहताना मनुष्य आणि प्रकृती यांचे सख्य माझ्या मनावर कोरले गेले, म्हणूनच पूर, भूकंप, जंगलातील आगी, वादळे ह्याने माझे मन दबकून जात नाही. प्रत्येक प्रसंगाशी एकरूप होऊन त्याची मस्ती मी अनुभवू शकतो. लहानपणी सृष्टिनिरीक्षण व नवनवे अनुभव यांच्या आवडीने प्रवासाची गोडी होती. मोठेपणी ह्या वृत्तीत समाजनिरीक्षण, तीर्थयात्रा, स्थापत्याच्या निरीक्षणाची गोडी, वगैरेची भर पडत गेली.” अशी नोंद ‘स्मरणयात्रे’त त्यांनी केलेली आहे.

वडिलांच्या सततच्या बदल्यांमुळे दत्तूला प्रवासाचा व निसर्गदर्शनाचा लाभ झाला खरा, पण त्याच्या शिक्षणात सतत बदल होत गेले. सावनूर, सावंतवाडी, सातारा, शहापूर, कारवार, धारवाड आदी अनेक गावांत एकेक इयत्ता करत त्याने शालेय शिक्षण पूर्ण केले. ह्या साऱ्या शाळांमध्ये कारवारच्या आदर्शवादी युवकांनी चालवलेल्या ‘हिंदू स्कूल’ चा त्याच्यावर फोर मोठा प्रभाव पडला. तेथील वामनराव दुभाषी, हरी कामत व मास्टर विठ्ठल ह्या तीन आदर्शवादी शिक्षकांचा तर त्याच्या घडणीवर खूपच प्रभाव पडलेला दिसतो. ह्या तिघांनाही विद्यार्थ्यांत रस होता. हरी कामतांमुळे त्याचा इंग्रजीचा पाया पक्का झाला. मुलांच्या नैतिक शिक्षणाकडे पण त्यांनी लक्ष दिले. शाळांतून स्पर्धेचे वातावरण कमी करून सहकार्याचे वातावरण उभे करण्यावर त्यांचा भर असे. वामनराव दुभाषी यांच्यामुळे इंग्रजी कवितेची गोडी निर्माण झाली आणि श्रमप्रतिष्ठेचे तत्त्व व समाजसुधारणेचे विचार त्यांनीच त्याच्या मनावर बिंबवले. वामनराव दुभाषी हे श्रेष्ठ लेखक पु. ल. देशपांडे यांचे आजोबा. पु. लं.नी आपल्या आजोबांचे सुरेख व्यक्तिचित्र ‘ऋग्वेदी’ या शीर्षकाने रेखाटले आहे. वामनरावांचा काकासाहेबांशी नंतरच्या काळातही संबंध टिकून होता. वामनरावांनी ‘गीतांजली’ चे अभंगरूप भाषांतर केले होते व काकासाहेबांनी त्याला प्रस्तावना लिहिली.

दत्तू लहानपणापासून खूप अभ्यासू होता असे नाही. पण जेव्हा अभ्यास करत असे तेव्हा तो मन लावून करीत असे. त्यामुळे तो सतत चांगल्या तऱ्हेने उत्तीर्ण होत गेला. शालेय जीवनापासूनच त्याला वाचनाचाही छंद लागला होता. ज्यातून आनंद मिळतो ते ते वाचायचे. परीक्षा, मार्क, स्कॉलरशिप ही ध्येये त्याने आपल्यापुढे कधीच ठेवली नव्हती.

अशा तऱ्हेने शालेय शिक्षणाच्या जोडीने मनःपूर्वक केलेले वाचन व संवेदनशीलतेने घेतलेले प्रवासानुभव ह्यामुळे वयाच्या अठराव्या वर्षापर्यंत इतर मुलांच्या तुलनेत दत्तू भरपूर अनुभवसमृद्ध झाला होता. त्याच्या वडिलांना पण शालेय शिक्षणाइतकेच ह्या अनुभव- शिक्षणाचे महत्व वाटत असल्याने, त्यांनी त्याला आपल्याबरोबर हिंडवण्यात शाळेचा बाऊ कधीच केला नाही.

अनुक्रमणिका

अशा तऱ्हेने दत्तू आपल्या जीवनयात्रेसाठी उचित पाथेय आपल्या वैयक्तिक जीवनात सिद्ध करत होता. त्यावेळी देशाच्या कानाकोपऱ्यात देशभक्तीचे वारे वेगाने वाहू लागले होते. त्याचेही तीव्र संस्कार त्याच्यावर होत होते. खरे तर त्याच्या घरात म्हणावे तसे देशप्रमाचे वातावरण नव्हते. वडील इंग्रज सरकारच्या नोकरीत होते. खाल्ल्या अन्नाला जागायचे, इमानेइतबारे सेवा करायची, ह्या संस्कारांचा त्याच्या मनावर पगडा होता.

पण घराबाहेरचे वातावरण देशप्रेमाच्या भावनेने धगधगलेले होते. लोकमान्य टिळकांनी गणेशोत्सव आणि शिवजयंती उत्सव सुरू करून, तरुण पिढीला राष्ट्रप्रेम व पारतंत्र्याविषयी चीड निर्माण करणाऱ्या कार्यक्रम-भाषणांची पाणपोई उघडून दिली होती. शिवाजीराजांच्या पराक्रमकथा तर तरुण पिढीला प्रेरणास्तोत्रच बनल्या होत्या. दत्तूच्या मनातही ह्या वातावरणामुळे देशभक्तीची भावना अंकुरली. आपल्या मित्रमंडळीत तो शिवाजी महाराजांवर भाषणे देऊ लागला.

ह्याच काळात पुण्यात प्लेगच्या निमित्ताने इंग्रजांनी केलेल्या जुलुमाविरुद्ध लोकमान्य टिळकांनी जनमत पेटवले होते.शिवाजी महाराजांच्या खालोखाल लोकमान्य टिळक हे लोकांच्या आदराचे व प्रेरणेचे अधिष्ठान बनले होते.

दत्तूच्या मनावर ह्या वातावरणाचा पगडा बसून तो पण टिळकभक्त बनला. त्याच्या मनातील देशभक्तीचे अंकुर जोम धरू लागले. आता नुसत्या भाषणबाजीने भागणार नाही. आपणही काहीतरी कृती केली पाहिजे असे त्याला वाटू लागले. त्यासाठी आपल्या दोन भावांना घेऊन त्याने एक गुप्तमंडळ स्थापन केले. घराच्या खोदकामात सापडलेली तलवार त्याने मोठ्या उत्साहाने देवीचा प्रसाद मानून जवळ ठेवली. पण वडिलांच्या हे लक्षात येताच सरकारी भयाने त्यांनी ती मोडून त्याच्या सुऱ्या बनवून टाकल्या. त्यावेळी त्याला फार वाईट वाटले. आपल्या पवित्र कामात जणू हा अपशकूनच घडला असे वाटले. पुढे महात्मा गांधीच्या प्रभावाखाली आल्यावर अशा हिंसात्मक देशभक्तीपासून दत्तू दूर गेला; पण ह्यावेळी क्रांतिकारकांच्या उत्कट देशप्रीतीने भारावण्याचेच त्याचे वय होते. तशात त्या वेळी त्यांच्या घरातील एक मुलगा प्लेगने मरण पावला. त्याची खबर सरकारी अधिकाऱ्यांना दिली नाही म्हणून वडिलांचा त्यांच्या गोऱ्या साहेबाने अपमान केला. दत्तू त्यावेळी तेथेच होता. त्याचे पितृभक्त मन वडिलांच्या ह्या अपमानाने डिवचले गेले व राज्यकर्त्यांना ह्या देशातून घालवून टाकायचा निश्चय त्याच्या मनाने केला.

एव्हाना त्याचे वय सोळाच्या उंबऱ्यावर पोहोचले होते. त्या काळच्या प्रथेनुसार घरात त्याच्या लग्नाविषयी बोलणी सुरू झाली. देशभक्तीने भारलेल्या त्या वातावरणात लग्नाचे विचार त्याला सुरुवातीला रुचले नाहीत. पण घरच्यांचा आग्रहाचा रेटा वाढत होता. वयात येणाऱ्या त्याच्या अन्तर्मनाला पण हळूहळू तारुण्यसुलभ अस्वस्थता जाणवू लागली होती. १९०२ मध्ये वयाच्या सतराव्या वर्षी इंग्रजी सहावीत असताना त्याचा विवाह शिरोडकर कुटुंबातील 'सुंदर' नावाच्या मुलीशी झाला. लग्नानंतर ती लक्ष्मीबाई कालेलकर झाली. लग्नामुळे येणाऱ्या जबाबदारीने त्याच्यात परिवर्तन झाले. आपण आता पूर्वीचे उरलो नाहीत, समाजाचे एक जबाबदार घटक बनलो आहोत ही भावना त्याच्या मनात रुजली. मात्र देशभक्तीचे विचार मनात अविचल होते.

अनुक्रमणिका

पुढच्या वर्षी तो मॅट्रिक व स्कूल फायनल अशा दोन्ही परीक्षांना बसला व उत्तम तऱ्हेने उत्तीर्ण झाला. त्या काळी ही परीक्षा मुंबई विद्यापीठ घेत असे. पुढील वर्षापासून (१९०४) ही परीक्षा विद्यापीठाने बंद केली. त्या काळी ह्या परीक्षा फार कठीण समजल्या जात व हुशार मुलेच दोन्ही परीक्षांना बसत असत.

मॅट्रिक झाल्यावर पुण्याला जाऊन इंजिनिअर बनण्याचे स्वप्न तर दत्तू केव्हापासून पाहत होता. त्या काळी पुणे हे विद्येचे माहेरघर मानले जाई. तशात टिळकांच्या कर्तुत्वाने भारलेले ते शहर ही देशसेवेसाठी योग्य कर्मभूमी आहे असे त्याला वाटत होते. पण तिथे शिकायला गेलेल्या त्याच्या मोठ्या भावंडानी शिक्षणात फारशी प्रगती न केल्याने आता पुन्हा दत्तूला पुण्याला पाठवायला वडील फारसे उत्सुक नव्हते. पण आपला मुद्दा तर्कशुद्धपणे दुसऱ्याला पटवून देण्याचे कौशल्य उपजतच अंगी असल्याने दत्तूने आपण उत्तम यश मिळवून दाखवू ही हमी वडिलांना दिली व पुण्याला शिक्षणासाठी जाण्यास त्यांची अनुमती मिळवली.

ज्या दिवशी तो पुण्याला कॉलेजात जाण्यासाठी निघाला त्याच दिवशी बाळकृष्णपंत तीन लाख रुपयांच्या प्रॉमिसरी नोटा संस्थानासाठी विकत आणायला पुण्याला निघाले होते. त्या वेळी घडलेला प्रसंग व त्यातून दत्तूला जन्मभरासाठी मिळालेले 'पाथेय' पुढे त्याने 'स्मरणयात्रे'त शब्दांकित केले ते त्याच्याच शब्दांत वाचण्यासारखे आहे. त्यावेळी त्याने,ह्या नोटांच्या खरेदीत थोडी चलाखी दाखवली तर मधल्यामध्ये बराच नफा कमावता येईल, असे वडिलांना सुचवले होते ती ही घटना आहे.

'वडिलांनी माझे म्हणणे शांतपणे ऐकून घेतले. मला वाटले, वडील माझ्या सूचनेचा विचार करीत आहेत. थोड्या वेळाने सद्‌गदित होऊन म्हणाले, 'दत्तू, मला वाटले नव्हते तुझ्यात असली हीनता असेल. ह्याचा अर्थ हाच ना की मी माझ्या अन्नदात्याला फसवावे? धूळ पडो तुझ्या शिक्षणावर. लक्ष्मी आज आहे आणि उद्या नाही. मेल्यावर देवासमोर उभा राहीन त्या वेळी काय जबाब द्यावा?... शिकून सवरून असेच करणार ना? त्यापेक्षा येथूनच घरी गेलास तर काय वाईट?' ऐकून मी गार झालो. मनाशी खूणगाठ बांधली की हरामाच्या पैशाचा कधीही लोभ करायचा नाही. खरे शिक्षण मला सांगली आणि पुणे यांच्यामध्ये गाडीतच मिळाले."

गाडीत लाभलेल्या त्या खऱ्या शिक्षणाची शिदोरी घेऊन दत्तू पुण्याला आला. दुर्दैवाने शिफारसपत्राचा थोडासा घोटाळा झाल्याने त्याला त्या काळच्या ख्यातनाम डेक्कन कॉलेजात प्रवेश मिळाला नाही. म्हणून त्याने फर्गसन कॉलेजात प्रवेश घेतला. नंतर मात्र त्याला ह्या घोटाळ्याचे समाधानच वाटले. कारण "डेक्कन कॉलेजातील साहेबी वातावरणात आपली देशभावना सुकून गेली असती. उत्तम डिग्री घेऊन तिच्या जोरावर सरकारी नोकरीत शिरलो असतो व आज लाभलेले समाधान गमावून बसलो असतो" हे त्याला पुढे जाणवले. मात्र तिथे जो युरोपियन प्राध्यापकांचा सहवास लाभला असतो तो मात्र हुकला. "अतिशय भिन्न संस्कृतीच्या लोकांचा जवळून संबंध येणे हे संस्कारितेसाठी फार महत्त्वाचे असते," असे मत त्याने पुढे व्यक्त केले आहे.

दत्तू फर्गसनमध्ये दाखल झाला. फर्गसन कॉलेजच्या भव्य इमारतीत पाय ठेवताना त्याच्या मनात आले, "ज्याला हित-अनहित ह्यातला फरक जोखता येतो व जो अनहितापासून संयमाने दूर राहू शकतो तो सुशिक्षित. आणि आता अशा एका सुशिक्षित जगात आपण प्रवेश करतो आहोत."

अनुक्रमणिका

फर्गसन हे त्या काळी फार वेगळ्या दर्जाचे कॉलेज मानले जात होते. त्याची स्थापनाच टिळक-आगरकरांसारख्या ध्येयवादी व देशाभिमानी व्यक्तींनी केली होती. त्यामुळे तेथील वातावरण देशभक्तीच्या भावनेने व थोर व्यक्तींच्या अस्तित्वाने भारलेले होते. जे. बी. कृपलानी, वि. दा. सावरकर हे त्याचे त्यावेळचे वसतिगृहातले सहाध्यायी होते. वसतिगृहातले विविध पक्षांचे पुरस्कर्ते, नवीन आलेल्या विद्यार्थ्यांना आपल्या पक्षात ओढण्याची शिकस्त करीत असत. त्या मंडळींची विविध राजकीय, आर्थिक, सामाजिक प्रश्नांवर खडाजंगी चर्चा चालत असे. सुरुवातीला त्याच्या देशप्रेमी मनाचा कल झुंजार अशा टिळकपक्षाकडे होता. पण वेळीच कारवारचे त्याचे गुरू वामनराव दुभाषी यांनी त्याला पत्र पाठवून सावध केले की, 'शिक्षण संपेपर्यंत कोणत्याही राजकीय पक्षात वाहवले जाऊ नये व जावयाचेच ठरवलेस तर विचारपूर्वक निर्णय घे.'

गुरूच्या ह्या सूचनेचा परिणाम त्याच्या आचरणात तत्काळ जरी जाणवला नसला तरी पण खोल कुठेतरी, प्रत्येक प्रश्नाकडे तटस्थपणे व स्वतंत्रपणे बघण्याची वृत्ती मात्र त्याच्यात रुजली असावी आणि त्यामुळे पदवी शिक्षणाच्या पुढील चार वर्षांत त्याच्या मनात वैचारिक मंथन सतत चालू राहिले. स्वतंत्र व तटस्थबुद्धीने प्रत्येक विचाराकडे बघण्याची वृत्ती वाढल्याने कोणत्याच विचारधारेकडे तो सर्वस्वी ओढला गेला नाही.

फर्गसन महाविद्यालयातला आणखी एक लाभ म्हणजे तेथील भव्य वाचनालय. तेथे त्याच्या वाचनाच्या आवडीला मुक्त वाटा लाभल्या. गंभीर वाचन वाढू लागले. अभियंता होण्याचे स्वप्न पहिल्याच वर्षी मागे पडले होते. तथापि जीवनात नेमके काय करावे ह्याचा अद्याप निर्णय होत नव्हता.

गणित हा त्याचा अत्यंत आवडता विषय होता. त्यामुळे रँग्लर परांजपे यांचा तो आवडता विद्यार्थी बनला. इंग्रजी व संस्कृत हे विषयही त्याच्या आवडीचे होते. त्या काळात त्याने इंग्रजी वाचन खूप केले. टेनिसन हा त्याचा आवडता कवी. स्कॉटच्या कादंबऱ्यादेखील तो आवडीने वाचत असे. पण लवकरच ललित वाङ्मयाकडून तो निबंध ह्या वाङ्मयप्रकाराकडे आकर्षित झाला व तो वाङ्मयप्रकार शेवटपर्यंत त्याचा सर्वात आवडता राहिला.

फर्गसन महाविद्यालयात असताना त्याने गणिताप्रमाणे भौतिकविज्ञान शाखेतही प्रावीण्य संपादन केले. विशेषतः प्रयोगविज्ञानात तो फारच कुशल होता. हे कौशल्य पुढील आयुष्यात नानाप्रकारे व्यक्त होत राहिले. पण आस्तिकता, नास्तिकता, धर्मप्रेरणा, संस्कृति-अभिमान इत्यादीबद्दलच्या मनोमंथनांमुळे त्या प्रकारचे वाचन वाढत गेले. विचार बदलत गेले व शेवटी विज्ञानशाखा सोडून तो तत्त्वज्ञानाकडे वळला.

त्यावेळी इंटरला असलेल्या अभ्यासविषयांत तर्कशास्त्र हा एक विषय होता. त्यातूनही तत्त्वज्ञानाची आवड वाढीस लागली. जीवनाचा वेध घेण्याच्या कितीतरी विचारप्रणाली आजपर्यंत जगात विकसित झाल्या आहेत, हे जसेजसे लक्षात येऊ लागले तसेतसे, त्या सर्व जाणून घेतल्याखेरीज शिक्षणाला खऱ्या अर्थाने पूर्णता येणार नाही असे त्याला वाटू लागले आणि परिणामतः दत्तूने तत्त्वज्ञान विषय घेऊन बी. ए. होण्याचा निर्णय घेतला.

क्वचित काळी त्याच्या मनात नोकरी करून सुखाने जीवन व्यतीत करावे असा विचार डोकावत असे. पण देशभक्तीने भारलेले त्याचे मन प्रश्न करी- आपल्या देशाच्या शत्रूची चाकरी करायची?- पण देशाला

विद्वान, अनुभवी लोकही हवेतच की? तो स्वतःचीच समजूत काढत असे. पण शेवटी त्याच्या मनातील देशभक्तीचा विजय झाला. "असे काही केले तर आपण आपल्याच नजरेत हीन ठरू" ही जाणीव झाल्याने त्याने निग्रहाने नोकरीचा व पर्यायाने स्थिर सुखासीन आयुष्याचा विचार सोडून दिला.

ह्याच सुमारास एक महत्त्वाचे स्थित्यंतर त्याच्या मनोभूमिकेमध्ये झाले. किशोरवयापासूनच त्याचे मन टिळकभक्तीने भारलेले होते. लोकमान्यांच्या जहालपंथाकडे त्याचा कल झुकलेला होता. पण त्या वेळी विलायतेतून निघणारे राष्ट्रीय कॉंग्रेसचे मुखपत्र 'इंडिया' फर्गसन कॉलेजमध्ये येत होते. त्याच्या वाचनात ते पत्र येऊ लागले. त्यात नामदार गोपाळ कृष्ण गोखल्यांचे विचार व भाषणे छापून येत असत. त्यातून जाणवणारी गोखल्यांची देशहिताची कळकळ व निखळ प्रामाणिक बुद्धी त्याला प्रभावित करू लागली. कोणत्याही विषयावरील गोखल्यांची अभ्यासपरिपूर्ण, सर्वांगस्पर्शी भाषणे ऐकण्यासाठी इतर नेतेच काय पण इंग्रज अधिकारीही उपस्थित राहतात हे कळल्यावर तर त्याचे गोखल्यांविषयीचे आकर्षण अधिकच वाढले. ह्या व्यक्तीचा परिचय व्हावा असे त्याला तीव्रपणे वाटू लागले. योगायोगाने त्याच सुमारास गोखल्यांचे फर्गसन कॉलेजात भाषण झाले. त्यांची प्रसन्नगंभीर मूर्ती, संस्कारसंपन्न भाषा, ब्रिटिशांच्या कुटिल राजनीतीवर सौम्य पण नेमकेपणाने प्रहार करण्याची पद्धत त्याच्या मनःप्रवृतीला अतिशय भिडली. हा एक सामान्य राजकारणी नव्हे तर देशाच्या भविष्यकालीन हिताचा विचार करणारा थोर मुत्सद्दी आहे अशी त्याची खात्री पटली. तथापि राजकारणाला अध्यात्मिक पाया देण्याची व देशाच्या मुक्तिसंग्रामात आम जनतेच्या सहभागाची गोखल्यांची भूमिका त्याला त्या वेळी नीट समजू शकली नाही. देशसेवा हे व्रत मानून, अकिंचन अवस्थेत, परिश्रम व अखंड उद्योग करत साधे जीवन व्यतीत करण्याचा आदर्श त्यावेळी त्याला भावला नाही. मात्र ह्या भाषणातून त्याच्या मनात नकळत पडलेले बीज पुढे गांधीजींच्या सहवासात तरारून आले.

त्यावेळी त्याचे मन जरी इतर युवकांप्रमाणेच, ताठ मानेने कारावास भोगणाऱ्या व सुटून आल्याबरोबर 'पुनश्च हरि ॐ' म्हणून इंग्रजी सत्तेशी संघर्षाला उभ्या ठाकलेल्या टिळकांच्या शौर्य, धैर्य, विद्वत्ता, देशप्रीती, त्याग इ. गुणांमुळे प्रभावित झाले होते, तरी टिळकांचे समाजसुधारणेबाबतचे पारंपारिक धोरण व भूमिका त्याला रुचत नव्हती. त्याला राजकीय व सामाजिक दोन्ही क्षेत्रात सारख्याच निर्भयपणे व तत्त्वनिष्ठेने स्वातंत्र्यवादी विचार मांडणारा नेता देशाला मिळावा असे वाटत होते. ती काळाची गरज होती व म्हणून तसा नेता ह्या देशाला नक्कीच लाभेल असा विश्वास सखोल विचारांती त्याला वाटू लागला होता.

त्याच सुमारास काही काळ तो प्राचार्य र. पु. परांजपे ह्यांच्या बुद्धिवादी प्रभावाखाली येऊन पाखंडी बनला होता. तथापि रानडे, भांडारकर व विवेकानंद ह्या तीन ऋषितुल्य युगपुरुषांच्या विचारांचा परिचय होऊन वेळीच तो सावरला. आपल्या ह्या परिवर्तनाविषयी त्याने पुढे एक पत्रात उल्लेख केला आहे—

"बुद्धीची उपासना वाढल्यामुळे नास्तिकता व संशयवाद यांनी घेरले....पूर्वपीठिका चांगली असल्यामुळे नास्तिकता व संशयवाद यांचा पुष्कळच फायदा झाला.... यथाकाळी पुन्हा धार्मिक भूमिकेवर आलो... लहानपणीची धार्मिकता काहीशी आचारात्मक व भाविक स्वरूपाची होती. नैतिक जीवनाची महती त्या वेळी साक्षात झाली नव्हती. आता नैतिक व आध्यात्मिक जीवन हेच जीवनसर्वस्व झाले आहे."

तसा तो कर्मकांड करणारा कधीच नव्हता. पण जीवनातील शाश्वत मूल्ये तो मानत होता. ईश्वरभक्तीचा संस्कार त्याच्या मनावर होता. याच सुमारास न्या. रानड्यांची धार्मिक प्रवचने त्याच्या वाचनात

अनुक्रमणिका

आली. भौतिक सत्य व नैतिक सत्य ह्यातील भेद रानड्यांनी इतका सुबोधपणे स्पष्ट करून दाखविला होता की तो समजून घेताना त्याची नास्तिकता विरघळून गेली. मानवी बुद्धीला मर्यादा असतात. भौतिक सृष्टीच्या पलीकडे जी एक भावनात्मक सृष्टी असते तिथपर्यंत ती पोहोचू शकत नाही, हे त्याच्या विवेकबुद्धीला जाणवू लागले. देव असेल वा नसेल पण श्रद्धापूर्वक प्रार्थना केल्यास मनाच्या शक्ती वाढू शकतात, हा विश्वास त्याच्या मनात निर्माण झाला. त्यामुळे न्या. रानड्यांविषयी त्याला नितांत आदर वाटू लागला.

पुढे १९४२ मध्ये न्यायमूर्ती रानडे यांची जन्मशताब्दी साजरी करावी व आपल्या भक्तिभावाला मूर्तरूप द्यावे म्हणून दत्तूने खूप पुढाकार घेतला होता. तथापि चलेजाव चळवळीच्या धामधुमीत त्याची खटपट सफल झाली नाही ह्याचा त्याला शेवटपर्यंत खेद वाटत राहिला.

ह्याच काळात त्याच्यावर प्रभाव टाकून गेलेली दुसरी थोर व्यक्ती म्हणजे डॉ. भांडारकर. त्यांच्या भाषणातून भक्तिमार्गाचे मर्म त्याच्यापुढे उलगडले. भक्तिमार्ग हा पारमार्थिक प्राप्तीसाठी नसून ऐहिक जीवन अधिक उन्नत करण्यासाठी असतो, हे लक्षात आल्यावर त्याला संतसाहित्यवाचनाची गोडी लागली व ती जन्मभर टिकली. जीवनाचा आध्यात्मिक पाया भक्कम करण्याची इच्छा वाढली.

त्याच्यावर प्रभाव टाकणारे तिसरे व्यक्तिमत्त्व म्हणजे स्वामी विवेकानंद. विवेकानंदाच्या शिकागो धर्मपरिषदेतील पराक्रमाचे कौतुक बालपणी घरात ऐकलेले होते. १८५७ च्या अयशस्वी संग्रामानंतर खचून गेलेल्या भारतीय मानसिकतेला ह्या दिग्विजयामुळे केवढा आत्मविश्वासाचा व अभिमानाचा आधार त्यावेळी लाभला होता. आता त्याने रानडे-भांडारकरांच्या जोडीने विवेकानंदाच्या ग्रंथाचे वाचन सुरू केले. भक्ती, सदाचार, मानवता, तेजस्विता आदी गुणांनी मंडित असा कर्मकांडाच्या पल्याडचा त्यांनी दाखविलेला हिंदुधर्म त्याला अतिशय भावला. अध्यात्म व देशभक्ती ह्यांचा विवेकानंदांनी साधलेला समन्वय तर अभिनवच होता.

'मानवी मन ही एक अथांग शक्ती आहे. आपल्या तत्त्वासाठी जगाच्या विरोधात ठामपणे उभे राहण्याचे सामर्थ्य तिच्यात आहे. ही मनःशक्ती हेच ईश्वरी तत्त्व आहे व ती विकसित करणे हे मानवाचे सर्वोच्च ध्येय आहे—' हे विवेकानंदांचे विचार दत्तूच्या मनावर चिरंतन ठसा उमटवणारे ठरले. आत्मनिष्ठा म्हणजेच ईश्वरनिष्ठा व जीवननिष्ठा — ह्याचा त्याला साक्षात्कार झाला.

विवेकानंदांचे चरित्र व भगिनी निवेदिता यांचे लेखन वाचून त्याला भारतीय संस्कृतीच्या श्रेष्ठत्वाची खात्री पटली. ही अध्यात्माधिष्ठित संस्कृतीच भविष्यात विश्वाला पथदर्शक ठरणार आहे हा विश्वास दृढ होत गेला. म्हणूनच त्याने भारतीय इतिहास, समाजशास्त्र, साहित्य, संस्कृती ह्या साऱ्यांचा हळूहळू पुष्कळ अभ्यास केला.

विवेकानंदांनी हिंदुधर्माचे उपनिषदप्रणीत जे भव्य रूप स्पष्ट करून दाखवले त्या प्रभावातच पुढे रवीन्द्रनाथ, श्री अरविंद व महात्मा गांधी ह्या तीन भारतभाग्यविधात्या महान व्यक्ती विकसित झाल्या असे मानले जाते. त्यांपैकी रवींद्रनाथ व महात्मा गांधी ह्या दोघांचा निकट सहवास व संस्कार पुढे त्याला लाभला. ह्यांच्यामुळेच त्याला बाह्यजगत, त्याचे गुणधर्म विसरून, इतकेच नव्हे तर स्वतःलाही विसरून, वस्तूचे निखळ रूप शोधण्याचा छंद लागला. वस्तूच्या अन्तःस्वरूपदर्शनाने लाभणारी आनंदावस्था त्याने अनुभवली.

अनुक्रमणिका

"आपण जे जीवन जगतो, पाहतो जे केवळ वरवरचे रूप आहे. खरे जीवन त्यापेक्षा खूप सखोल आहे, याची जाणीव मला झाली. ह्या पारमार्थिक बोधावास्थेमुळे पुढे कितीही मानसिक आघात झाले, विचारपरिवर्तने झाली तरी गाभ्यातली पारमार्थिकता कधी ढळली नाही." असे त्याने लिहून ठेवले आहे.

ह्याच सुमारास १९०५ मध्ये बंगालची फाळणी झाली. टिळकांच्या अग्रलेखांनी तरुणांची अंतःकरणे, ब्रिटिशांच्या कुटिल राजनीतीविरुध्द पुन्हा खवळून उठली. स्वातंत्र्यासाठी वाटेल ते बलिदान करण्यास ते सिद्ध झाले होते.

अशा तप्त वातावरणात दत्तूने स्वतःच्या जीवनविषयी एक महत्त्वाचा निर्णय घेतला. त्याबाबत त्याने स्वतःच्या दैनंदिनीत केलेली नोंद अशी आहे—

"इतःपर मी माझे संपूर्ण जीवन कोणत्या ना कोणत्या देशहितकारक कार्यात व्यतीत करीन. स्वतःचा असा वेगळा व्यवसाय करणार नाही."

ह्याच काळात आणखी एक लहानसा अध्याय त्याच्या जीवनात घडला. फर्गसनच्या वसतिगृहातील त्याचे सहाध्यायी वि.दा. सावरकर यांच्याशी त्याची मैत्री जुळली. दोघेही राजकारणात टिळकांचे भक्त व समाजकारणात आगरकरांचे अनुयायी, वंगभंगाच्या निर्णयाने खवळलेले; त्यामुळे विदेशी कापडाची होळी, दारुबंदीसाठी पिकेटिंग इ. चळवळीत ते सक्रियपणे सहभाग घेऊ लागले. ह्या निमित्ताने त्याला स्वदेशीचे व्याख्याते व भारतीय संस्कृतीचे पुरस्कर्ते, कुमार आनंदस्वामी यांच्या पुस्तकांचा परिचय झाला. त्यातून त्याला स्वदेशी-आंदोलनाच्या खऱ्या अर्थाची जाण आली. स्वदेशीचा पुरस्कार म्हणजे ग्रामोद्योगांना प्रोत्साहन देणे, पर्यायाने यांत्रिकीकरणाला थोपविणे हे होय, हे त्याच्या लक्षात आले.

पुढे रवींद्रनाथांनी 'श्रीनिकेतन' या नावाने ग्रामोद्योगांना प्रोत्साहन देणारी संस्था भक्कम सांस्कृतिक पायावर उभी केली, त्यामागे हीच डोळस जाणीव होती.

१९०५ ते १९०७ हे दोन वर्षे दत्तू बी. ए.चा अभ्यास करता करताच अशा विविध चळवळींत गुंतला होता. अशा तऱ्हेने भोवतालचे सामाजिक व राजकीय वातावरण, व्यक्ती, प्रसंग, विचारधारा ह्या सर्वांतून त्याची विशिष्ट दिशेने घडण होत होती.

परंतु सावरकरांबरोबरच्या चळवळीत तो फार काळ टिकू शकला नाही. जीवनाच्या प्रारंभीच त्याच्या दुभाषीगुरुजींकडून त्याला तटस्थ विचारांचा मंत्र मिळाला होता. त्यानुसार तो जेव्हा क्रांतिकारकांच्या दहशतवादी कृतींचा विचार करू लागला, तेव्हा त्याला त्यातील अपुरेपणा, दूरदृष्टीचा अभाव जाणवू लागला. मूठभर अधिकाऱ्यांच्या हत्येमुळे इंग्रज सरकार घाबरून निघून जाईल हे काही त्याला पटत नव्हते. १८५७च्या समराचा केवळ गौरव म्हणून वापर न करता, त्यातील अपयशाचा चिकित्सकपणे शोध घ्यायला हवा असे त्याला वाटे. भरपूर सैन्य व शौर्य असूनही आपण युद्ध हरलो. त्यामागची कारणपरंपरा शोधताना शिस्त, एकता, दूरदृष्टी या तीन गोष्टींचा अभाव व भारतीय जनतेची निष्क्रिय सहानुभूती इ. उणिवांवर त्याने आपल्या

अनुक्रमणिका

अभ्यासातून अचूक बोट ठेवले. शेवटी आपली भूमिका स्पष्टपणे मांडणारे परखड पत्र त्याने सावरकरांना पाठवले. त्यात समकालीन क्रांतिकारकांच्या प्रयत्नांबद्दल लिहिले आहे—

"१८५७च्या समराचे वेळी हिंदु-मुस्लिम यांचे ऐक्य तरी होते. आज तेवढे आहे का? तेव्हा राजेरजवाडे समरात सहभागी होत होते. आज तसे होताहेत का? नसेल तर का नाहीत? ह्याची उत्तरे शोधायला हवीत. अशा प्रश्नांचे चिंतन करून त्यावर उपाय शोधण्याची इंग्रजांची वृत्ती आपण उचलायला हवी. क्रांतीसाठी धर्माचा उपयोग पण फारसा सफल होणार नाही. कारण हिंदू मानसिकता परिस्थितीशी जुळवून घेणारी असल्याने राष्ट्रीय उत्थापनाला उपयुक्त नाही. जाज्ज्वल्य देशाभिमान, आत्यंतिक त्याग, 'करेंगे या मरेंगे' ही दृढनिष्ठा एवढे क्रांतीला पुरेसे नाही. ज्यांच्याशी मुकाबला करायचा त्यांचे बल किती, आपले किती? आपल्या अपुऱ्या बलाचा पूर्ण उपयोग करण्यासाठी नेत्यांमध्ये जे योजनाकौशल्य हवे, सर्व दलात जे सहकार्य हवे त्याचा पण मला अभाव दिसतो. म्हणून इतःपर मी दलात राहू इच्छित नाही."

इतका स्वच्छ विचार करून दत्तू क्रांतिकारक दलातून दूर झाला. पण मग आता नेमके काय करावे असा संदेह त्याच्या मनात निर्माण झाला. देशकार्यासाठी जीवन वाहायचा निश्चय तर पक्का होता. पण त्यासाठी ठोस रचनात्मक कार्य काय करावे हे सुचत नव्हते. अशा मनाच्या संदेहावस्थेत पुन्हा विवेकानंद त्याला मार्गदर्शक ठरले. त्यांचे एक अप्रकाशित पत्र त्याच्या हाती आले. पत्रात विवेकानंद म्हणतात, 'देशोद्धाराचा मी खूप विचार केला. दरवेळी मी एकाच निर्णयाप्रत आलो की शिक्षण हाच देशोद्धाराचा एकमेव मार्ग आहे."

विवेकानंदांचे हे पत्र वाचून त्याला जणू दिशाच सापडली. आपले भावी जीवन शिक्षणकार्यात वेचायचे असे त्याने ठरवले. अरविंदबाबूंच्या जीवनातूनही हाच निष्कर्ष त्याला लाभला होता. देशकार्यात, क्रांतीइतकेच शिक्षणाचे महत्त्व अरविंदबाबू मानत होते आणि म्हणूनच बडोद्याची नोकरी सोडून ते स्वतः कलकत्याच्या नॅशनल स्कूल या राष्ट्रीय संस्थेत रुजू झाले होते. दत्तूने पण ठरवले की भारताची पारतंत्र्यातून सुटका करण्यासाठी, स्वतःला सर्वप्रथम शैक्षणिक कार्याला वाहून घ्यायचे. अध्यापनकार्य व्रत म्हणून स्वीकारायचे. त्याचा हा निर्णय झाला तेव्हा त्याची बी. ए. ची परीक्षा जवळ आली होती. त्या काळी पदवीपरीक्षेत पहिला वर्ग मिळवणे प्रतिष्ठेचे मानले जाई. त्याला ते मुळीच कठीण नव्हते. पण देशसेवेसाठी थोडे मार्क कमी पडले तरी फारसे बिघडत नाही, हा लोकमान्यांचा विचार त्याला पटला होता. म्हणून पहिल्या वर्गाच्या मागे न लागता त्याने परीक्षाकाळातसुद्धा देशकार्य चालू ठेवले. दोन तासात बी. ए. चे पेपर सोडवायचे व उरलेला एक तास बिपिनचंद्र पालांच्या व्याख्यानपुस्तिकांची विक्री करायची. त्या विक्रीवर मिळालेले कमिशनही त्याने, माणिकतोळा केसमध्ये पकडल्या गेलेल्या अरविंदबाबूंच्या बचावासाठी चाललेल्या खटल्याला मदत म्हणून पाठवले.

परीक्षा आटोपली. (१९०८) जीवनाचा मार्गदेखील निश्चित झाला. अज्ञान, रोगराई, अंधश्रद्धा इत्यादींच्या दुःखपरंपरेतून भारतीयांची सुटका करण्यासाठी शिक्षण हाच उत्तम उपाय आहे. पण हे शैक्षणिक कार्य नेमके कसे करायचे? त्यासाठी अध्यापन करायचे की पत्रकारिता? याचा निर्णय होईना. तेव्हा मार्गदर्शनासाठी तो लोकमान्यांकडे गेला. टिळकांनी त्याला शिक्षणकार्यासाठी दोन्ही मार्ग अनुसरण्याचा सल्ला दिला. बालपणापासून मित्रांना शिकवण्याचा सराव तर होताच. पण पत्रकारितेचा काहीच अनुभव नव्हता. म्हणून मग टिळकांनीच शिफारसपत्र देऊन त्याला न. चिं. केळकरांकडे पाठवले. केळकरांनी त्याला 'मराठा'त रुजू करून घेतले. केळकरांच्या निकट सहवासात त्यांच्या विद्याव्यासंगाचा व रसिकतेचा प्रभाव

अनुक्रमणिका

त्याच्यावर पडला. तो तेथेच कायम राहिला असता तर, “कालेलकर हे महाराष्ट्रातील मोठे पत्रकार, संपादक, लेखक, थोर शिक्षक आहेत” अशी त्याची प्रतिमा उजळत गेलीही असती.

नियती त्याहून मोठी स्वप्ने पाहत असावी. त्याच्या कर्तृत्वविलासासाठी तिने राष्ट्रीय मंचाची योजना करून ठेवली होती. म्हणूनच की काय. ‘मराठा’ मधील कामाला सुरुवात करून एक-दोन महिने होतात न होतात तोच आपल्या आईला क्षयाची बाधा झाल्याचे कळल्यामुळे मातृभक्त दत्तू नोकरीचा तात्काळ राजीनामा देऊन आईची सेवा करण्यासाठी बेळगावी परतला.

इंजिनिअर बनून नद्यांवर पूल, जंगलातून रस्ते बांधून पैसे कमावण्याचे स्वप्न रंगवत दत्तू पुण्याला आला होता. ह्या व्यवसायात ठेकेदाराकडून पैसे खाल्ले जात असले तरी त्यात, फारतर परकीय सरकारला फसवल्यासारखे होईल, आपल्या प्रजेची छळवणूक काहीच नाही, असे तर्कट मनाशी रचत होता व त्याद्वारे ‘अधर्मातसुद्धा आपण धर्मबुद्धीला अवकाश देत आहोत’ असा भाबडा अभिमान बाळगत होता.

असा हा दत्तू पुण्यातील चार वर्षांच्या वास्तव्याने पार बदलून गेला.

‘स्मरणयात्रे’त म्हटल्याप्रमाणे ह्या चार वर्षात त्याला सामाजिक, धार्मिक, राजकीय जीवनाचे आकलन झाले. जीवनाच्या अनेक अंगोपांगांच्या बाबतीतले त्याचे आदर्श कमीअधिक प्रमाणात स्पष्ट झाले.

थोडक्यात विद्यार्थीदशा ओलांडून दत्तू आता एक प्रगल्भ तरुण बनला होता.

अनुक्रमणिका

# २.
# ध्येयशोध

आपल्या अध्यापनव्रताच्या प्रारंभकाळीच म्हणजे १९०८ साली आईच्या आजाराची वार्ता कळून दत्तू तिच्या सेवेसाठी बेळगावला परत आला. त्याच्या आईला क्षयरोग झाला होता. तसा तो रोग त्याच्या घराण्यात अनुवंशिक होता. त्यामुळे आईची सेवा करताना त्याला पण तो रोग होईल अशी शक्यता डॉक्टरांनी बोलून दाखवली व उपाय म्हणून अंडी खाण्यास सांगितले. पण मांसाहार न करण्याचा त्याचा निर्धार असल्याने त्याने तो सल्ला मानला नाही. आईची सेवा करण्यासाठी, तिच्याजवळ राहण्याचे त्याने निश्चित केले.

इथून त्याचे 'दत्तू'हे रूप मागे पडले आणि तो 'कालेलकर' म्हणून ओळखला जाऊ लागला.

त्यावेळी टिळकांचा उजवा हात मानले गेलेले गंगाधरराव देशपांडे बेळगावमध्ये राहून लोकजागृतीचे कार्य करत होते. साहजिकच कालेलकरांचे त्यांच्या दलात येणेजाणे सुरू झाले. त्यांची बुद्धिमत्ता, दृढनिश्चयी वृत्ती व अफाट वाचन ह्याचा अंदाज येताच, गंगाधररावांनी राष्ट्रीय वृतीने स्थापन झालेल्या गणेश विद्यालय नामक शाळेत हेडमास्तर म्हणून त्यांची शिफारस केली व ते तिथे रुजू झाले. अशा प्रकारे पहिल्याच नोकरीने ते महाराष्ट्रातील 'राष्ट्रीय शिक्षणा'शी निगडित झाले. पुढे ते राष्ट्रीय शिक्षणाचे पुरस्कर्ते व योजनाकार बनले. एक उच्च दर्जाचे शिक्षणतज्ज्ञ म्हणून नावाजले गेले. बेळगावची शाळा ही त्या साऱ्यांची गंगोत्री ठरली.

ह्याच सुमारास त्यांचा 'नागेशराव गुणाजी' या साहित्यप्रेमी व्यक्तीशी संपर्क आला. दोघे मिळून संतसाहित्याचा तसेच विवेकानंद व स्वामी रामतीर्थ ह्यांच्या साहित्याचा अभ्यास करू लागले. स्वामी रामतीर्थांचे लेख वाचण्याचा एक परिणाम म्हणजे, हिमालयाचे आकर्षण त्यांच्या मनात निर्माण झाले. आयुष्यात एकदा तरी हिमालयाचे समग्र दर्शन घेतले पाहिजे, ही उत्कट इच्छा त्यांच्या मनात रुजली.

इकडे आजारी आईची सेवा चालू होतीच. रात्री आईच्या जवळ जागत असताना वडिलांना वृतपत्रे वाचून दाखवीत असत, त्यातील इंग्रजी अत्याचाराच्या बातम्या समजावून देत असत. त्या ऐकताना, त्या अन्यायाला कुणीतरी जाब विचारलाच पाहिजे असे वडील म्हणत. ही संधी साधून कालेलकरांनी आपले देशसेवेचे ध्येय वडिलांना सांगून टाकले व त्यासाठी त्यांच्याकडून अनुमती मिळवली.

आता ते मोकळेपणाने गंगाधरपंतांच्या विविध उपक्रमात सहभागी होऊ लागले. १९०८ साली गांधीजींच्या दक्षिण आफ्रिकेतील मजुरांसाठी चालवलेल्या चळवळीला पाठिंबा देण्यासाठी सभा झाली. तेव्हा कालेलकरांनी गांधीजींवर भाषण केले. त्यावेळी, पुढे आपल्या जीवनाचे सुकाणू आपण ह्या महापुरुषाच्या हाती देणार आहोत ह्याची त्यांना कल्पनाही नव्हती.

गंगाधरपंतांबरोबर काम करण्यामुळे पोलिसखाते कालेलकरांकडे संशयित नजरेने पाहू लागले होते. त्यामुळे त्यांचे सासरे जरा काळजीत पडले. पण जावयाजवळ तसे काही म्हणण्याचे धाडस त्यांना होईना, कारण कालेलकर अतिशय स्पष्टवक्ते होते. त्यामुळे, सासरे त्यांना जरा बिचकून असत. म्हणून मग त्यांनी व्याह्यांजवळ आपले भय बोलून दाखविले. तेव्हा जन्मभर इंग्रजांची चाकरी करणाऱ्या बाळकृष्णपंतानी तात्काळ उत्तर दिले, 'माझा मुलगा बुद्धिमान आहे. उच्च शिक्षण, लेखन, व्याख्याने ह्याद्वारे त्याने आपले कर्तुत्व

अनुक्रमणिका

सिद्ध केले आहे. इतके असून आईबापांची निरलस सेवा करतो.. महिना दोनशे-अडीचशे मिळवणे शक्य असताना ध्येयासाठी त्याने महिना आठ रुपये पगाराची नोकरी स्वीकारली. तो जे करतो ते वाईट असे तर तुम्हीपण म्हणू शकणार नाही. आम्ही आमच्या काळाच्या आदर्शांप्रमाणे जगलो. नवी पिढी आपल्या नव्या आदर्शांनुसार काम करते आहे. आपले आदर्श त्यांच्यावर लादणे उचित होणार नाही—'

वडिलांचा मुलावरचा विश्वास, त्याच्या कार्याला पाठिंबा, त्याच्याविषयीचा अभिमान सर्वच ह्या उत्तरातून प्रतीत होते.

पण ज्यासाठी नोकरी सोडून कालेलकर बेळगावी परतले त्या मातृसेवेला मात्र यश आले नाही. १८ जून १९०८ रोजी त्यांची आई निवर्तली. ते फार खचून गेले. आता त्यांचे बेळगावात लक्ष लागेना. शाळेतील वातावरण पण गढुळले होते. राष्ट्रीय वृत्तीच्या नावाखाली परंपराप्रिय, संकुचित वृत्ती वाढीस लागली होती. परिणामी त्यांनी ही शाळा सोडून मुंबईस जाऊन वडिलांच्या इच्छेनुसार एल. एल. बी. करायचे ठरवले. गिरगावात एक खोली घेऊन ते राहू लागले. तिथे समोरच प्रार्थना समाजाची इमारत होती. साहजिकच तिथे चालणाऱ्या सभा-व्याख्यानांना ते हजेरी लावू लागले.

त्याच सुमारास लोकमान्य टिळकांना राष्ट्रद्रोहाच्या नावाखाली सहा वर्षांची कारावासाची सजा झाली. त्यांनी सुरू केलेले 'राष्ट्रमत' नावाचे दैनिक काही देशभक्त तरुण तन मन धन अर्पण करून चालवीत होते. कालेलकरांनी एकदा अस्पृश्यता निर्मूलनासंबंधी मुंबईत झालेल्या एका सभेचा वृत्तान्त 'राष्ट्रमत'कडे पाठवला होता. तेव्हापासून ते पण त्या वृतपत्रात सामील झाले. तेथील त्यागी, सहकार्यपूर्ण, राष्ट्रनिष्ठ वातावरण कालेलकरांना खूप आवडले. लवकरच त्यांनी एल.एल.बी. चा विचार सोडून दिला. 'राष्ट्रमत'चे ध्येय राजकीय स्वतंत्र्याइतकेच समाजसुधारणेचे, अंत्यजोद्धाराचे देखील होते. कालेलकरांचे 'राष्ट्रमत' विषयीचे प्रेम वाढविण्यास हेही कारणीभूत झाले.

'राष्ट्रमत'च्या मठीत, कालेलकरांचा अनेक मोठ्या व्यक्तींशी घनिष्ठ संबंध जुळला. त्यात न. चिं. केळकर, काकासाहेब खाडिलकर आदी व्यक्ती तर होत्याच; पण आणखी एका व्यक्तीचा,स्वामी आनंदानंद यांचा त्यांच्या जीवनात प्रवेश झाला. त्यांची मैत्री पुढे खूप जिवाभावाची झाली. 'राष्ट्रमत' बंद पडल्यावर कालेलकरांबरोबर तेही बडोद्याला गेले. त्यांच्यामुळेच कालेलकरांना हिमालयाची यात्रा घडली. पुढे दोघेही गांधीजींच्या आश्रमात सामील झाले. त्यांच्याविषयी कालेलकर पुढे म्हणत, “माझी जी पुस्तके लोकप्रिय झाली ती स्वामींमुळेच लिहून झाली. स्वामींनी माझ्यावर जेवढे प्रेम केले तेवढे कुणीच केले नसेल.”

गुरुस्थानी मानलेल्या गंगाधरपंतांविषयी देखील कालेलकर अत्यादराने म्हणत,“स्वतःबद्दल आत्मविश्वास नसणे ही एक फार धोकादायक स्थिती आहे. त्यापासून मला वाचवण्याचे काम गंगाधरपंतानी केले. माझ्या सेवाजीवनाच्या आरंभीच माझा माझ्यावरचा विश्वास त्यांच्यामुळे वाढला.” ह्या 'राष्ट्रमत'च्या मठीत त्यांना आयुष्यातील आश्रमजीवनाचा पहिला अनुभव मिळाला. मात्र इथे कपडे धुणे, संडाससफाई याबाबत शिथिलता होती. कालेलकरांना ती रुचेना. त्यांनी स्वतः ती कामे करायला सुरुवात केली. परिणामतः 'राष्ट्रमत' मध्ये शिस्त व स्वावलंबन आले. यावरून हिंसेतील फोलता, स्वच्छता, स्वावलंबन, श्रमप्रतिष्ठा, अंत्यजोद्धार इ. अनेक बाबतीत कालेलकरांची प्रवृत्ती गांधीविचारांशी मुळातूनच कशी मिळतीजुळती होती हे लक्षात येते.

अनुक्रमणिका

क्रांतिकारकांच्या वाढत्या कारवाया व क्रांतिकारकांना मदत करण्याचे 'राष्ट्रमत'चे धोरण, ह्यामुळे सरकारची वक्रदृष्टी 'राष्ट्रमत'वर पडली. तडजोडी करून कसेबसे टिकवून धरण्यापेक्षा बंद पडलेले बरे, असे कालेलकारांसह सर्व तरुण कार्यकर्त्यांचे मत पडले व शेवटी १९१० मध्ये 'राष्ट्रमत' बंद पडले. पण इतके दिवस तिथे राहणाऱ्या सर्वांना खूप मोठे शिक्षण देणारे ते एक कृतिशील विद्यालय ठरले. तिथल्या ग्रंथालयाने, तिथे चालणाऱ्या चर्चांनी, राष्ट्रहिताच्या कामांनी कालेलकरांना अधिकच अनुभवसंपन्न केले.

सुदैवाने 'आता पुढे काय' असा प्रश्न पडण्यापूर्वीच एक दिवस बडोद्याचे केशवराव देशपांडे तिथे आले. बडोद्यात त्यांनी अरविंद घोषांच्या प्रेरणेने, राष्ट्रीय शिक्षण देणारी 'गंगनाथ भारतीय विद्यालय' ही शाळा सुरू केली होती. त्यांना चांगला मुख्याध्यापक हवा होता. म्हणून ते कालेलकरांना बोलवावयास आले होते. कालेलकरांनी अर्थात तत्काळ होकार दिला. त्यांचे अध्यापनाचे ध्येय तर ह्यात साध्य होणार होतेच. पण आणखीही एक प्रबळ विचार त्यामागे होता. ते म्हणतात—

"भारतात संकुचित प्रांतीयतेचा रोग फार पसरला आहे. त्यामुळे एवढ्या मोठ्या राष्ट्रात फुटीरता वाढीस लागली आहे. हा प्रांतीयतेचा रोग नष्ट करावयाचा असेल तर आंतरप्रांतीय लग्न व निष्काम सेवा हे दोनच मार्ग आहेत. 'भारतवर्ष' अशी एक सलग जाणीव निर्माण करायची असेल व प्रांतोप्रांतात सामंजस्य निर्माण करावयाचे असेल तर भिन्नप्रांतीयांनी एकमेकांच्या प्रांतात जाऊन सेवाकार्य केले पाहिजे."

हे विचार त्यांच्या मनात प्रबल असल्याने त्यांनी केशवरावांच्या विनंतीचा तत्काळ स्वीकार केला. बडोद्याला जाण्यात आणखी एक आकर्षण होते ते म्हणजे, क्रांतिकार्य व अध्यात्मिकता या दोन्हींचा मेळ साधणाऱ्या आदरणीय अरविंदबाबूंचा सहवास त्यांना लाभणार होता.

शाळेला तेव्हा उन्हाळ्याच्या सुट्टया होत्या. त्या संपल्यावर बडोद्याच्या शाळेत रुजू व्हायचे ठरवून ते वडिलांच्या भेटीला गावी गेले. आई गेल्यापासून वडील खूप एकाकी झाले होते व थकलेही होते. आजारी वडिलांची दोन महिने त्यांनी खूप सेवा केली. ते रोज त्यांना गीता वाचून दाखवत, समजावून सांगत. कालेलकर लिहितात, "मी गीतेचा अर्थ त्यांना सांगे. पण ते आपल्या प्रश्नांतून गीतेपासून काय शिकायचे ही जीवनदृष्टी मला नकळत देत गेले. ह्या संवादातून गीता माझ्या बुद्धीपेक्षा हृदयात उतरत गेली. एक दिवस वडिलांचे छत्र माझ्या डोक्यावरून निघून गेले (१९१०); पण त्याच क्षणी गीतेचे हे बोधछत्र, माझ्या जीवनावर पसरले गेले. आता गीता माझ्यासाठी एक ग्रंथ उरला नाही तर मला जवळ घेऊन मार्ग दाखवणारी आणि तरीही माझे स्वातंत्र्य अबाधित ठेवणारी मंगलमूर्ती अशी जिवंत व्यक्ती बनली. मृत्यूत सुद्धा जीवनाचाच विजय दाखवणारी जीवनदृष्टी तिनेच मला दिली."

वडिलांच्या निधनामुळे व त्यानंतर इस्टेटीवरून घरात झालेल्या वादावादीने ते गावाकडील जीवनाला विटले. शरीर व मनाची थकावट दूर करण्यासाठी आपले जुने मित्र नागेशराव गुणाजी यांच्याबरोबर गोव्याला गेले ते पुन्हा गावी न परतण्याचे ठरवूनच. वाट्याला आलेल्या जमिनीवर त्यांनी पुढे ट्रस्ट करून एक हरिजन आश्रम उघडला. अद्यापही तो चालू आहे.

अनुक्रमणिका

गोवा हे सारस्वतांना माहेरघरासारखे वाटते. गोव्यातील प्राकृतिक सौंदर्याने कालेलकरांना विलक्षण मोहवून टाकले. गोव्यातील वास्तव्यात त्यांचा तेथील विख्यात संतकवी कृष्णभट्ट, सोहिरोबा आंबिये यांच्या कवितांचा अभ्यास झाला. तसेच बौद्ध साधू धर्मानंद कोसंबी यांच्याशी परिचय होऊन त्याचे रूपांतर पुढे घनिष्ट मैत्रीत झाले.

गोव्यात सुट्टी घालवून ते बडोद्याला आले. गाडीतून येताना वाटेत नक्षत्रखचित, तेजस्वी धूमकेतूच्या प्रकाशपुंजाने उजळलेले असे आकाश पाहताना त्यांच्या मनातील चिंतनशीलतेला, प्रकाश-अंधाराची एक नवीच जाणीव झाली. ते म्हणतात, "दिवसा शुभ्र प्रकाश पसरतो म्हणून हिरवीगार धरती, निळेभोर आकाश फक्त दिसते. रात्री काळा प्रकाश पसरतो. म्हणून अनंतकोटी पसरलेल्या ब्रह्मांडाचे दर्शन होते."

ह्या प्रचंड ग्रहविश्वाच्या दर्शनाने, त्या जगताचे स्वरूप काय? त्याचा अर्थ काय? हे जाणण्याची तीव्र जिज्ञासा त्यांच्या मनात जागी झाली. बडोद्याला आल्याबरोबर त्या विषयाची अनेक पुस्तके मिळवून त्यांनी ग्रहगोलांचे ज्ञान मिळवले. इतक्यावरच न थांबता त्यांनी ह्या विषयात तरुणांना रुची निर्माण होईल असे प्रयत्न करण्यास सुरुवात केली. कालेलकरांच्या ह्या छंदामुळे पुढे ते गुजरातेत 'आकाशी सौंदर्याचे गद्य कवी' म्हणून ओळखले जाऊ लागले. ह्या ग्रहविश्वाच्या जिज्ञासेपोटी अनेक तरुण मुले त्यांच्याकडे येत. त्यात एक १३-१४ वर्षांचा 'विनायक भावे' नावाचा हुशार मराठी मुलगा येई. त्यावेळी त्याला कल्पनाही नव्हती की पुढे आपण दोघे गांधीजींच्या आश्रमात गांधीचे सच्चे अनुयायी म्हणून जवळ येणार आहोत. हाच मुलगा पुढे 'विनोबा भावे' नावाने प्रसिद्ध झाला.

१९१० साली कालेलकर 'गंगनाथ विद्यालयात' रुजू झाले. ते विद्यालय उपनिषदकालीन आश्रमांच्या धर्तीवर चालवले जात होते. गुरुशिष्यात कौटुंबिक बंध निर्माण व्हावे, गुरूच्या विशुद्ध तेजस्वी आचरणातून विध्यार्थ्यांनी संस्कार घ्यावेत असे तिथले वातावरण होते. तिथे गुरूला नाना, अण्णा अशा घरगुती नावांनी संबोधत असत. कालेलकर तिथे मुख्याधापक म्हणून आल्यावर त्यांना 'काका' हे नाव पडले व त्याचे पुढे काकासाहेब असे झाले.

इथे स्थिर झाल्यावर त्यांनी आपल्या पत्नीला व मुलाला (शंकरला) बडोद्यास आणवून घर केले. हळूहळू त्यांची पत्नी सर्वांची काकी बनून गेली. लग्नानंतर पहिल्यांदाच त्यांचा हा स्वतंत्र संसार सुरू झाला. इथेच त्यांनी काही इंग्रजी पुस्तकांचे अनुवाद केले. संतकाव्याचे अध्ययन, मनन, चिंतन ते उत्कटपणे करू लागले. विद्यालयाच्या छात्रावासात त्याकाळी जेवणखाणाच्या बाबतीत ब्राह्मण-अब्राह्मण असा भेद केला जाई. काकासाहेबांनी हा भेदाभेद दूर करण्यासाठी कठोर पावले उचलली व थोड्याच दिवसांत ही सुधारणा विद्यार्थी व पालकांच्या गळी उतरवली.

त्याकाळी बडोद्यात सयाजीरावांसारखा पुरोगामी, विचारवंत, कृतिशील राजा राज्य करीत होता. त्यांनी दलितांसाठी शाळा काढल्या होत्या. पण तिथे शिकवायला कोणी ब्राह्मण व हिंदू शिक्षक मिळत नसे. काकासाहेबांनी आपल्या एका ब्राह्मण मित्राला तिथे शिक्षक म्हणून जाण्याचा सल्ला दिला. मात्र समाजाला एकदम दुखवण्यात फारसा फायदा नसतो, सुधारणा हळूहळू समाजाच्या गळी उतरवायच्या असतात ही जाणीव त्यांना होती. म्हणूनच त्याला, 'शाळेतून घरी परतल्यावर स्नान करून घरात शिरावे' असा मध्यम मार्ग त्यांनी सुचवला.

अनुक्रमणिका

काकासाहेबांकडे अनेक अल्पबुद्धीचे विद्यार्थी शिकायला येत. त्यांची कुवत, स्वभाव, बुद्धी, घडण ह्यांचा विचार करून काकासाहेब त्या त्या विद्यार्थ्याला शिकवण्याचे प्रयोग करीत. त्यात विद्यार्थी व काकासाहेब दोघांनाही खूप आनंद लाभे. ह्याच अनुभवातून ते ह्या निष्कर्षाला आले की, “शिक्षणात शिक्षकाचा सहवास, त्याची प्रेरणा, सहानुभूती फार महत्त्वाची आहे. म्हणूनच कितीही सुंदर आदर्श पाठ्यपुस्तके तयार केली तरी शिक्षकाची आवश्यकता कायम राहणार, कारण ग्रांथिक अध्ययनापेक्षा मौखिक अध्यापन हे केव्हाही अधिक संस्कारी व प्रभावी असते.”

गंगनाथ पाठशाळेत केशवराव देशपांड्यांसारखा देशभक्त, विचारी, त्यागी पुरुषाच्या सान्निध्यात जे संस्कार, जी जीवनदृष्टी, जे जीवनश्रेय त्यांना गवसले, त्याबद्दल ते लिहितात, “इथल्या संस्कारांमुळेच मला पुढे गांधीजींचे विचार समजून घेण्यास व त्यांच्या रचनात्मक कार्यक्रमात सहभागी होण्यास मुळीच कष्ट पडले नाहीत. माझ्या हातून पुढे जी काय देशसेवा घडली ती सर्व गंगनाथ विद्यालयाचीच प्रेरणा आहे. उच्च शिक्षण संपताच वडिलांचे छत्र हरपले. पण देशसेवेच्या ध्येयपथावर मला गंगाधरराव देशपांडे, केशवराव देशपांडे व बापूजी यांचे शिरःछत्र क्रमशः मिळाल्याने माझे जीवन धन्य झाले.”

दुर्दैवाने गंगनाथ विद्यालयाकडे इंग्रज सरकारची वक्रदृष्टी वळली. पंचम जॉर्ज यांच्या राज्यारोहणानिमित्त भरलेल्या दिल्ली-दरबारात सयाजीराजांनी स्वाभिमानपूर्वक वर्तन केले. त्यामुळे ब्रिटिश सरकार बडोदे संस्थानावर नाराज झाले होते. ह्या विद्यालयातून देशद्रोही कारवाया चालतात असे ठरवून सरकारने त्रास देण्यास सुरुवात केली (१९११). नाइलाजाने एकेक शिक्षक घाबरून शाळा सोडून जाऊ लागले. काकासाहेबांनी मात्र शेवटपर्यंत विद्यालय चालविण्याचा एकाकी प्रयत्न केला. पण राजभयाने विद्यार्थीसुद्धा शाळा सोडून गेल्यावर ते निराश झाले.

राष्ट्रीय शिक्षणाचा असा निकाल लागला. दुसरीकडे क्रांती करून देश स्वतंत्र करण्याच्या स्वप्नाला देखील आकार येत नव्हता. सुट्यासुट्या हत्यांनी इंग्रज घाबरणार तर नाहीतच, उलट आपल्या ध्येयमार्गात अडचणी येतील हे कुणाला कळत नव्हते. क्रांतीसाठी आवश्यक अशा संघटना, जागृती, योजनाबद्धता या गोष्टी कुणाजवळच नव्हत्या; त्यामुळे ते स्वप्न पण विरून गेले. वैवाहिक जीवनाच्या बाबतीतदेखील काका तत्कालीन अनेक सुधारक पुरुषांप्रमाणे असमाधानीच राहिले. कारण दोघांच्या प्रवृत्ती अगदी भिन्न होत्या. काकी माहेरच्या सुखवस्तू. लाडात वाढलेल्या, संसारविषयीच्या त्यांच्या कल्पना चारचौघींसारख्या हौसेमौजेच्या होत्या आणि त्यांच्या वाट्याला आले, स्वातंत्र्यसंग्रामात उडी घेतलेल्या असंख्य देशभक्तांच्या बायकांप्रमाणे त्यागमय खडतर आयुष्य! त्यामुळे त्यांच्या गृहजीवनात माधुर्य,स्थैर्य, सुबत्ता ह्यांना फारसा अवकाश उरला नव्हता. अशी सर्व बाजूंनी निराशा घेरून आल्यावर काकासाहेबांच्या अंतःकरणातील आध्यात्मिक प्रवृत्ती पुन्हा उफाळून आल्या. त्यापूर्वी सन १९०७ मध्ये स्वामी रामतीर्थांच्या भाषणांचा अनुवाद करताना त्यांच्या मनात हिमालयाची ओढ निर्माण झाली होतीच. शिवाय १९०९ साली ‘राष्ट्रमत’साठी काम करताना घनिष्ठ मित्र झालेले स्वामी आनंदानंद आता हिमालयात राहत होते आणि तेही काकासाहेबांना तिकडे बोलावत होतच.

काकासाहेबांच्या मनाने हिमालयात जाण्याचा निर्णय घेतला. त्यावेळी काकी गर्भवती होत्या आणि बाळंतपणासाठी त्या माहेरी जाणार होत्या. काकासाहेबांनी काकींना माहेरी पोहोचवले. पण आपल्या

मनातील हेतू त्यांना सांगितला नाही. वडिलांच्या अस्थी विसर्जित करून प्रयाग, गाय करीत थोड्या दिवसांनी परत येईन असे सांगितले. पत्नीच्या खर्चासाठी, आपल्या वाट्याच्या शेतीतील धान्य त्यांच्या माहेरी पोहोचवण्याची विनंती भावाला केली. जड अंतःकरणाने व निराश मनाने त्यांनी बडोद्याचा निरोप घेतला आणि हिमालयाच्या दिशेने प्रयाण केले. ते १९११ साल होते.

गंगोत्री, जमनोत्री, केदारनाथ, बद्रीनाथ, उत्तरकाशी, ज्योतिर्मठ असे फिरत उत्तराखंडाची ८०० मैलांची यात्रा, अवघ्या ४० दिवसांत करून ते हरिद्वारला परतले. ह्या यात्रेत त्यांनी स्वतःसाठी काही नियम ठरवले होते. अंगावर फक्त धोतर, चादर व मफलर एवढीच वस्त्रे असत. शिलाई केलेला कपडा वापरायचा नाही. झोपताना चटई, कांबळे व एक पांघरूण, हातात काठी, एवढ्याच सरंजामाने त्यांनी यात्रा पूर्ण केली. ही यात्रा जरी आत्मिक साधनेसाठी होती तरी त्यात प्रकृतीचे उन्मेष भक्तिभावाने पाहणे, समाज व देश-निरीक्षण करणे आणि विवेकबुद्धीच्या कसोटीवर आध्यात्मिक अनुभव पारखून घेणे ह्या अंगभूत वृत्ती सुटल्या नव्हत्या. त्यामुळे चांगली गोष्ट म्हणजे त्यांच्या यात्रेत पारंपारिक यात्रेतील निर्जीवपणा व आध्यात्मिक अनुभूतीचा उथळपणा आला नाही.

तिकडे ते तीन वर्षे भटकत राहिले,पण घराशी कोणताच संपर्क ठेवला नव्हता. काकींनी सुरुवातीला काही पत्रे पाठवली. मुलगा झाल्याचे कळवले. त्यावर काकांनी उत्तरात लिहिले,“तपश्चर्या करण्याचा मानस आहे. पत्रोत्तराची अपेक्षा ठेवू नका. शोधण्याचा प्रयत्नही करू नका. केल्यास पस्तावावे लागेल.

एकदा तर विवेकानंदांप्रमाणे संन्यास घेऊन कायमचे देशसेवेला वाहून घ्यावे असाही विचार त्यांच्या मनात बळावला होता. त्याबद्दल ते लिहितात, “तिला कळवण्याची जरुरी मला वाटली नाही. इच्छाही झाली नाही. मला वाटलं तीन वर्षात तिला माझ्याशिवाय राहण्याची सवय होईल. व मग तिचे तिलाच उमगून येईल. किंवा मी तेव्हा तिला सांगेन, असे ठरवले होते.”

ह्या साऱ्याचा काकींवर किती मोठा घाव बसला होता ह्याची कल्पना त्यांचा पुत्र सतीश ह्याच्या निवेदनातून येते. त्यावेळी तो खूप लहान होता. तो म्हणतो, ‘माझी आई त्यांची आठवण काढून रडत असे. सतत त्यांचाच विचार करत असे. त्यांनी परत यावे म्हणून देवाची प्रार्थना करत असे. आठवड्यातून ५-५ दिवस उपवास देखील करी.’ काकांप्रमाणे जणू काकींनी पण वेगळ्या प्रकारची तपश्चर्या आरंभली होती. खरे तर काकासाहेबांनी बालपणात भावजयांची दुःखे पाहिली होती. त्यावेळी स्त्रीदुःखाविषयी त्यांच्या मनात सहानुभूती निर्माण झाली होती. अशा अनुभवी चिंतनशील व्यक्तीकडून सामान्य नवऱ्यासारखे वर्तन का व्हावे ह्याचा बारकाईने विचार केल्यास त्याचे उत्तर विवाह जुळविण्याच्या पारंपरिक भारतीय पद्धतीत सापडते.

त्यांची जोडी अनुरूप नव्हती. लग्नापूर्वीच काकांना काकींच्या माहेरच्या काही गोष्टी कळल्या होत्या. त्यामुळे ते लग्नाला अजिबात राजी नव्हते. पण केवळ आईच्या शब्दाखातर त्यांना लग्नाला संमती द्यावी लागली होती.तरीही हे सर्व विसरून लग्नानंतर त्यांनी चारचौघांसारखा उमेदीनं संसार सुरु केला. पण हळूहळू त्यांच्या लक्षात येऊ लागले की दोघांच्या जीवनदृष्टीच सर्वस्वी भिन्न होत्या. सुशिक्षित, बुद्धिमान, ध्येयप्रवण काकासाहेबांची लग्नगाठ बांधली गेली ती शिक्षणाचा गंध नसलेल्या काकींशी. त्यांनी सुरुवातीला काकींना शिकवण्याचा प्रयत्न करून पाहिला. पण काकींना त्यात मुळीच गोडी वाटेना. मग कंटाळून काकांनी

अनुक्रमणिका

तो नाद सोडून दिला. पण काकींना त्यांची ही अपरिग्रह वृत्तीची देशभक्तीही पटेना. दोघांत अंतराय वाढत गेला.

अशा तऱ्हेने कौटुंबिक जीवनात, क्रांतिकार्यात, शिक्षणप्रयोगात, सर्वत्र नैराश्य आल्याने, मनाने सर्व मागे सोडून काका विरक्तवृत्तीने, आत्मशोधाच्या वाटेवर, हिमालयात भटकत राहिले. हिमालयातून वर्षभराने परतल्यावर संन्यासदीक्षा घेऊन रामकृष्ण मिशनमध्ये सहभागी होण्याचा त्यांनी प्रयत्न केला, पण दीक्षेसाठी तीन वर्षे साधना करावी लागते हे कळल्यावर ते अमरनाथच्या यात्रेवर पुन्हा गेले. शेवटी नेपाळयात्रा करून त्यांनी हिमालययात्रेची सांगता केली. ह्या दोन वर्षांत जे भव्यदिव्य प्रकृतीचे दर्शन ते घेत होते त्यात त्यांना ना कधी घरगृहस्थीची आठवण झाली, ना कधी स्वतःच्या भविष्याचा विचार त्यांच्या मनात आला.जणू सर्वस्वाने स्वतःला परमेश्वराच्या हातात सोपवून ते मुक्त झाले होते.

यात्रा पूर्ण झाल्यावर १९१३ मध्ये हरिद्वारला रामतीर्थांच्या आश्रमात राहून ते योगसाधना करू लागले. पण लहानपणापासून राष्ट्रोद्धाराचे मनात रुजलेले विचार पुन्हा डोके वर काढू लागले. देश मुक्त झाला नसताना स्वतःच्या मुक्तीचा प्रयत्न म्हणजे स्वेच्छाचार आहे, आत्मद्रोह आहे असे वाटू लगले. संन्यासी-वृत्ती मावळून जीवन-प्रवृत्ती बळावू लागली. राष्ट्रसंघटन केल्याशिवाय क्रांती करणे अशक्य आहे व राष्ट्रसंघटनासाठी प्रभावी साधन 'राष्ट्रीय शिक्षण' हेच आहे हे पूर्वीपासून मनोधारणेत रुजले असल्याने पुन्हा शिक्षणकार्याकडे वळावेसे वाटू लागले. त्यासाठी त्यांनी उत्तर भारतातील राष्ट्रीय वृतीने चालणाऱ्या अनेक संस्थांचा अनुभव घेतला.

१९१४ साली ते हातात 'गीतांजली'चा दीप घेऊन शांतिनिकेतनात जाऊन पोहोचले.

## ३.
## दोन गुरू

काकासाहेब कालेलकरांच्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीचा विचार केला तर त्यांच्यावर प्रामुख्याने महाकवी रवींद्रनाथ ठाकूर व राष्ट्रपिता महात्मा गांधी ह्या दोन महामानवांचा असाधारण प्रभाव असल्याचे प्रकर्षाने दिसून येते. दोघांचाही निकटचा सहवास व मार्गदर्शन त्यांना लाभले होते. काकासाहेबांचे हृदय, गांधीजींसंबंधी बोलताना जितक्या भक्तिभावाने उचंबळून येत असे तितकेच ते रवींद्रनाथांविषयी बोलतानाही येत असे.

काकासाहेबांनी एके ठिकाणी म्हटले आहे की,"मी रवींद्रनाथांना माझे हृदय दिले होते." काकासाहेबांचे साहित्य व अभिरुची पाहता ते रवींद्रांचे पाईक अधिक शोभतात, तरीही प्रत्यक्षात मात्र ते आयुष्यभर गांधीजींचे अनुयायी बनून राहिले.

स्वराज्यप्राप्तीबाबत आलेल्या नैराश्याने ते हिमालयात कसे निघून गेले व ते जाणे आत्मद्रोही वाटल्याने ते अस्वस्थ मनाने परत कसे आले, हा सारा इतिहास आपण पाहिलाच आहे. याच काळात अस्वस्थ अशा मनोवस्थेत एक दिवस त्यांच्या हाती रवींद्रनाथांची 'गीतांजली' आली.

त्यापूर्वीही प्रसंगाप्रसंगातून, काकासाहेबांच्या कानावर रवींद्रनाथांचे नाव ठसले होते. त्यांना आत्यंतिक आदरणीय वाटणाऱ्या अरविंद घोषांवर जेव्हा खटला चालू होता, तेव्हा रवींद्रांनी त्यांच्यावर लिहिलेली, 'हे अरविंद प्रणाम नेओ आमार' ही कविता काकांना जणू आपल्याच भावनांचा प्रतिध्वनी वाटली होती. त्यांचे अभिनव शैक्षणिक विचार व मानवी स्वातंत्र्याचा उद्‌घोष, काकांच्या मनाला भिडला होता. त्यांचे त्यावेळचे राजकीय गुरू लोकमान्य टिळक ह्यांच्या खटल्याच्या वेळी, रवींद्रनाथांनी फंड गोळा करून दाखवलेली जागरूकता आणि ब्रिटिश-अन्याय व अत्याचाराविरुद्ध लिहिलेल्या कडक शब्दांमधून वेळोवेळी व्यक्त झालेली त्यांची राष्ट्रभक्ती, ह्यामुळे टागोरांविषयी आदरभाव त्यांच्या मनात निर्माण झालेला होता. सशस्त्र क्रांतीला टागोरांचा विरोध होता. अशा तुरळक कृत्यांमुळे देशाचे नुकसान अधिक होते हे त्यांचे मत होते; क्रांतिकारक चळवळींच्या फोलपणाविषयीच्या काकासाहेबांच्या मतांशी ते जुळणारे होते. रवींद्रांच्या स्वदेशी आंदोलनाच्या कार्याविषयीही ते ऐकून होते. पण 'गीतांजली'ने त्यांच्या अंतरात्म्याला झपाटून टाकले. ते सांगतात—"तो केवळ काव्यानंद नव्हता, तर आत्म्यासकट संपूर्ण जीवनाला प्रेरणा देणारा तो गूढ अनुभव होता. ती केवळ एक काव्याकृती नव्हती तर एक समृद्ध संस्कृती होती."

जीवनाचा थांग अनेक दिशांनी घेऊ पाहणारा रवीन्द्रनाथ हा एक साक्षात्कारी धर्मपुरुष आहे असे त्यांना जाणवले.'गीतांजली'ने त्यांच्या अध्यात्मप्रवण अन् रसिक मनाला अपूर्व आनंद व समाधान लाभेलच,पण त्यांची आध्यात्मिकतेची भूमिकाच बदलून गेली. ईश्वराने दिलेल्या जीवनाचा सत्कार करणारा, इहलोकविन्मुख न होता आपल्या साऱ्या निष्ठा जीवनदेवतेला अर्पण करणारा हा महाकवी काकासाहेबांवर अंतर्बाह्य प्रभाव टाकून गेला. काकासाहेबांनी पुढे आपले संपूर्ण आयुष्य, आपले सर्व लेखन व चिंतन हे मानवी जीवन सुंदर, तेजस्वी, सृजनशील, पुरुषार्थी व आध्यात्मिकदृष्ट्या उन्नत कसे होईल ह्याचा मागोवा घेण्यात व्यतीत केले. टागोरांप्रमाणे तेही जीवनवादी, जीवनपरायण, जीवनयोगी व जीवनऋषी बनले.

अनुक्रमणिका

रवींद्रनाथ शांतिनिकेतनात शिक्षणाबाबत अभिनव प्रयोग करत आहेत हे कळल्यावर तिथे जाऊन त्यांच्या ह्या प्रयोगाचे अन्तर्बाह्य निरीक्षण करण्याचे त्यांनी ठरविले. त्यासाठी रवींद्रनाथांना एक पत्र पाठवले. हे पत्र काकासाहेबांचा विनम्र स्पष्टवक्तेपणा, त्यांची नैष्ठिकता, सत्त्वयुक्त समर्पणभावना या साऱ्यावर नेमका प्रकाश टाकणारे आहे. ते लिहितात,

"मी राष्ट्रीय शिक्षणाचा प्रेमी व अनुभवी आहे. आपले साहित्य मी वाचलेले आहे. त्याने प्रभावितही झालो आहे. चार-सहा महिने शांतिनिकेतनमध्ये राहून आपल्या शिक्षणाचा आदर्श व पद्धती यांचे अध्ययन करण्याची माझी इच्छा आहे. आपल्याकडून पगार घ्यावा इतका मी विपन्न नाही. आणि स्वतःचा खर्च घरून आणण्याइतका संपन्नही नाही. आपण घ्याल ती सेवा देईन. मला राहायला व जेवायला मिळाले म्हणजे पुरेसे आहे. संस्थेत सेवा करण्यासाठी स्वयंसेवक म्हणून जे येतात त्यातील काही किती बेजबाबदार असतात ह्याचा मला अनुभव आहे. म्हणून मी आपणास एक वचन देऊ इच्छितो की जोपर्यंत मी संस्थेत राहीन तोपर्यंत तिच्या नियमांचे अक्षरशः व भावशः पालन करीन." त्यानंतर रवींद्रनाथांचे ताबडतोब उत्तर आले, 'या.'

त्यानुसार ते शांतिनिकेतनात जाऊन राहिले. मुलांना इंग्रजी शिकवता शिकवता स्वतः बंगाली शिकले. मग रवींद्रांची सर्व कविता त्यांनी वाचून काढली. तिने ते अतिशय प्रभावित झाले. तिच्याबद्दल काकासाहेबांनी लिहिले आहे की, जीवनोपासक कवीच अशी कविता लिहू शकतो. त्यांच्या दृष्टीत सृष्टीतील रूपरसगंधनादकर्म ही सर्व परमेश्वराचीच अनंतरूपे आहेत. त्यातून प्रकट होणाऱ्या जीवनस्वामीला ओळखणे, त्याच्याशी तद्रूप होणे हीच रवीन्द्रनाथांची साधना आहे. मायावाद रवीन्द्रांना अमान्य होता. ते म्हणत, 'संपूर्ण सृष्टी आनंदरूप परमेश्वराचे व्यक्तरूप आहे.वृक्ष,वेली,जलप्रपात,छायाप्रकाशाची लपाछपी, ज्योतिर्मय ग्रह-तारकांचा मेळावा,अनंत प्राणिसमुदाय,ह्या सर्वांच्या स्पंदनाशी माझ्यातील स्पंदन मिळतेजुळते आहे. त्यांच्या संस्पर्शाने माझ्या अंतरात गाढ आनंदच्या लहरी संचारत असतात.'

'ईशावास्यं इदं सर्वम्'ह्या ईशोपनिषदप्रणीत जीवनदृष्टीचा त्यांच्यावर संस्कार होता. काकासाहेबांच्या मनावर पण हाच संस्कार प्रथमपासून दृढावलेला होता. पुढे रवींद्रनाथांच्या सहवासात तो अधिक पक्वमधुर होत गेलेला दिसतो. एके ठिकाणी ते म्हणतात—

"मी प्रथमपासून निसर्गवेडा आहे. निसर्गाचे मला लहानपणापासून असाधारण आकर्षण वाटे. पुढे जेव्हा मी संतसाहित्य वाचले (तेव्हा ईश्वराला सर्वत्र पाहण्याची इच्छा जागृत झाली.) त्यात मानवासकट ही संपूर्ण सृष्टी ही ईश्वराचा अद्यावतार आहे; राम, कृष्ण, बुद्ध वैगरे अवतार नंतरचे आहेत, अशा अर्थाचे एक वचन सापडले. या संतवचनाने माझ्या हृदयावर खोल ठसा उमटला. अनेक कवींना जसे करावे लागले तसे, निसर्गावर चैतन्याचे आरोपण मला करावे लागले नाही. पशुपक्षी, वृक्षवनस्पती, नद्यासरोवरे वगैरे निसर्गाच्या सर्व स्वरूपात मला ईश्वराचे दर्शन होऊ लागले. हा सारा दैवी दर्शनानंद प्रथमप्रथम आत्मनेपदी होता, स्वान्तसुखाय होता. पुढे अध्यापन सुरू केल्यावर हा हृदयात साठवलेला आनंद विद्यार्थ्यांमध्ये संक्रांत करण्याची आवश्यकता वाटू लागली. विद्यार्थ्यांना सामान्य अनुभवामार्फत असामान्य अनुभव देण्याचे आव्हान शिक्षक स्वीकारतो, तेव्हा त्याची सारी प्रेमशक्ती उत्कटपणे त्या दिशेने काम करू लागते. त्यावेळी हृदयस्थ स्वामीचे सहकार्य तिला अपोआप लाभत जाते."

अनुक्रमणिका

काकासाहेबांच्या ह्या निसर्गभक्तीत रवींद्रनाथांच्या सहवासानंतर जीवनानंदाचा उल्हास अधिकाधिक मिसळून गेलेला दिसतो. त्यांनी पुढे लिहिलेल्या 'जीवननो आनंद' ह्या पुस्तकाचे शिरःसूत्र म्हणून त्यांनी तैत्तिरीय उपनिषदातले एक वचन उद्धृत केले आहे.

'को हि ए अन्यात्? कः प्राण्यात्? यद् एष आकाशे आनंदो न स्यात्' (जगात जर आनंद नसता, तर श्वास तरी कुणी घेतला असता का? आणि जगावे असे तरी कोणाला वाटले असते?) ते म्हणतात,"ते माझ्या जीवनाचे एक स्थायी सूत्र आहे... शांतीची दीक्षा देणारी उत्तुंग हिमशिखरे, क्रीडानिपुण नद्या, आकाशात तरंगणारे ढग, झाडावरची फुले... साऱ्यात मला जीवन-स्वामीचे हास्य दिसले... संपूर्ण जीवन आनंदमय आहे. ही माझी चिरंतन अनुभूती झाली आहे."

रवींद्रांच्या प्रभावातून काकासाहेबांच्या अनुभूतीतील ही आनंदमयता गाढ होत गेली असावी. प्रत्येक संवेदनशील व्यक्तीच्या अंतरंगात एक मूळस्वर झुळझुळत असतो. ह्या मूळस्वराशी इतर अनुभवांच्या स्वरांची संगती साधून ती व्यक्ती आपल्या जीवनाची एक रागिणी निर्माण करत असते. निसर्गाविषयीची आत्मीयता, सख्यत्व हा रवींद्रनाथांप्रमाणेच काकासाहेबांच्या जीवनरागिणीतील मूळ स्वर होता. आपल्यात व समस्त सृष्ट जगतात एकच अखंड चैतन्य वाहते आहे हे त्या मूळ स्वराचे समान अधिष्ठान. गंमत पाहा. दोघांनाही आपल्या पूर्वायुष्यात कारवारच्या प्रकृतिसौंदर्याने, काली नदीवरील कड्यावरून वेगाने कोसळणाऱ्या दुधसागराने मोहविले होते. दोघांच्यातील सर्जकता डहुळवली होती. त्यातूनच रवींद्रांची जीवनदृष्टी टिपणारी त्यांची 'प्रकृतीर प्रतिशोध'ही अप्रतिम कविता उमलली. त्याच अनुभूतीतून काकासाहेबांचा दूधसागरावरचा सुंदर ललित निबंध फुलला.

पण काकासाहेबांचे पुढचे अनुभवसंचित भिन्न होत गेले. त्यात भिन्न तरी संवादी सूर मिसळत गेले. त्यामुळे ह्या दोघांच्या जीवनरागिण्यांच्या स्वरूपात फरकही पडत गेला. तरीही गाभा मात्र समानच राहिला.

रवींद्रनाथांच्या एकूण व्यक्तित्वाने असे भारून गेल्यामुळे शांतिनिकेतनात प्रमुख व्यवस्थापक म्हणून राहण्याची रवींद्रनाथांची विनंती त्यांना गौरवास्पद वाटली. त्यांनी तिचा तत्काळ स्वीकार केला. पुढे तेथील वास्तव्यात त्यांनी रवींद्रांच्या काव्यापाठोपाठ त्यांच्या कथा, कादंबरी, नाटक इ. गद्य लेखनाचा सखोल धांडोळा घेतला. रवींद्रांची बहुमुखी व दिव्यस्पर्शी प्रतिभा पाहून ते मोहून गेले. प्रत्यक्ष राजकारणात भाग न घेताही राजकीय विचारांना वास्तव व खानदानी वळण देण्याचे जे कार्य त्यांनी आपल्या कादंबऱ्यांद्वारे केले, ते त्यांना अजोड वाटले. परिणाम असा झाला की एकीकडे त्यांच्यातील श्रेयार्थी साधकवृत्ती परिपुष्ट होत गेली, तर दुसरीकडे त्यांच्यातील सुप्त साहित्यिक जागृत होत गेला. विचारवंताला कलादृष्टीची जोड असेल तरच तो प्रभावी होऊ शकतो, हे त्यांना उमगले. त्यामुळे पुढे गांधीजींच्या 'तुला केवळ लोकरंजन करायचे नाही. लोकशिक्षणही करायचे आहे.' ह्या आदेशानुसार ते जरी वैचारिक साहित्य अधिक लिहू लागले तरी त्यांची कलादृष्टीची साथ कधीच सुटली नाही.

त्याकाळात त्यांना रवींद्रनाथांची संगीतमय तालबद्ध शैलीतील प्रवचने ऐकण्याचाही योग आला. दरवेळी त्यांना वाटे,"अरे, हे तर प्रत्यक्ष कलात्मक उपनिषदच आहे. रवींद्रांच्या रजतकोकिल कंठातून त्यांचे काव्य व संगीत ऐकणे म्हणजे तर साक्षात सरस्वतीचा वीणानाद ऐकण्यासारखे आहे."

अनुक्रमणिका

साधक रवींद्रनाथ व कवी रवींद्रनाथ ह्यांच्याइतकाच शिक्षक रवींद्रनाथांचा प्रभाव पण काकासाहेबांवर खूप पडलेला दिसतो. त्यांना वाटे “मुलांचे मानसशास्त्र जाणणारा, त्यांच्या व्यक्तित्वाची कदर करणारा, त्यांच्या खास विश्वाची जाण असणारा, त्यांच्या भाषेत त्यांच्या प्रतिभासृष्टीशी संवाद साधू शकणारा हा एक जादूगार आहे.”

रवींद्रांचे शिक्षणविषयक विचार वाचल्यानंतरची त्यांची प्रतिक्रिया त्यांच्यावरील रवींद्रप्रभावाची द्योतक आहे. ते म्हणतात-

“गुलामांची दास्यातून मुक्तता करणाऱ्या लिंकनप्रमाणे शिक्षणाच्या नावाने मुलांवर जे अत्याचार होत आहेत त्यापासून त्यांना मुक्त करणारा हा एक आनंदावतारच आहे.”

रवींद्रांच्या ह्या शिक्षणविषयक वृत्तीच्या प्रभावाने काकासाहेबांच्या मनात नवी बीजे पेरली गेली व पुढे त्यांनी ती आपल्यापरीने विकसित केलेली जाणवतात. ते लिहितात-

“माझ्या अध्यापक मित्रांना मी सांगत असतो की आता ‘छात्रदेवो भव’ म्हणण्याचे दिवस आले आहेत. आपला छात्र हा ईश्वराचेच स्वरूप आहे. त्याला शिकवणे ही ईश्वराचीच सेवा आहे, असे मानून अध्यापनकार्य केले पाहिजे. मी जेव्हा लिहितो तेव्हा विद्यार्थ्यांसाठीच लिहीत आहे असे मला वाटत असते. आणि म्हणून लिहिताना मी इष्टदेवाची पूजा करीत आहे असे समजून मी लिहीत असतो. ‘निसर्ग हा चैतन्यमय आहे’ हा माझा अनुभव माझ्या विद्यार्थ्यांमध्ये संक्रान्त करावां, त्यांच्याही मनात निसर्गाविषयी भक्तिभाव उत्पन्न व्हावा म्हणून मी प्रयत्न करीत असतो. हा प्रयत्नदेखील विद्यार्थ्यांपुढे पौराणिक किवा धार्मिक वातावरण उभे न करता त्यांच्या मनात निसर्गाविषयी शुद्ध, कलात्मक भक्तिभाव उत्पन्न व्हावा, अशा स्वरूपाचा असतो.”

निसर्ग व विद्यार्थी या दोघांकडे पाहण्याची टागोर व कालेलकर यांच्या जीवनदृष्टीतील नवीनता विशेष लक्षणीय आहे.

काकासाहेबांना रवींद्रनाथांचे सर्वात मोठे अप्रूप वाटे ते, रवीन्द्रनाथ भारतीय संस्कृतीचे सर्वोच्च उद्‌गाते होते, म्हणून! काकासाहेब म्हणतात,“निसर्गाला या युगाच्या संस्कृतीची सर्वांगसुंदर मूर्ती घडवावीशी वाटली असावी आणि म्हणून त्याने रवींद्रांना घडवले. पूर्व – पश्चिम दोन्हीकडच्या संगीताचे ते तज्ज्ञ होते. काव्याच्या क्षेत्रात, कालिदासासहित सर्व जुन्या कवींनी संतुष्ट होऊन म्हणावे की, ‘आमची परंपरा पुढे चालवून तू आम्हाला कृतार्थ केलेस,’ एवढी मोठी कामगिरी त्यांनी केली आहे. त्यांच्या काव्यात मी नेहमीच भारतीय अक्षयतृतीयेच्या लाटा उसळून आलेल्या पाहिल्या आहेत. शिक्षणक्षेत्रात ते क्रांतदर्शी आधुनिक ऋषी होते. धर्मचिंतनात, उपनिषद्‌कालीन आत्मवीर व बौद्धकालीन दर्शनवीर भिक्षू, यांचे ते प्रतिनिधी होते. कथा, कादंबरी, नाटके, साहित्यमीमांसा, तत्त्वचर्चा, धार्मिक प्रवचने, दर्शनचर्चा, शब्दतत्त्व, इतिहाससंशोधन, समाजसंजीवन, विज्ञानचिंतन, कोणतेही क्षेत्र घ्या, त्यांच्या प्रतिभेने तिथे अप्रतिहत संचार करून तिला उजळून टाकलेले दिसेल. संस्कृतीचे आणखी एक क्षेत्र राहिले, चित्रकला. रविबाबूंमध्ये नवचित्रकलेने जन्म घेतला आहे. हे जेव्हा मी प्रथम ऐकले तेव्हा मला वाटले, थोरांच्या प्रत्येक गोष्टीचे कौतुक जग करते, त्यातलाच प्रकार असावा. मी रवींद्रनाथांची हस्तलिखिते पाहिली होती. त्यातल्या खाडाखोडीतून निर्माण झालेल्या आकृत्याही पहिल्या होत्या. पण एक दिवस त्यांची चित्रे पाहिली नि आश्चर्यचकित झालो. रवींद्रांच्या

अनुक्रमणिका

निरुद्देश रेषांच्या तो विस्तार, त्यातून निर्माण झालेल्या अनेक प्रकारच्या रोचक भेदक सजीव आकृती आणि त्या चित्रविचित्र आकृत्यांना लाभलेले व्यक्तित्व-खरोखर तो एक नवाच अवतार होता. त्यांची चित्रसृष्टी पाहिल्यावाचून त्यांच्या विश्वातोमुखी प्रतिभेची कल्पना यायची नाही. रवींद्रांना भेटल्यावर मी त्यांना माझ्या मनात प्रथम आलेली शंका सांगितली व मग म्हणालो –पण आता मी मोकळेपणाने म्हणू शकतो की आपल्यातला चित्रकार, कवीहून लहान नाही."

काकासाहेबांचे हे रवींद्रवर्णन वाचताना त्यांच्या स्वतःमधील दिलखुलास रसिक, अफाट वाचक, मर्मज्ञ समीक्षक व शैलीकार लेखक तर जाणवतोच, पण त्यांची चित्रकलेतील जाणसुद्धा दाद देण्याइतकी सूक्ष्मतरल होती हे कळते.

आणि म्हणूनच त्यांची पावती मिळताच रविबाबू प्रसन्न झाले आणि म्हणाले, 'तुमचे मत ऐकून बरे वाटले.'

रवींद्रनाथांना पण काकासाहेबांविषयी प्रेम व विश्वास होता. रवींद्रनाथांप्रमाणे काकासाहेबांना विविध कलांमध्ये रुची होती. पुढे प्रयत्नपूर्वक त्यांनी आपली कलेची जाण समृद्ध केली होती. रवींद्रांप्रमाणेच समाजजीवनाच्या शिक्षण, धर्म-कला, नीती, आर्थिक, राजकीय, सामाजिक, तत्त्वज्ञानात्मक अशा सर्व अंगांचा बारकाईने व तपशीलवार विचार करून समन्वित अशी जीवन-व्यवस्था त्यांनी समाजापुढे मांडली. सर्वांगीण जीवनाचा विचार करणारे हे गुरुशिष्य होते.

रवींद्रनाथांमध्ये शंभर टक्के भारतीयत्व रुजले होते. भारतीय संस्कृतीतील जे जे सुंदर, मंगल, प्रसन्नताकारक, कलात्मक ते ते सर्व त्यांनी वेचले होते. भारतीय संस्कृतीतील सण, उत्सव साजरे करण्यातील संस्कारक्षमता त्यांनी हेरली होती. समाजाला समृद्ध व एकसंध करण्याची सणांची परिणती त्यांनी जाणली होती. या सर्व उत्सवांमुळे निसर्ग व मानव यांच्यामध्ये एक प्रकारचे आनंददायक स्नेहबंधन निर्माण होते. ही रवींद्रांची श्रद्धा होती. सणांच्या काव्यात्मक स्पर्शाने मानवी जीवन अधिक सुंदर, समृद्ध होते हा विश्वास होता. काकासाहेबांच्या 'शांतिनिकेतन'मधील वास्तव्यात ह्या साऱ्यांचा संस्कार त्यांच्या तरल मनावर निश्चित झाला असणार. तथापि त्यांनी पुढे स्वेच्छेने निवडलेल्या राजकीय धकाधकीच्या व राष्ट्रउभारणीच्या कार्यात अशा प्रकारच्या संस्कारांना प्रस्फुटित करण्याची संधी त्यांना फारशी लाभली नसावी. स्वच्छता, टापटीप, प्रार्थना एवढ्या सामुग्रीतच आश्रमातील उत्सवांची संगती करावी लागत असे. तरीदेखील ते व नायकम् दंपती [आर्यानायकन हे सिलोनी तरुण शांतिनिकेतानात होते. त्यांच्या पत्नी आशादेवी ह्या बंगाली होत्या. काकासाहेबांनंतर काही वर्षांनी तेही गांधींच्या आश्रमात आले.] संधी मिळेल तेव्हा आपल्या शांतिनिकेतनातील सौंदर्यपूर्ण संस्काराची छाप आश्रमीय वातावरणात उमटवीत असत असे न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी सांगतात.

तथापि काकांच्या चिंतनशील मनाने ह्या व्रत-उत्सवांच्या मर्मांचा बारकाईने सतत शोध घेतला असावा व त्याची प्रचीती त्यांच्या 'जिवंत व्रतोत्सव' ह्या पुस्तकातील विवेचनातून येते.

त्या विवेचनात सणांचा एक वेगळा अर्थ काकासाहेबांनी मांडला आहे आणि तो विचार करण्यासारखा आहे. ते म्हणतात –

अनुक्रमणिका

"आपण कधी इतिहास लिहिला नाही. इतिहास म्हणजे मनुष्यजातीपुढे उत्पन्न झालेल्या प्रश्नांची नोंद. त्यापैकी ज्या प्रश्नांचे निराकरण झालेले असते ते समाजजीवनात, पचवलेल्या अन्नाचे रक्त व्हावे, तद्वत राष्ट्रीय समजुतीचे व सामाजिक संस्काराचे रूप पावले आहेत. राष्ट्रीय महत्त्वाच्या घटनांचा इतिहास आपण सणांच्या द्वारे जागृत ठेवतो. प्रत्येक सामाजिक चळवळीच्या केंद्राला तीर्थाचे रूप देऊन आपण ती जिवंत ठेवली आहे. अशा रीतीने इतिहास लिहून ठेवण्यापेक्षा इतिहास जगणे आणि जगवणे ही आपल्या समाजाची खुबी आहे. अनिर्णीत प्रश्नात मतभेत असतो. जितके मतभेद तेवढे संप्रदाय आपण उभे करतो. जाती, शाखा, पंथ, प्रणाली हे अनिर्णीत प्रश्न सोडवण्याचे शोधलेले मार्ग! इतिहास कागदावर उतरवून ठेवण्यात आपल्याला रस नाही. इतिहास कागदावर जतन करणे चांगले की जीवनात जतन करणे चांगले हे सांगणे काठीण. जोवर परंपरा तुटली नव्हती तोवर आपला इतिहास जिवंत होता. अजूनही लोकांच्या चालीरीती, ज्ञातिसंघटना, व्रते, सण वगैरे तपासून पाहिल्यावर त्यातून पुष्कळ इतिहास मिळण्यासारखा आहे. मात्र हा इतिहास केवळ राजकीय नसेल, तर सामाजिक व राष्ट्रीय असेल."

काकासाहेब शांतिनिकेतनात खूप रंगले-रमले होते; आणि कुटुंब इथे आणवून गृहस्थी पुन्हा स्थिर करण्याचा विचारही त्यांनी सुरू केला होता.

पण असे असतानाच तेथील जीवन सोडून ते महात्मा गांधींकडे वळले.

झाले असे की, दक्षिण आफ्रिकेतील भारतीयांना जाचणाऱ्या 'इमिग्रेशन ॲक्ट' विरुद्ध केलेल्या यशस्वी सत्याग्रहानंतर, गांधीजींनी याच सुमारास कायमचे भारतात यायचे ठरवले. त्यानुसार आपल्या तेथील फिनिक्स आश्रम बंद केल्यावर, आपल्या आश्रमवासी मुलांना कुठे पाठवायचे, असा प्रश्न त्यांना पडला. तेव्हा रवींद्रनाथ व गांधी या दोघांचेही स्नेही असलेले शांतिनिकेतनच्या कार्याला वाहून घेतलेले श्री. ॲन्ड्र्युज यांच्या सल्ल्यानुसार त्यांनी मुलांना शांतिनिकेतनात पाठवले. फिनिक्स येथील त्यांची वेगळी जीवनसरणी चालू राहावी म्हणून रवींद्रनाथांनी मुलांची स्वतंत्र व्यवस्था केली. काकासाहेब त्या मुलांसह राहू लागले. आपल्या मनमोकळ्या स्वभावामुळे ते मुलांमध्ये खूप मिसळून गेले. काकासाहेबांनी गांधीविषयी, त्यांच्या अभूतपूर्व सत्याग्रहाविषयी अनेकजणांकडून ऐकले होते. स्वराज्यप्राप्तीसाठी १८५७ पासून आतापर्यंत झालेल्या, सर्व असफल प्रयासातील मर्यादा त्यांना स्पष्टपणे जाणवल्या होत्या. त्यामुळे दिशाशून्य झालेल्या मनाला आतल्याआत एकप्रकारे नैराश्य भासत होते. ह्या पार्श्वभूमीवर दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रहाच्या बातम्या त्यांना खूप रोमांचकारक वाटल्या. देशाच्या स्वातंत्र्यासाठी एक अभिनव भारतीय उपायच जणू सापडला, असे त्यांना वाटू लागले. गांधीजींचे 'हिन्दी स्वराज्य' हे पुस्तकही त्यांनी वाचले होते. त्यामुळे गांधींजींना भेटण्याची तीव्र जिज्ञासा व उत्सुकता त्यांच्या मनात जागी झाली होती. १७ फेब्रुवारी १९१५ ला गांधीजी शांतिनिकेतनात आले. त्यांच्या स्वागतासाठी शांतिनिकेतनने आपल्या परंपरा व अभिरुचीनुसार भव्य व कलापूर्ण तयारी केली होती. स्वागतासाठीच्या वैदिक मंत्राची निवड व पठण स्वतः काकासाहेबांनीच केले. खरेतर त्या वेळी रवींद्रनाथ शांतिनिकेतनात नव्हते. फिनिक्स आश्रमातील एक विद्यार्थी प्रभुदास गांधी लिहितात, 'आम्हां फिनिक्सवासीयांना हा सौंदर्य, नम्रता व माधुर्याचा आस्वाद देण्यात काकासाहेब सर्वात अग्रेसर होते.'

रवींद्रनाथ शांतिनिकेतनात परतल्यावर त्यांची व गांधीजींची जी प्रथम भेट झाली त्याचे वर्णन करताना, 'बापूजींची ओझरती दर्शने' ह्या आपल्या पुस्तकात काकासाहेब लिहितात, 'दिवाणखान्यात आम्ही

बापूंच्या बरोबर गेलो. रविबाबू एका मोठ्या कोचावर बसले होते. ते उठले. रविबाबूंची उंच भव्य मूर्ती, त्यांचे शुभ्र केस, लांब दाढी, आणि भव्यतेत भर टाकणारा त्यांचा झगा, सर्व काही प्रौढ अन् सुंदर. त्यांच्यासमोर आखूड धोतर, कुडते आणि काश्मिरी टोपी घातलेले गांधीजी जेव्हा उभे राहिले तेव्हा जणू सिंहासमोर उंदीर उभा असावा असे वाटले."

अर्थात् गांधीजींचे जाणवलेले हे बाह्य थिटेपण, त्यांच्या सहवासात राहू लागल्यावर उत्तरोत्तर वितळत गेले व त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या अफाट उंचीमुळे, काकासाहेबांच्या मनात त्यांचे आभाळाएवढे भव्य रूप साकार झाले. मात्र रवींद्रनाथांच्या ह्या राजस्वरूपाचा काकासाहेबांच्या सौंदर्यप्रेमी मनावर इतका तीव्र ठसा उमटला असावा की उत्तर आयुष्यात त्यांच्या बाह्यरूपाविष्कारात त्याची छाप अधिक गडद होत गेलेली जाणवते.

गांधीजीचे थोडे दिवसच शांतिनिकेतनात होते.पण आपल्या सरळ आणि साध्या वृत्तीने त्यांनी तिथल्या लोकांना आपलेसे करून टाकले. काकासाहेब आधीच प्रभावित झालेले; त्यामुळे त्यांना गांधीजींबरोबर चर्चा-संवाद साधणे जराही अवघड गेले नाही.त्यांनी सत्याग्रह, अहिंसा, परमेश्वर अशा नाना विषयांवर गांधीजींना प्रश्न विचारले. इथपर्यंत सांगितले की,"आध्यात्मिकदृष्ट्या मला अहिंसेचे महत्त्व पटलेले आहे. अहिंसेने मोक्ष मिळेल पण स्वराज मिळेल की नाही याची मला शंका आहे." काकासाहेबांची उत्कट जिज्ञासा, चिंतन व नम्रता जाणवल्यामुळे गांधीजींनी त्यांना मनःपूर्वक उत्तरे दिली. काकासाहेबांचा निर्भीड स्पष्टवक्तेपणा हा कोणत्याही समस्येला प्रामाणिकपणे भिडण्याच्या त्यांच्या वृत्तीतून आलेला होता.

प्रथम भेटीत गांधीजींना देखील काकासाहेब आवडले असावेत. त्यांच्या चतुर नजरेला आपल्या भारतातील कार्यासाठी, नवीन आश्रमासाठी हा माणूस सर्वथैव उपयुक्त आहे हे जाणवले असावे. त्यांनी आपल्या आत्मचरित्रात काकासाहेबांच्या ह्या प्रथम भेटीचा जो उल्लेख केला आहे तो ह्याचाच द्योतक असावा. म्हणूनच ते शेवटी काकासाहेबांना म्हणाले, 'मी आता भारतात कायम राहणार आहे. एक आश्रम सुरू करणार आहे. तेथे येऊन राहा. माझी कार्यपद्धती पाहा. अहिंसा पटली तर स्वीकारा. नाहीतर उडून जायला मोकळे आहात. तुमच्यासारखे लोक मला कुठून मिळणार?'

काकासाहेबांनी आपले मित्र जे.बी.कृपलानी यांनाही बोलावून घेतले होते. त्यांनी पण गांधीजींना आडवेतिडवे प्रश्न विचारले. शेवटी म्हणाले, 'मी इतिहासाचा प्राध्यापक आहे. अहिंसेने स्वराज्य मिळाल्याचे एकही उदाहरण मला मिळालेले नाही.' त्यावर गांधीजींनी नम्रतेने पण आत्मविश्वासाने दिलल्या उत्तराने दोघेही प्रभावित झाले. गांधीजी म्हणाले, 'तुम्ही इतिहास शिकवणारे आहात. मी इतिहास घडवणारा आहे.' पुढे काकासाहेब म्हणतात, "पहिल्या भेटीतच जाणवले की त्यांची मते पटोत वा न पटोत, पण एक गोष्ट नक्की की या माणसाने प्रत्येक प्रश्नाबाबत मौलिक चिंतन केले आहे. प्रश्नांची उत्तरेसुद्धा अगदी स्पष्ट शब्दांत व ठामपणे देत होते. पण कशालाही अहंकाराचा वास नव्हता वा कृतक विनयही नव्हता. आणखी एक जाणवले की प्रत्यक्ष अनुभव व तर्कशुद्धेतेने जरी ते बोलत असले तरी काही गोष्टी नितान्त श्रद्धेवर उभ्या होत्या. जणू काही एखाद्या दैवी दुनियेतून आल्यासारखे ते वाटत होते. मला तेव्हाच वाटले, हा युगपुरुष आहे. मातीच्या गोळ्यातून हा माणूस शूरवीर व साधनावीर निर्माण करील. स्वराज्याचा आपला संकल्प पुरा व्हायला याचे नेतृत्व पर्याप्त आहे. आणि मी त्यांच्याबरोबर जाण्याचा निर्णय घेतला."

अनुक्रमणिका

ह्या निर्णयाला आणखी एका कारणाने टेकू मिळाला. त्यांच्या कानावर कुणकूण आली की बाहेरच्या माणसाला बंगाली संस्थेत इतके वरचे स्थान दिले गेल्याचे वैषम्य व राग काही बंगाली लोकांना वाटू लागला आहे. त्यांना फार दुःख झाले. प्रांतीयता पूर्णपणे विसरून भिन्न प्रांतात एकजीव होऊन सेवा करण्याचा भारतीय माणसाचा आदर्श त्यांना दाखवून द्यायचा होता, पण इतर लोक त्यांची प्रांतीयता विसरू शकत नव्हते.

जड अंतःकरणाने त्यांनी शांतिनिकेतनचा निरोप घेण्याची अनुमती रवींद्रनाथांजवळ मागितली. ते म्हणाले, "गुरुदेव, येथे राहण्याची संधी आपण मला दिलीत. तो माझा असाधारण गौरव आहे असे मी मानतो. आपण मला नव्याने सुरू होणाऱ्या 'विश्वभारती'तील आजीव संस्थाचालक करणार होता. आपल्या जीवनविषयक तत्त्वज्ञानाने मी प्रभावितही झालो आहे. तथापि ज्या स्वराज्यकांक्षेसाठी हिमालयातली अध्यात्मसाधना अर्धवट सोडून मी परतलो ती माझी आकांक्षा गांधींच्या मार्गाने पूर्ण होईल असा मला विश्वास वाटू लागला आहे. त्यांच्यातील संतकोटीचे क्षात्रतेज मला आकर्षित करते. मी त्यांच्या कार्यात मदत करण्यासाठी गेलो तर आपण मला आशीर्वाद द्याल ना?" त्यांची प्रामाणिक तळमळ रवींद्रनाथांना जाणवली व त्यांनी काकासाहेबांना जाण्याची अनुमती दिली. आपल्या संपूर्ण साहित्याचा संच त्यांना भेट दिला. ह्याचा काकांना अतीव आनंद झाला. काकासाहेब म्हणतात, "मागाहून मला कळले की, गांधीजीनी त्यांच्यापाशी मागणी केली होती आणि गुरुदेवांनी मला त्यांना 'लोन' म्हणून देण्याचे कबूल केले होते. अर्थात ही उधारी गांधीजींनी कधीच परत केली नाही," गांधीजींकडे येऊन राहिल्यानंतर काकासाहेबांचे व्यक्तिमत्व व कर्तृत्व विविध अंगाने विस्तारत गेले. गांधीजींच्या आश्रमात त्यांच्या जीवनात नवा अध्याय सुरू झाला.

देशसेवा व देशसेवेचे मार्ग शिकण्यासाठी गांधीजींनी आश्रम उघडला होता. शुद्ध सेवेसाठी सेवकाचे चारित्र्य शुद्ध हवे हा गांधीजींचा ठाम विश्वास होता आणि म्हणून त्यांनी आश्रमवासीयांसाठी अहिंसा, सत्य, अपरिग्रह.. वगैरे अकरा व्रते सुचविली होती. काकासाहेबांनी गांधीजींशी चर्चा करून त्यामागची बैठक व मौलिकता जाणून घेतली. अशा व्रतपालनातून चारित्रसंपन्नतेचे वातावरण समाजात निर्माण होईल व ते स्वराज्य-प्राप्तीसाठी उपयुक्त ठरेल हे काकांना जाणवले. तथापि ह्या व्रताची प्रतिज्ञा सामान्य माणसाला एकदम घेता येणार नाही. क्रमशः तो उन्नती करू शेकल हे सौम्य, पण दृढ शब्दांत त्यांनी गांधीजींना सांगितले.

प्रार्थना हे गांधी आश्रमातील महत्त्वाचे अंग. काकासाहेबांना प्रार्थनेचे सामर्थ्य पटले होते. ते म्हणत, "प्रार्थना हे एक प्रकारे हृदयाचे स्नान आहे. प्रार्थनेच्या वातावरणात आपण जर तल्लीन होऊ शकलो तर हृदयात जन्मलेले कुसंस्कार व मलिन संकल्प हळूहळू वितळू लागतात. शुभ संकल्प दृढ व विकसित होऊ लागतात. सामुदायिक प्रार्थनेमुळे भाग घेणाऱ्यांत एक आत्मीयता निर्माण होते."

मात्र गांधीजींच्या मनात प्रार्थनापुरुष हा गीतेतील 'स्थितप्रज्ञ' होता. पण काकासाहेबांनी आपल्या प्रभात प्रार्थनेत महाराष्ट्रातील शिव, विष्णू, गणपती, देवी व सूर्य ह्या पाच उपास्य देवतांच्या प्रार्थना पण समाविष्ट केल्या. काकासाहेबांचे संस्कृत ज्ञान व अध्ययन विपूल होते. त्यामुळे पुढे प्रार्थनेची पुस्तके तयार करताना गांधीजीनी काकासाहेबांचा सल्ला घेऊनच ती तयारी केली. पुरातन संदर्भ,संस्कृत श्लोकार्थ, शब्दार्थ, कशाबाबतही शंका उपस्थित झाल्यास गांधीजी सहजच काकासाहेबांकडे वळत असत.

अनुक्रमणिका

काकासाहेबांना हिंदुधर्माचे सद्यकालीन दूषित रूप फार खटकत असे. युगानुकूल असे धर्माचे रूप बदलायला हवे असे त्यांना फार उत्कटपणे वाटत होते. गांधींजींच्या आश्रमजीवनात हिंदुधर्मातील उत्तमोत्तम अंग तेवढे प्रतिबिंबित होत होते आणि म्हणूनच काकासाहेब गांधीजींच्या आश्रमजीवनात मनःपूर्वक रमून गेले. स्वच्छता, स्वावलंबन, श्रमप्रतिष्ठा, अस्पृश्यताविरोध आदी आश्रमवैशिष्ट्ये तर काकासाहेबांनी जीवनात प्रथमपासूनच अवलंबिली होती.आश्रमात राष्ट्रीय शाळा सुरु झाली आणि काकासाहेबांना हवे ते कार्य मिळाले. गांधींजीनी शाळेचा भार काकासाहेबांवर सोपविला होता. गांधींची 'राष्ट्रीय शिक्षण संकल्पना' काकासाहेबांना पहिल्यापासूनच अभिनव व उपयुक्त वाटली होती. त्यामुळे त्यांनी धोरण, संकल्प म्हणून ते शिक्षण स्वीकारले.

मात्र त्यांच्यात एक लक्षणीय फरक गांधीआश्रमात आल्यावर झालेला दिसतो. शांतिनिकेतनापासून काकासाहेबांना पाहणारे फिनिक्स आश्रमातील प्रभुभाई गांधी म्हणतात, 'आश्रमातले काकासाहेब आता शांतिनिकेतनातले उरले नव्हते. तिथे ते सौम्य व आनंदी दिसत. भरघोस दाढी ठेवत. आता दाढी गेली होती. (ती उत्तरायुष्यात पुन्हा वाढवलेली दिसते.) पूर्वीपेक्षा गंभीर बनले होते. विद्यार्थ्यांशी खूप कमी बोलत. सदा वाचनात मग्न असत. गांधीजींच्या वैराग्यप्रधान जीवनदृष्टीचा प्रभाव नकळत काकासाहेबांवर काही काळ दृढ झाला असावा.'

गांधीजींनी सामान्यातल्या सामान्य माणसाला स्वातंत्र्याच्या चळवळीसाठी प्रेरित करून, चळवळीत सामावून घेतले होते. आजपर्यंत कोणत्याही राष्ट्रवादी नेत्याला जे जमले नव्हते ते अमोल कार्य गांधीजींनी करून दाखविले होते. त्यामुळे काकासाहेबांना गांधीजींबद्दल फार आदर वाटत होता. गांधीजींच्या चळवळी, त्यांचे जीवनतत्त्वज्ञान, त्यांची जीवनदृष्टी, त्यांचे कार्यक्रम हे सर्व त्यांनी मनापासून समजून घेतले आणि ते त्यांचे निष्ठावंत अनुयायी बनले. त्यांनी गांधीजींनाच आपल्यात मुरवले होते. त्यामुळे ते गांधीविचार सुबोध करून सांगणारे प्रवक्ते बनले.

मात्र ते गांधीजींचे आंधळे भक्त नव्हते. कधीकधी गांधीजींचे कार्यक्रम त्यांना पटत नसत. त्या वेळी ते ऋजुतेने आपला विरोध स्पष्ट करत. गांधीजी व रवींद्रनाथ ह्यांच्यातील मतभेदात तर ते काही वेळेस रवींद्रनाथांच्या बाजूने असत व तसे ते स्पष्टपणे गांधीजींना सांगत असत. पण गांधीजी कधी रागावले नाहीत. दुसऱ्याच्या विरोधाला हसून विरघळून टाकण्याची अमोघ कला त्यांना साधली होती आणि त्या कलेने त्यांनी काकासाहेबांनाही पूर्णपणे आपल्याकडे वळवून घेतले होते.

गांधीआश्रमात राहत असताना काकासाहेबांना जाणवले की, इथे येणारे पुरुष आश्रमाचे आदर्श समजून घेऊन वागतात. पण बहुसंख्य स्त्रिया, पती, पुत्र वा पिता ह्यांच्यामुळे बळेच या आदर्शाचा स्वीकार करतात. त्यांच्या मनात आश्रम जीवनाविषयी अप्रीतीच दिसते कारण इथे कौटुंबिक जीवनाला गौण स्थान आहे.शिवाय ह्याचे महत्त्व समजावून देण्याची चिकाटी पुरुषवर्गात नाही. त्यामुळे स्त्रीवर्ग आश्रमजीवन परिपुष्ट करण्याऐवजी शिथिल करण्यासाठी धडपडत आहे. हे लक्षात आल्यावर त्यांनी गांधीजींना सांगितले की यावर वेळीच उपाय होणे आवश्यक आहे. गांधीजींनाही ते पटल्यामुळे त्यांनी स्त्रियांसाठी स्वतंत्र वर्ग, प्रवचने, प्रार्थना सुरू केल्या. परिणामतः स्त्रियांमध्ये मोठी जागृती निर्माण झाली. अबलत्व भावना, विकारी साजशृंगार ह्याचा त्याग होऊन, निर्भय, स्वतंत्रवृत्तीची स्त्री घडवली गेली.

अनुक्रमणिका

गांधीजीही काकासाहेबांचे सर्जक सामर्थ्य जाणत होते. त्याचबरोबर त्यांना हाताने लिहिण्याचा मनस्वी कंटाळा आहे. हे पण गांधीजींना ठाऊक होते. म्हणूनच एकदा येरवडा जेलमध्ये ते दोघे एकत्र असताना, त्यांनी काकासाहेबांना बोलावून, ‘दिवसाच्या वेळापत्रकात मला अर्धातास मोकळा मिळू शकतो, तेव्हा काही लिहायचे असल्यास सांगा. मी लेखनिकाचे काम करण्यास तयार आहे.’ असा प्रांजळ प्रस्ताव मांडला होता. अर्थात काकासाहेबांनी एवढे धाष्टर्य दाखवले नाही. पण यातून दोघांच्यातली आत्मीयता दिसून येते.

काकासाहेबांची गुजरातच्या कल्याणासाठी चाललेली प्रामाणिक धडपड पाहून, गांधीजी त्यांना कौतुकाने ‘सवाई गुजराती’ म्हणत. काकासाहेब म्हणत, इतर कोणत्याही सन्मानापेक्षा ही पदवी मला सर्वात मोलाची वाटते. गांधीजी व काकासाहेब ह्यांच्यातले नाते जगावेगळे होते. काकासाहेबांचे एक इंग्रजी चरित्रलेखक श्री. माधोप्रसाद त्याचे वर्णन करताना म्हणतात ‘काका व गांधीजीं यांच्यामधले नाते, हे दोन आत्म्यांचे सख्य होते. गांधीजी कधी काकांचे नम्र विद्यार्थी बनत तर कधी काकांचे पथदर्शक! काका कधी गांधीजींना शिकवत असत तर कधी विद्यार्थी बनून त्यांच्यासमोर रडतही असत. स्वतःची मते स्वच्छपणे गांधीजींना सुनावण्यात काकांनी कधी मागेपुढे पाहिले नाही. गांधीजी पण, आपला आत्म्याचा आवाज वेगळे सांगत नसेल तर काकांच्या म्हणण्याला मान देत असत.

काकासाहेबांची स्वतंत्र विचारशक्ती, चिंतनशीलता, बुद्धिमत्ता, संस्कृतप्रभुत्व, स्वातंत्र्यप्रेम, वैराग्यशीलता, सहनशीलता इत्यादी गुणांविषयी गांधीजींना खूप आदर होता. गांधीजींचे प्रिय सचिव महादेवभाई देसाई आपल्या डायरीत लिहितात, ‘काकांच्या सहवासाला बापूंनी एका लेखात सत्संग म्हटले आहे आणि ह्या सत्संगाची बापूजींना अनेकदा तहान लागत असे. ही तहान मी तर नाहीच, पण वल्लभभाईसुद्धा भागवू शकत नव्हते.

उत्तम इंग्रजी व भारतीय साहित्य, निसर्गसौंदर्य वगैरे अनेक गोष्टींची गांधीजींना आवड होती. पण त्यांनी जो जीवनमार्ग स्वीकारला होता, ज्यासाठी आपले पूर्ण आयुष्य झोकून दिले होते, त्यासाठी त्यांना ह्या आवडी बाजूला साराव्या लागल्या होत्या, काकासाहेबांजवळ ते तसे अनेकदा बोलून दाखवत असत. त्या आवडींची थोडीशी पूर्ती काकांच्या सहवासात व काकांच्या रूपाने होत होती. कलेविषयी गांधीजींची मते बाळबोध असली तरी काकासाहेबांचे ‘उत्तरेकडील भिंती’ हे ललित पुस्तक वाचून ते इतके खुष झाले की आपला नेहमीचा साधेपणाचा आग्रह सोडून उत्तम कागद, उत्तम छपाई, उत्तम चित्रे देऊन ह्या पुस्तकाची आवृत्ती काढायची इच्छा त्यांनी व्यक्त केली. ‘कलेची वस्तू, तिची कदर झालीच पाहिजे’ असे ते म्हणाले.

गांधीजींचे हे सख्यत्व जाणूनच आपल्या दोन्ही गुरूंशी असलेल्या आपल्या अनुबंधाचे फार मार्मिक विश्लेषण काकासाहेबांनी स्वतःच एके ठिकाणी केले आहे. ते म्हणतात, “गुरुदेव रवींद्रनाथांनी,जीवनाची व्यापकता समजायला व उमजायला मदत केली.त्यामुळे आमच्यासारख्यांच्या जीवनात ते खोलवर पोहोचू शकले. पण ते पोहोचणे संपूर्ण जीवनाविषयक असूनही, बुद्धिगम्यच होते. ते स्वतः व्यक्ती म्हणून आमच्या जीवनात घुसू शकले नाहीत. त्यांची तशी इच्छाही नसावी. आम्ही त्यांची कविता, त्यांचे विचार आपलेसे करू शकलो पण त्यांनी स्वतःला आपलेसे करू दिले नाही. ते दूरच राहिले. गांधीजींचे मात्र यांच्या अगदी उलट. त्यांनी आम्हाला ‘अपनावले.’ आम्ही त्यांचे झालो. ते आमचे झाले.”

अनुक्रमणिका

एवढे सौहार्द दोघांच्यात असल्यामुळेच, महाराष्ट्रात येऊन कार्य करण्याची तीव्र उत्कट इच्छा असूनही व तशी दोनदा संधी मिळूनही [सासवणे येथील राष्ट्रीय शाळेत जाऊन गांधीजींच्या कार्यपद्धतीचा प्रचार करावा असा प्रस्ताव सरदार पटेलांनी, काकांचा तेथील चालकांशी असलेला जिव्हाळा पाहून केला होता. तसेच १९४२ मध्ये बापूजी अणे यांनी टिळक विद्यापीठाच्या कुलपतिपदाचा राजीनामा दिला तेव्हा शंकरराव देव, आचार्य लिमये आदींनी काकासाहेबांना ते स्थान घेण्याचा आग्रह केला.] गांधीजींनी त्यांना नको म्हणून सांगितले व आपली पूर्ण सेवा गांधीजींना वाहिलेली असल्याने त्यांनी दिलेला निर्णय काकासाहेबांनी निर्विकल्पपणे मान्य केला. टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या कुलगुरुपदाला नकार दिल्याबद्दल काकासाहेन लिहतात, "गौहत्तीच्या कुलगुरुपदाची जागा घेण्याविषयी मला सुचविले होते.

पण तेव्हा महात्मा गांधीनी नको सांगितले होते. परप्रांतात जाऊन अधिकारारूढ होणे हे सेवकाला तितकेसे पोषक होत नाही. अधिकार हाती न घेता सेवा करणे हाच उत्तम मार्ग आहे हा त्यांचा सल्ला मला पण पटला होता. मात्र महाराष्ट्राबाबत तसे नव्हते. पण मला वाटते, तेथील वातावरणात माझा जम बसण्याइतका माझा स्वभाव लवचिक नाही हे महात्मा गांधीनी ओळखले असावे. आणि मला वेळीच वाचवले असावे.याहून दुसरी उपपत्ती लागत नाही." असे गांधीमय झालेले काकासाहेब गांधीनिधनानंतरही त्यांच्या विचाराचे प्रवक्तेपण पेलत राहिले. अमुक एका परिस्थितीत गांधींचे मत काय असते? त्यांचे तत्त्वज्ञान अद्यापही कसे मार्गदर्शक ठरू शकते? हे ते प्रश्नकर्त्यांना नीट समजावून देत असत. त्यांच्यावरील आक्षेपांना समर्पक उत्तरे देऊन आक्षेप खोडूनही दाखवीत असत. सत्याग्रहाबाबत ते म्हणतात "सत्याग्रहाचे गांधीजींचे एक व्याकरण होते, या व्याकरणाचे नियम न पाळता आज जो सत्याग्रह केला जातो तो सत्याग्रह राहत नाही, दुराग्रह बनतो. गेल्या वीस वर्षांत कुणीही शुद्ध सत्याग्रहाची उदाहरणे लोकांसमोर ठेवली नाहीत."

इथपर्यंत रवींद्रनाथांकडून गांधीजींकडे झालेला काकासाहेबांचा प्रवास आपण पाहिला, मात्र ह्याचा अर्थ असा नव्हे की रवींद्रनाथांना नाकारून ते गांधीजींकडे वळले होते. उलट गांधीजींचे अनुयायित्व स्वीकारल्यावरही, रवींद्रनाथांचा प्रभाव त्यांच्यावर टिकून राहिलेला दिसतो. गांधीजींच्या सहवासात अत्यंत व्यस्त जीवन जगत असतानासुद्धा संधी मिळेल तेव्हा रवींद्र साहित्याचा आस्वाद इतरांना लाभावा म्हणून अनुवादाचे, रसग्रहणाचे कार्यही ते करत राहिले. १९२० मध्ये गांधीजीच्या नवजीवन वृत्तपत्रातील आपल्या कारकीर्दीची सुरुवात त्यांनी रवींद्रनाथांवरील आस्वादक लेखाने केली. त्यांच्या ह्या अनुवादित ललित कृतीमुळे महाराष्ट्र, गुजरात व सिंधप्रांतात रवींद्रनाथांविषयी आस्था व कुतूहल जागे झाले.

काकासाहेब म्हणत, "वरवर जरी ह्या दोन व्यक्तिमत्त्वांत वृत्तिभेद व साधनभेद दिसत असला तरी ह्या दोन महामानवांच्या जीवनदृष्टीचा गाभा अंतर्यामी एकच आहे. वरवरच्या भेदावर काय म्हणून भर द्यायचा? दोघांच्या स्वभावात आणि कार्यक्षेत्रात अंतर असूनही, दोघांच्या चारित्र्यांत, जीवनाच्या आदर्शांत आणि त्यांच्या युगकार्यांत अद्भुत साम्य होते. मला पुष्कळदा वाटते, देवाने आपल्या कार्याचे दोन विभाग पाडून ते या दोन विभूतींच्या हातात सोपवून त्यांच्या मार्फत आपले युगकार्य संपन्न केले असले पाहिजे. अशा प्रकारे दोघांचे तत्त्वज्ञान परस्परपोषक होते हे एकदा आपल्याला कळून आले म्हणजे दोघांची भक्ती आपण समानतेने करू शकू.... मी माझी जीवनदृष्टी दोघांपासून प्रेरणा घेऊन विकसित केली आहे. दोघांचाही मी ऋणी आहे."

स्वातंत्र्यसिद्धीसाठी राष्ट्रीय चळवळीचा पाठपुरावा करणारे काकासाहेब स्वातंत्र्योत्तर काळात विश्वमिलनाच्या विचारांकडे वळलेले दिसतात. एक प्रकारे त्यांनी स्वतःच्या आचारविचारसारणीत आपल्या दोन्ही गुरूंच्या जीवनदृष्टींचा समन्वय साधलेला दिसतो.

अनुक्रमणिका

४.

## राजकीय व शैक्षणिक कार्य

काकासाहेबांची व गांधीजींची प्रथम भेट शांतिनिकेतनात १९१५ साली झाली. तेव्हाच देशाच्या स्वातंत्र्यासाठी भारतीय जीवनदृष्टीवर आधारलेला एक अनोखा साधनमार्गच गांधीजींच्या रूपाने लाभला आहे असा विश्वास काकासाहेबांच्या मनात दृढ झाला होता. आणि पुढे मागे गांधीजींचा आश्रम स्थापन होताच आपण तिकडे जायचे व गांधीजींच्या नेतृत्वाखाली देशकार्या सुरू करायचे अये त्यांच्या मनाने पक्के केले होते. त्यानुसार गांधीजींनी अहमदाबादजवळ कोचबर येथे १९१७ साली आपला पहिला आश्रम सुरू केल्यावर, त्याची व्यवस्था बघण्यासाठी म्हणून, गांधीजींच्या विनंतीनुसार ते आश्रमात दाखल झाले.

तिथून त्यांच्या जीवनाला एक निश्चित दिशा मिळाली. ख्रिस्ताचे जसे पहिले बारा शिष्य होते तसे गांधीजींचे पहिले चार सत्-शिष्य मानले जातात; ते म्हणजे किशोरलाल मश्रूवाला, महादेवभाई देसाई, काकासाहेब कालेलकर व विनोबाजी भावे. गांधीजींच्या आश्रमात येताना काकांना वाटले, “भारताला हवा असलेला नेता गांधीजींच्या रूपाने लाभला आहे.” आणि गांधीजींना वाटले, ‘हा आपला पहिला, आणि जवळचा बुद्धिजीवी अनुयायी आहे.’

काका आश्रमात आले. पण स्वतंत्र विचारशक्ती व मते यांमुळे ते पूर्णपणे आश्रमीय झाले नाहीत. तरीही गांधीजींना त्यांच्याविषयी आदर वाटत असे. काही दिवसांतच कोचबर येथील आश्रम साबरमतीकिनारी स्वतःच्या जागेत आला. आश्रमाला जोडूनच ‘राष्ट्रीय शाळा’ सुरू झाली. लवकरच देशातील विनोबांसारखे अनेक विद्वान, प्रतिभावान, निष्ठावान शिक्षक ह्या शिक्षणकार्यात सहभागी झाले. पूर्वानुभव व राष्ट्रीय शिक्षणाची निश्चित दृष्टी असलेल्या काकासाहेबांवरच शाळेच्या मार्गदर्शनाची सर्व जबाबदारी गांधीजींना सोपवली. काकासाहेब शाळेत भूगोल विषय शिकवीत. त्यासाठी मुलांना दूरदूर पायी प्रवासाला नेत असत. ते स्वतः खगोलज्ञ असल्याने रात्रीच्या वेळी मुलांना ग्रहताऱ्यांचे ज्ञान करून देत. विद्यार्थ्यांचे मन रसिकाचे मन कसे होईल, ज्ञान हा आनंदाचा प्रवास कसा बनेल यांसाठी ते सतत प्रयत्न करीत. भारतातील उत्तमोत्तम विद्यार्थ्यांना अवघे जग दाखवून आणावे असाही त्यांचा एक संकल्प होता! त्यातून विद्यार्थ्यांची जीवनजिज्ञासा पूर्ण करता येईल असे त्यांना वाटे.

ह्या शाळेतील बहुतेक शिक्षक मराठी जाणणारे होते. पण विद्यार्थी बहुसंख्य गुजराती असत. काकासाहेब हळूहळू मोडकेतोडके गुजराती बोलायला शिकले. पण ते इतिहासाच्या अध्यापनाला अपुरे पडू लागले. मग गुजराती मुलांशी आवर्जून सतत बोलून त्यांनी जिद्दीने आपले गुजराती सुधारले. इतके की, मुलांना आर्यांचा गोष्टीरूप इतिहास सांगता सांगता नरहरीभाई परीखांच्या मदतीने त्यांनी गुजरातीत इतिहासाचे ‘पूर्वरंग’ हे सुरेख पुस्तक तयार केले. आपल्या हिमालय यात्रेतील रोचक अनुभव मुलांना रंगवून सांगता सांगता गुजराती भाषेच्या नैसर्गिक प्रवाहात त्यांची वाणी मिसळून गेली. गुजरातेत राहून राष्ट्रीय शिक्षणकार्य करायचे तर गुजरातीवर प्रभुत्व मिळवायला हवे हे जाणून, त्यांनी मन लावून गुजराती भाषेची प्रकृती, शब्दांच्या छटा, त्यातल्या खुब्या आत्मसात केल्या.

काकासाहेब ज्ञानपिपासू होते. त्यामुळे अनेक विषयांत त्यांना रुची होती. आश्रमात कामाव्यतिरिक्तच्या वेळात अनेक विषयांवरील ग्रंथांचे त्यांचे वाचन सतत चालूच असे. त्यावर त्यांचे स्वतंत्र

अनुक्रमणिका

मनन व चिंतनही चाले. प्रत्येक क्षेत्राविषयी त्यांना सखोल माहिती असे. आश्रमात किशोरलाल मश्रूवाला त्यांना ज्ञाननिधी (Encyclopaedia) म्हणत असत. ते म्हणत 'काकासाहेब जवळ असले की आवश्यक ती माहिती मिळविण्यासाठी कोश धुंडाळण्याची खटपट करावी लागत नाही.' शिक्षणाच्या पद्धती व प्रयोग यांवरून काकासाहेबांची आश्रमातील इतर व्यक्तींशी बरीच वादावादी होत असे, कारण काकासाहेब कर्मठ नव्हते. ते उदारही असल्यामुळे अनुशासननिष्ठ शिक्षण त्यांना रुचत नसे. शिवाय वृतीने ते स्वतंत्र विचाराचे होते. तथापि त्यांनी मित्रांबद्दलची आत्मीयता ह्या वादविवादांनी कधीही गढूळ होऊ दिली नाही. गुणदोषांसकट परस्परांना स्वीकारण्याची वृत्तीही त्यांच्यात होती. ह्या आश्रमात स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने, समानतेने, मुक्तपणे वागवले जाई. समान संधी दिल्या जात.कुठल्याही प्रकरचा स्त्रीपुरुष भेद, कमीपणाचा भाव, त्या अबला आहेत अशी भावना जाणवून दिली जात नसे.

आश्रमात आता काकांबरोबर त्यांच्या पत्नी काकीही माहेराहून पुन्हा राहायला आल्या. पण आश्रमजीवन तर काकींना अजिबात रुचत नव्हते. त्यामुळे त्या दोघांत बरीच वादावादी होत असे. महादेवभाई देसाई म्हणतात, 'फार मोठ्या माणसाचे पत्नीपद तसे फारसे सुखावह नसते.पण हे सत्य काकींनी खोटे ठरवले आहे. त्या दोघांत सतत मतभेद होत असूनही, काकांचा मोठेपणा जाणल्याने काकी त्यांच्या भक्त बनल्या. पण दोघांनाही आपापले स्वतंत्र व्यक्तिमत्व जपण्याची जिद्द होती. सदासर्वकाळ वाचन, चिंतन,मनन, मार्गदर्शन, चर्चा ह्यांत मग्न असणारे काका सणावाराच्या दिवशी घरी काकींच्या हुकुमाप्रमाणे कामधाम, जेवणखाण सरळपणे करताना पाहून दोघांचे चरणवंदन करण्याची इच्छा होई—' मात्र बाहेरून पाहणाऱ्याला दिसणारे हे संसारचित्र आतून म्हणावे तसे संवादी नव्हतेच. पुढे काकांच्या सहवासात काकींमध्ये शिक्षणाची आवड निर्माण झाली. काकांनी देखील उत्साहाने त्यांना मराठी भाषा शिकवली. काव्याचा आस्वाद घेण्याची क्षमता त्यांच्याच निर्माण केली. त्या आनंदी दिवसांच्या स्मरणाने आजही माझे मन आनंदी होते. असे काकासाहेब पुढे म्हणत.

अहमदाबादच्या वास्तव्यात काकींची अंतस्थ रसिकता उमलून आली. एकदा दूध आणायला बाहेर पडल्या असताना दिसलेल्या सकाळच्या आकाशाचे त्यांनी अगदी सहजपणे सुंदर वर्णन केले. त्या म्हणाल्या, "सकाळ म्हणजे जणू ऋषींची संध्यापूजा चालली आहे, दुपारचे गरम आकाश म्हणजे वाटतं जणू ब्राह्मणांचा यज्ञयाग चाललाय, तर संध्याकाळ साधुसंतांचीच वाटते.' यावर काकासाहेब म्हणाले, "काकींच्या ह्या भव्य कल्पनाचित्रात संपूर्ण भारताच्या इतिहासाचे विकासतत्त्व सामावले आहे."

गांधीजीही काकींना मानत असत. ह्याचे प्रमुख कारण म्हणजे, आश्रमातील हरिजनांचा मुक्त वावर हा कस्तुरबासकट इतर स्त्रियांना मान्य नव्हता; परंतु काकींची मात्र हरिजनांबरोबर राहायला, स्वैंपाकघरात त्यांचा वावर असायला हरकत नव्हती. काकांनी आश्रमात आपल्या घरी आणलेल्या एका हरिजन बालकाचे लालनपालनसुद्धा काकी सहजपणे करीत होत्या. त्यामुळे गांधीजींना त्यांचे फार कौतुक वाटे. कोणत्याही गोष्टीला काकींनी विरोध व्यक्त केला तर गांधीजी स्वतः त्यांच्या घरी जाऊन आपली बाजू त्यांना समजावून सांगत असत. पहिल्या महायुद्धात जर्मनीविरुद्ध लढण्यासाठी इंग्रजांना मदत करण्यास गांधीजींनी मान्यता दिली होती व त्यानुसार गुजरातेत सैन्यभरती सुरू झाली होती. गांधीजींचे धोरण म्हणून काकासाहेब, स्वतःला फारसे पटले नसताना, सैन्यात ठरती व्हायला तयार झाले. तेव्हा काकी खूप रागावल्या. त्यांनी इंग्रजांना मदत करण्यास तीव्र विरोध केला. गांधीजी जेव्हा समजूत काढायला आले तेव्हा त्यांनी स्पष्टपणे सांगितले, 'मी भित्री नाही. पूर्वी नवरा क्रांतिकार्यात सहभागी व्हायचा, तेव्हा मी वैधव्यासाठी मनाची तयारी

अनुक्रमणिका

ठेवली होती. झाशीच्या राणीचे नाव मी लावते. आजही इंग्रजांविरुद्ध लढायला नवराच काय, पण दोन्ही मुलांना भरती करायला मी तयार आहे. पण काका इंग्रजांना मदत करणार ही कल्पनाच मला सहन होणार नाही.'

सुदैवाने युद्ध थांबल्याने हा प्रश्नच मिटला. पण ह्या प्रसंगातून काकींच्या व्यक्तिमत्त्वावर स्पष्ट प्रकाश पडतो. काकासाहेब सांगतात. "पुढे जेव्हा मिठाचा सत्याग्रह सुरू झाला तेव्हा काकी दिवंगत झाल्या होत्या. पण मुलांना मी त्यांच्या वरील वाचनाची आठवण करून दिली. तेव्हा शिक्षण सोडून दोघंही सत्याग्रहात सामील झाली हे पाहून काकींच्या आत्म्याला नक्कीच समाधान वाटले असणार."

गांधीजींबरोबर राहू लागल्यावर काकासाहेबांनी हळूहळू गांधीजींच्या तत्त्वज्ञानाचे मर्म जाणून घेतले. ते गांधीजींचे अंधभक्त कधीच होऊ शकले नाहीत. संधी मिळेल तेव्हा ते गांधीजींना अनेक प्रश्न विचारून त्यांचा दृष्टिकोन, मनाचे समाधान होईपर्यंत समजावून घेत व मगच ती जीवनदृष्टी आपलीशी करीत. म्हणूनच ते लोकांना गांधीजींचे तत्त्वज्ञान सहजतेने पण नेमकेपणाने समजावून, पटवून देऊ शकले. व गांधीविचारांचे प्रवक्ते म्हणून प्रसिद्ध झाले. गांधीजींच्या चळवळीचे वेगळेपण काका असे सांगतात "१८५७ पासून देशाच्या स्वातंत्र्यासाठी नाना प्रयत्न होऊनही, स्वराज्य दृष्टिपथात येण्याऐवजी इंग्रजी सत्ता बळकट होत गेली. पण गांधीजी आले आणि त्यांनी एक सरळ रस्ता दाखवला. ज्यात सामान्यातला सामान्य माणूस सहभाग घेऊ शकत होता. ह्यासाठी हृदयात उत्कट स्वातंत्र्याकांक्षा व ती जाहीरपणे व्यक्त करण्याचे धैर्य एवढ्या दोन गोष्टींची आवश्यकता होती. मग तो मिठाचा सत्याग्रह असो, सविनय कायदेभंगाची चळवळ असो वा असहकाराचा पुकारा असो. सारा देश हा लोकोत्तर सेनानीच्या पाठीशी उभा ठाकला. हे आजपर्यंत कोणत्याही राष्ट्रवादी नेत्याला जमले नव्हते." गांधीजींच्या अहिंसेबद्दल ते लिहितात, 'ही अहिंसा जैन वा वैष्णव साधुप्रणीत अहिंसा नाही. लहान मुले वा स्त्रियांतसुद्धा क्षात्रतेज प्रकट करणारी ही तेजस्वी अहिंसा आहे. मारामाऱ्या, खून वा हत्येचे संस्कार आमच्या जनतेवर नाहीत. आमच्या संस्कृतीचे हे मोठेपण आहे. म्हणून जनतेच्या संस्कृतीला अनुरूप असा प्रतिकाराचा मार्ग गांधीजींनी शोधून काढला होता. म्हणूनच जे क्रांतिकारकांना जमले नाही ते गांधीजींनी करून दाखविले. ज्या देशव्यापी लढायांमुळे कोणाचीही हत्या न करता, जाळपोळ न करता, पूल न उडविता, सरकारचे काम पूर्णपणे बंद पाडले जाते... ही काय मामुली बाब आहे?"

गांधीजींची जीवनदृष्टी इतक्या सहजसुंदरपणे समजावून देण्याची हातोटी लाभल्यामुळेच पुढे ते, लोकमान्य टिळकांचे प्रमुख अनुयायी गंगाधरराव देशपांडे ह्यांच्या जीवनदृष्टीतही परिवर्तन घडवून त्यांना गांधीजींचे अनुयायी बनवू शकले. मात्र ह्याचा परिणाम म्हणजे टिळकभक्त महाराष्ट्राच्या मनात काकासाहेबांविषयी कायमचा एक कडवट भाव निर्माण झाला. पुढे त्यात अनेक कारणांनी भर पडत गेली हा दैवदुर्विलास होय!

ह्याच वेळी असहकाराच्या जोडीने काही रचनात्मक व राष्ट्रउभारणीची कामे गांधीजींनी सुरु केली. त्यातील एक म्हणजे स्वतंत्र गुजरात विद्यापीठाची स्थापना हे होय. निव्वळ कारकून तयार करणारी इंग्रजी शिक्षणपद्धती नाकारून स्वदेशाभिमानी, स्वावलंबी, चारित्र्यवान भारतीय नागरिक घडवण्याचे ध्येय, ह्या विद्यापीठाने समोर ठेवले होते. अशाच धोरणाने चालणाऱ्या शाळा जागोजाग स्थापन करून त्यांच्यात समन्वय स्थापन करण्याचेच काम ह्या विद्यापीठाने करावे असे ठरले. ह्या विद्यापीठाच्या कार्यकारिणीवर अर्थात्व

अनुक्रमणिका

काकासाहेबांची नियुक्ती होणे अपरिहार्य होते.गांधीजी या विद्यापीठाचे कुलपती होते. विद्यापीठाचे 'सा विद्या या विमुक्तये' हे ध्येयवाक्य आणि 'वटवृक्ष व कमळ असलेले मानचिन्ह' या संकल्पना काकासाहेबांच्याच होत्या.

शांतिनिकेतनातील आश्रमसंस्कृतीचाही काकासाहेबांच्या मनावर चांगलाच प्रभाव होता. ते म्हणत, "आश्रमसंस्कृती हे आपल्या संस्कृतीचे महत्त्वाचे अंग आहे." त्यातल्या उणिवा लक्षात येऊनही, त्याचे महत्त्व व भारतीयांवरचा तिचा प्रभाव काकासाहेबांना जाणवत होता. ते लिहितात, "या देशातला मनुष्य, मग तो कोणत्याही धर्माचा व पंथाचा असो, आश्रमजीवनाकडे तो नेहमीच आकृष्ट झाला आहे. अध्यात्मसाधनेचे व संस्कृतीचे जेवढे प्रयोग ह्या देशात झाले ते सर्व ऋषिमुनींनी आश्रमाच्या द्वाराच केले. आधुनिक कालातही ज्यांनी महत्त्वाचे कार्य केले त्या रवींद्रनाथ, विवेकानंद, दयानंद, श्रद्धानंद, अरविंद ह्या साऱ्यांनी आपापले आश्रम व आचार्यकुले स्थापन केली होती. गुजरात विद्यापीठाच्या 'मुद्रे' साठी मी वटवृक्षाचे चिन्ह सुचविले ते याच भावनेने की वटवृक्ष (झोपडी व गाय यांसह) आश्रमसंस्कृतीचे प्रतीक आहे. शिवाय पारंब्या जमिनीत रुजून नवे झाड तयार होते. वृक्षकुटुंब वाढते. मग मुळचे 'वैदिक खोड'कोणते ते ओळखणे कठीण होऊन जाते.कित्येक वेळा मूळ खोड कुजून जाते. परंतु वृक्ष ताजातवानाच राहतो." असा हा 'वटवृक्ष' आपल्या अवघ्या संस्कृतीचे सुद्धा प्रतीक आहे.

खरे तर काकासाहेबांची इच्छा, खालपासून शिक्षण सुरू करून हळूहळू विद्यापीठापर्यंत जावे अशी होती. पण गांधींचे व इतरांचे मत विद्यापीठस्थापनेच्या बाजूने होते. म्हणून काकासाहेब, बहुमताच्या इच्छेस मन देऊन विद्यापीठस्थापनेस तयार झाले.

अशा प्रकारे ते देशातले स्वतंत्र असे पहिलेच विद्यापीठ होते. तशात असहकारितेच्या आंदोलनात ज्यांनी महाविद्यालयीन शिक्षण सोडून त्या साऱ्यांना पदवीशिक्षण देण्याचे काम ह्या विद्यापीठाने करायचे होते; म्हणून हे केवळ गुजराती विद्यापीठ न राहता अखिल भारतीय व्हावे व त्याचे माध्यम हिंदी असावे असा काहींचा युक्तिवाद होता. पण काकासाहेबांचे मत पडले "आपले शैक्षणिक आदर्श भारतीय राहतील, शिक्षकांची वृत्ती पण भारतीय असेल, पण हे विद्यापीठ काही देशातले एकमेव विद्यापीठ नसणार. ह्याची प्रेरणा घेऊन प्रत्येक भागात अशी विद्यापीठे स्थापन झाली पाहिजेत व प्रत्येकाचे माध्यम मात्र वरपासून खालपर्यंत त्या त्या प्रांताची प्रादेशिक भाषाच असली पाहिजे." गंमत म्हणजे इतर गुजराती संचालक हिंदीच्या अनुरोधात होते. पण शेवटी गांधीजींनी काकासाहेबांचेच मत ग्राह्य असल्याचा निर्वाळा दिला व गुजराती माध्यमाचे पहिले राष्ट्रीय विद्यापीठ १८ ऑक्टोबर १९२० रोजी सुरू झाले. सर्व विद्यापीठातील विद्यार्थी असहकाराच्या आंदोलनात सरकारी महाविद्यालये सोडून आलेले होते. एक अदम्य उत्साह सर्वांच्या मनात ओसंडत होता. काकासाहेब विद्यार्थ्यांना सांगत "इतर मोठ्या महाविद्यालयांच्या तुलनेत हे महाविद्यालय छोटे वाटेल. पण तो मोठेपणा विटाचुन्याचा आहे. आपण जे कार्य करत आहोत, ती आपली प्रतिष्ठा आहे."

काकासाहेब तेथे अर्थशास्त्र, इतिहास, धर्मशास्त्र, तर कधी उपनिषद शिकवीत असत. बंगालीला शिक्षक नव्हता तर त्यांनी ती पण शिकवण्याचे काम केले. पण सर्वांत महत्त्वाचे काम झाले ते महाविद्यालय सुरू होताना प्रार्थनेनंतर आठ-दहा मिनिटे त्यांनी दिलेली प्रवचने. ती विद्यार्थ्यांच्या मनाला स्पर्श करून जात. काहीतरी चांगले करून दाखविण्याची महत्त्वाकांक्षा त्यांच्या मनात जागृत होत असे. प्रार्थनेचा कंटाळा असूनही केवळ नंतरच्या प्रवचनाच्या लोभाने काही विद्यार्थी प्रार्थनेला येत असत. ग्रंथालय व पुरातत्त्व

अनुक्रमणिका

विभागात काकासाहेबांना विशेष रस होता. प्राच्यविद्याभ्यासाचे हे महत्त्वाचे केंद्र व्हावे म्हणून त्यांनी जैन मुनी 'जिन विजयजी' व बौद्ध धर्माचे प्रकांडपंडित 'धर्मानंद कोसंबी' अशी विद्वान माणसे तेथे आणली होती.

गांधीजींच्या प्रेरणेने काकासाहेबांनी गुजरात विद्यापीठाच्या घडणीत अमोल असे कार्य केले. तथापि काही प्राध्यापकांच्या मनात काकासाहेबांविषयी काही गैरसमज, स्पर्धावृत्ती निर्माण होऊ लागल्याचे लक्षात येताच, ह्या स्पर्धेत आपल्याला रस नाही, तेव्हा आपण वेळीच दूर व्हावे हा निर्णय त्यांनी घेतला व गांधीजींची अनुमती घेऊन ते पुन्हा आपल्या आश्रमातील राष्ट्रीय शाळेत परत आले. पण त्यांनी विद्यापीठाशी संपूर्ण संबंध तोडला नव्हता. नियामक समितीवर ते होतेच. पुरातत्व विभागाच्या कामातही रस घेत होते. विद्यार्थी व अध्यापक मंडळी मार्गदर्शनासाठी त्यांच्याभोवती सतत जमलेली असत. गुजरातच्या तरुणांचे ते खरोखरचे मित्र, शिक्षक व सल्लागार बनले होते. गुजरातच्या एका संपूर्ण पिढीवर त्यांचा प्रभाव पडला.

शिक्षणाच्या जोडीने काकासाहेबांचे वृत्तपत्रीय लेखनही सुरू झाले. आपले विचार व निर्णय लोकांपर्यंत पोहोचवता यावेत म्हणून गांधींजीनी १९१९ साली 'यंग इंडिया' व 'नवजीवन' ही दोन साप्ताहिके सुरू केली. संपादनाचे काम काकांचे परममित्र स्वामी आनंद हे बघत. कधी मजकूर कमी पडला की ते काकांना हुकूम करीत, 'लेख पाठवावा' ते म्हणत 'हुकुमाची पहार ठोकली की काकांच्या खाणीतून हमखास लेखरूपी रत्न बाहेर यायचे.' अशाप्रकारे १९२० पासून काका 'नवजीवन' मधून नेमाने गुजरातीतून लेखन करू लागले. भाषेबाबत काही सुधारणा लागल्यास स्वामी आनंद करून घेत. पुढे लेखनक्षमता वाढत जाऊन काकासाहेब गुजरातीतील एक समर्थ लेखक बनले.

१९२२ मध्ये गांधीजी व इतर नेत्यांची धरपकड झाली. तेव्हा 'नवजीवन'ची पूर्ण धुरा काकासाहेबांच्या हातात आली. ह्या वृत्तपत्रातून त्यांनी जे सातत्याने व विपुल असे ओजस्वी लेखन केले त्यांतून त्यांच्या तेजस्वी, स्वातंत्र्यप्रेमी रूपाची ओळख अधिकाधिक होऊ लागली. पत्रकारितेबाबात काकांची भूमिका टिळकांप्रमाणे, 'समाजहिताचा रखवालदार' अशी होती. निद्रिस्त समाजाला जागे करणे, गुलाम प्रजेला अन्यायाची जाणीव करून देऊन युयुत्सू बनवणे, लोकसंघटन करणे ही कामे पत्रकाराची आहेत अशी काकांची भूमिका होती. तिला जागून त्यांनी संक्रमणकाळात खूप प्रभावी कार्य केले. म्हणूनच ह्या कालखंडाला काकासाहेबांच्या जीवनातील 'सुवर्णकाल' असे उमाशंकर जोशी यांनी म्हटले आहे.

ह्याच काळात देशात, उत्तरेत हिंदु-मुसलमान व दक्षिणेत ब्राह्मण-अब्राह्मण असे तट पडत चालले होते; काँग्रेस ब्राह्मणांची आहे असे मानून अब्राह्मण त्यापासून दूर राहत होते, ही परिस्थिती लक्षात येताच काकासाहेबांनी दक्षिणेत तीन-चार दौरे काढून काँग्रेस ही केवळ ब्राह्मणांची कशी नाही, किती मोठे अब्राह्मण नेते तिच्यात आहेत हे पटवून दिले. तसेच भारतीय नेत्यांनी सहकारी कौन्सिलात प्रवेश करण्याच्या विरुद्ध ते असूनही अब्राह्मण नेता कौन्सिलात जायला तयार असेल तर विरोध करायचा नाही असा पवित्रा त्यांनी घेतला. परिणामी अब्राह्मण नेते व पर्यायाने अब्राह्मण जनता कॉग्रेसकडे वळली. काकासाहेबांना राजकारणात फारशी रुची नसतानाही त्यांनी दाखवलेली ही हुशारी पाहून राजाजींसारखे नेतेही प्रसन्न झाले.

'नवजीवन'मध्ये काकांनी, शीख सत्याग्रहींवरील इंग्रजांच्या अमानुष अत्याचाराविरुद्ध, जळजळीत लेख लिहिले. त्यामुळे १९२३ मध्ये त्यांच्याविरुद्ध राजद्रोहाचा खटला होऊन त्यांना एका वर्षाच्या

अनुक्रमणिका

कारावासाची शिक्षा झाली. त्यावेळी काकी मोठ्या धैर्याने त्यांना साबरमती जेलपर्यंत पोहोचवण्यास गेल्या. त्यावेळी 'नवजीवन'चा खास अंक काढून आधुनिक गुजरातचे निर्माते म्हणून काकांचा गौरव करण्यात आला.

जेलमध्ये गेल्यावर मात्र, स्वामी रामानंद तीर्थांप्रमाणेच काकासाहेबांनी पण बाहेरच्या सर्व वास्तवाचा विचार मनातून पुसून टाकला व जेलमधील जीवनाशी ते एकरूप झाले. ह्या काळात त्यांचे वाचन व लेखन खूप झाले. 'उत्तरेकडील भिंती' हे अपूर्व पुस्तक इथेच लिहिले गेले.

१ फेब्रुवारी १९२४ रोजी काकासाहेब तुरुंगातून बाहेर पडले तेव्हा एक उत्तम शिक्षक, उत्तम लेखक, उत्तम सत्याग्रही, उत्तक पत्रकार व सर्वात महत्त्वाचे म्हणजे गांधीजींचे उत्तम सहकारी म्हणून लोकमानसात त्यांची प्रतिमा स्थिर झालेली होती. ह्याचा परिणाम असा झाला की १९२४ साली बोरसादमध्ये होऊ घातलेल्या गुजराती राजनीतिक परिषेदेचे अध्यक्षपद त्यांच्याकडे आले. अर्थात काकासाहेबांना राजकारणात फारसा रस नसल्याने त्यांनी तीन दिवसांपुरते आपण हे अध्यक्षपद सांभाळू व पुढे वर्षभर ती जबाबदारी वल्लभभाई पटेलांनी सांभाळावी ह्या अटीवर ते स्वीकारले.त्यावेळचे त्यांचे अध्यक्षीय भाषण गाजले.मात्र खेदाची गोष्ट म्हणजे ह्या परिषदेपासूनच काही गैरसमज होऊन वल्लभभाईंच्या मनात त्यांच्याविषयी किल्मिष निर्माण झाले, असे काकासाहेबांना वाटू लागले.

परिषदेहून परतल्यावर लवकरच काकासाहेब आजारी पडले. त्यांना क्षयाची बाधा झाल्याचे निष्पन्न झाले. हा रोग त्यांच्या घराण्यातच असल्याने त्यांनाही तो होण्याची शक्यता डॉक्टरांनी त्यांच्या आईच्या आजारपणातच व्यक्त केलेला होती. व त्यांना तब्येत सांभाळण्याचा इशारा दिला होता.

आजाराची बातमी कळताच, त्यांचे निकटचे स्नेही स्वामी आनंद ह्यांनी पैसे जमवून काकासाहेबांना हवापालटासाठी प्रथम नर्मदाकिनारी नेले. तिथून पुण्याजवळ चिंचवड, सिंहगड व शेवटी ते त्यांना बोर्डीस घेऊन गेले. ते १९२५ साल होते. जवळचे नातेवाईकही घेणार नाहीत इतकी त्यांची काळजी स्वामी आनंद घेत होते. त्यांच्या निरपेक्ष प्रेमामुळे व सेवेमुळे काकासाहेब संकोचून गेले होते. ह्याच वास्तव्यात काकांना 'आलूबेन ड्रायव्हर' ह्या त्यांच्या पारशी मानसकन्येचा लाभ झाला.

खरे तर या काळात आश्रमाचा थोडासा असलेला पगार घेणे हेही त्यांना बरोबर वाटत नव्हते. पण मग गांधीजींनीच पत्र लिहून त्यांना कळवले 'आश्रम गरीब असला तरी कोणावर किती खर्च करायचा त्याचा काही नियम करता येत नाही. तुमच्याबाबत सर्वाधिकार स्वामी आनंदला दिले आहेत. आपल्याला रिकामे बसून पगार घेण्याचा संकोच वाटत असेल तर पडल्या पडल्या विद्यार्थ्यांना पत्रे लिहीत चला. त्याचा फायदा होईल.'

पण तेवढ्याने काकासाहेबांचे समाधान न झाल्याने ह्या निरुद्योगी विश्रांतिकाळात 'स्मरणयात्रा' नामक आत्मकथन व गुजराती भाषेचा शब्दकोश तयार करण्याचे काम त्यांनी स्वतःकडे घेतले. त्यांनी खूप अभ्यास करून परिश्रमपूर्वक तयार केलेला हा शब्दकोश आजही गुजरातचा प्रमाणित कोश मानला जातो. ह्या आजारात गांधीजी त्यांना नेमाने पत्र पाठवून विचारपूस करीत. राहवले नाही तेव्हा स्वतः सिंहगडला येऊन काकांची त्यांनी सेवा केली. ते आश्रमात परतल्यावर रोज त्यांच्याकडे तबकभर फुले पाठवायची व्यवस्था गांधीजींनी केली!

अनुक्रमणिका

ह्या आजारपणात काकांनी आणखी एक निश्चय केला तो म्हणजे पुन्हा शक्यतोवर आजारीच पडायचे नाही; म्हणजे गांधीजींसारख्या थोर माणसाकडून सेवा करून घेण्याची अवघड वेळ आपल्यावर येणार नाही. म्हणून त्यांनी आजारपणात आरोग्यशास्त्र, आहारशास्त्र यावरची पुस्तके वाचून काढली. डॉ. दिनशा मेहतांसारख्या निसर्गोपचारकाशी चर्चा करून श्रम, आहार, विहार इ. चे नियम स्वतःपुरते ठरवून टाकले. मुख्य म्हणजे मनाचा शरीरावर फार प्रभाव असतो हे लक्षात घेऊन मन सुखदुःखापासून अलिप्त ठेवून चिंतेऐवजी चिंतनात मग्न राहण्याचे निश्चित केले.

दोन वर्षानंतर आजारातून उठल्यावर काकांनी आश्रमातील शाळेत पुन्हा रुजू व्हायचे नाही असे ठरवले. कारण एक तर तिथे ब्रह्मचारी आश्रम व गृहस्थाआश्रम ह्यांच्यात जो एक सूक्ष्म अंतराय निर्माण झाला होता तो त्यांना बोचत असे. ह्या व्यतिरिक्त आश्रमाची व्यवस्था पट पूर्णपणे मार्गी लागली होती. तेव्हा आता स्वतंत्रपणे लोकशिक्षणाचे काम करावे असे त्यांनी ठरवले. गांधीजींच्या अनुमतीने 'साहित्य आणि शिक्षण' नावाने नवजीवन मासिकाची एक पुरवणी म्हणून पत्रिका काढण्यात त्यांनी स्वतःला गुंतवून घेतले. ह्याच पुरवणीत त्यांनी 'स्वदेशी' ह्या जुन्या संकल्पनेचा, गांधीजींनी जो नव्याने सर्वांगीण व सखोल विचार केला होता, त्याचे आर्थिक, सांस्कृतिक, आध्यात्मिक, राजकीय असे सर्व पदर उलगडून दाखवणारी एक सुंदर 'पूर्ण स्वदेशी' नावाची लेखमाला लिहिली होती. त्यात ते म्हणतात,

"ज्या समाजात व ज्या देशात आपण जन्मलो त्याची सेवा करणे हा आपला धर्म आहे व तोच स्वदेशी धर्म होय. ग्रामोद्योग व हस्तकला ह्यांना आर्थिक परिमाण तर आहेच, पण त्यापलीकडे एक कलात्मक व आध्यात्मिक परिमाण आहे. त्यात यंत्रवादाच्या मर्यादेचे भान आहे. या स्वदेशीला नैतिक बाजूही आहे. कारण तिच्यामुळे मानवाच्या स्वार्थावर व लोभावर अंकुश राहतो. तिच्यामुळे युद्धाला लगाम बसेल व एक व्यापक बंधुता निर्माण होईल."

आत्यन्तिक राष्ट्रवादाच्या विरुद्ध असलेले प्रसिद्ध फ्रेंच लेखक रोमॉरोलॉ यांना, कालेलकरांच्या स्वदेशी संकल्पनेतही तोच 'विकृत राष्ट्रवाद' आहे असे प्रथम वाटले. म्हणून त्यांनी कालेलकरांच्या दृष्टिकोनावर खरमरीत टीका लिहिली. लोक काकासाहेबांना 'तुम्ही आपला दृष्टिकोन समजावून सांगा,' असा आग्रह करू लागले. पण काकासाहेब म्हणत. "त्यांच्या टीकेने माझ्या कार्याचे काही नुकसान होणार नाही. तेव्हा अशा टीकेला मी कशाला महत्त्व देऊ? गैरसमज कालान्तराने आपोआप दूर होतात..." नि तसेच झाले. पुढे रोमॉरोलॉ यांना काकासाहेबांच्या स्वदेशी कल्पनेचा, भारतच्या तत्कालीन आर्थिक परिस्थितीतला संदर्भ उलगडल्यावर त्यांनी मोठ्या मानाने क्षमायाचनेचे पत्र पाठवले. 'ते तरी प्रसिद्ध करा. म्हणजे इथल्या इंग्रजी वाचकांचा गैरसमज दूर होईल.' असा मित्रांचा आग्रह होता. पण एवढ्या मोठ्या विद्वानाने मागितलेली क्षमा जाहीर करणे, तिचे प्रदर्शन मारणे, काकांच्या सुसंकृत मनाला उचित वाटले नाही.

काकासाहेबांच्या जीवनात स्थैर्ययोग दिसत नाही! म्हणूनच की काय आपल्या पत्रकारितेत मग्न असताना १९२८ साली त्यांच्यावर एक नवीनच कामगिरी येऊन पडली. त्यांनी सुरू केलेल्या गुजरात विद्यापीठात अंतर्गत भांडणांमुळे शिथिलता व गोंधळ निर्माण झाला होता. एवढ्या उमेदीने सुरू केलेल्या विद्यापीठातील ही दुरवस्था पाहून गांधीजी व्यथित झाले. त्यांनी काकासाहेबांना विद्यापीठाच्या कारभारात लक्ष घालून त्याची घडी व्यवस्थित बसवून देण्याची विनंती केली. 'तुम्ही हे काम घेतले तर मी निश्चिंत होईन.'

अनुक्रमणिका

असे गांधीजींनी म्हटल्यामुळे वाईटपणा येण्याची शक्यता जाणवूनही, केवळ गांधीजींना चिंतामुक्त करण्यासाठी त्यांनी १९२८ साली हे कुलनायकपद स्वीकारले. त्यापायी त्यांचे जीवनभराचे दोन अभिन्नहृदय मित्र, आचार्य कृपलानी व स्वामी आनंद रुष्ट होऊन त्यांना दुरावले. त्याचा काकासाहेबांना जन्मभर विषाद वाटत राहिला. पण गांधीभक्तीपायी त्यांनी हेही नाईलाज म्हणून स्वीकारले.

ही पुनर्रचनेची जबाबदारी स्वीकारण्यापूर्वी त्यांनी गांधीजींना स्पष्टपणे एक अट सांगितली होती. ती म्हणजे," प्रत्येक कृती व निर्णयापूर्वी मी आपली संमती घेत जाईन. पण इतर कुणाचीही लुडबुड मी माझ्या कारभारात, निर्णयात वा धोरणात चालवून घेणार नाही."

विद्यापीठाची धुरा हाती घेतल्यावर त्यांनी शिक्षणातील साहित्य, संगीत, नृत्य आदी कलांना गौणरूप देऊन सुतारकाम, सूत कातणे, विणणे आदी उपयुक्त रचनात्मक स्वदेशी वळणांच्या गोष्टींना अग्रक्रम दिला. काका म्हणत, "गांधीजींच्या स्वराज्ययज्ञात गुजरात विद्यापीठाचे योगदान सर्वात जास्त आहे म्हणून मी या सांस्कृतिक त्यागाला सिद्ध झालो."

ते खरे कलांचे उपासक; पण स्वातंत्र्याच्या उपासनेची गरज जाणून त्यांनी कलांना गौणस्थान देऊन शिक्षण ग्रामाभिमुक व व्यावसायाभिमुक केले. धनिकानुनय करण्यासाठी त्यांनी आपल्या ह्या धोरणात रेसभरही बदल केला नाही.

ह्यावेळी मुंबईचे नगीनदासभाई अमुलखराय यांना एक लाख रुपये दान करावयाचे होते. तेव्हा त्यांना काकासाहेबांनी 'ग्रामसेवा मंदिर' नामक संस्था स्थापन करून त्यात ग्रामसेवादीक्षित तरुण तयार करायची योजना दिली व ती मान्य झाली. त्यातून दीक्षा प्राप्त झालेले विद्यार्थी गुजरातेतील खेडोपाडी जायचे, ग्रामीण लोकांबरोबर जेवायचे, त्यांच्या भाषेत बोलायचे, त्यांना विदेशीच्या त्यागाचे व स्वदेशी खादीच्या वापराचे महत्त्व शिकवायचे.दारूचे व्यसन सोडवून राष्ट्रसेवेचे व्रत द्यायचे.सरकारी अत्याचाराला सहनशक्तीने,एकजुटीने प्रत्युत्तर कसे द्यायचे हे सर्व काकासाहेब आपल्या कृतीने विद्यार्थ्यांना दाखवून देत.

अशा तऱ्हेने विद्यापीठाच्या कामात काकासाहेब व्यग्र असताना १९२९ साली काकासाहेबांच्या जीवनात एक दुखःद घटना घडली ती म्हणजे काकींचा मृत्यु!

एका विसंवादी सहजीवनाची ती अखेर होती. आपल्या सहजीवनाविषयी काकासाहेबांनी वेळोवेळी तटस्थपणे नोंदी केल्या आहेत. ते म्हणतात "पारंपरिक संस्कारात वाढलेल्या काकींना, माझे सुधारकी विचार पचवणे अशक्य होते. त्यामुळे प्रथमदर्शनीच आमच्यात दरी निर्माण झाली. ती स्वतंत्र विचारांची होती; आणि मी त्याकाळच्या हिंदू पतीप्रमाणे, अट्टाहासाने माझी मते तिच्यावर लादण्याचा प्रयत्न करी. आश्रमजीवन माझ्यामुळेच तिच्यावर लादले गेले. ह्यामुळे आमच्यात वादावादी होत असे. त्याचा प्रतिकूल परिणाम आमच्या मोठ्या मुलावर सतीशवर झाला. त्याची आई त्याला शिकवे, 'वडिलांनी देशभक्ती केली तेवढी पुरे. तू त्यांच्या नादी लागू नकोस.' सतीशवर त्याच्या आईचा प्रभाव अधिक होता. मी राष्ट्रीय शिक्षणाचा पुरस्कर्ता. माझा मुलगा सरकारी कॉलेजात शिकला. माझ्या टीकाकारांना-खास करून महाराष्ट्राला —मला दांभिक ठरवायला चांगले निमित्त मिळाले."

अनुक्रमणिका

आणखी एके ठिकाणी काका म्हणतात,

"माझी राष्ट्रसेवा, अध्यात्म, सामाजिक उन्नतीचे प्रयत्न समजून घेण्याचा प्रयत्न करूनही काकींना त्यात कधीच रस वाटला नाही. माझ्या सततच्या बदलत्या जीवनाशी काकींनी जुळवून घेतले असते, माझ्या मित्रमंडळींशी अतिशय स्नेहाचे नाते ठेवले असले, तरीपण आम्हा दोघांचे स्वभावच जुळत नव्हते. ब्रम्हचर्येचा आदर्शही काकींना बिलकुल मान्य नव्हता. कलाभिरुचीत तर खूपच अन्तर होते. त्यामुळे आमच्यात सतत वादविवाद चालत. लोकांतही आमची वादावादी हा चर्चेचा विषय होई."

ह्याही परिस्थितीत त्यांनी आपले दाम्पत्यजीवन होईल तेवढे सुखी करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी काकींबद्दलच्या आपल्या सर्व अपेक्षा सोडून दिल्या. दोघे आपापल्या वृत्तीनुसार जीवनक्रम आचरू लागले. त्यामुळे गृहजीवनात समरसता नसली तरी शांती निर्माण झाली. आपण आपल्या पत्नीवर कायमस्वरूपी उदात्त संस्कार करू शकलो नाही ही शिक्षणतज्ज्ञ म्हणून आपली हार आहे, हे काकासाहेबांनी मान्य करून टाकले व तोही प्रयत्न सोडून दिला. निदान काकींवर तरी त्याचा ताण नको! महादेवभाईंसारख्या बाहेरच्यांना हे आतले ताण जाणवलेले दिसत नाहीत. पण ह्या ताणांचा दोघांच्याही तब्येतीवर परिणाम होऊ लागला.

पुढेपुढे काकी वरचेवर आजारीच असायच्या. दिवसभर शाळा व आश्रम यांच्या कामांत काकासाहेब बुडलेले असत. पण रात्री ते काकींची सर्व प्रकारे सेवा करीत. नोकर आला नाही तर काकींचे खराब झालेले बादलीभर कपडेही धुवून टाकत. त्यांच्या हिस्टेरियात शांती मिळावी म्हणून रात्ररात्र त्यांच्याजवळ बसून गोष्टी करीत. मात्र ह्याचा ताण त्यांच्याही प्रकृतीवर पडू लागल्याने, त्यांनी काकींना माहेरी पाठवून देण्याचा निर्णय घेतला. एकमेकांना समजून घेऊ शकत नाही तोवर दूर राहणे इष्ट, असाही विचार त्यामागे होता. पण नवरा असताना माहेरी जाऊन राहण्याची वेळ आली तर त्या वियोगाची बोच बाईच्या जिव्हारी लागते. काकींनी त्या काळातली आपली वेदना कधीही प्रकट केली नाही. पूर्वीच्या विरहात चिमुकल्या दोन मुलांचा विरंगुळा तरी होता. आता दोघे शिक्षणासाठी दूर राहिलेले. आपण माघारी का आलोत हे आईवडिलांना सांगणे त्या काळी शक्य नव्हते. त्यांची आतल्या आत घुसमट सुरू झाली. परिणामतः त्या खंगू लागल्या. त्यांना क्षयाची बाधा झाली. तीन वर्षे त्यांच्या शरीराने तग धरला. शेवटी त्यांच्या लक्षात आलं, आता आपण फार काळच्या सोबती नाही. तेव्हा त्यांनी गांधींना पत्र लिहून आश्रमात येण्याची परवानगी मिळवली. सतीशबरोबर त्या आश्रमात आल्या. आपण जाणार ह्याचा त्यांना लेशमात्र खेद नव्हता. उलट जाण्यापूर्वी काकासाहेबांची आपली भेट झाली, आपले बोलणे झाले याचाच त्यांना खूप आनंद झाला. आपण अहेवपणी जाणार ह्याचेच त्या भारतीय स्त्रीमनाला समाधान वाटत होते आणि त्याच संध्याकाळी त्यांच्या आत्म्याने चाळीस वर्षांच्या जीर्ण नश्वर देहाचा त्याग केला. मृत्युसमयी आपला पती आपल्या जवळपास होता एवढे सौभाग्य काकींच्या पदरात पडले.

खरे तर क्षयरोग हा काकासाहेबांचा 'घरंदाज' वारसा! तरुणपणी त्याने काकासाहेबांनाही गाठले होते. पण शेवटी त्याने घास घेतला तो काकींचा! जणू काकींनी आपले निरोगी दीर्घायुष्य काकासाहेबांना दिले व बदल्यात त्यांचा राजयक्ष्मा घेऊन त्या निघून गेल्या (१९२९)

काकींच्या ह्या साऱ्या फरफटीचे वर्णन श्रीमती ज्योती थानकी यांनी, 'समन्वय के साधक' ह्या काकासाहेबांवरील गौरवग्रंथातील आपल्या लेखात केले आहे. ह्या दुर्दैवी सहजीवनाचे सार त्या काकासाहेबांच्या शब्दांत सांगतात, "एका मर्यादेपेक्षा आमचे सहजीवन सुखी झाले, पण सफलतेचा दावा मी

करू शकत नाही. एक शिक्षणकार म्हणून ह्या वैवाहिक जीवनाच्या चिंतनातून ठामपणे म्हणू शकतो की, बालकांवर चांगले संस्कार होण्यासाठी आईवडील अनुरूप हवेत. अन्यथा त्यांची दुर्दशा होते. ती टाळण्यासाठी माझ्याकडून मी खूप प्रयत्न केला.......एकमेकांना स्वातंत्र्य देण्यात केवढा फायदा असतो ह्याचाही अनुभव घेतला. दोघांनी जीवनसमृद्धी मिळवली; तरी पण आम्ही एकमेकांसाठी नव्हतो, हे कळते."

शेवटी ही करुणिका म्हणजे देशसेवेची ऊर्मी, गांधीविचारातील नैतिक व नैष्ठिक तत्त्वज्ञानाचा प्रभाव, समतोल नसलेला विजोड विवाह ह्या साऱ्यांचा अपरिहार्य असा दुर्दैवी परिपाक होता असेच म्हणावे लागेल.

सामान्यतः पत्नीमागे पतीचे जीवन फार एकाकी व केविलवाणे होते. पण आश्रमीय जीवनामुळे काकासाहेबांना त्यांची कामे करायला सेवक, सचिव मिळाले. सेवाशुश्रुषा करायला अनन्यभावी शिष्या लाभल्या. संघटित आश्रमीय जीवनात व सामुदायिक तुरुंगवासाच्या काळात चिंतन, वाचन व लेखनाला निवांत वेळ आणि लेखनिक मिळत गेले. काकासाहेब कुटुंबवत्सल गृहस्थीत गुंतून राहिले असते तर एवढे चिंतन-लेखन त्यांच्या हातून झाले असते का? जे सुचत गेले, चिंतक मनाला स्फुरत गेले ते सर्व अक्षरबद्ध होऊ शकले असते कां? असा विचार मनात आल्याखेरीज राहत नाही.

काकींच्या मृत्यूनंतर काकासाहेबांनी आपले लक्ष पुन्हा पूर्णपणे देशकार्यावर केंद्रित केले. ह्याच सुमारास वल्लभभाई पटेलांनी बार्डोलीला अहिंसात्मक सत्याग्रह केला. त्यावेळी काकासाहेबांनी सुनियोजितपणे केलेल्या विद्यार्थी-सत्याग्रहींच्या पुरवठ्यामुळेच तो यशस्वी झाला व वल्लभभाई 'सरदार' म्हणून ओळखले जाऊ लागले.

त्या नंतर लवकरच गांधी व नेहरूंनी संपूर्ण स्वराज्याची घोषणा केली व ह्या लढ्यात गुजरात विद्यापीठाचे विद्यार्थी सर्वात पुढे राहतील असा आशावाद गांधींनी व्यक्त केला. गांधीजींची अपेक्षा म्हणजे काकासाहेबांच्या लेखी आव्हानच! लगेच त्यांनी आपले विद्यापीठ स्वराज्य-युद्धाच्या छावणीत बदलून टाकले. देशभरच्या सर्व राष्ट्रीय संस्थांची परिषद भरवून, त्यात विद्यार्थ्यांना आंदोलनात सहभागी होणाचे आवाहन केले. त्यानंतर १९३० साली महाराष्ट्रातही तळेगाव येथे अशीच राष्ट्रीय शिक्षणसंस्थांची परिषद भरवली गेली व काकासाहेब या परिषेदेचे अध्यक्ष होते. तिथेही त्यांनी हेच आवाहन केले. आंदोलनाची सुरूवात म्हणून २६ जानेवारी १९३०ला देशभर स्वातंत्र्यदिवस साजरा केला गेला. त्यावेळी मित्राला लिहिलेल्या पात्रात ते म्हणतात— "स्वतंत्र भारतात राज्य, समाज, कायदा, धर्म ह्यांच्या पुनर्रचनेत माझा उपयोग होऊ शकेल असे मला वाटते. तरीपण ह्या स्वातंत्र्ययज्ञातच ह्या देहाची आहुती पडावी अशी माझी मनोकामना आहे," आणि म्हणून ते स्वतःही आंदोलनात उतरले. आपल्या विद्यापीठातील विद्यार्थ्यांना पण स्वातंत्र्यआंदोलनात बलिदान देण्याची प्रेरणा ते देत राहिले. प्राणविहीन विद्वता, प्राणविहीन कला काय कामाची? त्याकाळात एका विद्यार्थ्याला स्वाक्षरी देताना त्यांनी लिहिलेले "सुरक्षिततेच्या शोधात पुरूषार्थ हरवून जातो." हे वाक्य त्या काळातील त्यांचा महत्त्वाचा संदेश व्यक्त करते.

गांधीजींनी १२ मार्चला दांडीयात्रा सुरू केली. आश्रमात गांधीजींच्या खालोखाल काकासाहेबांचे स्थान होते. गांधीजी जेलमध्ये गेले तर त्यांच्यामागे आंदोलन अहिंसेच्या मर्यादेत चालू ठेवणारा कुणीतरी खात्रीचा माणूस मागे ठेवणे आवश्यक होते. म्हणून गांधीजींनी काकासाहेबांना दांडीयात्रेत सामील होऊ दिले नाही.

अनुक्रमणिका

काकासाहेबांनीही आपली जबाबदारी ओळखून, आपले सत्याग्रही विद्यार्थी गुजरातभर पाठवले. लोकांना आंदोलनाचे स्वरूप व हेतू ह्यांची माहिती देत जनमत जागृत केले व आंदोलन सतत जागते ठेवले. विद्यापीठातील विद्यार्थ्यांचे हे काम पाहून गांधीजींनी उद्‌गार काढले, 'आजपर्यंत विद्यापीठावर जेवढा खर्च केला तो चक्रवाढ व्याजाने वसूल झाला.' काकासाहेबांना मिळालेल्या ह्या प्रशस्तीपत्राहून मोठे पारितोषिक कोणते असणार? ह्या काळात एकदा स्वाक्षरी देताना त्यांनी लिहिले, "माझ्या विद्यार्थ्यांनी माझे जीवन धन्य केले."

काकासाहेंबांची दोन्ही मुले शंकर आणि बाळ सत्याग्रहात सामील झाली होती. शंकरची परीक्षा तर दोन दिवसांवर येऊन ठेपली होती. पण ती सोडून तो आंदोलनात उतरला. काकासाहेब मुलांच्या ह्या देशभक्तीने कृतकृत्य होऊन गेले. एवढ्यात बोरसदजवळ चळवळीला घातपाती रूप आले. हे कळताच काका तिथे गेले. त्यांनी तेथील लोकांना, अहिंसक सैनिक बनून स्वराज्य कसे मिळवता येईल हे ओजस्वी भाषेत सांगितले. परिणामी १९३० साली गांधीजींच्या मागोमाग त्यांना पण तुरुंगयात्रा करावी लागली. प्रथम त्यांना साबरमती तुरुंगात ठेवण्यात आले. इन्स्पेक्टर जनरल ऑफ प्रिझन्स – कर्नल डायल ह्यांच्याशी त्यांचा पहिल्या तुरुंगवासात स्नेह जमला. त्यांना काकासाहेबांविषयी आदर होता. म्हणून त्यांनी तब्येतीचे निमित्त साधून काकासाहेबांची रवानगी गांधीजींच्या समवेत येरवडा तुरुंगामध्ये केली. तिथे गांधीजींच्या सहवासात मार्गदर्शन लाभणार म्हणून काकासाहेब खूष झाले.ह्या काळात त्यांची गांधीजींशी खादीची अर्थनीती, शोषणरहित संस्कृतीमध्ये खेडोपाड्यांचे महत्त्व, ग्रामोद्योग, स्वेदेशीचा व्यापक अर्थ, अहिंसेचे विविध पैलू इ. विविध विषयांवर खूप सखोल चर्चा चाले. ह्याचा फायदा काकासाहेबांना गांधीजींची जीवनदृष्टी समजून घेण्यासाठी व तिचा अर्थ लोकांना नीट समजावून सांगण्यासाठी झाला. हा केवळ महात्माच नाही तर युगपुरुष आहे असेही त्यांना जाणवले.

येरवडा जेलमध्ये असतानाच गांधीजींचे चरखा अधिक कार्यक्षम करण्यासाठी अनेक प्रयोग चालत. ह्या प्रयोगात काकासाहेबांचे यांत्रिकी कौशल्य त्यांच्या प्रत्ययाला आले. हा केवळ शिक्षणशास्त्रज्ञ, साहित्यिक, समाजशास्त्रज्ञ व चिंतकच नाही तर ह्याला वैज्ञानिक प्रतिभा पण लाभली आहे हे गांधीजींच्या लक्षात आले. परिणामी त्यांनी 'उत्तम चरखा स्पर्धे'च्या पारितोषिक समितीवर काकासाहेबांची नेमणूक केली. काकासाहेब म्हणतात "ह्या वास्तव्यात माझा हा पैलू गांधीजींना कळला म्हणून येरवडा जेलबाबत मी कृतज्ञ आहे."

काकासाहेबांच्या सुटकेच्या वेळी गांधीजी व काकासाहेब दोघांचेही डोळे भरून आले. इतके दोघे मनाने एकरूप झाले होते. तुरुंगातून बाहेर पडल्यावर काकासाहेब काही दिवस पुण्यातच राहत होते. त्यावेळी तुरुंगात असलेल्या गांधीजींनी, बाजूच्या ठाकरसींच्या बंगल्यातली दुर्बीण जलमध्ये आणून बसवण्याची सरकारला विनंती केली.ते काम कुणालाच जमेना.

तेव्हा काकासाहेबांनी स्वतः जाऊन, त्या दुर्बिणीचे भाग सुटे करून, ती जेलमध्ये आणून बसवली. तिच्या आधारे गांधीजी आकाश निरीक्षण करीत बसत. हा आनंद आपण गांधीजींना देऊ शकलो म्हणून काकासाहेबांना खूप धन्य वाटले.

अनुक्रमणिका

ह्यानंतर गांधीजींनी काकासाहेबांना, गुजरात विद्यापीठाची आंदोलनामुळे विस्कळीत झालेली घडी पुन्हा बसवून देण्याची विनंती केली. काकांच्या मनातही ह्या विद्यापीठाला देशाचे महत्त्वपूर्ण विद्याकेंद्र बनवण्याच्या अनेक योजना खेळत होत्या. त्यामुळे बाहेर पडल्यावर ते विद्यापीठात विद्यार्थीसंघटन कार्यात बुडून गेले. पण काही दिवसांतच, नव्या व्हॉईसरॉयने गांधी-आयर्विन करार कचऱ्याच्या पेटीत टाकून धरपकडीला सुरूवात केली व काका १९३२ साली पुन्हा तुरुंगामध्ये गेले. ह्यावेळी ते विसापूर तुरुंगामध्ये होते. तिथे उंच भिंतीऐवजी तारांच्या कुंपणात मोकळ्यावर कैदी ठेवले जात. त्यामुळे मोकळेपणा खूप असे. पण व्यवस्था चांगली नव्हती. काकांनी तुरुंगाधिकाऱ्याला विनंती करून तुरुंगाचे व्यवस्थापन आपल्याकडे घेतले. स्वयंपाक, बाजारहाट, हिशेब इ सर्व कामे कैद्यांनी वाटून घेतली. इतके सुरेख संचलन पाहून जेलर खूष झाले. त्यांनी सर्वांना बाजूच्या तळ्यावर आंघोळीसाठी, कपडे धुण्यासाठी जाण्यास परवानगी दिली. बाजारहाटासाठी बाहेरदेखील पाठवत. थोडक्यात जणू तिथे आश्रमजीवनच सुरू झाले!पण पुन्हा तिथून त्यांची बदली बेळगावजवळील ‘हिंडलगा’ तुरुंगामध्ये झाली. तुरुंगामध्ये रोज सूत कातण्याचा त्यांचा रिवाज होता. पण इथला जेलर असभ्य होता. त्याने त्यांना चरखाच दिला नाही. तेव्हा काकांनी सात दिवस उपवास केला. परिणामी त्यांना चरखा मिळाला. पण उपवास करण्याच्या गुन्ह्याबद्दल त्यांना नेहमीची कोठडी सोडून चोर डाकूंच्या कोठडीमध्ये ठेवण्यात आले. काका तिथे पण त्यांच्याशी गप्पा मारून त्यांच्या मनाचा तळ शोधण्याचा प्रयत्न करू लागले. पुंडलिक कातगडे नावाचा मित्र – शिष्य— सत्याग्रहीही त्याच कोठडीत होता. काकासाहेब त्यांच्याशी, स्वराज्याचा संदेश गावोगावी पोहोचवण्यासाठी ग्रामसुधार व ग्रामसंघटन कसे करावे. अंधश्रद्धांपासून लोकांना परावृत्त करून नवे जिवंत स्वरूप त्यांना कसे देता येईल इत्यादी प्रश्नांवर सतत चर्चा करत. ह्यातून १९३२ साली त्याचे ‘हिंडलग्याचा प्रसाद’ हे ग्रामसुधारणांविषयक पुस्तक तयार झाले.

‘हिंडलगा’ तुरुंगामध्ये असताना, काकासाहेबांना फारशी चांगली वागणूक मिळत नव्हती. त्यांच्या प्रकृतीविषयी गांधीजींना नेहमीच चिंता वाटत असे. त्यामुळे ही गोष्ट कानावर येताच त्यांनी प्रिझन सुपरिंटेंडंट कर्नल डायलजवळ त्या बाबतीत चौकशी केली व काकांना आपल्या तुरुंगामध्ये आणून ठेवण्याची विनंती केली. प्रकृतीच्या काळजीव्यतिरिक्त जवळ बोलवण्याचे आणखीही एक कारण दिसते. पूर्वीच्या तुरुंगसहवासात काकांनी गांधीजींना आकाशदर्शनाची माहिती देऊन गोडी निर्माण केली होती. त्यामुळे काकासाहेब जवळ राहिल्यास ते अध्ययन पण पुढे चालू करता येईल व गुजरातीत खागोलदर्शनावर एखादे उत्तम पुस्तकही लिहवून घेता येईल, असा गांधीजींचा विचार होता. त्यांनी काकांना जे पत्र पाठवले त्यात ते म्हणतात ‘आकाशाचे निरक्षण करताना जी अनंतता, स्वच्छता, भव्यता व नियमबद्धता जाणवते ती मनाला शुद्ध करते. नक्षत्रांचे सौंदर्य व त्यातून प्रसवणारी शीतलता ह्यांनी मनाला शांती मिळते. मला हे सर्व अद्भुत वाटते. तेव्हा खगोलविद्येचे ज्ञान व ही अनुभूती ह्या दोन्हींचे मिश्रण असलेले पुस्तक आपण गुजरातीत लिहावे.’ त्यासाठी आपल्याजवळची खगोलदर्शनावरची तीन उत्तम पुस्तकेही निवडून त्यांनी काकासाहेबांना पाठवली होती.

इथून सुटल्यावर काकासाहेब, गांधीजींची वैयक्तिक सत्याग्रहाची कल्पना आवडल्याने ती अमलात आणण्यासाठी अहमदाबादला गेले. तिथे कडक भाषणे देणे, आंदोलनाला प्रेरणा देणाऱ्या छापील पत्रिका काढून वाटणे इ. उद्योग त्यांनी जोरात सुरू केले. शेवटी १९३३ साली त्यांना पुन्हा पकडून सिंध-हैद्राबादमधील तुरुंगात ठेवण्यात आले, तिथे कम्युनिस्ट नेते श्रीपाद अमृत डांगे वास्तव्याला होते. दोघांत मतभिन्नता असूनही छान स्नेह जुळला. डांगे हे काही काळ काकांचे लेखनिकही बनले. डांग्यांविषयी काका

अनुक्रमणिका

म्हणतात, ‘मोठा गोड स्वभावाचा व उमद्या चारित्र्याचा माणूस होता तो.” ‘शुद्ध चारित्र्य’ हा काकांचा प्रिय अस विषय होता.

१९३३ मध्ये गांधीजींनी साबरमती आश्रम विसर्जित करून टाकला. कारण एकतर स्वातंत्र्य मिळेपर्यंत तिथे परत जायचे नाही असे दांडीयात्रेला निघतानाच त्यांनी ठरवून टाकले होते. व त्यांच्याखेरीज आश्रम चालू ठेवण्यात अर्थ नव्हता. दुसरे कारण म्हणजे, आश्रमजीवन आणि तेथील व्यवहारविन्मुखता, श्रद्धाजडता, अत्यन्तिक नियमबद्धता ह्या साऱ्या गोष्टींवर खूप टीका होऊ लागली होती. नेहरू, वल्लभभाई, कृपलानी ह्यांच्यासारखे जवळचे अनुयायी देखील ह्या टीकेत सामील झाले होते. म्हणून गांधीजींनी हा निर्णय घेतला. काकासाहेब म्हणतात, “आश्रमजीवनात काही दोष होतेच. काही गांधीजींच्या स्वभावामुळे निर्माण झाले होते. काही आश्रमवासीयांच्या पामर वृत्तीतून आले होते. तर काही दोष भारतीय जनमानसामुळे आले होते. तरीपण आश्रमाने देशात उज्ज्वल चारित्र्याचे एक वातावरण निर्माण केले होते. या दोषांवर पक्षपातरहित टीका करून आश्रमजीवन सुधारता आले असते. ह्या प्रयोगाची ज्यांनी निर्भय होऊन कठोर टीका केली त्यांनी चारित्र्यनिर्माणाचा एक स्रोत सुकविला हे विसरता कामा नये. परिणामी आज स्वराज्य हाती आले, भौतिक प्रगती पण झाली आहे, पण राष्ट्रीय चारित्र्य नष्ट झाले आहे. ते निर्माण करणे हाच आश्रमजीवनाचा विधायक हेतू होता.” आजची चारित्र्यहीन राजकीय संस्कृती पाहता काकासाहेबांचे विश्लेषण किती अचूक होते हे लक्षात येते.

साबरमती आश्रमाचे ग्रंथालय नगरपालिकेला देऊन टाकण्यात आले. बंद विद्यापीठाचे ग्रंथभांडारही दिले गेले. खरे तर नगरपालिकेवर सरकारी कलेक्टरचा अंकुश असल्याने स्वतंत्र राष्ट्रीय वृत्तीच्या संस्थांची मालमत्ता त्यांना देणे काकासाहेबांना पटले नव्हते पण केवळ गांधींजींची इच्छा म्हणून त्यांनी एका वर्षानंतर त्यास मान्यता दिली.

या कृतीमुळे वल्लभभाई खूप नाराज झाले. कायद्याचा प्रश्न काढून त्यांनी गांधीजींना पत्र पाठवले. काकासाहेबांच्या दृष्टीने त्यांचा प्रश्न चुकीचा नव्हता. तथापि, एकूण वल्लभभाईंच्या मनात आपल्याविषयी पूर्वीपासून नाराजी आहे व प्रसंगाप्रसंगाने ती दृढ होत चालली आहे, हे काकासाहेबांनी ओळखले. आपण स्वतःला गुजराती मानून, ह्या प्रांताच्या सेवेला वाहून घेतले असले तरी आता इथे राहणे फारसे योग्य नाही; आपले इथले कार्य पूर्ण झाले आहे हे त्यांनी जाणले आणि म्हणून गांधीजींच्या संमती घेऊन त्यांनी सप्टेंबर १९३४ मध्ये गुजरातचा निरोप घेतला. ह्यात वल्लभभाईंच्या इच्छेइतकाच स्वतःच्या स्वातंत्र्यरक्षणाचा देखील विचार होता.

अशा रीतींनी १९३४ मध्ये काकासाहेबांच्या जीवनातले एक मोठे कर्तृत्वशाली पर्व संपले. भारतीयांच्या मनातल्या जातीय, प्रांतीय भावनेतली बंदिस्तता त्यांना पुन्हा एकदा जाणवली. तथापि त्यांच्या समन्वयप्रिय वृत्तीत, व्यापक भारतीयत्वातल्या श्रद्धेत जराही कडवटपणा उतरला नाही. गुजराती भाषेविषयी निर्माण झालेला प्रेमबंध तर दोन्हीपक्षी शेवटपर्यंत अतूट रहिला.

अनुक्रमणिका

५.

## राष्ट्रीय शिक्षण

"भविष्यात लोक मला भलेही लेखक म्हणून न ओळखोत ; पण एक शिक्षक, शिक्षणकार म्हणून लोकांना माझे दीर्घकाल स्मरण राहावे यात मला आनंद वाटेल." काकासाहेबांनी स्वतःविषयी केलेल्या वरील विधानातून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे मर्म सहज लक्षात येते. काकासाहेबांचा पिंड शिक्षकाचा होता आणि तो जन्मजात पिंड रवींद्रनाथ टागोर व महात्मा गांधी ह्या दोन शिक्षणतज्ज्ञांच्या सहवासात परिपक्व होत गेला होता.

काकासाहेबांनी ज्या शिक्षणकार्यासाठी स्वतःला सुरुवातीला वाहून घेतले त्या शिक्षणसंकल्पनेचा कसा कसा विकास झाला व काकासाहेबांचे त्यात योगदान कोणते, हे थोडे सविस्तरपणे पाहणे आवश्यक आहे.

प्रारंभी बाबू अरविंद घोष व स्वामी विवेकानंद ह्यांच्या लेखनातील जीवनदृष्टीने प्रभावित होऊन त्यांनी आपले जीवन शिक्षणकार्याला वाहून घेण्याचा निर्णय घेतला होता. पण त्यानंतर पुष्कळ भ्रमंतीही केली होती.

ब्रिटिशांनी अमलात आणलेल्या शिक्षणपद्धतीविषयी लोकमान्यादी देशप्रेमी पुढाऱ्यांच्या मनात तीव्र असंतोष खदखदत होताच. स्वातंत्र्यप्राप्तीसाठी आवश्यक असणारे राष्ट्रप्रेम, सामाजिक बांधिलकी, राष्ट्राभिमान, स्वावलंबन इ.गुणांचा विकास ह्या शिक्षणातून होणारच नाही हे लक्षात येऊन चिपळूणकर, टिळक, आगरकर आदी तत्कालीन नेत्यांनी 'न्यू इंग्लिश स्कूल' सारखी राष्ट्रीयवृत्ती जोपासणारी शाळा पूर्वीच सुरू केली होती. पदवी संपादन केल्यावर नोकरीच्या मागे न लागता स्वतंत्र, प्रतिष्ठित व समजोपयोगी जीवन कसे जगावे हा संस्कार विद्यार्थ्यांवर करणे हे राष्ट्रीय शिक्षणाचे पहिले धोरण होते. अशा राष्ट्रीयवृत्ती जोपासणाऱ्या शाळा महाराष्ट्रात आणखी काही शहरांत निघाल्या. पुढे दिनांक १४ नोव्हेंबर १९०५ रोजी लोकमान्यांनी केसरीतील आपल्या अग्रलेखात राष्ट्रीय विद्यापीठाची गरज ही त्यापुढची कल्पना मांडली. लोकमान्य लिहितात 'सरकारी शाळेतून मिळणारे' शिक्षण हे हुशार, पण नेभळे नोकर तयार करणारे आहे. राष्ट्रीय शील, उमेद व उद्योग वाढवण्याकरता नाही. खाजगी शाळा आहेत पण त्या सरकारी कह्यात. म्हणून सरकारी दबावाखाली न जाणारे विद्यापीठ स्थापण्यावाचून गत्यंतर नाही व तिथे स्वभाषेतूनच शिक्षण दिले पाहिजे.'

राष्ट्रीय शिक्षणाची सुरुवातीची संकल्पना लोकांत स्वदेश, स्वभाषा, स्वसंस्कृती यांबद्दल अभिमानाची भावना जागृत करणे ही होती. पण पुढे पुढे त्या संकल्पनेचा अधिकाधिक विचार होऊन, तिचा विकास होत गेला. स्वभाषा, स्वतःचा तेजस्वी इतिहास ह्यांच्या जोडीने शरीरबलसंवर्धन, व्यवसायशिक्षण हे देखील राष्ट्रीय शिक्षणात सामाविष्ट झाले. धर्मपालनापलीकडे राष्ट्रस्वातंत्र्य, आर्थिक स्थिती, गुलामगिरी ह्या कशाचाही विचार न करणाऱ्या स्थितिप्रिय मध्यमवर्गात जागृती निर्माण करणे हेही उद्दिष्ट होतेच.

त्यातूनच पुढे स्वदेशी चळवळ वाढत गेली. आपल्या देशातील उद्योगधंद्यांना प्रोहोत्सन देणे, देशातील लोकांच्या कलाकौशल्याला वाव देणे, आपल्या लोकांना रोजगारी उपलब्ध करून देणे, देश स्वावलंबी व पर्यायाने स्वाभिमानी करणे, स्वयंपूर्ण करणे, समर्थ करत नेणे असे लो. टिळकांचे शिक्षण आणि

अनुक्रमणिका

स्वातंत्र्याचे समीकरण होते. अशाप्रकारे लोकमान्यांच्या स्वदेश चळवळीतून 'राष्ट्रीय शिक्षणा'चा विचार जरी वेगाने वाहू लागला असला तरी राष्ट्रीय शिक्षणाचा आधुनिक विचार गांधीजींच्या असहकाराच्या काळातच पूर्णरूपाने विकसित झाला. गांधीजींनी जीवनाच्या सर्वच अंगांची, आपल्या विशिष्ट जीवनदृष्टीतून विचार करून मांडणी केली. तशीच शिक्षणाविषयीही त्यांनी एक व्यापक मांडणी केली. राष्ट्रोद्धारक तरुण निर्माण करणे ह्या पूर्वीच्या संकल्पनेच्या अधिक पुढे जाऊन, विद्यार्थ्यांचा बौद्धिक, शारीरिक, नैतिक व अध्यात्मिक विकास करणे हे राष्ट्रीय शिक्षणाचे व्यापक ध्येय आहे असे गांधीजींनी म्हटले आहे. ह्या राष्ट्रीय शिक्षण संकल्पनेच्या टिळक ते गांधी या प्रवासाचे काकासाहेब सुरुवातीपासून साक्षीदार, प्रोत्साहक व प्रचारक होते.

गांधींजींच्या सहवासात येण्यापूर्वीच लोकमान्यांच्या प्रभावामुळे काकासाहेबांचा महाराष्ट्रातील राष्ट्रीय शिक्षणाशी संबंध आला होता. बडोदे,बेळगाव आदी भागांचा महाराष्ट्राशी घनिष्ट भावसंबंध जोडण्यास काकांचे तेथील वास्तव्य व शैक्षणिक कार्य कारणीभूत झाले आहे.ह्या कालखंडात राष्ट्रभक्तीने भारलेले कितीतरी मराठी तरुण काकासाहेबांनी संस्कारित केले आहेत. प्रगत विचारांची बीजे त्यांच्यात पेरली आहेत.

हिमालयातून परत आल्यानंतर कुठल्याही एका जागी, एका शाळेत स्थिर होण्यापूर्वी देशात चालू असलेले शिक्षणाचे नवेनवे प्रयोग पाहावेत म्हणून ते निघाले होते. प्रथम ते कांगडी येथील आर्यासमाजाच्या गुरुकुलात गेले. पण वेदकालीन संस्कृतीचे तिथे चाललेले पुनरुज्जीवन व त्यानुकूल शिक्षण त्यांना तत्कालीन परिस्थितीत अपुरे वाटू लागले. आजची भारतीय संस्कृती वेदकालीन संस्कृतीच्या कितीतरी पुढे गेली आहे हे त्यांनी जाणले. तिथून ते हरिद्वारच्या सनातन्यांनी स्थापन केकेल्या ऋषीकुलात गेले. चार-सहा महिने तिथे त्यांनी मुख्य अधिष्ठात्याचे काम केले. ते पण अपुरे वाटून पुढे ते वैष्णवांच्या आचार्यकुलात गेले. मग वृंदावनचे भारतप्रेमी राजा महेंद्रप्रताप ह्यांचे प्रेममहाविद्यालय त्यांनी पहिले. ह्याच वेळी रवींद्रांच्या शांतिनिकेतनातील शिक्षणविषयक नवनव्या प्रयोगांचे वृत्त कानी येत होते. मग गीतांजलीच्या प्रभावाचे निमित्त होऊन ते 'शांतिनिकेतना'त गेले. तेथील साहित्य, कला, अध्यात्म, ग्रामसेवा इ. ने भारलेल्या वातावरणात हे खरेतर रमले होते. त्यांच्या मूळ पिंडाला तेथील वातावरण भावणारे होते.' पण मनातली स्वातंत्र्याकांक्षा त्यांना अस्वस्थ करीत राहिली. राजकीय तेज सोडून, इतर सर्व राष्ट्रीय शिक्षणातली उद्दिष्टे तिथे होती. स्वभाषा, स्वसंस्कृती, राष्ट्राभिमान इत्यादीचे पोषण तिथे होत असले तरी तेथील शिक्षण स्वातंत्र्ययुद्धास प्रत्यक्ष उद्युक्त करणारे नाही ही सूक्ष्म बोच काकासाहेबांच्या मनात कुठेतरी असावी. त्यामुळे शांतिनिकेतनात गांधीजींची भेट होताच ते गांधीजींकडे ओढले गेले.

गांधीजींच्या 'हिंदी स्वराज्य' ह्या पुस्तकातील संपूर्ण व सर्वांगीण जीवनदर्शन पाहता त्या पायावर शिक्षणाचे एक समग्र व स्वंतत्र तंत्र विकसित करता येईल असाही एक विश्वास त्यांच्या मनात जागा झाला. त्यावेळी त्यांची मनस्थिती जाणून स्नेही केशवराव देशपांड्यांनी काकासाहेबांना गांधीजींकडे जाण्यास प्रोत्साहन दिले. सर्वांगीण शिक्षणाच्या आपल्या कल्पनेच्याच दिशेने— पण अधिक सखोल व व्यापकपणे— गांधीजींचे विचार वाहत आहेत हे त्यांना उमगले होते.

गांधीजींबरोबर साबरमती आश्रमात आल्यावर आश्रमाला जोडून गांधीजींनी राष्ट्रीय शाळा सुरू केली. काकांचा पूर्वानुभव व राष्ट्रीय शिक्षणाची निश्चित दृष्टी लक्षात घेऊन तिचा कारभार काकासाहेबांकडे सोपवला. शाळेत मुले-मुली असा भेद नव्हता. शारीरिक श्रम हे शिक्षणाचे एक अंग मानले गेले होते. सुरुवातीला मौखिक शिक्षणावर भर द्यायचा व मुलांची बोटे वळू लागली की सुवाच्य अक्षरलेखन शिकवायचे

हे धोरण होते. शिक्षण मातृभाषेत, जबरदस्तीने काही शिकवायचे नाही. धार्मिक शिक्षण हादेखील शिक्षणाचा एक भाग, पण तो पुस्तकातून न शिकवता शिक्षकांच्या आचरणातून व बोलण्यातून शिकवला जावा असे धोरण ठरले. शिक्षण स्वावलंबी व्हावे म्हणून नऊ वर्षांनंतर मुलाला काहीतरी उद्योग शिकवायचे ठरले. ह्या छोट्या प्रयोगातूनच पुढे वीस वर्षांनंतर गांधीप्रणीत 'नई तालीम' ही राष्ट्रीय शिक्षणयोजना प्रचारात आली. 'अशा धर्तीवर संपूर्ण देशाची शिक्षणपद्धती बदलायला हवी,' हे गांधीजींचे काकासाहेबांना उद्देशून बोलले गेलेले धोरण, काकासाहेबांनी संकल्प म्हणून स्वीकारले. ते म्हणतात— "ह्यामुळे विचार करण्याची दिशा व पद्धतीत नवाच रंग आला." शरीर, मन व आत्मा ह्या तिन्हींचा विकास साधू पाहणाऱ्या ह्या शिक्षण-प्रणालीसाठी काकासाहेब नवनवे उपक्रम योजू लागले.पुढे वेळोवेळी गांधीजींशी चर्चा करून काकासाहेबांनी त्यांची राष्ट्रीय शिक्षणाची संकल्पना पूर्णपणे आत्मसात करून आपल्या लेखनातून ती सुबोधपणे विशद करण्यास सुरुवात केली.

पुढे तेवढ्यावर न थांबता आपल्या स्वतःच्या चिंतनातून व अनुभवातून ह्या राष्ट्रीय शिक्षण संकल्पनेत त्यांनी मौलिक भरही टाकली. स्वतःप्रमाणे त्यांनी आपल्या विद्यार्थ्यांच्या मनातही भूगोल, खगोल, भारताचा प्राचीन इतिहास, सांस्कृतिक प्रवाह, जगातील धर्मांची विविधता, स्मृतींचे वैशिष्ट्य, भारताची राजनीती, अर्थनीती आदी अनेकानेक विषयांबद्दल जिज्ञासा जागृत केली.

१९२० साली पहिल्या स्वतंत्र राष्ट्रीय विद्यापीठाची स्थापना गुजरातेत झाली. तेव्हापासून काकासाहेबांनी त्या विद्यापीठात अनेक भूमिकांतून खूप मोलाचे कार्य सातत्याने २५ वर्षे केले. ह्या कालखंडात परिस्थितीनुरूप 'राष्ट्रीय शिक्षणा'ची व्याख्या ते विकसित करत गेले.

ते म्हणतात "प्रत्येक देशाचे सामाजिक आदर्श वेगळे असतात. राष्ट्रप्रवृत्ती वेगळी असते. त्यानुसार त्यात त्या देशाची शिक्षणपद्धती हवी. म्हणून अन्य देशाची शिक्षणपद्धती कितीही आकर्षक वाटली तरी जशीच्या तशी उचलणे फायद्याचे नसते. आपली शिक्षणपद्धती गरिबी थाटाची. म्हणून ग्रंथवाढीपेक्षा इथे शिक्षणशास्त्री व जिवंत प्रचारक वाढायला हवें. कायदेकानूपेक्षा धार्मिक प्रघात व नित्याच्या सवयीवर मदार हवी. धंदेशिक्षण शालेय पद्धतीने न देता शागीर्द पद्धतीचे हवे. किंवा कारखान्यांच्या अनुषंगाने हवे. विद्या चोरून ठेवायची वृत्ती सोडून व्यासंग वाढायला हवा."

आज आपण केवळ पाश्चात्यांचे अनुयामी अनुकरण करत आहोत. इंग्रजांनी राजनीतीने देश काबीज केला. पण शिक्षणनीतीने झपाट्याने समाज काबीज केला. आवडीनिवडी, हास्यविनोद, कायदेकानू, आदर्श, यात्रास्थाने, सर्वच गोष्टी आपण पाश्चात्य देशात शोधतो आहोत. पाश्चात्त्यीकरणाच्या हल्ल्यातून देशाला वाचवण्यासाठी ते स्वदेशीचा मंत्र सांगतात; मात्र आपल्या विश्वकुटुंबवादी स्वदेशी धर्म म्हणजे पाश्चात्त्यांचा यांत्रिक राष्ट्रवाद किंवा आंतरराष्ट्रीयवाद नव्हे. आपल्या स्वदेशी धर्म राष्ट्राराष्ट्रातले कल्याणकारी सहकार्य सुचवतो. ह्या त्यांच्या धारणेमुळे शिक्षणक्षेत्रात भाषा म्हणून इंग्रजीलाही एक कोपरा ठेवावा असे ते म्हणत.

विद्यासंस्काराचा आरंभ जर स्वकीय भाषा व स्वकीय संस्कृतीने केला गेला नाही तर आपल्या समाजाला भवितव्य उरणार नाही. स्वधर्म व स्वभाषेच्या संस्कारापासून बाल्यकाळात जो दूर राहील, त्याची ती हानी कधीच भरून न येणारी ठरेल.

अनुक्रमणिका

काकासाहेबांच्या दूरदृष्टीने केलेल्या ह्या इशाऱ्याचे गांभीर्य व महत्त्व शिक्षणक्षेत्रातील आजच्या दुरवस्थेकडे पाहताना पुरेपूर पटते.

गुजरात पाठोपाठ पुण्याला १९२१ साली टिळक महाराष्ट्र विद्यापीठाची स्थापना झाली, इतरही अनेक गावांतून राष्ट्रीय शिक्षणाची विद्यालये स्थापन झाली. महाराष्ट्रातील नागपूर, वर्धा, येवला, तळेगाव, खामगाव वगैरे ठिकाणी राष्ट्रीय शिक्षण संस्थांशी काकासाहेबांचा निकटचा संबंध होता. ते म्हणतात, "मी या सर्व ठिकाणी जाऊन गांधीजींच्या विचारांचा तपशीलवार प्रचार करीत असे." महाराष्ट्रात सासवणे, तळेगाव आदी ठिकाणी जेथे जेथे राष्ट्रीय शिक्षण परिषद होत असत तेथे तेथे अध्यक्षपद आपोआप काकासाहेबांकडे येऊ लागले व त्याचा उपयोग करून ते महाराष्ट्रातील राष्ट्रीय शिक्षण चळवळीला कालानुरूप नवनव्या संकल्पना पुरवीत असत. १९३० मध्ये तळेगाव येथील 'राष्ट्रीय शिक्षण परिषदे'च्या अध्यक्षस्थानावरून त्यांनी जे भाषण केले त्याविषयी तिथे उपस्थित असलेले एक शिक्षणतज्ज्ञ म्हणतात, 'आचार्यांनी पुढे येणाऱ्या वर्धा योजनेचे सुतोवाच केले. आचार्यांचे विचार दिसायला साधे पण नवीन दिशा दाखवणारे, राष्ट्रीय शिक्षणाच्या कल्पनेत मूलाग्राही सुधारणा सुचवणारे होते. त्यांच्या त्या भाषणात नवविचारांची वीज चमकली, पण दुर्दैवाने कायदेभंगाच्या गडगडाटात त्याकडे दुर्लक्ष झाले.

ही परिषद देशातील राष्ट्रीय शिक्षणाला नवीन वळण देण्याच्या गांधीजींच्या इच्छेला मूर्तस्वरूप देण्यासाठी बोलावण्यात आली होती. ह्या परिषदेत टिळक विद्यापीठातील श्री. हर्षे प्रभृती सर्व अध्यापकांनी आणि महाराष्ट्रातील सगळ्याच राष्ट्रीय शिक्षणसंस्थांनी उत्साहाने भाग घेतला होता.या परिषदेत राष्ट्रीय शिक्षणाचे ध्येय,प्रथम जे व्यापक व अस्पष्ट होते, ते स्पष्ट व मर्यादित केले गेले.

ह्या परिषदेतच स्त्रीशिक्षण स्वरूप, 'ग्रामसेवा मंदिरां'ची स्थापना, उच्च शिक्षणाचे माध्यम प्रांतीय भाषा की हिंदी, धर्म व राष्ट्रीयता यांची सांगड, उद्योगप्रधानता आदी मुद्द्यांचाही विचार झाला व अप्रत्यक्षपणे राष्ट्रीय शिक्षण संकल्पनेचे पुढील वळण सूचित केले गेले.कारण गांधीजींनी पुढे 'राष्ट्रीय शिक्षण संकल्पने'त मूलोद्योग, मातृभाषा, ग्रामसुधारणा, खादी, अहिंसा, सर्वधर्मसमभाव, श्रमप्रतिष्ठा इत्यादी साधनांना अधिक प्राधान्य दिले आहे.

काकासाहेब पिंडाने तत्त्वज्ञानी, जागतिक तत्त्वज्ञानाचा त्यांचा चांगला परिचय होता. नवभारताच्या रचनेत जे अनेक बदल करायचे आहेत त्यांचा त्यांनी बारकाईने व आस्थेने विचार केला होता. नवभारताचे राष्ट्रीय जीवन निकोप, समतोल, निर्मल, नीतिशुद्ध, संयमी, उद्दात्त, ज्ञानपूर्ण होण्यासाठी कशा तऱ्हेने शिक्षण दिले जावे, ह्यासाठी अनेक मार्गदर्शक तत्त्वे व सूचना त्यांनी मांडल्या.

राष्ट्रोद्धारापासून सुरू झालेली काकासाहेबांची शिक्षणविषयक संकल्पना आत्मोद्धारापर्यंत विकसित झालेली दिसते. समतेच्या भोंगळ कल्पनेमुळे आज शिक्षणक्षेत्रात जी अनागोंदी माजली आहे ती पाहता काकासाहेबांनी विशद केलेल्या समतेचा अर्थ माननीय वाटतो. ते म्हणतात, "समता म्हणते यांत्रिकी समता नव्हे. विविधता हा जगाचा नियम आहे. तो लक्षात घेऊन समता राबवायची आहे. खरे शिक्षणशास्त्र जीवनभेदानुसार निरनिराळी तयारी करून देण्याची जबाबदारी स्वीकारीत असते. आजचे सरकारी शिक्षण सर्वांना एकाच साच्यात पिळून काढते. ते योग्य नव्हे. आमचे आंधळे, परवश धोरण सोडून, दूरदृष्टीने संयोजित व सुसूत्र शिक्षणपद्धती बनवायला हवी."

अनुक्रमणिका

शिक्षणातील देशीपणावर काकासाहेबांनी जोर दिला आहे. शिक्षण व विद्या ह्यांबद्दलच्या आपल्या देशी, आदर्शवादी मानसिकतेला अनुरूप विचार मांडताना ते म्हणतात,

'पूर्वी शिक्षणाचा आदर्श विद्वत्ता हा होता. पुढे नोकरी हा ठरला. त्याला गोंडस नाव 'करिअर' दिले जाते. पण करिअर, नोकरी, पैसा हे सर्व ओघाने यावे. खरे शिक्षण समाजोन्नती व आत्मोन्नतीसाठीच असते. आपल्या ह्या स्वार्थी वृत्तीचे समर्थन 'आम्ही काही योगी नाही, संसारी आहोत.' असे केले जाते. पण लोकांपुढे हीन आदर्श ठेवणे किवा असलेले आदर्श खाली ओढणे हा शिक्षणाचा सर्वात मोठा प्रजाद्रोह आहे."

आजच्या शिक्षणातील त्रुटींवर बोट ठेवताना काकासाहेब म्हणतात, "आजचे शिक्षण राहणीतील खर्चीकपणा, विचारस्वातंत्र्याच्या नावाखाली बौद्धिक स्वेच्छाचार, करमणुकीच्या, आनंदाच्या नावाखाली वेळेचा दुरुपयोग ह्या पद्धतीने खालावत आहे."

शिक्षणाचा व्यापक हेतू स्पष्ट करतानाच काकासाहेब लिहितात, "आपले अध्यात्म हे त्रिकालाबाधित सत्य आहे. बाकी धर्मकल्पना काल, समाज, काव्यवृत्ती ह्यातून फुललेल्या आहेत. काही काव्यमय, काही चूक, काही कालबाह्य, काही अपसमज. ते सर्व हलक्या हाताने दूर करायला, धर्म तपासायला, शिरलेला अधर्म दूर करायला शिक्षणाने समर्थ केले पाहिजे. धार्मिक शिक्षण म्हणजे कर्मकांड वा धर्मविधींचे शिक्षण नव्हे तर चारित्र्यबल व तत्त्वनिष्ठा वाढवणारे शिक्षण. गणित, व्याकरण, तर्कशास्त्र ह्यांचे शिक्षण ज्ञात माहितीपेक्षा बुद्धीला जी कसरत होते, बुद्धीचे हत्यार पाजळते म्हणून महत्त्वाचे. व्यापारशिक्षण तर महाराष्ट्राने घ्यायलाच हवे. पैसा, धाडसीपणा, काही सवयी ह्या स्वभावे शिकायला हव्यात. उद्योगधंद्यांचे शास्त्र तयार करून उद्योगधंद्याला प्रतिष्ठा द्या. संस्कारितता केवळ साहित्यातूनच नव्हे तर उद्योगशिक्षणातूनही देता येते. आज हे उद्योजक व्यापारी पडद्यामागे राहून सर्व सूत्रे हाती घेताना दिसतात. ब्रह्मवर्ग व क्षात्रवर्ग आज क्षीण होऊन अग्रपूजेचा मान वैश्यवर्गाला लाभला आहे. आपल्या इच्छेनुरूप ते सर्व समाजाला वाकवीत, वळवीत आहेत. पण आता जगातील कष्टकरी वर्ग जागृत होत आहे. संघशक्तीचे सामर्थ्य काबूत आले आहे. आता जगात रंकप्रकोप होणार आहे, अशी चिन्हे दिसत आहेत. ह्यातून जगाला वाचवेल तो गीतेतील प्रवृत्तिप्रधान, स्वधर्मनिष्ठ संन्यास! अलिप्त राहून समाजव्यवहाराशी तादात्म्य पावू शकणाऱ्या तरुणांची निर्मिती राष्ट्रीय विद्यापीठातून व्हायला हवी."

काकासाहेबांच्या दूरदृष्टीला १९३४ सालीच जाणवलेले भविष्यातील परिवर्तन, त्यांच्या चिंतनशिलतेचे फलस्वरूप आहे. औद्योगिक शिक्षणाचे वाढते महत्त्व, पाश्चात्त्यीकरणाचा धोका, यांत्रिकीकरणातील चैतन्यहीनता, उपभोगी वृत्तीतील भयानकताही सारी भविष्यकालीन कुघटिते, त्यावेळीच हेरून त्यांनी आपल्या भाषणांत त्यांचा विस्ताराने ऊहापोह केला आहे. ह्या साऱ्यावर उपाय म्हणजे व्यापक राष्ट्रीय शिक्षण हेच होय असे ते मानतात. कारण समाजावर नियंत्रण ठेवणाऱ्या सैन्य. पोलीस, धर्म, कायदा ह्या सर्व शक्ती भय वा लालूच दाखवून आपले काम करतात. पण भयपूर्ण वातावरणात मनाचा विकास कधीच होणार नाही. ह्या दृष्टीने शिक्षणधर्म हा अहिंसाधर्म आहे. बुद्धीला जागृत करून, सवयींना वळण लावून, सेवेची सवय करून शिक्षण जीवनात कायमचे परिवर्तन करते. शिक्षणाइतका सरळ, सशास्त्र आणि स्थायी असा उपाय नाही. म्हणूनच व्यापक शिक्षणाला ते आधुनिक धर्मसाधन म्हणतात.

अनुक्रमणिका

त्यांचे इंग्रजी चरित्रकार माधोप्रसाद म्हणतात— ‘गुजरात राष्ट्रीय विद्यापीठाची सात वर्षे धुरा सांभाळताना त्यांनी भारतातल्या इतर राष्ट्रीय विद्यापीठांच्या ध्येयधोरणांवर बराच प्रभाव टाकला. राष्ट्रीय शिक्षणाला एक वेगळाच रंग दिला.ह्या राष्ट्रीय शिक्षणातून त्या वेळच्या परिस्थितीच्या गरजेनुसार, स्वातंत्र्याकांक्षेने पेटलेले देशभक्तच तयार करायचे होते, पण काकासाहेबांनी ही ‘स्वातंत्र्याकांक्षा’ व्यापक केली. तिला मूलभूत स्वातंत्र्यकल्पनेचा पाया दिला.’

अनुक्रमणिका

६.

## राष्ट्रभाषाप्रसार

गुजरात व गुजरात विद्यापीठ सुटले तरी काकासाहेबांचे शिक्षणकार्य थांबले नाही. उलट एका फिरस्त्या विद्यापीठाचे ते सूत्रधार बनले.

त्याचे असे झाले की, गुजरात सोडण्याचा निर्णय काकासाहेबांनी घेतला, त्याच सुमारास वर्ध्याला जमनालालजी बजाज ह्यांच्या विनंतीनुसार 'सत्याग्रहाश्रम' हा एक नवा आश्रम उघडण्यात आला होता. तिथे राहून तुम्ही राष्ट्रभाषाप्रचाराचे काम कराल का? असे गांधीजींनी त्यांना विचारले आणि काकांनी तत्काळ होकार दिला. ते वर्ध्याच्या आश्रमात आले. सुरुवातीला त्यांनी हरिजन छात्रावासात राहण्याचे ठरवले. तेथील विद्यार्थ्यांत ते अतिशय मिळूनमिसळून राहत असत.

काही कालानंतर ते सेवाग्रामच्या वाटेवरील एका वाडीत राहायला आले. पुढे तो भाग काकांच्या वास्तव्यामुळे काकावाडी ह्या नावानेच ओळखला जाऊ लागला. रस्त्याच्या पलीकडेच 'महिलाश्रम' नावाची शाळा व वसतिगृह होते. चळवळीत सहभागी झालेल्या सत्याग्रहींच्या बायका, मुली, बहिणी वगैरेंच्या निवासाची व शिक्षणाची सोय व्हावी ह्या हेतूने ती संस्था उभारण्यात आली होती. तेथे संचालिका व शिक्षिका म्हणून ३५ वर्षे राहिलेल्या श्रीमती मालतीबाई थत्ते अद्याप नाशकात आहेत. त्या काकासाहेबांच्या प्रेमळ, शांत व समंजस व्यक्तिमत्त्वाच्या आठवणी सांगतात. काका प्रवासाहून आले की आपल्या प्रवासाची रसाळ वर्णने महिलाश्रामातील मुलींना व्याख्यानांतून ऐकवत.

मात्र इथल्या वास्तव्याचा काळ हा काकासाहेबांनी मुख्यत्वेकरून राष्ट्रभाषेच्या विविधांगी विकासासाठी वाहिलेला काळ होता.

फार पूर्वी भडोचमध्ये भरलेल्या गुजरात शिक्षण परिषेदेच्या अधिवेशनात त्यांनी राष्ट्रभाषा हिंदीच्या समर्थनार्थ एक भाषण दिले होते. त्यात त्यांनी, "शिक्षणाचे मध्यम प्रांतीय भाषाच असली पाहिजे हे खरे; तरीपण विविध प्रांतांच्या भाषांमध्ये सामंजस्य प्रस्थापित करण्यासाठी, राष्ट्रीय एकात्मता निर्माण करण्यासाठी एका राष्ट्रभाषेची आवश्यकता आहे. हे स्थान इंग्रजी कधीच घेऊ शकणार नाही. कारण ती भाषा परकीय आहे. तिची मुळे ह्या भूमीत रुजलेली नाहीत. इथली संस्कृती त्या भाषेत अभिव्यक्त होऊ शकणार नाही," असे मौलिक प्रतिपादन केले होते.

काकासाहेबांचे विषय-प्रतिपादनाचे कसब ठाऊक असल्यामुळे पुढे जेव्हा स्वतंत्र भारताची राष्ट्रभाषा हिंदीच असेल हे ठरले तेव्हाच गांधीजींनी राष्ट्रभाषाप्रचारकार्याची आखणी करताना, हे काम काकासाहेबांवर सोपवण्याचे ठरवले. पण त्यावेळी काकासाहेब नुकतेच गांधींजवळ आले होते. त्यामुळे ते म्हणाले— "मला काही दिवस तुमच्याजवळ राहू दे. तुमची तत्त्वे, तुमची कार्यपद्धती ह्याचा पूर्ण परिचय होऊ दे. तोपर्यंत माझ्या ऐवजी, माझे शांतिनिकेतनातले स्नेही पं. हरिहर शर्मा नावाचे तामीळ गृहस्थ आहेत- हिंदीचे महत्त्व जाणणारे आहेत. त्यांना ह्या कामी पाठवावे. दक्षिणेतील हिंदी प्रचाराला ते योग्य आहेत."

त्याप्रमाणे शर्मांनी दक्षिणेत हिंदीभाषाप्रचाराचे खूप काम केलेही. पण हळूहळू लोकांच्या मनात हिंदी भाषा आपल्या भाषांवर, अस्मितेवर आक्रमण करते आहे व त्याद्वारे उत्तरेतील लोक आपल्यावर स्वामित्व गाजवणार अशी कडवट भावना वाढू लागली. ह्याला एक कारण असे की प्रचार करणाऱ्या उत्तरेकडील लोकांत, अशा नाजूक परिस्थितीला हाताळण्याचे जे कौशल्य हवे ते नव्हते. त्यांचा आक्रमक उत्साह लोकांमध्ये आशंका निर्माण करण्यास कारणीभूत झाला.

त्यामुळे काका गुजरातेतील कार्यातून मुक्त झाल्याबरोबर गांधीजींनी ह्या प्रसाराची धुरा पुन्हा त्यांच्यावर सोपवण्याचे ठरवले. काकासाहेबांच्या समन्वयक व संयत धोरणावर गांधीजींचा विश्वास होता. अर्थात्च काकासाहेबांनी हे काम स्वीकारले व ते दक्षिणेत गेले. तेथील बिघडलेल्या वातावरणाशी त्यांना सामना करायचा होता. पण तो त्यांनी आपल्या अनुभवाच्या, प्रतिभेच्या व निष्ठेच्या बळावर यशस्वी रीतीने केला व हिंदी प्रसाराच्या रेंगाळलेल्या कामाला चांगला वेग दिला. ह्याचे एकच उदाहरण देता येईल.

काकासाहेब कोचीनला हिंदी भाषेच्या प्रसारासाठी गेले होते. दुसऱ्या दिवशी सभा व मेळावे आयोजित केले होते. पण दुसऱ्या दिवशी सकाळीच एका स्थानिक पेपरात मथळा आला.

'उत्तर के आर्योका एक और आक्रमण,' संयोजक घाबरले. सभांवर बहिष्कार झाला तर? पण काकासाहेब म्हणाले, "तुम्ही काळजी करू नका. मी सांभाळून घेईन. तुम्ही फक्त हे जे कोण लोक आहेत त्यांची-माझी भेट घडवून द्या." ते लोक देखील, 'काकासाहेबांना आपण आज छान सुनावू या' ह्या भावनेने भेटायला आले. काकासाहेबांनी सुरुवातच अशी केली, "हे पहा, मी काही उत्तरेचा नाही, न दक्षिणेचा. आमचा महाराष्ट्र मधला. हे उत्तरेचे लोक खरेच आक्रमण करून आले असते तर आम्ही मधल्या लोकांनी त्यांना रोखले नसते का? उत्तरेकडचे लोक आम्हांला दक्षिणीच मानतात. मग मी ह्या उत्तरेकडील लोकांमार्फत तुम्हांवर आक्रमण कसा करू शकतो? संकट आले असता सभोवार भिंती उभ्या करून आत्मरक्षण करणे हा काही खरा मार्ग नव्हे. ज्यांच्या आक्रमणाला तुम्ही भिता त्यांचावर तुम्हीच आक्रमण का करत नाही? असे पाहा. संस्कृत भाषा उत्तरेची. शंकराचार्य तुमच्या केरळचे. पण त्यांनी केरळच्या रक्षणासाठी सभोवर सांस्कृतिक भिंती उभारल्या नाहीत. त्यांनी उत्तरेची भाषा शिकून घेतली आणि आपणच उत्तरेवर आक्रमण केले. हा एकटा केरळी युवक साऱ्या देशभर वादासाठी आव्हान देत फिरत राहिला. तुम्ही त्याचे अनुकरण करा. उद्या देश स्वतंत्र झाला तर मी आश्वासन देतो की इथले राज्य मल्ल्याळम्‌मध्येच चालेल. पण त्याच्या जोडीने आपल्याला देशाची एकता टिकवावयाची आहे. एकतेशिवाय आपले स्वातंत्र्यही टिकायचे नाही व सामर्थ्यपण. ह्यासाठी आपल्याला एक राष्ट्रभाषा हवी. म्हणून आपण दुसरी भाषा म्हणून हिंदी शिकणार आहोत."

त्यांचे हे तर्कशुद्ध व मनाला स्पर्श करणारे विचार ऐकून विरोधकांचा विरोध मावळला व ते काकासाहेबांना सहकार्य देऊ लागले. त्यांच्या मनात – 'हा पुरुष राष्ट्रभाषेचा प्रचार करतो खरा, पण तो आपल्या मातृभाषेचाही त्राता आहे,' – असा विश्वास काकासाहेब उत्पन्न करू शकले व म्हणूनच प्रचाराचे मूळ बळकट करू शकले. काकासाहेबांमुळेच राष्ट्रभाषाप्रचारकार्याला जोराची चालना लाभून त्यात नवचैतन्य निर्माण झाले, हे त्यांचे विरोधकही नाकबूल करणार नाहीत. 'सर्वोदय' व 'सबकी बोली' या दोन्ही हिंदी मासिकांचे संपादन करून त्यांनी हिंदीची अप्रतिम सेवा केली. पुण्यात राष्ट्रभाषाप्रचाराचे महाराष्ट्राचे मध्यवर्ती केंद्र स्थापन करून, इथल्या राष्ट्रभाषा प्रचाराला त्यांनीच प्रेरणा दिली. ते म्हणत, "मराठी, बंगाली

अनुक्रमणिका

वैगरे भाषा परिणत असल्या तरी त्यांना अखिल भारतीय स्थान नाही. उलट हिंदी ही पूर्ण भारताची नकळत संपर्कभाषा ठरली आहे. साधुसंत कोणत्याही प्रांताचे असोत, ते काशी ते कन्याकुमारी भ्रमण करतात. हिंदीचाच वापर करतात. महाराष्ट्राचे संस्थापक शिवाजी महाराज ह्यांनी कवी भूषणला आपला राजकवी बनवून देशभर त्याला पाठवून, हिंदीलाच राष्ट्रभाषेचा मान दिला. नामदेव, सोहिरोबांसारखे संत पण हिंदीतून रचना करून हिंदीचे सार्वदेशिकत्व मान्य करतात. गुजराती भाषी दयानंदानी पण हिंदीलीच स्वाभिमानाचे अमृत पाजून तिला नवसंजीवनी दिली होती. तेव्हा हिंदीच राष्ट्रभाषा व्हायला योग्य आहे. हिंदुमुस्लीम दोघांनाही ती प्रिय आहे. उर्दू हे हिंदीचेच एक साहित्यिक रूप आहे. प्राचीन सुसंस्कृत श्रेष्ठ भारतवर्षात जे काम संस्कृतने केले तसेच आजच्या उत्थानपर्वात हिंदी, भारताची लोकभाषा बनून करणार आहे."

आपल्या बहुश्रुत प्रज्ञेने नाना प्रकारचे संदर्भ देत आपला मुद्दा सहजपणे लोकांच्या मनावर ठसवण्याचे काकासाहेबांचे कसब हे असे होते. पुढे समर्पक दाखला देत ते म्हणतात "भारतीय संस्कृतीच्या सर्वदेशीय विकासासाठी प्रांतीय भाषा, प्रादेशिक संस्कृती, रीतिरिवाज पोषकच आहेत. पण सर्व अवयवांना एकत्र जोडणारे मन असते तद्वत सर्व प्रांतात एकरूपता, एक प्राण निर्माण करण्याचे काम 'राष्ट्रभाषा' करते व ते स्थान हिंदीव्यतिरिक्त कोण घेऊ शकेल?" ह्याच भ्रमंतीत एका इंग्रजीप्रेमी सज्जन गृहस्थाने, राष्ट्रभाषेवर आपला जराही विश्वास नाही, पण इंग्रजांना हुसकावण्याचे ते एक अस्त्र आहे म्हणून मी आर्थिक मदत देतो असे सांगितले. काकासाहेब म्हणतात, "ह्यातून राष्ट्रभाषाप्रचारामागचा हाही एक पैलू मला नाव्याने जाणवला."

असे अनेक अनुभव घेतल्याने ते समृद्ध झाले होते. हिंदी राष्ट्रभाषा व्हायची असेल तर तिच्या वाटेत काय काय समस्या उभ्या आहेत वा होतील, ह्याचे स्पष्ट चित्र त्यांच्या मनापुढे उभे होते. त्यातल्या काही समस्या आज तंतोतंत खऱ्या ठरलेल्या पाहून काकासाहेबांच्या दूरदृष्टीचे अप्रुप वाटल्याखेरीज राहत नाही. ते लिहितात, "स्वराज आज ना उद्या मिळणारच. ते मिळाल्यावर राज्य कोण चालवणार? तर आज जे प्रशासनात आहेत तेच. त्यांना इंग्रजीतून व्यवहाराची इतकी सवय झाली आहे की ते तद्नंतरही प्रशासनाचा कारभार इंग्रजीतच चालवणार. बरे, नेता कितीही राष्ट्रवादी असला तरी तो ह्या प्रशासकांविना राज्य चालवू शकणार नाही. म्हणजे स्वातंत्र्योत्तर राज्यकारभार इंग्रजीतच चालणार. म्हणजे सामान्य माणूस आपल्या मुलांना तुटके फुटके का होईना इंग्रजीच शिकवणार. कारण त्यामुळे सरकारी नोकऱ्या मिळणे त्यांना कठीण होणार नाही. राज्यकारभाराची जी भाषा तीच सार्वजनिक जीवनाची भाषा होणार. म्हणजे स्वातंत्र्य मिळाल्यावर इंग्रजीची प्रतिष्ठा अधिकच वाढणार. मग हळूहळू लोक म्हणू लागणार, 'इंग्रजी जर इतकी प्रचलित आहे तर तिला पण एक भारतीय भाषा का मानू नये?'"

भविष्याचे किती तंतोतत चित्र काकांच्या अनुभवसंपन्न प्रतिभेने पाहिले होते!

ह्या परिस्थितीत राजकीय स्वातंत्र्याबरोबर सांस्कृतिक स्वराज्य मिळवावयाचे असेल तर पुढीलप्रमाणे चार दिशांनी मोर्चेबांधणी व्हायला हवी असे त्यांनी ठरवले :

१) प्रादेशिक प्रशासन व शिक्षणाचे माध्यम त्या त्या प्रदेशाच्या भाषेत असावे.
२) भाषा भिन्न असल्या तर त्या सर्व एकाच संस्कृतीचे उन्मेष आहेत हे ठसवत राहणे आवश्यक आहे.

अनुक्रमणिका

३) प्रांतिक भाषा भयमुक्त करून आंतरप्रांतीय व्यवहारासाठी हिंदीचा स्वीकार करायला हवा हे पटवून द्यावे लागेल.

४) ह्या सर्व भाषांना जवळ आणण्यासाठी देवनागरी लिपीचा वापर करावयासही सांगावे लागेल. अद्याप ९० टक्के लोक अशिक्षित आहेत. तेव्हा नव्या लिपीतूनच त्यांना साक्षर का करू नये?

हे काकासाहेबांचे विचार गांधीजींना मान्य होऊन ह्या चतुःसूत्रीचा प्रसार संपूर्ण देशात करण्यासाठी 'राष्ट्रभाषा प्रचार समिती, वर्धा' नावाची संस्था स्थापन झाली. राजेंद्रबाबू तिचे अध्यक्ष व काकासाहेब उपाध्यक्ष झाले.

काकासाहेबांनी तत्काळ कामाला सुरुवात केली. सर्व प्रांतांतून संघटना बांधण्यासाठी त्यांनी भारतभर इतका प्रवास केला की देशातील एकही प्रमुख गाव, प्रमुख व्यक्ती, प्रमुख साहित्यिक, तसेच सांस्कृतिक, प्राकृतिक व ऐतिहासिकदृष्टया महत्त्वाचे एकही स्थान त्यांच्या परिचयातून सुटले नाही. काकासाहेब वृत्तीने भटके, रसिक व जिज्ञासू. हे काम त्यांच्या प्रवृत्तीला एकदम मानवले. प्रत्येक प्रांतातील ख्यातनाम व्यक्तींना घेऊन काकांनी संघटना उभ्या करण्यात यश मिळवले. ह्याच काळात १९३६ मध्ये आणखी एका महत्त्वाचे बीज काकासाहेबांनी रोवले व ते म्हणजे नागपूर येथे भरवलेली 'भारतीय साहित्य परिषद.' प्रत्येक भाषांची स्वतंत्र संमेलने होत होती. प्रादेशिक पातळीवर साहित्याचा विचार व कार्य चालू होते. पण 'भारतीय साहित्य' या संकल्पनेचा विचार फारसा झाला नव्हता. भारतीय साहित्य एकच आहे, ते फक्त भिन्न भाषांतून लिहिले जाते ही संकल्पना पुढे रुजली जाऊन त्यातून 'साहित्य अकादमी'ची स्थापना झाली. मात्र त्याचे बीज काकासाहेबांनी प्रथम इथे रुजवले. अर्थात् ह्या विचाराला एक-दोन परिषदांपेक्षा अधिक व्यापक मूर्तरूप त्या काळी येऊ शकले नाही. तरी पण काका मात्र त्यानंतरच्या आपल्या सर्व भाषणांत, राष्ट्रभाषाप्रचारकार्यात ही संकल्पना मांडत राहिले.

ह्यातूनच काकासाहेबांच्या दूरदृष्टीला आणखी एका समस्येचे भान आले. ती म्हणजे नागरी लिपीत सुधारणा करणे. नागरी लिपी सामान्यांना सोपी वाटावी, यंत्रयुगाची आव्हाने तिला पेलता यावीत, ती मागे पडू द्यायची नसेल तर तिच्यात वेळीच सुधारणा करायला हव्यात हे त्यांना जाणवले. मुद्रण, मुद्रालेखन, दूरलेखन, द्रुतलेखन इत्यादी बाबतीत इंग्रजीचा वेग तिला द्यायलाच हवा, नाहीतर वेगात पसरणाऱ्या यंत्रसंस्कृतीत, नागरी लिपी मागे पडेल व नाईलाजाने का होईना, पण लोकांना इंग्रजी भाषा व रोमन लिपी यांचा अवलंब करावा लागेल. काकासाहेब लिहितात,"नागरी लिपी आजतागायत लिहिण्याच्या साधनांनुसार बदलत आली आहे (ताडपत्र इ.). वर्णमाला व लिपी भिन्न आहेत. वर्ण ही ध्वनीची व्यवस्था आहे तर लिपी ही पाहण्याची व हाताने रेखाटण्याची गोष्ट आहे. नागरीची वर्णमाला वैज्ञानिक आहे. पण लिपी खूप जुनी असल्याने तिच्यात कालभेद व स्थळभेदानुसार काही फरक पडत गेले आहेत. तेव्हा त्यात बदल करून ती समान व सोपी करणे शक्य आहे व छपाईच्या, टाइपिंगच्या दृष्टीने आवश्यकही आहे. उदा. १) स्वरसंख्या कमी करणे व 'अ'लाच उकार लावणे. २) जोडाक्षरे सर्व व्यंजने एकापुढे एक ठेवून लिहिणे. नवे वेगळे चिन्ह नको. त्यामुळे छापायला सोपे होईल. ३) रेषेच्या वर व खाली एकार, उकार असल्याने छपाईकाम फार कठीण व महाग होते. तेव्हा लोकशाही तंत्राने सर्वांना एकाच ओळीत बसवावे.

अशा प्रकारे क्रमाक्रमाने करावयाच्या आणखीही अनेक लिपी-सुधारणा त्यांच्याजवळ होत्या. ते म्हणत, नागरी लिपीत अशी थोडीशी सुधारणा केल्यास ती रोमन लिपीच्या स्पर्धेत निश्चित विजयी होऊ

शकेल. ह्यासाठी मग इंदोरच्या हिंदी साहित्य संमेलनाला जोडून 'लिपिसुधार परिषद' पण भरवली गेली. काकासाहेब तिचे अध्यक्ष होते. त्यांनी आपल्या ह्या सर्व सुधारणा परिषदेपुढे ठेवल्या. पण दुर्दैवाने २-३ वर्षांच्या विरोधानंतर त्या कशाबशा संमत झाल्या. त्या सुद्धा, अहिंदी मुलखातील हिंदी प्रचारात ह्या सुधारणा करायच्या ह्या अटीवर! सुधारणा हळूहळू लोकांच्या गळी उतरवायच्या हे काकासाहेबांचे धोरण होते.

गांधीजींनी आपल्या 'हरिजन' साप्ताहिकात ह्या लिपीतील काही सुधारणांचा स्वीकार केला. पण विनोबाजींनी टोकाला जाऊन सर्वच जोडाक्षरे काढून टाकली. त्यामुळे त्यांची पुस्तकेच खपेनात. तेव्हा ते पुन्हा पूर्वीच्या नागरी लिपीला शरण गेले. परिणामी रूढिवादी बलवान झाले. काका म्हणतात, "माझ्यावर सोपवलेल्या ह्या कामात घरच्यांनीच खोडा घातला!"

काकासाहेबांच्या चाणाक्ष नजरेला आणखी एक गोष्ट जाणवली. हिंदीचे प्रेमी नेतेसुद्धा पुष्कळदा इंग्रजीत भाषण करतात. कारण इंग्रजी भाषणाचे वृत्त, शीघ्रलेखन पद्धतीमुळे ताबडतोब देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचते. तेव्हा हिंदीसाठी ताबडतोब लघुलिपी (शॉर्ट हॅन्ड) तयार व्हायला हवी हे त्यांच्या लक्षात आले. त्यानंतर ह्या लघुलिपीतून नागरी लिपीत लिहिण्यासाठी व त्याच्या अनेक प्रती पटकन करण्यासाठी इंग्रजीप्रमाणच सुगम होतील असे टाइपरायटर बनवायला हवेत हेही त्यांनी हरले. तारघरासाठीही देशी वर्णमाला-संकेत निश्चित करायला हवेत, हेही त्यांना जाणवले.

तत्काळ त्यांनी ही कामे आपल्या अंगावर घेतली. ह्यात त्यांना पांडुरंग भुरके आणि गजानन दाबके ह्या दोन कल्पक, उत्साही, तत्पर तरुणांचे बहुमोल सहकार्य मिळाले. गजाननने प्रचलित लघुलिपीपेक्षा फलदायी व शीघ्रगती लघुलिपी शोधली. मुद्रालेखनाचे नवीन यंत्र विकसित केले. त्यांच्या मदतीने काकासाहेबांनी प्रशिक्षण केंद्र सुरू केले. अहिंदी प्रदेशातून विद्यार्थी येऊन तेथे हिंदी भाषालेखन, टाइपरायटिंग शिकून आपपल्या प्रांतात जाऊन काम करू शकत. पण पुढे पुढे लिपिसुधारणेच्या त्यांच्या मोहिमेला जेव्हा जवळच्यांकडून विरोध होऊ लागला किंवा काहीजण मान्यता देऊन पुढे लोकविरोधाला भिऊन अर्ध्यातून माघार घेऊ लागले तेव्हा ते निराश झाले व त्यांनी तो प्रयत्न सोडून दिला.

राष्ट्रभाषा म्हणून हिंदीला प्रतिष्ठा व आधुनिकता आणून देण्यासाठी अशाप्रकारे काम चालू असतानाच एक दुर्घटना घडली. नीरा पिण्याचे निमित्त होऊन काकासाहेबांना व त्यांच्या सर्व सहकार्यांना कॉलऱ्याने पछाडले. ह्यात त्यांचे सर्वोत्तम सहकारी पांडुरंग व गजानन मरण पावले. काकासाहेबही ह्या आजारातून कासेबसेच वाचले. गांधीजींनी ह्या काळात त्यांची तब्येत सुधारावी म्हणून खूप लक्ष घातले. पण महाराष्ट्रातील काही वृत्तपत्रांनी मात्र 'मराठी सहकाऱ्यांना गांधीजींनी निरेमधून विष देऊन मारण्याचा प्रयत्न केला.' असे खोटे आरोप केले. आपला प्रिय महाराष्ट्र इतक्या खालच्या पायरीवर जाऊ शकतो हे पाहून काकांना खूप वाईट वाटले, राग आला व तो ते शेवटपर्यंत विसरू शकले नाहीत.

ह्या आरोपांना प्रत्त्युतर देण्याची काकासाहेबांची इच्छा होती. पण गांधीजींनी कळवले, 'काही प्रत्त्युतर देण्याची गरज नाही. असल्या उत्तरा-प्रत्त्युत्तरने भावना वाढतच राहते. त्यापेक्षा मनात विखार होता. तो ओकून टाकला गेला असे समजावे.'

अनुक्रमणिका

न बोलता काकासाहेबांनी आपले राष्ट्रभाषाप्रचाराचे काम जोरात चालू ठेवले. बहुतेक प्रांतांत कॉंग्रेसने आपली सरकारे स्थापन केली होती व राष्ट्रभाषाप्रसाराला प्रोत्साहन लाभत होते. तेवढ्यात हिंदी-उर्दू वाद सुरू झाला. मुसलमानांना वाटू लागले की हिंदीच्या निमित्तीने आपल्या जुन्या राज्यकर्त्यांची भाषा दडपून टाकली जात आहे. त्यासाठी मध्यममार्ग म्हणून हिंदी व उर्दूच्या मधले असे 'हिंदुस्थानी' हे नाव राष्ट्रभाषेला नाव देण्याचे ठरले. पण ते दोन्ही पक्षांना नामंजूर ठरले. मुस्लिमांना वाटू लागले, नाव वेगळे असेल तरी त्यातून हिंदीच आपल्या डोक्यावर बसणार व जी अनेक मुस्लिमांची व हिंदूंची साहित्याभाषा होती ती उर्दू दडपली जाणार. हिंदूंना वाटे, ह्या धेडगुजरी भाषेने आमची हिंदी भाषा भ्रष्ट होणार. तशातच राष्ट्रभाषा प्रचार समितीचे कार्य हिंदी साहित्य संमेलनांतर्गत चालले असल्याने त्यांचा शुद्ध हिंदीचा आग्रह ते सोडेनात, उर्दू एक सांप्रदायिक भाषा म्हणून राहू शकते, पण ती राष्ट्रभाषेत समाविष्ट होऊ देणार नाही, ही त्यांची भूमिका! मुस्लिमांना पण भाषेच्या व्यावहारिक रूपापलीकडचे जे सांस्कृतिक, धार्मिक रूप असते ते हिंदीचे रूप स्विकारणीय होण्यासारखे नव्हते.

परिणामी काकासाहेब व गांधीजी दोघेही अहिंदी मुलखातले असल्याने त्यांच्यावर नाही नाही ते काल्पनिक आरोप होऊ लागले. त्यांच्या चांगल्या हेतूने केलेल्या प्रयोगांबद्दल शंका घेतल्या जाऊ लागल्या. शेवटी कंटाळून काकासाहेबांनी आपला जुनाच मुद्दा पुन्हा गांधीजींसमोर आणला की,राष्ट्रभाषा समिती व हिंदी साहित्य संमेलन ह्या दोन्ही गोष्टी वेगळ्या करा, पण तेही होऊ शकले नाही. शेवटी काकासाहेब, राजेंद्रबाबू व गांधीजी या तिघांनीही राष्ट्रभाषा प्रचार समितीतून अंग काढून घेतले.

इतकी वर्षे ज्या राष्ट्रभाषाप्रचारासाठी खर्च केली, त्या कार्याचा हिंदी भाषिकांनी अतिउत्साहाने, इतरांच्या मनात आशंका निर्माण करून, विचका केलेला पाहून त्यांना खेद वाटे. हिंदी / उर्दूच्या वादात दाक्षिणात्यांची मदत घेऊन बदल्यात इंग्रजी कायम ठेवण्याची अट मंजूर करून त्यांनी देशाचे अहितच केले असे त्यांचे मत होते. ते म्हणतात— "इंग्रजी कधीच ह्या देशाची भाषा होऊ शकणार नाही. लोकांच्या पैशांवर चाललेले तिचे अध्यापन बंद करून बघा, तत्काळ तिची मुळे सुकून जातील. देशी भाषा मात्र शाळाकॉलेजातून शिकवल्या नाहीत तरी जिवंत राहतात, वाढतात कारण त्यांची मुळे ह्या भूमीत रुजलेली आहेत." इंग्रजीचे महत्त्व ते मानतात. ते म्हणतात, "ते टिकायला हवीच. पण तिच्या योग्यतेएवढीच ती आपल्या राजकारणाची भाषा होऊ शकत नाही. इंग्रजी जाणणारे राज्यकर्ते व न जाणणारी प्रजा असे ती देशाचे दोन भाग करते. शासक व शासित असे दोन वर्ग झाले तर त्याला स्वराज्य म्हणताच येणार नाही. इंग्रजी भाषा ही केवळ बाहेर बघण्याची खिडकी उरली नसून पश्चिमेकडील सर्व पूर ह्या देशात आणून त्याला बुडवून टाकणारे महाद्वार बनली आहे. देशाचे स्वातंत्र्य व एकता एकमेकांवर निर्भर आहेत. आज इंग्रजीच्या सार्वत्रिक वापरामुळे ही हार्दिक एकतेची भावना क्षीण झाली आहे. इंग्रजीमुळे राज्यतंत्राची मुळे सुकत चालली आहेत व बौद्धिक विकास पण थांबला आहे."

राष्ट्रभाषा प्रचार समितीतून अंग काढून घेतल्यावर काही दिवस त्यांनी 'हिंदुस्थानी प्रचार सभा' ह्या नावाच्या संस्थेद्वारे प्रचाराचे काम केले. पण काही ठोस काम होण्यापूर्वीच १९४२चे 'भारत छोडो' आंदोलन सुरू झाले नि हे काम मागे पडले. ह्यापूर्वी १९३८ मध्ये 'सर्वोदय' मासिक सुरू झाले होते. त्याचे संपादन अर्थात्च काकासाहेबांकडे आले होते. जोडीला दादा धर्माधिकारी होते. ते काकासाहेबांकडे जाऊन लेख लिहून घेत असत. ते म्हणतात, 'काकासाहेबांची वाक्धारा, कामधेनूप्रमाणे अप्रतिहत वाहत असे. क्षणभरही

अनुक्रमणिका

त्यांना विचार करावा लागत नसे.' सत्य, अहिंसा, स्वदेशी व शरीरश्रम ह्या सर्व समाजाच्या अभ्युदयकारी गांधीप्रणीत जीवनमूल्यांची मीमांसा व विवेचन ह्या मासिकातून काकासाहेब सतत करत होते.

गांधीजींच्या सहवासात इतकी वर्षे राहिल्याने एव्हाना काकासाहेबांमधला स्वातंत्र्यसेनानी परिपक्व होत गेला. गांधीविचारांशी केवळ सहमत असण्यापलीकडे. त्या विचारांच्या सततच्या चिंतनाने त्यांची त्यांवर श्रद्धाच बसलेली होती. अहिंसेच्या बाबतीतही ते सश्रद्ध झाले होते. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात 'सर्वोदय' मधून त्यांनी लोकांना असे आवाहन केले होते की, "आक्रमकांना हत्याराने प्रत्त्युतर देण्याऐवजी असहकाराने प्रत्युतर द्या. युद्धात मृत्युच्याच वाटेवर तुम्ही निघाला आहात. मग बलिदान करून मृत्यू स्वीकारा, शिकार बनून नको." पण अहिंसा एक श्रद्धा म्हणून नव्हे तर एक धोरण म्हणून ज्यांनी स्वीकारले होते त्या बहुसंख्य नेत्यांनी दुसऱ्या महायुद्धात इंग्लंडला मदत करण्याचे ठरवले. तेव्हा तिचे दुःख होऊन काकासाहेब लिहितात, "अहिंसेचे अमोघ शस्त्र धारण करण्याची शक्ती व तिचा प्रभाव दिसून येण्यासाठी लागणारा धीर, त्यांच्याजवळ नाही. अहिंसेचा चमत्कार त्यांनी अमृतसर हत्याकाण्डाचे वेळी पाहिला नव्हता? दाण्डीयात्रेनंतर पंधरा दिवसांत भारतात युगप्रवर्तन झाले नव्हते? ती कोणती शक्ती होती जिने ह्या गुलामी सुखासीनतेत स्वाभिमान जागवला? अहिंसेच्या तत्त्वज्ञानानेच ह्या मृतवत देशात प्राण फुंकले नव्हते का? एवढे होऊन आता आम्ही आमची श्रद्धा कशी हरवून बसलो?"

१९३९ ते १९४२ पर्यंत ते सतत अहिंसेच्या अमोघतेविषयी लिहीत राहिले. व्रत घेतल्यासारखे बोलत राहिले. जणू ह्या देशात गांधीजी अहिंसेचा सर्वात मोठा प्रयोग करत आहेत आणि त्यासाठी पार्श्वभूमी तयार करण्याचे काम आपले आहे, असेच त्यांना वाटत होते. ह्या काळात त्यांनी जे लिहिले ते प्रासंगिक असूनही अहिंसेचे वैज्ञानिक विवरण म्हणून आजही तितकेच सुसंगत व मौलिक वाटते.

भारतीय कॉंग्रेस इंग्लंडशी नाना प्रकारच्या तडजोडी करत होती. त्या गांधीजींना पटत नव्हत्या. पण त्यांच्या विरोधाला कॉंग्रेस जुमानेनाशी झाली होती. त्या काळात काकासहेब पूर्वीच्याच उत्साहाने गांधीजींच्या पाठीशी उभे राहून त्यांचे विचार देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचविण्याच्या प्रयत्न करीत होते. तेवढ्यात गांधीजींना अटक झाली. देश क्षुब्ध झाला. संतापाने जिकडेतिकडे जाळपोळ, तोडफोड सुरू झाली. काकासाहेबांनी विचार केला. "अशा सात्त्विक संतापाच्या प्रतिक्रियेला, अहिंसेत कुठेतरी जागा मिळवून दिली पाहिजे. नाहीतर आंदोलन बेलगाम व विध्वंसक वळण घेत राहील." गांधीजी तुरुंगात कुणाला विचारणार? त्यांनी स्वतःच्या चिंतनाला ग्वाही ठेवून निवदेन प्रसृत केले, "सरकारला रोखण्यासाठी काही विध्वंस करायचा असेल तर अवश्य करावा. पण अगोदर सरकारला त्याची जाणीव करून दिली पाहिजे. लपून चोरून काही करता कामा नये."

परिस्थिती पाहून तत्त्वांची पुनर्रचना करण्याची काकासाहेबांची क्षमता ह्या ठिकाणी दिसते. पण ह्याचा परिणाम म्हणजे त्यांना पुन्हा कारावास भोगावा लागला. हा त्यांचा शेवटचाच कारावास होता. ह्या काळात त्यांच्या हातून विपुल लेखन व चिंतन झाले. आपल्या उर्वरित जीवनाचे कार्य धर्मसमन्वयाचेच आहे हा निर्णयही ह्याच कारागृहात त्यांनी घेतला. तथापि बाहेर पडल्यावर केवळ गांधीजींची इच्छा म्हणून ते 'हिंदुस्थानी प्रचार सभे'चे काम आणखी काही काळ (१९४५ पर्यंत) करीत राहिले. त्यात यशाची पुसट आशा त्यांना जाणवत नव्हती. गीताप्रणीत निष्काम कर्मयोग्याच्या भावनेने केवळ प्रसाराचे काम ते करीत होते. ते लिहितात, "मला लक्षात आले होते की देशाला हितकर असूनही गांधीजींनी दिलेली कोणतीही नीती आता

अनुक्रमणिका

पुढे चालणार नाही.मला जाणवले की आता हिंदीही राष्ट्रभाषा म्हणून सहजपणे पुढे स्वीकारली जाणार नाही.जोपर्यंत अहिंदी प्रांतीयांच्या हातात तिचा प्रसार होता तोपर्यंत त्याला चांगला लोकाश्रय लाभला. आता तो हिंदी भाषिकांच्या हातात गेला आहे. आता अहिंदी प्रांत त्याला विरोध करणार व सर्व मिळून इंग्रजीचे स्थान भक्कम करणार." स्वातंत्र्यांच्या कितीतरी आधी केलेले काकासाहेबांचे हे 'अनुमान' आज शब्दशः खरे ठरले आहे.

पुढे दोन वर्षांनी स्वातंत्र्य आले. पण देशाचे विभाजन झाले. गांधीजींचे अखंड भारताचे स्वप्न भंगले. हत्याकांडात धगधगणाऱ्या नौखालीत पदयात्रा करीत ते केवळ आपल्या सात्त्विक आत्मसामर्थ्याच्या बळावर हत्याकांडाला थोपवण्याचा प्रयत्न करीत होते. काकासाहेबांना वाटले, आपण त्यांच्या साथीला जावे. त्याप्रमाणे ते निघालेही. पण गांधीजींनी त्यांना नौखालीत येण्यास मना केले.

१५ ऑगस्ट उजाडत होता. बंगाल, बिहार, आसामच्या सीमेवर असलेल्या पार्वतीपूरला गाड्या मध्यरात्री पोहोचल्या. आपल्या वडिलांचा अपमान एका इंग्रज अधिकाऱ्याने केल्यामुळे, इंग्रजांचे राज्य मिटवून टाकण्याची प्रतिज्ञा केली, तो दिवस काकांना त्याक्षणी आठवला. तिथून झालेला पुढचा सारा प्रवास आठवला. त्यांनी तिथूनच गांधीजींना पत्र लिहिले— "१९०६ मध्ये मी स्वातंत्र्याची शपथ घेतली. तिथून पुढे जीवनाने खूप वळणे घेतली. तुमच्या सहवासात देशाच्या स्वातंत्र्याचा अर्थ अधिक स्पष्ट होत गेला. म्हणूनच आज आम जनतेच्या जोडीने स्वातंत्र्याचा आनंद मनवत असताना, मनात येतेय, की खरे स्वातंत्र्य तर अजून दूरच आहे. पण मनात आशा आहे, ते पण आज ना उद्या येईलच.आता यापुढे सांप्रदायिक एकतेसाठी व दीनदलितांच्या सेवेसाठी उत्तरायुष्य वाहून घेणार आहे. ह्यासाठी जी दृष्टी व पावित्र्य हवे ते मला लाभले असा आशीर्वाद द्या. मात्र संस्थेद्वारे काम करण्याचा उत्साह आता राहिला नाही. हाती घेतलेले संघटन एकटा किंवा मदतनीस घेऊन जमेल तसे करण्याकडे मनाचा कल होतोय. परमानंदाची गोष्ट म्हणजे गेली ३५ वर्षे इंग्रजांविषयी मनात जो द्वेष दृढ झाला होता तो उत्तरोतर कमी होत आज पूर्ण लोपला आहे.हे सर्व तुमच्याच सहवासाचे फळ आहे."

गांधीजींची जीवनदृष्टी काकासाहेबांच्या जीवनदृष्टीत अशी मिसळून गेली. संपूर्ण आयुष्यभर गांधीजींच्या जीवनदृष्टीचे दूरदर्शित्व ते प्रश्नकर्त्यांना, आक्षेपकांना मार्मिकपणे समजावून देत राहिले.

स्वातंत्र्यापाठोपाठच गांधीजींचा वध झाला आणि काकासाहेबांची एकूणच सार्वजनिक जीवनातली रसलिप्तता सुकत गेली.

एव्हाना काकासाहेबांच्या वयाची साठी उलटली होती. बाह्य कर्तव्य करताना मन निर्लिप्त होत चालले. आंतरिक जीवनात मात्र वेगाने प्रगती होऊ लागली. व्यक्तीच्या मागे संस्थांची होणारी अवनती त्यांनी पाहिली होती. म्हणूनच नव्याने कोणतीही संस्था वा संघटना उभी न करता लेखन, भाषण, पत्रव्यवहार, चर्चा ह्यांद्वारे होईल तेवढे प्रबोधन ते करीत राहिले. ह्या विश्वाच्या मागे कोणी सर्वशक्तिमान शक्ती आहे हा त्यांचा दृढ विश्वास होता. त्यामुळे त्यांना कशाची काळजी नव्हती. पडेल ते काम ईश्वरेच्छा मानून फलाशा न ठेवता मनःपूर्वक करत राहणे हि त्यांची वृत्ती बनली.

अनुक्रमणिका

व्यक्तीच्या एकनिष्ठ व एकाकी साधनेचे महत्त्व कोणत्याही सिद्धान्ताच्या सामुदायिक अभिव्यक्तीपेक्षा जराही कमी नाही, नसते, हे काकासाहेबांनी केवळ ओळखले नव्हते तर मनापासून मानलेलेही होते.

अनुक्रमणिका

७.

# प्रवासी साहित्यिक

काकासाहेबांचे व्यक्तिमत्त्व हे एक बहुआयामी व्यक्तिमत्त्व होते. ते स्वातंत्र्याकांक्षी सेनानी होते. अध्यात्मप्रवण तत्त्वचिंतक होते. तेजस्वी पत्रकार होते. शिक्षणशास्त्रज्ञ होते. राष्ट्रभाषाप्रचारक होते. गांधीविचारांचे प्रवर्तक होते. पण इतके सांगूनही त्यांची ओळख अपुरीच राहावी असा आणखी एक त्यांचा चित्तवेधक पैलू होता तो म्हणजे ते एक 'निसर्गवेडे प्रवासी साहित्यकार' होते; सर्जक व शैलीकार लेखक होते; सौंदर्यपूजक व तत्त्वचिंतक साहित्यिक होते. किंबहुना ते जे होते ते आज त्यांच्या या लेखातूनच मूर्तिमंत प्रकट झालेले दिसतात. त्यांचे जगणे, त्यांचे भटकणे, त्यांचे लिहिणे— ह्या सर्व प्रक्रिया त्यांच्या जीवनमुशीत एकरस झालेल्या आहेत. लिहिणे हे तर त्यांच्या जीवनाचे अभिन्न अंगच होते. 'दिसामाजी काहीतरी लिहावे' ह्या समर्थोक्तीचे जणू काही ते निष्ठेने पालन करीत. त्यामुळे त्यांची ग्रंथसंपदा मोठी व समृद्ध आहे.

काकासाहेब मात्र स्वतःच्या लेखनाविषयी म्हणतात "साहित्यसेवा करण्यापेक्षा समाजसेवा करणे अधिक महत्त्वाचे असल्यामुळे माझ्या हातून साहित्यसेवा बेताचीच होते. मला त्याचा विषाद नाही. पण अनायासे देशदर्शन, प्रकृति-निरीक्षण, सौदर्यचिंतन घडते व ते केव्हा लेखांच्या रूपाने लिहून होते." पण हा झाला त्यांच्या सौजन्याचा भाग. त्यांचे अधिकांश लेखन जरी साहित्यनिर्मितीच्या प्रेरणेतून झालेले नसले, कधी त्यांच्यातला शिक्षक,कधी शिक्षणतज्ज्ञ,कधी पत्रकार,कधी समाजसेवक,कधी तत्त्वचिंतक,कधी जीवनचिंतक, कधी अनुभवाचा आनंद उधळू पाहणारा प्रवासी त्यांना लेखनासाठी भाग पाडीत असला तरी त्यांच्या जीवनदर्शनाच्या अनुभवसमृद्धीमुळे व वेधक शैलीमुळे त्यांचे हे स्वैर व स्फुट लेखन सघन, लालित्यपूर्ण व कसदार झालेले आहे.

ते म्हणतात त्याप्रमाणे, ते कधी 'करिअर' च्या मागे लागले नाहीत. जे काम हाती आले ते आपणहून हातून जाईपर्यंत तपासून पळून जाण्याचा त्यांनी कधी प्रयत्न केला नाही. ते करीत असताना जे जे अनुभव आले त्यावरच साहित्यनिर्मिती होत गेली. मात्र त्यांच्या जातिवंत सर्जक प्रतिभेला एक निरंतर अध्यात्मिक पाया लाभलेला होता. त्या दृष्टीने ते ज्ञानदेवांच्या जातकुळीचे होते तर त्यांचे सौंदर्यपूजक संवेदनशील मन टागोरांशी नाते सांगते आणि स्वातंत्र्यकांक्षी व राष्ट्र-उत्थानकांक्षी प्रवृत्ती गांधीधर्मी होत्याच.

असे म्हणता येईल की काकासाहेब जीवनवादी साहित्यिक होते आणि केवन साहित्यच नव्हे तर एकूणच कलेची व्यवहाराशी सांगड घालून, तिच्या साहाय्याने जीवनाला वळण देण्याची अवघड कार्य काकासाहेबांच्या साहित्याने केले आहे. त्यांच्या लेखी कला व जीवन भिन्न नव्हते. जीवन हीच सर्वात श्रेष्ठ कला आहे, असे ते मानत. 'जीवनकला' हेच त्यांचे उपास्य दैवत होते. ही कला त्यांना साधली आणि म्हणूनच इतरही कला त्यांना अवगत झाल्या होत्या. लेखन तर त्यांची सहजस्फूर्त क्रिया बनली होती. सर्वांत महत्त्वाची गंमत म्हणजे, ह्या विपुल लेखनातली एकही ओळ त्यांनी स्वतःच्या हाताने लिहिलेली नाही. लिखाणाचा त्यांना मनस्वी कंटाळा होता. कुणालातरी लेखनिक म्हणून घेऊनच ते लेखन करीत असत. ते म्हणत, "मी हाडाचा लेखक नसून 'शिक्षक' आहे, 'बोलक' आहे.' वासरू दिसल्यावर गाईला जसा पान्हा फुटतो तसा समोर रस घेऊन ऐकणारा समजदार श्रोता वा लेखनिक भेटला की माझी वाणी अप्रतिहत स्फुरू लागते," काकासाहेबांना लेखनिक पण जाणता असावा लागे. तो तसा नसेल, लिहिण्यात रस घेणारा नसेल, यांत्रिक असेल, तर 'मी माझे लेखन आवरते घेतो' असे ते सांगत. "माझा एखादा लेख नीट उतरला नसला तर

राष्ट्रमतचे संपादक व माझे मित्र स्वामी आनंद तत्काळ विचारात, 'लेखनिक कोण होता?' तुरुंगवासामुळे व आश्रमीय जीवनामुळे मला अनेक चांगले, रसज्ञ व बुद्धिमान लेखनिक लाभले.

आणखी एके ठिकाणी ते मल्लीनाथी करतात, "लेखनिक म्हणून श्रीगणेशाला निवडून व न उमजता एकही शब्द त्याने लिहू नये, अशी अट त्याला घालून, व्यासांनी दुनियेतल्या साऱ्या लेखनिकांना त्यांचा 'स्वधर्म' शिकवला आहे."

असे स्वधर्मनिष्ठ लेखनिक काकासाहेबांना लाभत गेले ही वाचकांचीच पुण्याई म्हणायला हवी. १९०७ मध्ये काकासाहेबांनी पहिले पुस्तक 'रामतीर्थ चरित्र' लिहिले. १९७३ साली शेवटचे पुस्तक 'वासरी' लिहिले. म्हणजे जवळजवळ सहासष्ट वर्षे ते लेखन करीत राहिले.

काकासाहेबांचे सुरुवातीचे बरेचसे आयुष्य गुजरातेत गेले. त्यामुळे त्यांच्या कर्तृत्वाचा प्रारंभ तेथेच झाला व बरेचसे कार्यही तेथेच झाले. त्यामुळे साहजिकच त्यांचे बरेच लेखन गुजरातीतूनच झाले आहे. त्यांची जवळजवळ साठ पुस्तके गुजरातीतून प्रसिध्द झाली आहेत. शिवाय वृत्तपत्रांतील स्फुट लेखन पुष्कळच आहे. त्यांच्या समग्र साहित्याचे पंधरा विशाल खंड गुजरातीत प्रसिद्ध झाले आहेत. गुजरातीत ते एक विचारवंत व शैलीकार लेखक म्हणून मानले जातात. त्या मानाने त्यांचे मराठीतील लेखन कमी आहे. आज मराठीत त्यांच्या नावावर बेचाळीस पुस्तके आहेत. त्यांपैकी वीस मूळ मराठीत लिहिलेली असून, तेवीस पुस्तके प्रथम इतर भाषांत लिहून मग अनुवादित केलेली व झालेली आहेत.

मराठीतील अल्पलेखनाबाबत, 'आमच्या देशाचे दर्शन' ह्या अनुवादित पुस्तकाच्या प्रस्तावनेत ते म्हणतात, "मी व्यस्त माणूस. 'सर्वोदया'साठीसुद्धा कुणी येऊन बसल्याशिवाय लेखन होत नाही. तेव्हा मी कुठे मराठीत स्वतंत्र लिहू?"

गुजराती पत्रांच्या संपादकत्वामुळे गुजरातीत व राष्ट्रभाषाप्रचाराच्या कामानिमित्त हिंदीतून त्यांचे लेखन आपोआप वाढत गेले. पण त्याचा अनुवाद करण्याची पूर्ण अनुमती त्यांनी आपल्या मराठी सहकाऱ्यांना दिली होती. त्यांच्या गुजराती पुस्तकांचा मराठी अनुवाद प्रामुख्याने वामनराव चोरघडे, श्रीपाद जोशी, भाऊ धर्माधिकारी, नरेश मंत्री, माधव सावंत, बा.भ.बोरकर, प्रेमा कंटक, बाबाजी मोघे, पां.गं.देशपांडे आदी सहकाऱ्यांनी केलेला आहे. ही अनुवादित पुस्तके पण मूळ मराठीच वाटावीत इतकी सरस उतरली आहेत. यांचे कारण म्हणजे एकतर गुजराती भाषा मुळातूनच मराठीला जवळची, सख्ख्या बहिणीच त्या. पुन्हा एकत्र नांदणाऱ्या. त्यातून काकासाहेब मूळचे मराठी. त्यामुळे त्यांच्या गुजराती भाषेची धाटणी व वळण मराठी स्वरूपाचेच राहिले आहे. अशी स्थिती असल्याने त्यांचे मूळ गुजराती साहित्य मराठीत येताना त्यातला मुळचा स्वाद, सुरेलपणा, सौरभ व सौंदर्य जराही ढळलेले नाही. किंबहुना ही पुस्तके अनुवादित आहेत हे कळूनसुद्धा तसे असल्याचे जाणवत नाही.

भाऊ धर्माधिकारींनी अनुवादित केलेल्या 'हिमालयातील प्रवास' ह्या प्रवासवर्णनपर पुस्तकाच्या प्रस्तावनेत काकासाहेब स्वतः म्हणतात"प्रवासी मराठी. त्याच्या आवडीनिवडी मराठी. मुळात महाराष्ट्रीयन असल्यामुळे हे पुस्तक भाषांतर आहे असे वाटू नये. मी स्वतः लिहावयास घेतले असते तर त्याच्याहून निराळे किंवा अधिक चांगले लिहिले नसते." 'जीवनलीला' (अनुवाद : नरेश मंत्री) च्या प्रस्तावनेतही त्यांनी नमूद

अनुक्रमणिका

केले आहे की, “या सत्तर प्रकरणांतील केवळ सहा प्रकरणे मी स्वतः मराठीत लिहिलेली आहेत. त्यावरून वाचकांची खात्री होईल की माझ्या मूळ लिखाणात आणि नरेश मंत्रींच्या भाषांतरात शैलीभेद मुळीच नाही. म्हणून हे सर्व लिखाण माझेच मराठी लिखाण आहे असे मानावयास हरकत नसावी.” मराठी, हिंदी लेखांच्या ‘आवारनवार’ ह्या गुजराती अनुवादाला प्रस्तावना लिहिताना ते पुन्हा हेच सांगतात, “मराठी, गुजराती, हिंदी भाषा अतिजवळच्या भाषाभगिनी. त्यामुळे ह्यातील भाषांतर थोडे इकडेतिकडे झाले तरी वाक्यरचना वा शब्दावलीसुद्धा— फार दूर जाऊ शकत नाही.”

काकासाहेबांच्या मराठीवर क्वचित् गुजरातीची छाया आढळते. शब्दांचे आदान-प्रदान तर त्यांनी दोन्ही भाषेत केले आहे. ह्याबद्दलची आपली भूमिका त्यांनी, ‘मालंच’ ह्या रवींद्रनाथांच्या कादंबरीच्या अनुवादाच्या प्रस्तावनेत मांडली आहे. ते लिहितात—

“आपल्या भाषेत तंतोतंत शब्द मिळत नसतील तेव्हाच परभाषेतला शब्द घ्यावा असे काही नाही. आपल्या देशातील, आपल्या संस्कृतीतील, सर्व भाषांचे सर्व शब्द खरोखर आपलेच आहेत. एखादा शब्द गोडसा वाटला, या भाषेत सहज मिळून जाईल असा वाटला तर आपल्या वाङ्मयकुटुंबात त्याला प्रसन्नपणे स्थान द्यावे. कुटुंबात नव्यानव्या मुली आपण नाही का आणत?” ह्या भूमिकेमुळे त्यांनी संस्कृत, हिंदी, बंगाली, गुजराती भाषांतील रुचलेले व सार्थ वाटणारे अनेक शब्द, म्हणी एकमेकीत मिसळल्या आहेत. ह्यालाच ते खिचडी-शैली म्हणतात. पण त्याबद्दल ‘क्षमा’ मागत नाहीत. कारण क्षमेचा अर्थ ‘पुन्हा असे करणार नाही’ असा होतो. पण हे तर सर्व प्रांतीय भाषांबाबत हळूहळू होतच जाणार आहे. शिवाय खिचडी सर्व भारतीयांना प्रिय आहेच— अशीही मिस्कील टिप्पणी ते करतात. ह्याव्यतिरिक्त काकांची बरीच ग्रंथनिर्मिती हिंदी (४७ पुस्तके) व इंग्रजीतही (६ पुस्तके) झाली आहे. असा हा बहुभाषी, बहुरंगी लेखक आहे. भरपूर प्रवास, यथेच्छ वाचन,सूक्ष्म निरीक्षण व सखोल चिंतन ह्यातून त्यांनी प्रचंड साहित्यनिर्मिती व तीही अनेक भाषांत केलेली!

डॉ. राधाकृष्णन् एकदा म्हणाले होते— ‘भारतीय साहित्य एक आहे. तथापि ते वेगवेगळ्या भाषांत लिहिले जाते.’ ह्यानुसार रवींद्रनाथ (बंगाली), सुब्रमण्य भारती (तामीळ), वल्लथोळ (मल्याळम), प्रेमचंद (हिंदी) हे आपापल्या भाषेत लिहिणारे— पण भारतीय साहित्यिक आहेत. ह्याच प्रभावळीत काकासाहेबांचे पण नाव आदराने घेता येईल. त्यांचे आणखी खास वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी एकाच वेळी तीन भारतीय भाषांत ग्रंथनिर्मिती केली. ह्या बहुभाषी देशात बहुभाषी साहित्यिक असणे ही गांधीयुगाचीच एक किमया आहे असे म्हणता येईल. बहुभाषावादाचा भक्कम पाया काकासाहेबांनी आपल्या जीवन व कृतीतून घातला आहे. ह्या बहुभाषिकत्वामुळे हा मराठी माणूस देशभर पोहोचला. त्यांची पुस्तके अनेक विश्वविद्यालयांतून पाठ्यपुस्तके म्हणून लावली गेली आहेत.

काकासाहेबांच्या लेखनसंभारात, बौद्धिक चिंतनातून झालेले वैचारिक लेखन हा जसा एक मोठा भाग आहे तसेच रसिकतेने जीवनातील विविध तरल अनुभवांना सामोरे जाऊन, त्यांनी अतिशय लालित्यपूर्ण व संवेदनशीलतेने केलेले ललितलेखनही भरपूर आहे. त्यांच्या लेखनसंसारावरून नुसती नजर फिरवली तरी मन अचंबित होते. लेखन हा त्यांचा व्यवसाय कधीच नव्हता. ती त्यांची वृत्ती होती. ते हाडाचेच साहित्यिक होते.

अनुक्रमणिका

त्यांचे नजरेत भरणारे विधायक राष्ट्रीय कार्य म्हणजे 'राष्ट्रभाषा' म्हणून हिंदुस्थानीची घडण घडवणे, तिचा प्रचार करणे, ते कार्यसुद्धा शब्दशक्तीशीच निगडित होते. ह्यासाठी त्यांनी संस्कृतच्या आधारे नवनवे सुबोध हिंदी शब्द घडवले, रुळावले. नवीन शब्द बनवण्याची तर त्यांच्याजवळ जणू काही टांकसाळच होती. देवाज्ञा, राजाज्ञा, नगरपालिका, कुलपती, ग्रामसेवा दीक्षित (सोशल वर्क ट्रेनी), वासरी (डायरी), विश्वजनीन (युनिव्हर्सल), भागीरथविद्या (इरिगेशन इंजिनिअरिंग), गजाग्रह (टग ऑफ वॉर), तुलसीपत्र (कास्टिंग व्होट) वगैरे त्यांनी घडवलेले, किंवा वारंवार वापरलेले शब्द आता बहुतेक भारतीय भाषांनी स्वीकारले आहेत. हे शब्द घडवण्यात खटपट नसे. ते कारंज्यासारखे उस्फूर्तपणे उसळून येत. त्यामुळे त्यात क्लिष्टता व कारागिरी नसे. काही वेळेस इंग्रजी शब्दांना ते इतका चपखल पण देशी घडणीचा शब्द योजत की वाचणाऱ्याने कौतुकाने स्तिमित व्हावे. उदा. पवनचेंडू (फूटबॉल), शीतपेटी (फ्रीज),स्वाक्षरी (ऑटोग्राफ), करदीप (टॉर्च), डबीगोळी (कॅप्सूल), हनुमानउडी (लॉंग जंप), अंगदकुदी (हाय जंप), कूचगीत (मार्चिंग सॉंग), चित्रमंजुषा (अल्बम), एकश्रुती (मोनोटोनस), विद्यापक (फेलो) इत्यादी; नायगाराचे वर्णन करताना 'हॉर्स शू फॉल'ऐवजी ते 'चंद्रभागा'शब्द वापरतात. नायगाऱ्याजवळ नेणाऱ्या बोटीला ('मेड ऑफ द मिस्ट'ला)'तुषारबाला' म्हणतात, कधी कुहराकुमारी पण म्हणतात. 'ॲक्वेरियम'ला 'जलचरी' शब्द किती अनुरूप वाटतो! त्यांची शब्दरचनाशक्ती गुजरात विद्यापीठाचे संविधान तयार करताना प्रथम प्रकट झाली. प्रायमरी स्कूलसाठी कुमार मंदिर, हायस्कूलसाठी विनयमंदिर, कॉलेजला महाविद्यालय, व्हॉईस चॅन्सलरला कुलनायक, सिनेटला नियामकसभा, आदी आजचे चिरपरिचित शब्द काकासाहेबांच्याच टांकसाळीतून निघालेले आहेत. त्यांपैकी काही थोडे प्रथमतः इतरांनी वापरलेलेही असण्याची शक्यता आपण गृहीत धरू. शब्दांशी खेळ करणे, नवनव्या संदर्भात त्यांचा प्रयोग करणे, वेगवेगळ्या ज्ञानप्रदेशांचा लाक्षणिक अर्थ व्यक्त करणाऱ्या शब्दांना स्वतःच्या लेखनात खेचून आणून त्यातून नवीन अर्थ व्यक्त करणे, श्लेषात्मक शब्दयोजनेतून नर्म विनोद साधणे, नवनवे सामासिक शब्द घडवून व्यक्ती वा प्रसंगाचे मर्मदर्शन घडवणे हे काकासाहेबांच्या शब्दप्रभू लेखणीचे खेळ आहेत. भाषेचा असा सर्जनशील वापर ते करतात म्हणून त्यांची भाषा कधीच साचेबद्ध वाटत नाही. काकासाहेबांच्या शब्दरचना सामर्थ्याची साक्ष श्री. विश्वनाथ भट ह्यांनी तयार केलेल्या पारिभाषिक कोशाची पाने चाळताना सहज पटते. काकासाहेबांनी तयार केलेल्या (coined) शब्दांचा संग्रह त्यांच्याच नावाने काढण्याचा प्रस्ताव जेव्हा काकांच्यासमोर ठेवण्यात आला तेव्हा त्यांनी त्याला स्पष्ट नकार दिला. ते म्हणाले, "अशी कामे एका माणसाची सत्ता होऊ शकत नाही." त्यांची ती अभिनिवेशविरहित वृत्ती त्यांच्या व्रती जीवनाशी सुसंगतच होती. शब्दांच्या अनुरूपतेचे हे त्यांचे स्वाभाविक भान,त्यांनी त्यांच्या पुस्तकांच्या प्रस्तावनांना जी समर्पक नावे दिली आहेत त्यांतही प्रकर्षाने जाणवते. (उदा. उत्तरेकडील भिंती— 'प्रवेशक', रवींद्रमनन- 'पाठवणी', मृगजळातील मोती-'रत्नाचे रुपांतर', खेळकर पाने— 'संतोष', लोकमाता— 'उपस्थान' (पूजा),जीवनलीला— 'मावंदं' इत्यादी.)

ह्याशिवाय त्यांनी 'राष्ट्रभारती हिंदी का मिशन,' 'सत्याग्रह और युद्धनीती,' 'समन्वय संस्कृति की ओर,' 'युगानुकूल हिंदु जीवनदृष्टी' इत्यादींची हिंदीतूनही ग्रंथरचना केली. हिंदी भाषा अहिंदी माणसाला कशी सोपेपणाने शिकवता येईल हे सांगणारे 'नागरी वर्णलिपी बोध' हे पुस्तक लिहिले. अनागरी लिपिकांना नागरी लिपी व हिंदी भाषा शिकविण्यासाठी वैज्ञानिक दृष्टीची व अनुभवाधिष्ठित अशी ही लिपी शिकवण्याची पद्धती त्यांनीच शोधून काढली. भाषाविषयक आणखी एक महत्त्वाचे काम त्यांनी केले ते म्हणजे गुजराती भाषेचा 'जोडणीकोश' त्यांनी तयार केला. गुजरातीत साहित्य विपुल निर्माण होत होते. पण ऱ्हस्वदीर्घाचे जे अराजक माजले होते, त्यामुळे भाषेला ठीक असे रूप व प्रतिष्ठा येत नव्हती. ते दूर करण्यासाठी गांधींजींच्या

अनुक्रमणिका

सुचेनेनुसार अथक परिश्रम घेऊन त्यांनी हा शब्दकोश तयार केला. त्यासाठी त्यांनी प्रथम गुजराती व्याकरणाचा अभ्यास केला. कोशाबाबत तो पावेतो झालेल्या चर्चांचे अहवाल मागवून अभ्यासले, वेगवेगळ्या साहित्यिकांशी व भाषावैज्ञानिकांशी पत्रव्यवहार केला. शक्यतो विरोधक निर्माण होणार नाहीत अशी खबरदारी घेत सामंजस्याने, सामोपचाराचे धोरण ठेवून कोशाचे काम पाच वर्षांत पूर्ण केले. आजही गुजरातीत तो कोश अधिकृत मानला जातो. ह्या कामाबाबत त्यांची भूमिका अशी होती, "आपण जिथे राहतो, जिथले अन्नपाणी घेतो, त्या भूमीशी आपण एकरूप झाले पाहिजे. तिथली अव्यवस्था दूर केली पाहिजे. जीवनाचा आनंद मनापासून केलेल्या सेवेतच असतो."

भाषाविषयक अशी लहानमोठी कामे त्यांनी केली असली तरी 'सृजनशील व चिंतनशील साहित्यिक' हीच त्यांची खरी ओळख होय. काकासाहेबांच्या ह्या सृजनशील साहित्याचे प्रामुख्याने पुढीलप्रमाणे ७ विभाग पाडता येतील :

१) निसर्ग व प्रवासवर्णनात्मक लेख
२) ललित निबंध
३) वैचारिक व चिंतनपर लेखन
४) गांधीविचार दर्शन
५) अनुवादित वा आधारित साहित्य
६) आत्मपर लेखन
७) कला व साहित्य समीक्षा.

ह्या विविधरंगी लेखनसंभारात त्यांना साहित्यिक म्हणून प्रतिष्ठा मिळवून देणारा सर्वात महत्त्वाचा वाङ्मयप्रकार म्हणजे त्यांची निसर्गवर्णने व प्रवासवर्णने. अर्थात त्यांची निर्मितीसुद्धा साहित्यनिर्मितीच्या प्रेरणेतून झाली नसून मनात तुडुंब भरलेला निसर्गानंद विद्यार्थ्यांना वाटून टाकण्यातून झाली आहे. गांधीजींनी, काकासाहेबांच्या ह्या वृत्तीचे मर्म किती अचूकपणे ओळखले होते ह्याचे प्रत्यंतर पुढील प्रसंगातून येईल. खादीयात्रेनिमित्त दक्षिण भारतात हिंडत असताना 'जोगचा धबधबा' पाहायला जायची कल्पना निघाली. कामामुळे गांधीजी, महादेवभाई वगैरे कुणीच हा धबधबा पाहायला येऊ शकत नव्हते. तेव्हा काकासाहेब म्हणाले, 'मी पण जात नाही' त्यावर गांधीजी उत्तरले, 'काका, अशी निसर्गस्थळं पाहणं हा तुमचा स्वभावधर्म आहे. तुम्ही बघायला जायलाच हवं. तुम्ही शिक्षक आहात. विद्यार्थ्यांना भूगोलाचा आणखी एक सुंदर पाठ आपण देऊ शकाल.' गांधीजींच्या ह्या विधानाची प्रचीती पाठ्यपुस्तकातला काकासाहेबांचा 'जोगचा धबधबा' हा नितान्तसुंदर पाठ ज्यांनी वाचला आहे, त्यांना खचितच येईल. बालांना व प्रौढांनी एकाचवेळी बांधून ठवू शकण्याचे सामर्थ्य काकांच्या ह्या लेखनात आहे.

काकासाहेबांच्या मूळ पिंडच भटक्या प्रवाशाचा. तशात वडिलांच्या फिरत्या नोकरीमुळे बालपणापासून त्यांच्या ह्या पिंडाला पोषण मिळत गेले. वयाच्या १८व्या वर्षापर्यंत त्यांनी खूप प्रवास केला. शाळेत जेवढे शिकले त्याहून अधिक ते प्रवासात, जीवनाच्या शाळेत शिकले. बालपणी नरसोबाच्या वाडीतील भूत उतरविण्याचा प्रकार पाहिला आणि हे जे कर्मकांडाचे भूत लोकांना लागले आहे ते इतर भुतांपेक्षा भयंकर आहे ही गोष्ट ते शिकले. साधुसंतांचे माहेर अशा पंढरपुरीचा भक्तीचा महोत्सव पाहिला नि संतसाहित्याचे खोलात जाऊन अध्ययन करण्याची तीव्र इच्छा त्यांच्या मनात जागृत झाली. त्यातूनच पुढे त्यांचे संतमानस

अनुक्रमणिका

तुकाराम, हे छोटेखानी पण अर्थसंपन्न पुस्तक तयार झाले. प्रत्येक यात्रेहून परतताना ते अनुभवसमृद्ध होऊन, नवेच होऊन परतत असत. ह्या अनुभवसमृद्धीमुळे त्यांची प्रवासवर्णने आशयसंपन्न झाली आहेत. ह्या प्रवासांतूनच त्यांची सूक्ष्म अवलोकनशक्ती व विश्लेषणशक्ती परिपुष्ट होत गेली. वेगवेगळ्या संस्थानिकांच्या राज्यांतून फिरताना त्यांचे चिकित्सक मन त्यांची वेगळी वैशिष्ट्ये टिपू लागले. त्यामुळे मग ते आपल्या वर्णनात लिहून जातात—“सावंतवाडी, गोवा, कारवार येथील प्रजा रजोगुणी, पण कलानिपुन आहे. मिरज, जामखिंडी, रामदुर्ग येथील लोकांत ब्राह्मणशाहीची वैशिष्ट्ये दिसतात. ‘जत’मधील हिंदु-मुस्लिम ऐक्याच्या पांढऱ्या झेंड्याने मला भूत-भविष्याकडे पाहण्याची नवी दृष्टी दिली. सावनूरचे नबाब राहणीतच नव्हे तर विचारातही द्रवीड जाणवले. सर्व राज्यांत कलाकारांना आधार मिळे, पण विलासीपणाही पोसला जात होता. सर्व राण्यांना सन्मान मिळे, पण नाटकशाळांचा प्रभाव कमी नव्हता. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे सर्व संस्थानांत एका बाबतीत साम्य दिसे ते म्हणजे, प्रजा गरीब पण तिची राजनिष्ठा पतिव्रता स्त्रीची होती.” ही विश्लेषक नजर त्यांच्या पुढील सर्व प्रवासवर्णनांत अशीच सजगपणे कार्यरत झालेली दिसते.

ह्या बालपणीच्या भटकंतीप्रमाणेच पुढे देशसेवेसाठी करावी लागलेली भ्रमंतीही त्यांना अतिशय उपकारक ठरली. त्यांच्याइतका आसेतुहिमाचल पुन्हापुन्हा प्रवास करणारा, अनेक संस्कृतींचा रसिक परिचय असलेला व जीवनाचा आनंद लुटणारा दुसरा कुणी महापुरुष असेल, असे वाटत नाही. त्यांची देशसेवा लक्षात घेता त्यांना स्वातंत्र्योत्तर काळात कोणतेही अधिकारपद मिळू शकले असते. पण ते म्हणाले “देणारच असाल तर मला एक रेल्वेचा पास द्या. ज्यामुळे मी मनमुराद भटकू शकेन. मला निमंत्रण देणाऱ्या यजमानांवर माझ्या प्रवासखर्चाचा बोजा पडणार नाही.”

‘चरैवेति’ ह्या श्रुतीच्या आदेशाचे त्यांनी खरोखर पालन केले. स्वतःच्या ९५ वर्षांच्या प्रदीर्घ आयुष्यात जवळजवळ पंचवीस वर्षे रेल्वेतच काढली! ते म्हणत, “व्यक्तीच्या जीवनात यौवनाचे चैतन्य असेल तर त्याला अज्ञाताचे निमंत्रण टाळतच येत नाही. अज्ञाताचा शोध घेणे, त्याचा अनुभव घेणे, त्याच्यावर विजय मिळवून ते अज्ञात ज्ञाताच्या कक्षेत आणणे हाच जीवनाचा सर्वश्रेष्ठ आनंद व जीवनाचे पुष्टीकरण करणारे अन्न आहे.” सौंदर्य व आनंदाच्या शोधात भटकणारा हा धार्मिक परिव्राजक— हा भटका फिरस्ता—कमालीचा निसर्गवेडा होता. निसर्गाशी त्यांचे जणू वैयक्तिक नाते असून, निसर्ग त्यांच्याशी गुजगोष्टी करतो असे वाटते. त्यामुळे त्यांच्या गोष्टीवेल्हाळ निवेदक मन प्रसन्न करून जातो. ते म्हणत, “आलिशान महालात राहण्यापेक्षा डोंगरदऱ्यांत, अरण्यात, समुद्राच्या रेतीत अनिकेत अवस्थेत राहणे मला अधिक मानवते.” डोके, कान व मुख्यतः हृदय उघडे ठेवून ते जन्मभर भटकत राहिले. त्यांचे फिरणे अनेकदा निरुद्देश असले तरी निरर्थक कधीच झाले नाही.

काकासाहेब असे निसर्गवेडे असले तरी माणूसघाणे मात्र नव्हते. निसर्गाइतकेच ह्या जगातील इतर घटनांचे त्यांना आकर्षण होते. मानवाच्या प्रत्येक भल्याबुऱ्या कृतीत त्यांना रस होता. विश्वाइतकीच मनुष्यहृदयाची व संस्कृतीची गहनता पाहून ते चकित होत. एके ठिकाणी ते म्हणतात, “ज्या रसिकतेने मी डोंगरवृक्ष पाहिले त्याच रसिकतेने झोपड्या व राजवाडे पाहिले. ज्या आवडीने शंख व शिंपले पाहिले तेवढ्याच आवडीने मुझियम्स पाहिली. ज्या वृत्तीने अरण्यात हिंडलो त्याच वृत्तीने संमेलेने व अध्यापन यात समरस झालो.”

अनुक्रमणिका

निसर्गाच्या जोडीने तीर्थस्थाने, इतिहासप्रसिद्ध स्थळे, किल्ले, राजवाडे काकासाहेबांनी पाहिले. त्यांचे सूक्ष्म अवलोकन, रेखीव मांडणी व जिवंतपणा देणारी सारगर्भता खरोखरच थक्क करणारी आहेत.

देशाप्रमाणे विदेशात देखील त्यांनी पायावर चक्र पडल्यासारखी अविरत भ्रमंती केली. तेथील निसर्गसौंदर्याची जोडीने तेथील लोकजीवन, इतिहास, संस्कृती, कला ह्यांचे तुलनात्मक व सघन दर्शन ते आपल्या प्रवासवर्णनातून घडवतात तेव्हा ते त्यांच्या संस्कारी व समृद्ध अनुभवविश्वाचे, विविधांगी व्यासंगाचे, सखोलचिंतनाचे दृश्यरूप आहे हे जाणवते. ते म्हणत "हिंदू संस्कृतीचे खरे स्वरूप समजले की सारे देश पवित्र व पूज्य वाटू लागतात. ज्या भक्तिभावाने रामेश्वरापासून हिमालयापर्यंत यात्रा केली त्याच भक्तिभावाने व कुतूहलाने जगप्रवास केला की मग जगातल्या सगळ्या नद्या लोकमाता वाटू लागतात. हरेक नदीचा उगम ईश्वराच्या आशीर्वादासारखा शुभ्र व श्रेयस्करच ठरतो. हरेक पर्वत हिमालयाइतकाच देवात्मा वाटतो."

आपल्या ह्या सर्व प्रवासवर्णनांमागची भूमिका त्यांनी 'भक्तिकुसुमे'ह्या प्रवासवर्णनपर पुस्तकाच्या प्रस्तावनेत सविस्तरपणे मांडली आहे. ते लिहितात "माझी प्रवासवर्णने ही निसर्गाच्या पूजेची, ईश्वराच्या आद्यावताराच्या पूजेची भक्तिकुसुमे आहेत.त्याकडे केवळ साहित्यसेवा म्हणून पाहू नये. 'निसर्ग हा चैतन्यमय आहे' हा माझा अनुभव विद्यार्थ्यात संक्रान्त करावा : त्यांच्यात निसर्गाविषयी भक्तिभाव उत्पन्न व्हावा, म्हणून मी लिहितो."

विद्यार्थ्यांपुढे पौराणिक वा धार्मिक वातावरण उभे न करता त्यांच्यात निसर्गाविषयी शुद्ध कलात्मक भक्तिभाव उत्पन्न व्हावा अशा तऱ्हेने त्यांचे हे लेखन झालेले आहे. ह्याच भूमिकेतून त्यांनी लिहिलेले सर्वांत पहिले व सर्वांत जास्त वाचकप्रिय झालेले प्रवासवर्णन म्हणजे 'हिमालयाचा प्रवास' हे होय. त्या पुस्तकानेच अभावितपणे त्यांचे साहित्यक्षेत्राते पदार्पण झाले. साबरमती आश्रमातील शाळेतील विद्यार्थ्यांना, आपल्या हिमालययात्रेतील रोचक अनुभव सांगता सांगता, शांतिनिकेतनात मनात जाग्या झालेल्या साहित्यिक प्रेरणा पुन्हा डोके वर काढू लागल्या व त्यांनी विद्यार्थ्यांसाठी साहित्य-सृजन सुरू केले. त्यांच्या स्वतःसाठी देखील हा एक स्वतःबद्दलचा नवीनच शोधच होता.

खरे तर राजकीय नैराश्यातून उफाळून आलेल्या आध्यात्मिक प्रेरणेमुळे ते हिमालयाकडे निघाले होते. "जगताविषयी कितीही वैराग्य घेऊन माणूस हिमालयात गेला तरी हिमालयाविषयी अनुराग काही त्याच्या मनातून सुटत नाही. तेव्हा हिमवानाचे संपूर्ण दर्शनसुख घेऊनच मग एका जागी तपश्चर्येस बसावे" असे ठरवून ते उत्तराखंडाच्या यात्रेस निघाले. प्रयाग, काशी, गाय, बौद्धगया, बेलूरमठ, अयोध्या असे करत करत ते हिमालयात पोहोचले. वाटेतील प्रत्येक ठिकाणाची निरीक्षणे त्यांनी रसिकतेने पण चिंतनशील तटस्थपणाने केलेली दिसतात. काशीबद्दल ते म्हणतात, "हिच्याइतकी जिवंत नगरी दुसरीकडे कुठेच दिसणार नाही. हजारो साम्राज्ये आली आणि गेली, पण काशी जशीच्या तशी आहे. कारण की येथे धर्मचिंतनाची परंपरा अखंड चालत आली आहे. कोणताही नवा विचार ह्या देशात जन्म घेतो, त्याला काशीत आल्याबरोबर स्वतःचे घर मिळतेच. काशीचे नाव घेताच जसे हरिश्चंद्राचे स्मरण होते तसेच बुद्ध व महावीराचेही होते. कबीर तर सर्वांत जास्त लक्ष वेधून घेतो."

त्याचबरोबर काशीत घाणेरड्या गंगाकुंडात न्हाऊन पवित्र होऊ पाहणारे अंधश्रद्धाळू भाविक पण काकासाहेबांच्या नजरेतून सुटत नाहीत. ते म्हणतात "ह्या काशीत इतके दर्शनशास्त्री होऊन गेले, पण

कुणालाही दर्शनशास्त्राला अनुरूप समाजशास्त्र रचावेसे का वाटले नाही? पवित्र अशा श्रद्धेचे किती दांभिक अंधश्रद्धेत रुपांतर झालेय हे. विवेकानंदानी दाखवलेला उदात्त जीवनदर्शन देणारा हिंदुधर्म हाच का?"

प्रत्येक प्रवासात अशा नानाविध प्रश्नांवर चिंतन करीत गेल्याने त्यांच्या यात्रेला एका शोधयात्रेचेच स्वरूप आलेले दिसते.

काशीविश्वेश्वराच्या मंदिराला लागून उभ्या असलेल्या मशिदेचे मिनार पाहून ते म्हणतात, औरंजेबाने धर्मांध होऊन विश्वेश्वर मंदिर तोडले व त्या जागी मशीद उभारली. आज त्याचे साम्राज्य गेले. तरीपण काशिसारख्या हिंदूंच्या पवित्र स्थळी इस्लामची पताका अशी ही मशीद डौलात उभी आहे. ती तोडून टाकायचा विचार अद्यापपावेतो हिंदूंच्या मनालाही स्पर्शाला नाही. तेव्हा ही मशीद इस्लामच्या विजयाची पताका उरली नसून हिंदूंच्या सहिष्णुतेची ध्वजाच वाटते."

हेच काकासाहेब भेडाघाट येथील तोडफोड झालेल्या चौसष्ट योगिनींच्या सुंदर मूर्ती पाहून कळवळून म्हणतात, "रोगराईने माणसे मेली, जमिनीवर सांडलवंड झाली व लढाईत माणसे घायाळ झाली तर त्या अभद्र निशाण्या आपण ताबडतोब मिटवू बघतो, मग ह्या खंडित मूर्ती आपण अद्याप जशाच्या तशा का राहू दिल्या? धर्मांध मुसलमानांचे स्मारक म्हणून? की आपल्या भ्याडपणाचा आणि सामाजिक बेजबाबदारपणाचा, कबुलीजबाब म्हणून? इतर धर्मांत अशा तोडफोड झालेल्या मूर्तींची ताबडतोब बेमालूम दुरुस्ती केले जाते. परंतु आपली मंदिरे योग्य अथवा पुरुषार्थी लोकांच्या ताब्यात आहेतच कुठे?"

ऋषिकेशला ते साधूंचे माहेर संबोधतात. पुढे ते म्हणतात, "कोणत्याही ठिकाणी पुष्कळ वेळा गेले की प्रथमदर्शनाचे कौमार्य नष्ट होते. पण ऋषिकेशबाबत तसे घडत नाही. ते अध्यात्माचे विद्यापीठ आहे. एकदा औरंजेबाने ह्या स्थानावर स्वारी केली. तेव्हा तेथील ऋषी आपल्या झोपड्या जाळून अरण्यात पळून गेले. औरंगजेब खजील झाला, अरण्यात त्यांच्यामागे कुठे धावणार? तीन दिवसांत साधू परतले व विद्यापीठ यथापूर्व सुरू झाले." शेवटी ते भाष्य करतात," जे अपरिग्रह व्रत पाळतात ते परतंत्र वा पराभूत कसे होणार?"

अशी अनेक निरीक्षणे नोंदवत ते हिमालयात जाऊन पोहोचतात. हिमालयाविषयी, तेथील प्रकृतिसौंदर्याविषयी त्यांच्या मनात बालपणापासून आकर्षण होते. ते लिहितात, "लहानपणी देवळात जे देवाचे दर्शन घडे त्यापेक्षा हिमालयातील शिखरावरून जे ईश्वरदर्शन घडते ते अधिक पोषक आहे."

हिमालयाची यात्रा त्या काळी फार कठीण होती. दुर्गम पहाड चोहोकडे पसरलेले. पक्की सडक तर राहूच द्या. कच्चे रस्तेही नव्हते. पाऊलवाटा धरून एकेका पहाडावरून दुसऱ्यावर चढायचे. जणू स्वर्गारोहणाची एक एक पायरी. भोवती अपार उधळलेले निसर्गसौंदर्य. प्रत्येक उन्मेष म्हणजे जणू प्रत्यक्ष ईश्वराचेच नवे रूप. जो जो वर जावे तो तो प्रकृतीची भव्यता विस्तारतच होती. त्या प्राकृतिक सौंदर्यात व त्यातून लाभणाऱ्या आध्यात्मिक अनुभूतीत तल्लीन होऊन जवळजवळ दीड-दोन वर्षे ते हिमालयात निःसंगपणे अडीच हजार मैल भटकत राहिले. ह्या दोन वर्षांत प्रकृतीचे जे भव्यदिव्य दर्शन त्यांनी घेतले त्याचा असीम आनंद त्यांना एकट्याने उपभोगता येईना, मनात मावेना. त्यांच्यातला साहित्यिक जागा झाला. दोन वर्षांत मनात जे चिंतन, ध्यान, निरीक्षण केले, ज्यांमुळे त्यांचे आंतरिक जीवन समृद्ध झाले होते, साधनेची शांती लाभली होती,बाह्यजगत व अंतर्जगत ह्यातील ऐक्याची अनुभूती ते अनुभवू लागले होते, त्या साऱ्याचा उद्रेक

अनुक्रमणिका

त्यांच्या ह्या प्रवासवर्णनात उतरलेला दिसतो. प्रवासात घेतलेल्या आपल्या आध्यात्मिक अनुभूतीविषयी मात्र त्यांनी मौनच स्वीकारलेले दिसते. हे अनुभव वाच्य नसतात म्हणून? की ते केवळ आत्मनेपदी व स्वान्तसुखाय असतात म्हणून? का अपुऱ्या समजाचे आपले लोक त्यांचा अंधश्रद्धेने वापर करतील म्हणून?

हिमालयवर्णनात त्याची भावसमाधी लागते. हिमालय ते जगतात. तेथील सौंदर्य प्राशन करतात. त्यामुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व तर समृद्ध झालेच, पण आपल्या लेखणीने निसर्गालाही त्यांनी अधिक श्रीमंत केले आहे. त्यांचे हे प्रवासवर्णन इतके सौंदर्यवेधी व सृष्टिरहस्याचे दर्शन देणारे उतरले आहे की त्याच्या गुजरातीच नव्हे तर मराठी अनुवादाच्या पण अनेक आवृत्त्या निघाल्या आहेत.

हिमालयप्रवासातील त्यांच्या एका अनुभवाचे शब्दांकन पाहा "हिमालयातील सर्वात कठीण चढणी चढून गेल्यावर खात्री झाली की ही तपश्चर्या फुकट गेली नाही. वर पोचताच जे दृश्य दिसले ते मी जन्मभर विसरणार नाही. वेदकालीन ऋषींची महासभा बसली असावी अशा रीतीने असंख्य बर्फाच्छादित शिखरांची एक महापरिषद अर्धवर्तुळाकार बसलेली होती...ज्या दिशेला पाहावे तिकडे दूरवर पांढरी पांढरी शिखरे अनंततेचे सूचन करीत होती. हे पांढरे बर्फ त्रिकालातीत असावे असे पसरले होते. बर्फ जसेजसे शिळे होत जाते तसतशी त्याच्यावर हस्तिदंताच्या पिवळटपणाची प्रतिष्ठा येते. आणि त्यावर जेव्हा कुठेकुठे नवीन पांढरे बर्फ पडते तेव्हा ते, म्हातारीच्या मांडीवर मूल बसले असावे तशी शोभा देते."

त्यांच्या ह्या स्वैर कल्पनाशक्तीला, समृद्ध अनुभवाचा भक्कम आधार असल्याने वाचकांचे मनोविश्वही ती समृद्ध करते. खरे तर ही शब्दचित्रे नसून प्रेमचित्रेच आहेत. हिमालयाशी काकासाहेबांचे कायमचे स्नेहबंध जुळून गेले होते.हिमालयातील दिवसांच्या आठवणींनी एखाद्या सासुरवाशिणीसारखी आपली सद्गदित अवस्था होऊन जायची, असे ते स्वतः सांगतात. ह्या पुस्तकाला लिहिलेल्या प्रस्तावनेतून, प्रवासवर्णनाबाबतच्या लेखनप्रक्रियेचा विचार मराठीत प्रथमच आला.

काकासाहेबांच्या सगळ्या प्रवासवर्णनांत प्रवासाबाहेरच्या कितीतरी गोष्टींचा, पुराणकथांचा, ऐतिहासिक घटितांचा, वैदिक सूत्रांचा उल्लेख असतो. त्याबद्दल ते म्हणतात, "ह्याबाबत मी नम्रपणे इतकेच म्हणू शकतो की प्रवासाला निघतो म्हणजे केवळ पायाने वा डोळ्यांनी मी प्रवास करीत नसतो'. वेदात, चालणाऱ्याचे भाग्यही चालते, असे म्हटले आहे. माझा अनुभव असा आहे की चालणाऱ्याचे डोकेही भरधाव चालू लागते, मात्र त्याला पायाप्रमाणे एकाच दिशेने चालण्याचे बंधन नसते. जहाजावरील पक्षी मध्येच भरारी घेतात, मर्जीला येईल तेवढ्या घिरट्या घालून पुन्हा डोलकाठीवर येऊन बसतात. तसे ह्या कल्पनाशक्तीचे होते. मी प्रवासाला निघालो तेव्हा मला वैराग्यप्रवण, ध्यानशक्तीलाच फक्त बरोबर घेऊन जायचे होते. पण नको म्हटले तरी कल्पनाशक्ती, स्मरणशक्ती, योजनावृत्ती ह्या अपौरुषेय मंडळींचा तांडा मागे लागतोच. शेवटी त्यांच्याविरुद्ध सत्याग्रह करायच्या ऐवजी निराग्रह वृत्तीने त्यांना येऊ दिले."

काकासाहेबांचे दुसरे प्रवासवर्णनाचे पुस्तक म्हणजे 'ब्रह्मदेशचा प्रवास.' शांतिनिकेतन सोडण्यापूर्वी, इतक्या जवळ (बंगालमध्ये) आलो आहोतच तर ब्रह्मदेश बघून यावा असे मनात येऊन ते कृपलानींच्या सोबत ब्रम्हदेशाच्या प्रवासाला गेले. ही यात्रा केवळ कुतूहलापोटी होती. हिमालययात्रेची हार्दिक उत्कटता त्यात नव्हती. तरीपण त्यांच्या चिंतनशील स्वभावाने काही मार्मिक निरीक्षणे नोंदवलेली दिसतात. एके ठिकाणी ते म्हणतात, "देशाच्या भौगोलिक रचनेचा त्याच्या संस्कृतीवर केवढा परिणाम होतो. भारतातील आडव्या

अनुक्रमणिका

हिमालय पर्वतामुळे चिनी संस्कृती भारतात फारशी पसरू शकली नाही. उलट ब्रह्मदेशातील दक्षिणोत्तर पर्वतराजींमुळे उत्तरेकडील वृक्षसृष्टीच्या बीजांबरोबर चिनी संस्कृतीची बीजे अण थेट सिंगापूरपर्यंत पसरू शकली."

जेव्हा भारतीय राजपुत्र, वणिक् पुत्र ब्रह्मदेशात प्रथमच बुद्धधर्माच्या प्रसारासाठी गेले असतील, तेव्हा त्यांना कोणकोणत्या परिस्थितीशी सामना करावा लागला असेल ह्याच्या अनेकानेक शक्यता काकासाहेबांच्या मनात प्रवासभर फिरत होत्या. ह्या संदर्भात ते लिहितात, "जे लोक परदेशात जाऊन राहतात, त्यांची फक्त पोटं मोठी असता कामा नयेत. हृदय पण मोठं हवं. तेथील इतिहास, संस्कृती, धर्म, समस्या ह्यांचा त्यांनी मनापासून रस घेऊन अभ्यास करायला हवा."

मंडालेला गेल्यावर त्यांचे मन लोकमान्यांच्या स्मरणाने भरून न येणे अशक्यच होते. ते पटकन लिहितात, "स्वातंत्र्यपूर्व काळात अशी किती 'तीर्थ' तयार झाली असतील कोण जाणे!'

ब्रह्मदेशातील प्रचंड ऐरावती नदीवरील त्यांचे भाष्य मोठे रंगतदार आहे. ब्रह्मी लोकांच्या कपड्यातील रंगसंगतीविषयीचे त्यांचे भाष्य त्यांच्या कलात्मक संवेदना कशा सजग होत्या ते दाखवते. ते लिहितात, "समाजाची मनोरचना व अभिरुचीचे सार त्यांच्या संगीतातून जसे काढता येते तसेच ते त्यांच्या रंगांच्या निवडीवरूनही काढता येईल. इथल्या लोकांच्या घरांचे रंग व पोशाखांचे रंग ह्यात एक विरोध आढळतो. पण त्यामुळे ते दोन्ही प्रभावकारक ठरतात. भडक चटकदार रंगांतून एक प्रकारचे चांचल्य जाणवते. तर अतिगंभीर रंगांमुळे उदास वातावरण निर्माण होते.. ब्रह्मी रंग शांत व साजिंदे असूनसुद्धा उदास वाटत नाहीत. त्यांच्यात गर्भश्रीमंती अधिक आहे."

आसामचे प्राकृतिक सौंदर्य व तेथील लोकांची कपडे विणण्यातली, झोपड्या बांधण्यातली कलात्मकता पाहताना, आसामी व बंगाली यांच्यातली तेढ अनुभवताना त्यांचे लक्ष सीमेवरील डोंगरी जातिजमातींकडे जाते. त्यांना भारताच्या सांस्कृतिक प्रवाहात आणण्यासाठी काहीतरी केले पाहिजे हे लक्षात येते. सीमेपलीकडील चीनची हालचाल जाणवते व ते लिहितात, "चीनचे विद्यापीठ आसाम सीमेपासून १००-२०० मैलांवर आणले गेलेय. उद्या असे न होवो की आपल्या ईशान्य सीमेवरील जातिजमातींची सूक्ष्म माहिती आपल्याला चिनी प्राध्यापकांकडून घ्यायची वेळ येईल." काकासाहेबांची ही दूरदृष्टीची सूचना आम्ही आमच्या नेहमीच्या भारतीय वृत्तीला अनुसुरून उपेक्षिली. त्यांचे घोर परिणाम आपण अनुभवत आहोतच.

काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत देशातील नैसर्गिक वा मानवनिर्मित असे एकही सौंदर्यस्थळ नसेल की जिथे काकासाहेब पुन्हापुन्हा पोहोचले नाहीत आणि रसिकतेने त्यांनी त्याचा आस्वाद घेतला नाही. ह्या सर्व अनुभवांची मनावर उमटलेली तरल प्रतिबिंबे टिपणारी, त्यांची प्रवासवर्णनपर पुस्तकांची भारत दर्शं (७ भाग) ही मालिका अपूर्व आनंददायी ठरली आहे. त्यांतून डोंगरकिल्ल्यांची वर्णने, आकाशस्थ ग्रहगोलांची निरीक्षणे, नगर-महानगरांची टिपणे, नद्यांची संस्मरणे असे अनेकविध अविष्कार त्यांच्या प्रतिभेचे, संदर्भसंपृक्ततेचे मनोरम दर्शन घडवतात. ह्यांपैकी नद्या, सागर,धबधबे, तळी, सरोवरे, संगम, मृगजळ इ. जलतत्त्वाशी निगडित अशा ७० लेखांचे एक पुस्तक 'जीवनलीला' ह्या नावाने प्रसिद्ध झाले आहे. ते इतके रसमय उतरले आहे की, साहित्य अकादमीने ते पुस्तक सर्व भारतीय भाषांत अनुवादित केले आहे. ते नुसते

अनुक्रमणिका

जलविभ्रमांचे वर्णन नोंदवीत नाही तर त्यामागील सांस्कृतिक संदर्भांना, जीवनविषयक तात्त्विक प्रश्नांना सहज स्पर्श करत जाते. यांमधील नद्यांवरील लेखांचे संकलन 'लोकमाता' या नावाने मराठीत झाले आहे.

आर्यांच्या मनातील आपल्या नद्यांविषयीचा सख्यभाव व भक्तिभाव वर्णन करून सांगताना 'सरिता संस्कृती' ह्या प्रस्तावनेत त्यांनी, एकूणच आर्यसंस्कृती नदीशी किती अंगांनी स्वतःला बांधून आहे ह्याचे फार मार्मिक वर्णन केले आहे. या भक्तिपूर्ण आकर्षणाव्यतिरिक्त काकासाहेब नद्यांकडे आणखी एका अंगाने बघतात. ते म्हणतात, "माझ्या मनात नद्या म्हणजे केवळ पाण्याचा ओघ नसतो. ते जीवनाचे प्रतीक आहे. जिवंत व्यक्तीच जणू! प्रत्येक नदीचा काहीतरी स्वभावविशेष असतो. जीवितकार्य असते. सौंदर्य असते." भारतातील लहानमोठ्या असंख्य नद्यांची संस्मरणे त्यांनी चितारली आहेत. नद्यांची इतकी काव्यमय वर्णने आजपर्यंत कुणीही केली नसतील.

'काकासाहेब नद्या पाहतात आणि प्रवास संपला तरी त्या त्यांच्या मनात तुडुंब भरूनच राहतात. मनात त्यांची ओढ खळाळत राहते. ते तिच्या तीरावर खेळतच राहतात. म्हणून त्यांचे नदीवर्णन हे केवळ स्थळवर्णन वा प्रार्थना ठरत नाही. तर वर्षानुवर्षे नदीबद्दल जे एक अतूट नाते देहामनाशी जुळलेले असते त्याचा तो बहुरंगी उत्कट आलेख असतो. तिच्या थेंबाथेंबानी जी संस्कृती जोपासली गेली, जो इतिहास घडला, जो मानव नांदला, त्याचेच दर्शन नदीधारेतून घडते. अशी प्रक्रिया घडणे ही कलात्मकतेची खूण आहे.' हे प्रा.चंद्रकांत वर्तकांचे विवेचन त्या पुस्तकाचे सर्व मर्म उकळून दाखवते.

तिस्ता नदीवरील काकासाहेबांचे भाष्य पहा "जेव्हा' एखादी पहाडी नदी सरोवरातून उगम पावते, तेव्हा तिला सर-यू किवा सरो-जा म्हणतात, जेव्हा पर्वतशिखरांच्या कुशीत जमा झालेल्या हिमराशीतून तिचा जन्म होतो तेव्हा तिला 'हेमवती' म्हटले पाहिजे. एरवी पर्वतातून उगम पावणाऱ्या नद्यांचे सामान्य नाव 'पार्वती' आहेच. जन्मदात्या हिमालयाच्या या सर्व मुलींची नावे एकत्र केली तर त्यांची संख्या हजारांनी भरेल." तिस्तेचे मूळ नाव "त्रिस्रोता' आहे. तिस्ता तीन स्रोतांच्या संगमाने बनली आहे. ही नदी 'कान चेन झींगा' (कांचनजंघा) शिखराच्या दक्षिणेकडून उगम पावते. काश्मीरची दूधगंगा, स्वर्धुनी वितस्ता (झेलम), सेवाव्रती रावी, स्तन्यदायिनी चिनाब अनेकांची शब्दचित्रे, त्यांच्याभोवतीच्या आख्यायिका, इतिहास, त्यांचे धावणे, लचकणे, घोंगावणे, भोवतीची देवळे, मठ, ह्यांसह इतकी वेल्हाळ उतरली आहेत की ती सर्व मुळातूनच वाचायला हवीत.

महाभारतकारांनी नद्यांना 'विश्वस्य मातारः' म्हटले आहे. त्यापासून प्रेरणा घेऊन काकासाहेबांनी आपल्या नदीसंस्मरणांना 'लोकमाता' नाव दिले आहे. ते म्हणतात, "नदीला पाहताना मला नेहमी प्रश्न पडतो, हा सनातन प्रवाह येतो कुठून? कुठे जातो? प्रश्न जितका जुना होत जातो तसतसा तो अधिक गंभीर, काव्यमय व उत्कट, गूढ बनत जातो.... विश्वाचा आदिअंत शोधण्याची सनातन प्रेरणा मानवाला ह्या नदीपासूनच मिळाली असेल का?"

एकूणच जलतत्त्वाविषयी काकासाहेबांना विलक्षण आकर्षण आहे. ते म्हणतात, "वातावरणाखेरीज आपण जगू शकणार नाही हे जरी खरे असले तरी पृथ्वीला खरे महत्त्व आहे, ते तिला धरून राहिलेल्या उदककारणानेच. पाण्यात जो तजेला आहे, जे जीवनतत्त्व आहे ते इतर कोणत्याही महाभूतात नाही. पाण्याचा स्वभाव चंचल आहे. तरल आहे. उर्मील आहे. पण त्याहून विशेष म्हणजे तो वत्सल आहे.... उंच

अनुक्रमणिका

पहाड, शेते, ढग, आणि त्यांचे उत्सवरूप सूर्योदय, सूर्यास्त ह्यांचे चमत्कार मी पाहिलेत. तरीपण जलाचा प्रवाह व विस्तार ह्यात जी चैतन्यपूर्ण जीवनलीला प्रकट होते त्याच्यासारखा उत्कट दुसरा प्राकृतिक अनुभव नाही. पहाड कितीही उत्तुंग गगनभेदी असला तरी जोपर्यंत त्याचा विशाल वक्ष भेदून एखादा लहानसा का होईना झरा खळाळून बाहेर पडत नाही तोपर्यंत हे दृश्य सुनेसुने, कोरडेच वाटते."

नद्यांप्रमाणे सागराचेसुद्धा नाना विभ्रम काकासाहेबांनी रंगवले आहेत. धनुष्कोटीच्या सागरमीलनाचे हे वर्णन पाहा. "धनुष्कोटीमध्ये हरिहराच्या मीलनाप्रमाणे समुद्रांचा सागरसंगम आहे. या दोघांना एकदम कसे काय भेटू द्यायचे म्हणून पृथ्वीने जणू काही रामधनुष्याची कमानदार 'कोटी' आडवी ठेवून त्या दोघांना एक कोसपर्यंत भेटू दिलेले नाही.... आणि काय त्या दोघांचा खाजगी संकेत! महोदधीने हिरवा रंग धारण केला तर रत्नाकर निळाभोर बनतो. रत्नाकरावर हिरवट रंग चढतो, तेव्हा महोदधी गडद निळ्या रंगाची रेलचेल करून टाकतो. जोपर्यंत इच्छा असून भेटता येत नाही तोपर्यंत दोघे बेफाम होतात. पण एकदा का भेटण्याची मोकळीक मिळाली की जणू काय कसलीच उत्सुकता नव्हती. भेटायचे ते भेटून घेतले – असली शांती आणि सहजता त्यांच्या चेहऱ्यावर आढळून येते."

याउलट परदेश प्रवासातील मध्य समुद्राचे वर्णन बघा कसे उदास आहे." चहूकडे पाणीच पाणी असते. घटकाभर मनाला गंमत वाटते. नंतर वातावरण गंभीर बनत जाते. आपली सबंध सृष्टी या जहाजापुरती मर्यादित. विशाल समुद्रापुढे किती तुच्छ. समुद्राच्या दयेवर जगणारी. बाकी सगळे पाणी पाणी पाणी. इतक्या पाण्याचा अर्थ तरी काय? जमिनीचा कितीही मोठा भूखंड पाहत असलो तरी एवढी जमीन कशाला? असा विचार मनात येत नाही. विशाल आकाश पाहूनही असे वाटत नाही. पण समुद्राचे पाणी पाहून असा विचार हटकून येतो."

एकूण सर्व पुस्तकांची वीण अशीच वर्णन व चिंतन ह्यांच्या दुपेडी गोफाने गुंफलेली आहे. काकासाहेबांचा विशेष म्हणजे त्यांचे चिंतन कधीही बोजड वा क्लिष्ट होत नाही. 'रसिकत्वी परतत्त्व स्पर्शु' असा तो मेळ असतो. काकासाहेबांचा संस्कृत वाङ्मयाचा सखोल अभ्यास होता. त्यामुळे वेदांपासून अभिजात वाङ्मयापर्यंत आणि पौराणिक कथांपासून लोककथांपर्यंत अनेक संदर्भ, सूक्ते, वचने, शब्दविशेष त्यांच्या ह्या लिखाणात पदोपदी डोकावतात. त्यामुळे काकासाहेबांच्या लेखनाला लाभणाऱ्या सौंदर्याचे अचूक वर्णन करताना प्रसिद्ध गुजराती लेखक उमाशंकर जोशी म्हणतात. 'काकांच्या शैलीत गेल्या पाच हजार वर्षांचा सुवास दडला आहे. एखादा संस्कृत शब्द, एखादा शब्दसमुच्चय, एखादा वाङ्मय खंड, एखादा श्लोकार्ध त्यांच्या लिखाणाला सुगंधभाराने दरवळून टाकतो. पुन्हा ही अवरतणे पांडित्यप्रदर्शनासाठी आलेली नसून,त्यांचा प्रयोग अनायास मधुर असतो.'

त्यांचा आस्वाद सामान्यांना पण घेता यावा म्हणून ह्या सर्वांचे स्पष्टीकरण देणारे टिपण काकासाहेबांनी आपल्या पुस्तकाला जोडले आहे. त्याविषयी काकासाहेब म्हणतात – "आपल्या देशात संदर्भग्रंथांची उणीव आहे. चांगली वाचनालये पण फारशी नाहीत. त्यामुळे जिज्ञासू विद्यार्थी व संस्कारी रसिक वाचकांसाठी ह्या टीपा लाभदायक ठरतात."

लेखनातही काकांच्यातला शिक्षक कसा सदैव जागृत असतो ते इथे जाणवते. अशा प्रकारे निसर्गाची सूक्ष्मता, भव्यता, क्षुद्रता, रहस्यमयता, स्थिती, गती या साऱ्यांची जिवंत शब्दचित्रे काकांनी उभी केली आहेत.

अनुक्रमणिका

निसर्गातील बदल, हालचाल, घडामोडी यांचे बारकाईने निरीक्षण करून अचूक, गतिमान व नादमय शैलीत ते सारे टिपले आहे. त्यांच्या नजरेने निसर्ग पाहू लागले की निसर्गात लपलेले ईश्वराचे विराट चैतन्य जाणवून वाचकाचे मन उदात्त आनंदाने व प्रसन्नतेने भरून जाते. ते म्हणत, “ही धरती विश्वव्यापी विष्णुपत्नी आहे. जीवनमात्राची ती माता आहे. तिचा कणन् कण पवित्र आहे. तिच्या कणात चैतन्य स्फुरण पावताना मला दिसते.” सौंदर्यात शिवाची व शिवात सत्याची प्रतीती त्यांना येत असे.

हे भारतयात्रेचे वर्णन त्यांच्या लेखी केवळ साहित्यनिर्मिती नसून देशभक्तीचा, देशपूजेचाच एक भाग असतो. भक्त जसा आपल्या आराध्य देवतेचे वर्णन करण्यात भक्तीचा आंनद घेतो तसा काकांना देशातील पर्वत,नद्या,मंदिरे,गावे ह्यांचा परिचय करून देण्यात आनंद लाभत असे. भक्तिकुसुमे ह्या प्रवासवर्णनपर पुस्तकाच्या प्रस्तावनेत ते म्हणतात “माझ्या भारतभक्तीत देव आणि देऊळ असे द्वैत नाही.देवच देऊळ आहे आणि हे देऊळ एवढे मोठे आहे की त्याला बाहेरचे दारच नाही. पायात शक्ती असेल तितके चालायचे. अनंत दर्शने घ्यायची. पूजेच्या शेवटी प्रसादाची फुले स्वकीयांना देतो तद्वत ही जीवनकुसुमे साहित्यस्वरूपात वाचकांना देत आहे. ईश्वराच्या कृपेने मला हिंदुस्थानच्या देवभूमीत अश्वमेध यज्ञाच्या घोड्याप्रमाणे मनसोक्त फिरण्याची संधी मिळाली आहे. कॅमेरा कधी बरोबर नव्हता. पण कलापिपासू डोळ्यांनी कितीतरी चित्रे स्मरणाच्या पेटीत खच्चून भरून ठेवलेली आहेत. लिहिणारे भेटले व थोडा वेळ हाताशी असला तर एखादे चित्र रुजू करावे, असे स्वैर लेखन केले आहे. ह्या लेखांत काही रचना नसली तरी भारतभक्तीने थबथबलेले हृदय अनुस्यूत आहे.”

इतकी जिवंत, रसरशीत, समृद्ध व रसिकतेने नटलेली प्रवासवर्णने वाचून भारतभूमीचे दर्शन करावे अशी उत्कट इच्छा होणार नाही असा वाचक विरळा.

स्वातंत्र्योत्तर काळात त्यांनी जवळजवळ सर्व जगभर प्रवास केला. त्यापैकी आफ्रिकेतील प्रवासावर ‘उसपरके पडोसी’ हे पुस्तक लिहिले. हा एक नवाच देश. नवीन वंशाचे लोक, नवी संस्कृती, वेगळा निसर्ग, वेगळे इतिहाससंचित, वेगळ्या परंपरा; तरीपण काकासाहेबांनी तितक्याच उत्कटतेने, समरसतेने व मार्मिक अवलोकनाने त्या देशाचे वर्णन केले आहे. तिथे त्यांनी जसा तेथील भव्य निसर्ग पाहिला, पशुपक्षी पाहिले; तसेच तेथील सामान्य लोक,त्यांच्यासमस्या, त्यांची सुखदुःखे देखील जाणून घेतली. आफ्रिकेत प्रवास करताना तेथील नील नदीच्या उगमापर्यंत ते गेले. गंगोत्री-जमनोत्रीप्रमाणे ह्या उगमस्थानाचे त्यांनी ‘निलोत्री’ नाव ठेवले. व्हिक्टोरिया सरोवरातून उसळी मारून बाहेर पडणाऱ्या नील नदीचे दर्शन घेताना नेहमीप्रमाणे ते रोमांचित व ध्यानस्थ झाले. गंमत म्हणजे सवयीप्रमाणे त्यांच्या तोंडातून ईशावास्य वा माण्डुक्य उपनिषधातील श्लोकांऐवजी, सवितृवर्णनपर श्लोक निघाले. त्याबद्दल ते म्हणतात, “आता मला मिस्र देशाच्या संस्कृतीच्या पुराणांचा शोध घेऊन नील नदी (त तिला प्रेमाने निलाम्बा म्हणतात) व सूर्य यांचा काही खास संबंध होता का हे शोधून काढले पाहिजे.”

परदेशप्रवासवर्णन करणाऱ्याला चार सिद्धी अवगत असाव्या लागतात असे ते एके ठिकाणी म्हणतात. त्या म्हणजे, उदार व्यापक सहानुभूती, परसंस्कृती आत्मीयतेने समजून घेण्याची हार्दिक शक्ती, मानवजातीच्या विकासाचा इतिहास जाणण्याने येणारी समन्वयकारी विवेचक शक्ती व चौथी म्हणजे स्वदेशीयांसाठी कोणती हिततत्त्वे सांगावीत याचे तारतम्य. त्यांची चिंतनगर्भ, संस्कृतीच्या गाभ्याला हात घालणारी ही प्रवासवर्णने वाचताना ह्या चारही सिद्धी काकासाहेबांना वश होत्या हे जाणवते. त्यांची

प्रवासवर्णने म्हणजे विश्वाच्या ऐतिहासिक, धार्मिक, सांस्कृतिक व प्राकृतिक उद्यानातील सुंदर रंगीबेरंगी फुलांचे गुच्छच होत, असे वाटत राहते.

नायगाऱ्याचे प्रथम दर्शन घेताना त्यांना अगदी धन्य धन्य वाटले. पुढे ते म्हणतात "परंतु सर्वात जास्त आनंद तर अधःपातातही उल्हास व आनंद दाखवणाऱ्या विश्वरूप दर्शनाचा होतो."

नायगाऱ्याचा घोंघावणारा प्रपात, त्याचा रजतरस, त्याचे वाऱ्याशी चालणारे युद्ध, त्यातून उडणारे तुषार, त्याने निर्माण झालेले धुके यांचे मोठे ललितरम्य वर्णन त्यांनी केले आहे. पुढे ते म्हणतात, "जिथे धबधबे असतात तिथे कशी कोण जाणे, पण वेगवेगळी पाखरे जमतातच. हे द्विजगण निसर्गाकडूनच धबधब्याचे व्याकरण शिकतात. त्यामुळे त्यांना धबधब्याचे भय वाटत नाही. त्यांच्या अवतीभवती ते उडत राहतात. त्याच्या तुषारांत सुस्नात होतात, भिरभिरतात. जणू कवींना सांगत असतात, खाद्य शोधणे एवढाच आमच्या उडण्याचा मतलब नसतो. फुलांशी जसा आम्ही अनुनय करतो तसा ह्या तुषारांत स्नानाचा व पोहण्याचा आनंद पण आम्ही घेत असतो आणि जेव्हा हा आनंद पोटात मावेनासा होतो तेव्हा गाण्याचा लकेरीबरोबर तो आनंद हवेत उधळून देतो."

आणखी एके ठिकाणी ते लिहितात," ह्या प्रपातयुगुलाची आनंदसमाधी हजारो प्रेक्षकांच्या उपस्थितीनेही भंग होत नाही. एवढ्या उसळणाऱ्या पाण्याला समाधी कसे म्हणावे, असे कुणाला वाटते. पण समाधीची अचल प्रतिष्ठा, ह्या अखंड गतीत सुद्धा जाणवते. सतत नजर लावून बसल्यास एका स्थिरतेचा अनुभव आल्याखेरीज राहत नाही."

अशा सूक्ष्म अध्यात्मिक अनुभवांचा शोध ह्या आनंदयात्रेत सतत चालू असतो. त्याचप्रमाणे अनुभवसमृद्धी मुळे एखादे दृश्य पाहताना तत्सम अनेक दृश्यांची स्मरणसाखळी तांच्या मनात उलगडत जाते.

अमेरिकेतील हा धबधबा पाहताना त्यांना ब्रिटिश गियानातील पोटेरो नदीवरील प्रचंड केचूर धबधबा, आफ्रिकेतील थोका धबधबा, जोगचा धबधबा असे देशी-विदेशी पाहिलेले असंख्य धबधबे आठवतात. प्रत्येकाचे वेगळेपण ते नोंदवतात. श्वॅगोडान पॅगोडाच्या पायऱ्या चढताना त्यांना पर्वतीच्या 'राजवंशी पण पवित्र' पायऱ्या गोमटेश्वरच्या 'गरीब यात्रेकरूसारख्या',तर दुसऱ्या बाजूच्या 'वीर्यवान ब्रह्मचाऱ्यासाठीच जणू बांधलेल्या' पायऱ्या, शत्रुंजच्या, 'अस्तित्व आहे— नाही एकच',अशा पायऱ्या, गिरीनारच्या 'पहाडी रस्ताच वाटावा अशा' पायऱ्या, शंकराचार्य टेकडीच्या 'क्षणाक्षणाला थांबा व आजूबाजूची शोभा पहा' असे सांगणाऱ्या पायऱ्या, व्यापाराचे प्राचीन मार्गच असावे' असे वाटणाऱ्या मंडालेजवळच्या पायऱ्या त्यांना आठवतात व नेहमीच्या परिचयातली वस्तूसुद्धा केवढा व्यापक आशय व संदर्भ त्यांच्या मनात जागा करते ह्याचे अप्रुप वाटते! काकासाहेबांनी युरोपचाही प्रवास केला. युरोपिअन राष्ट्रांतील युद्धोत्तर पडझड व त्यातून पुनश्च वर येण्याची युरोपिअनांची चैतन्यमय जिद्द त्यांना भावली. तेथल्या स्वच्छ सुंदर निसर्गसौंदर्यावर ते लुब्धही झाले. पण का कोण जाणे, त्या प्रवासावर त्यांनी फारसे लेखन मात्र केलेले नाही.

जपानला ते आग्रहाच्या निमंत्रणामुळे ५-६ वेळा जाऊन आले. त्यांचे जपानशी कायमचे ऋणानुबंध जुळून गेले होते. पहिल्यांदा ते जपानला गेले तेव्हा जपानमध्ये बिनवासाच्या साकुरा फुलांच्या बहराचे दिवस होते. साकुऱ्याचा तो अपल्काळ टिकणारा उन्मादक बहर पाहत नाचणे, गाणे, फिरणे हा जपानी लोकांचा

मोठा उत्सवच असतो. जपान्यांची सौंदर्याविषयीची ही संवेदनशीलता पाहून काकासाहेब मुग्ध झाले. त्यानंतरच्या प्रत्येक सफरीत जपानच्या समृद्ध निसर्गसौंदर्याचे सौम्य आणि रौद्र, दोन्ही अविष्कार पाहत, त्यांनी सारा जपान पालथा घातला. ते लिहितात, "हिमालयातील उत्तुंग हिमराशी बघताना जो विराट विश्वात्मकतेचा अनुभव आला, तोच अनुभव मला जपानमधील आसो पर्वतावरील ऊन व ज्योतिरूप ढगांच्या दर्शनामध्ये लाभला. वाटले, जिच्या उद्धारासाठी भगवंताने एवढे अवतार घेतले ती ही पृथ्वी – ही सृष्टी — हा भगवंताचा आद्य व विराट अवतार आहे. आणि त्याच्याशी एकरूप होणे हीच सर्वात मोठी साधना आहे." 'उगमणो देश' ह्या पुस्तकात ह्या अनुभवांची नितांतसुंदर शब्दचित्रे त्यांनी रेखाटली आहेत.

काकासाहेबांची बहुतेक प्रवासवर्णने ही बरीच मागाहून लिहिलेली आहेत. त्यामुळे ती विस्मृतीच्या अतलातून ओढून काढलेली असतात. साहजिकच त्यात सत्य व काल्पनिक ह्यांची रसमिसळ झालेली असते. त्यातून, त्यातील सत्य म्हणजे सुद्धा वास्तवाचे त्यांच्या संवदेनशील मनावर पडलेले 'इम्प्रेशन'च असते. ह्या सर्वांमुळे त्यांची लेखनप्रक्रिया ही पुनःप्रत्ययापेक्षा पुनर्निर्मितीच अधिकांश असते. मनातील अमूर्त संस्कारांना मूर्त करणारी ही प्रक्रिया ललितवाङ्मयाची प्रक्रिया असल्याने त्यांची प्रवासवर्णने अनेकदा प्रवासाची पार्श्वभूमी लाभलेले ललितनिबंधच ठरतात.

'काकासाहेबांच्या प्रवासवर्णनांनी 'प्रवासवर्णन' ह्या वाङ्मयप्रकाराच्या विकासाची वळणे, त्यातील लवचिकतेच्या शक्यता प्रथम अधोरेखित केल्या आहेत. एक स्वतंत्र वाङ्मयप्रकार म्हणून विकसित होण्याला आधार दिला आहे.' ह्या शब्दांत काकासाहेबांचे ऋण, डॉ. चंद्रकांत वर्तक यांनी आपल्या मराठीतील प्रवासवर्णनविषयीच्या प्रबंधात व्यक्त केले आहे. ते म्हणतात, 'प्रत्येक स्थलाशी संलग्न असे एक वातावरण असते. संवेदनक्षम व संस्कारित प्रतिभावंतालाच हे वातावरण अनुभवता येते. त्याचा आस्वाद घेता येतो. हे सामर्थ्य काकासाहेबांच्या प्रतिभेत असल्याने ते रसिकाला वर्णित स्थळाचे व्यक्तिमत्त्व त्याच्या अंगभूत वातावरणासह 'भोग्य' करू शकतात. त्यातील चैतन्यमयतेची भावगर्भ अनुभूती देतात. ही जाणीव एवढ्यावर थांबत नाही तर त्या वर्णानातून काकासाहेबांचे सौंदर्यवृत्तीने भारलेले, नव्या अनुभवासाठी, आसलेले, सगळ्यांचा सूक्ष्म व खोलवर विचार करणारे व्यक्तिमत्त्व जाणवत राहते."

अशा तऱ्हेने अनेक लहानमोठ्या देशांतून हा आनंदयात्री जीवनभर फिरत राहिला. तेथील निसर्ग, जनजीवन व संस्कृती ह्यांचा वेध घेत राहिला. उत्कृष्ट प्रवासवर्णनासाठी ह्या तीन गोष्टींच्या जोडीने लेखकाची संस्कारिता विविधलक्ष्यी असावी लागते असे काकासाहेब म्हणत. ती संस्कारिता काकासाहेबांजवळ असल्यामुळे त्यांची प्रवासवर्णने मराठी साहित्याची. किंबहुना भारतीय साहित्याचीच भूषणे ठरली आहेत.

अशी रसिक, चिंतनगर्भ आणि संस्कृतीच्या गाभ्याला हात घालणारी प्रवासवर्णने लिहून काकांनी भारताचा भूगोल, पुरातन इतिहास, भारताचे लोकमानस, थोडक्यात भारताची श्री व संस्कृती, ह्यांची साहित्यातून पुनर्प्रतिष्ठा केली आणि गुजराती तसेच मराठीतही प्रवासवर्णनाचे दालन श्रीसंपन्न केले आहे.

अनुक्रमणिका

८.

## ललित व अनुवादित साहित्य

काकासाहेबांनी यशस्वीपणे हाताळलेला दुसरा वाङ्मयप्रकार म्हणजे ललित निबंध. कोणत्याही व्यक्ती, वस्तू, दृश्य, प्रसंग यांविषयी लेखक आत्मनिष्ठ भूमिकेतून लालित्याच्या अंगाने स्फुट लेखन करतो ते लेखन साधारणतः ललित निबंध या सदरात मोडते. अशा लेखनात लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाचे प्रतिबिंब अपरिहार्यपणे उमटलेले असते. हे व्यक्तिमत्त्व जेवढे रसिक, संपन्न, व्यासंगी व खेळकर असेल तेवढे त्याचे लेखन वाचकांशी जिव्हाळ्याचे नाते जोडून जाते.

काकासाहेबांचे सर्वच लेखन थोड्याबहुत फरकाने आत्मनिष्ठ आहे. त्यामुळे त्यांची प्रवासवर्णने, ललितनिबंध, प्रस्तावना, नोंदी ह्यांतल्या सीमारेषा इतक्या पुसट होत जातात की त्यांचे निश्चित विभाजन करणे कठीण होते. तथापि त्यांच्या समृद्ध, रसिक व नर्मविनोदी व्यक्तिमत्त्वाचे प्रतिबिंब त्यांच्या सर्वच साहित्यात उमटलेले असल्यामुळे हे त्यांचे लेखन रसिकांच्या हृदयाशी चटकन भावबंध निर्माण करते. कोणाही चांगल्या ललितनिबंधकाराचे मानसिक व बौद्धिक क्षितिज विस्तृत असावे लागते. ह्या दृष्टीनेही बघता, काकासाहेब ललित निबंधाचे आचार्यच ठरतात. ललित निबंधाच्या लेखकात व वाचकात जी एक आत्मीयता निर्माण होते आवश्यक असते, ती निर्माण करण्यात काका फार कुशल आहेत. लोककथेसारखी शैली व लोकसाहित्यातला ताजेपणा त्यांच्या ललितलेखनाला प्रसन्नता व आत्मीयभव देऊन जातो. म्हणूनच काकासाहेब गुजराती ललितनिबंधाचे शिल्पकार मानले जातात. गुजराती कवी व समीक्षक 'सुंदर' काकासाहेबांना,'सर्जक निबंध (ललित) साहित्यप्रकाराला सर्वप्रथम व उत्तम रीतीने निर्माण करणारा निबंधकार' असे म्हणतात.

'जीवनातील आनंद' हे काकासाहेबांचे निसर्गवर्णनपर ललित निबंधांचे प्रमुख पुस्तक. वेळोवेळी लिहिलेल्या निसर्गदृष्यांवरील नव्वद ललित लेखांचा हा संग्रह आहे आणि तो अर्पण केला आहे तो 'आनंदा'लाच, निसर्गातील हरएक विभ्रमात ह्या आनंदयात्रीला जीवनाचा आनंद भेटत आला आहे. 'विश्वात आनंदाव्यतिरिक्त दुसरे काय आहे?' हे तैत्तिरिय उपनिषधातील सूक्त पुस्तकाच्या सुरुवातीला त्यांनी दिले आहे. कारण रवीन्द्रनाथांप्रमाणे तो त्यांचा स्वानुभव आहे आणि तेच ह्या पुस्तकाचे सूत्रही आहे. या पुस्तकाच्या 'आनंदाचे निर्झर' ह्या प्रस्तावनेत ते सांगतात, "जीवनातील आनंद व्यक्त करण्यास मी जो प्रारंभ केला तो हिमालयातील प्रवासापासून. सहकाऱ्यांना तो आवडला म्हणून मग ब्रह्मदेशचा प्रवास लिहिला. भारतीय संस्कृतीप्रमाणेच अखंड वाहणाऱ्या भारतातील नद्यांचे दर्शन केल्यावर त्या 'लोकमातां'ना स्मरणांजली अर्पण करणे ओघानेच आले. सरकारने जेव्हा वर्षभर तुरुंगात डांबून ठेवले तेव्हाही ही आनंदयात्रा तुरुंगाच्या चार भिंतींच्या आत चालूच होती. सर्वत्र अखंड यात्रा चालूच आहे. जीवनाच्या आनंदाच्या असंख्य प्रवाहांना व लहान झऱ्यांना एकत्रित करून या' जीवनाच्या आनंदा'ला जनतेपुढे वाहता करून शरदऋतूच्या ढगाप्रमाणे आता मी आपला अनुभूतिभार हलका करून टाकत आहे."

प्रस्तावनेतून स्पष्ट होते की काकासाहेबांच्या लेखी अवघे जीवन ही एक आनंदयात्राच आहे. आनंद हा वाटल्याने द्विगुणित होतो. म्हणून तो वाटण्याची ऊर्मी त्यांच्यामध्ये प्रबल होती. अशा वाटण्याने मन स्वात्त्विक बनते हा त्यांचा विश्वास होता. ते म्हणतात, "अशा सहअनुभूतीमुळे सुखाहून वेगळाच असा एक

अनुक्रमणिका

नवाच आनंद प्राप्त होतो. कलेच्या द्वारे त्या मनोमय आनंदाचा ओझरता अनुभव इतरांना देता येतो. आनंदाची सर्जकवृत्ती अदम्य असते आणि ह्या नव्या सर्जनामुळे आणखी नव्या आनंदाचे फवारे उडतात ते वेगळेच."

"प्रकृतीचा एकही उन्मेष असा नाही की ज्यात मला रुची नाही" ह्या त्यांच्या पहिल्या वाक्यानेच ह्या संग्रहातील ललित निबंधांचे स्वरूप स्पष्ट होते. निसर्गाच्या प्रत्येक विभ्रमाशी, दिवसाच्या प्रत्येक प्रहराच्या बदलत्या आविर्भावाशी ते तन्मय होऊन, त्यातून स्रवणाऱ्या आनंदधारेत चिंब होऊन जातात. पाऊस, ढग, फुले, पाने, प्रभात, माध्यान्ह, इतकेच काय पण चिखल वा रणरणत्या उन्हातले काव्यसुद्धा ते पाहू शकतात. कोकिळेचे पिल्लू, रेतीतील गवत, धुके, वटवाघूळ, तुरुंगातील गुढीपाडवा अशा साध्यासाध्या विषयांची मौजभरी मुलाखत ते करून देतात आणि त्यामुळे त्यांच्या निबंधांना रसपूर्ण गती लाभते. एका निबंधात ते म्हणतात, "पूर्वेच्या बाजूस दोन टोकांना आंब्याची झाडे आहेत. त्यावर लहान लहान कैऱ्या फार सुंदर तऱ्हेने लोंबत आहेत. वाऱ्याने फांद्या हलू लागल्या म्हणजे ते कोवळे आंबे आनंदाने डोलू लागतात. वानराची पोरे, आईच्या पोटाशी बिलगून जशी निर्धास्त होतात, तशा या कोवळ्या कैऱ्या आंबाच्या फांदीला लटकत राहून जमिनीपासून आपण किती उंच आहोत, असे मनातल्या मनात म्हणून आनंद लुटतात." जीवनदेवता, प्राकृतिक दृश्यातून आपला अनंतविध उल्हास व्यक्त करीत असते. त्यांचा आनंद घेण्याची आनंददीक्षा काकासाहेबांना लाभली होती ती अशी!

"आपण आकाशाचे वर्णन करतो, पृथ्वीचे वर्णन करतो, जलाशयाचे वर्णन करतो; पण चिखलाचे वर्णन केलेले कोणी पाहिले आहे का? मनातसुद्धा कोणाला चिखलाविषयी सहानुभूती वाटत नाही. परंतु तटस्थपणे विचार करता चिखलात काही कमी सौंदर्य नसते, याची प्रतीती होईल. एकतर ह्या प्रदेशातील चिखलाचा लाल रंग मोठा सुंदर असतो. पुस्तकाच्या पुठ्ठयावर, घराच्या भिंतीवर किंवा अंगावरील उंची कपड्यांवर आपण सगळे असेच चिखलाचे रंग पसंत करतो. कलाभिज्ञ लोकांना मातीच्या भांड्यांनादेखील तोच रंग असलेला फार आवडतो. फोटो काढताना जर चिखलाचा ठिकऱ्या रंग आला तर त्याला 'वॉर्म टोन' म्हणून तज्ज्ञ मंडळी खूप खूष होऊन जातात."

'गुजरातच्या निसर्गाचा खरा प्रकृतिगायक कोण असेल तर ते काकासाहेब होत. ज्याप्रमाणे मेघाणींनी लोकहृदयात प्रवेश करून लोकसाहित्यातील चैतन्यमय तत्त्व दाखवले, त्याप्रमाणे काकांनी निसर्गाच्या हृदयात प्रवेश करून त्याचे चैतन्य खुले करून दाखवले आहे. त्यांनी दिव्य दृष्टीने निसर्ग पाहिला नि रसिकांना पण ती दृष्टी मिळवून दिली', हे गुजराती समीक्षक चंद्रकांत मेहता ह्यांचे विधान वरील वर्णनातून प्रत्ययास येते.

किती भिन्नभिन्न विषयांत काकासाहेबांच्या रसिक मनाला रस व गती होती, किती नेरपेक्षपणे ते प्रत्येक वस्तूजाताशी समरस होत असत, संवेदनांच्या श्रीमंतीने समृद्ध व तृप्त होत असत हे पाहून मन थक्क होतं! वाटतं इतक्या कार्यरत व बहुप्रवृत्तिक जीवनात त्यांना ह्या आनंदाव्यतिरिक्त काहीच देऊ न शकणाऱ्या छंदासाठी वेळ तरी कसा उपलब्ध होत होता?

ह्या पुस्तकातील तिसऱ्या खंडात 'अनंताचा विस्तार' ह्या शीर्षकाखाली आकाशदर्शनाचे विविध उन्मेष बघायला मिळतात. हे 'देवाचे काव्य' काकासाहेबांनी किती सूक्ष्मपणे अनुभवले, अभ्यासले आहे, ह्याची ग्वाही या लिखाणात पदोपदी मिळते. रात्रीचे हे लखलखीत वैभव काकासाहेबांनी इतके सहजतेने व

अनुक्रमणिका

गोष्टीवेल्हाळपणे चितारले आहे की, अजाणत्यालाही आकाशाचा वेध घेण्याची गोडी लागावी. सुरुवातीलाच ते एक मार्मिक विधान करतात. ते म्हणतात "ज्यात कमी दिसतं तो अंधार व ज्यात जास्त दिसतं तो प्रकाश, ही व्याख्या जर बरोबर असेल तर असं म्हटलं पाहिजे की दिवसा पांढरा अंधार असतो त्यामुळे आपल्याला फक्त पृथ्वी व सूर्य हे दोघेच दिसतात. पण रात्री काळा उजेड पडतो तेव्हाच ईश्वराची अनंत व अफाट सृष्टी आपल्यापुढे प्रकट होते." ह्या आकाशस्थ विश्वाचे ते जेव्हा वर्णन करू लागतात तेव्हा जणू काही त्यांच्या लेखणीतून आकाशी सौंदर्याचे गद्य काव्य झरू लागते. त्यांचे सचिव श्रीपाद जोशी सांगतात 'शांत निस्तब्ध रात्रीच्या गर्द निळ्या आकाशात स्वच्छंदपणे बागडणाऱ्या तारकांचे मूक गान ऐकण्यात त्यांनी किती रात्री घालवल्या आहेत.'

जुन्या-नव्या, पौर्वात्य-पाश्चात्त्य ज्योतिषज्ञानाची काकासाहेबांना भरपूर माहिती होती. म्हणूनच सामान्य वाचकाला घरबसल्या ते देवाचे काव्य ऐकवतात. तुरुंगात असताना, महात्मा गांधींपासून ते सामान्य कैद्यांपर्यंत अनेकांना त्यांनी ह्या आकाशदर्शनाच्या आनंदाची दीक्षा दिली होती. ताऱ्यांच्या वेगवेगळ्या आकृत्यांना ते अगस्तीची झोपडी, खिचडीचे भांडे, देवयानी, दशरथ इ. अशी काही समर्पक नावे देतात की सामान्यांना पण गोडी वाटते. त्यांचा शिष्य म्हटला की आकाशदर्शनाचा शौकीन असायचाच!

काकासाहेबांच्या शब्दांत त्यांनी वर्णन केलेले 'देवाचे काव्य' पाहा. "आजकाल श्रावणाला पश्चिमेकडे मावळत असताना पाहण्याची मोठी गंमत आहे. श्रावण नक्षत्र नितांत सुंदर आहे. आकाशगंगेच्या काठी त्याचे तीन तारे एका ओळीत असतात. यातील मधला चकाकणारा तारा म्हणजेच पितृभक्त श्रावण. दोन्ही बाजूंचे तारे आहेत ते त्याचे आईबाप. आईबापांची कावड घेऊन तो गंगेच्या तीरावर येऊन पोहोचला होता. इतक्यात त्याला दशरथाचा बाण लागला. या तीन ताऱ्यांनाच बाण समजून तो कोणत्या दिशेने आला आहे हे पाहण्यासाठी जर उजवीकडे नजर फिरवली तर एक मोठा तारा दृष्टीस पडतो. त्याचे नाव अभिजित. वास्तविक त्याला 'दशरथ' म्हटले पाहिजे. त्याच्याच बाणाने श्रावण गतप्राण झाला होता ना?"

असे हे आकाशदर्शन.काकासाहेबांना विश्वरूप दर्शनाइतके ते पवित्र वाटते. त्यात सौंदर्याच्या अनुभूतीबरोबरच, हृदयाची भव्यतामूलक उन्नती साधते, असे त्यांना वाटते. ह्या व्यतिरिक्त आणखी कुठलेच प्रयोजन ह्या आकाशदर्शनामागे नाही. लहानसहान कृतींपासून मोठ्या कृतींपर्यंत प्रत्येकीतून आनंद मिळविणे हा काकासाहेबांचा स्थायिभाव होता आणि असा आनंद आपल्याबरोबरीने वाचकांना आपल्या लिखाणातून देणे हेच त्यांना मोठे प्रयोजन वाटत असे. म्हणूनच "आनंदाइतके दुसरे मोठे प्रयोजन काय असणार?" असे ते विचारतात. 'जीवनातील आनंद' ह्या पुस्तकात निर्हेतुक आनंदाचा उल्हास सर्वत्र भरून राहिला आहे. रसात्मकता, प्रगल्भता व संस्कारिता ह्या दृष्टीने हे पुस्तक काकासाहेबांच्या ललित निर्मितीतील सर्वश्रेष्ठ कृती मानता येईल.

कलादृष्टीने त्यांची आणखी एक कृती 'श्रेष्ठ' मानली जाते व ती म्हणजे 'उत्तरेकडील भिंती' हे छोटेखानी पुस्तक. काकासाहेब साबरमती जेलमध्ये असताना बाहेरचे जग दृष्टीआड झालेले. मग काकासाहेबांची प्रतिभा त्यांच्या सूक्ष्म निरीक्षणशक्तीचे बोट धरून उत्तरेकडील भिंतींवरून आतबाहेर करणाऱ्या कावळे व कबुतरांच्या निरीक्षणात दंग झाली. मुंग्या-किड्यांचे, नीलकंठ-चक्रवाकाचे अवलोकन करू लागली.खारीच्या क्रीडांत गुंगून गेली. त्या सर्वांची मोठी खुसखुशीत व संवादस्वरूप वर्णने ह्या पुस्तकात आहेत. कुठे गहन विचार नाहीत. उपदेश नाही. विद्वज्जडता नाही. प्रचार नाही. काही नाही. आहे फक्त

अनुक्रमणिका

तुरुंगाच्या चार भिंतीआडचा आनंद. लहान लहान गोष्टीतून आनंद कसा मिळवता येतो ते हे पुस्तक वाचकांना शिकवते. वाचकाला आपल्याबरोबर खेचून नेण्याचे सामर्थ्य काकासाहेबांच्या शैलीत आहे. त्यामुळे ते वर्णन करीत असलेले प्रसंग, आपण स्वतःच अनुभवत आहोत असे वाचकाला वाटते. त्यांची रसार्द्र शैली कोणत्याही वस्तुविषयाला आस्वाद्य करू शकते. जीवनातील लहानमोठ्या गोष्टींकडे समभावाने पाहण्याची अद्भुत सिद्धी त्यांना लाभली होती. त्यांच्यातील चैतन्याची धारा, दृष्टीपथात येणाऱ्या सर्व वस्तूंवर झरत असते. हे पुस्तक मनोरंजन म्हणून जितके बालकांना प्रिय झाले तितकेच साहित्याचा एक नवा प्रकार म्हणून विद्वानांना, रसिकांना रुचलेले आहे.

ह्या पुस्तकाच्या दुसऱ्या आवृत्तीच्या प्रस्तावनेत काकासाहेब 'आशीर्वाद' देताना म्हणतात, 'उत्तरेकडील भिंती' ह्या पुस्तकाने मला अनेक दरवाजे मोकळे झाले. अनेक घरांत प्रवेश मिळवून दिला. मी लिहितो तो गप्पागोष्टी करण्यासाठी. त्यामुळे वाचकांबरोबर तेवढ्यापुरता अभेद निर्माण होतो. त्यामुळे त्यांनाही आनंद वाटतो. हे पुस्तक वाचताना लहानांना आनंद होतो तो त्यांच्या मनात मावत नाही. ती मोठ्यांना दाखवतात.त्यांना पण खूप आवडते. मग मुलांना कळते की जगात अशीही वस्तू आहे की ती आपल्याइतकीच मोठ्यांना पण आकर्षित करते. त्यांचा आत्मविश्वास वाढतो. हे काम ह्या पुस्तकाने केले. कारण ह्यात विद्वत्ता, प्रचार काही नाही. आहे फक्त अनुभवाची, सुखदुःखाची, कल्पनांची देवाणघेवाण, मुख्यत्वे निजानंदाची मस्ती. खरोखरच दुनियेने मला प्रसन्न ठेवले. मला जगण्याइतका अवकाश तिने दिला. तुरुंगातसुद्धा मला, माझी दुनिया प्रियच वाटली. माझ्या लिखाणात मला ह्या 'भिंती' प्रिय आहेत."

तुरुंगातसुद्धा प्रसन्न राहणारा, आनंद शोधणारा हा माणूस खरोखरच 'खुषमिजाजी'च म्हणायला हवा. तीन वर्षांचा कारावास भोगत असताना त्यांनी केलेल्या लिखाणाची प्रदीर्घ यादी वाचली की त्यांच्या सदानंदी व स्थिरचित्त वृत्तीची खात्री पटते. ह्या पुस्तकाला वा.म. जोशींची प्रस्तावना आहे. त्यात त्यांनी काकांचं ऋण नेमकेपणानं व मोकळेपणानं व्यक्त केलं आहे. ते लिहितात, 'काकासाहेब हे गुजरातमधील पहिल्या पाच लेखकांपैकी एक आहेत. गुजरातीने एक चांगला मराठी लेखक नेला म्हणून थोडं वाईट वाटतं. पण खरं तर जास्त अभिमानच वाटतो की परकी भाषेत एका मराठी माणसानं इतकं आदरणीय स्थान मिळवलं. क्षुल्लक दिसणाऱ्या गोष्टीत काकांची कल्पनाशक्ती जे रंग, ज्या संवेदना, जे विचार भरते त्याच्यी मौज वाचकांनी स्वतःच अनुभवायला हवी. त्यांच्या शैलीत आत्म्याच्या सदाचाराचे, सदाकांक्षांचे व सरलतेचे प्रतिबिंब पडलेले आहे.'

जेलमधून बाहेर पडताना त्यांच्या तोंडातून जे शब्द आले ते पुस्तकाच्या शेवटी घेतलेले आहेत. "क्षीणे पुण्ये मर्त्यलोकं विशन्ति". जेलमधले वास्तव्य त्यांना खरोखरच किती निर्विकल्प आनंद देऊन गेले ह्याचेच हे उद्‌गार द्योतक आहेत. काकासाहेब एके ठिकाणी मिस्किलपणे म्हणतात "आजच्या शहरी मुलांना कोणत्या ऋतूत कोणती फुलं फुलतात, कायकाय बदल होतात, ह्याबद्दल काहीच माहिती नसते. आइस्क्रीमच्या ऋतूनंतर छत्रीचा ऋतू, मग मफलर बांधायचा ऋतू, एवढेच त्यांना कळते,"अशा ह्या निसर्गापासून तुटलेल्या पिढीला काकासाहेबांची ही, निसर्गाचा एक भागच बनून लिहिलेली प्रासादिक पुस्तके केवढीतरी श्रीमंती देऊ शकतील.

कलादृष्टीने महत्त्वाचे असे त्यांचे आणखी चार ललित-निबंध संग्रह आहेत. दोन हिंदीत (प्रकृति का संगीत, उडते फूल), एक गुजरातीत (आवारनवार) व एक मराठीत (खेळकर पाने) आहे. ह्यातील काही

लेख अनुवादित होऊन एकमेकांत घेतले गेलेले आहेत, तेव्हा 'खेळकर पाने' ह्या एकाच संग्रहाविषयी जरा तपशिलाने सांगते. हा संग्रह काकासाहेबांनी त्यांना घडवणाऱ्या महाराष्ट्रातील निसर्गाला अर्पण केला आहे. प्रस्तावनेची शीर्षकसुद्धा नेहमीच्या कालात्मकतेने अनुरूप ठेवले आहे, 'संतोष'. खेळकर पानांची अभिजात लीला रसिकांपुढे ठेवताना त्यांच्या मनात 'संतोषा' खेरीज अन्य कुठली भावना असणार? एका लेखात काकासाहेबांनी कलकत्त्याच्या वाटेवर भरलेल्या एका नदीकाठच्या ओल्या मातीतील नक्षीचे वर्णन केले आहे. ते म्हणतात, "हे नक्षीकाम काही न बोलता, कसलाही बोध देण्याच्या भरीस न पडता सरळ हृदयाला जाऊन भिडत होते आणि तिथे आपली कायमची छाप पाडीत होते. याचे नाव खरी कला!" ह्या संग्रहातील लेख म्हणजे सुद्धा असचे रंग,आकार,प्रकाश,नादनिनाद ह्यांतून होणाऱ्या अपूर्व संवेदनांचे त्यांच्या रसिक मनावर उमटलेले 'नक्षीकाम' च होय.

हा निष्कामपणे चाललेला त्यांच्या संवेदनांचा व कल्पनाशक्तीचा खेळ आहे. खेळाला आनंदप्राप्तीव्यतिरिक्त अन्य कुठले प्रयोजन असणार? म्हणूनच मंगेश पडगावकार ह्या लेखांविषयी म्हणतात, "आनंदाचे अनेकविध क्षण शोधणे हाच ह्या निबंधांचा आवडता छंद आहे. प्रतिपादनाचा कसलाही काच नसल्यामुळे, अनुभवांच्या पानांच्या खेळकर गिरक्यांतून आनंदाच्या अनेक लयी साधल्या आहेत. आनंदास्वादाच्या रुचिभिन्नतेकडे काकासाहेब मिस्किलपणे पाहू शकतात. जीवनाकडे अलिप्त कुतूहल नजरेने बघण्याच्या, जीवनाचा उमदेपणाने स्वीकार करण्याच्या लकबीतून 'स्मृतिचित्रे'च्या जातीचा नर्म व खुसखुशीत विनोद ते निर्माण करतात."

असे नितांतसुंदर ललितनिबंध काकासाहेबांनी आणखी का लिहिले नाहीत? असा प्रश्न मनात येऊच नये. कारण प्रस्तावनेत काकासाहेबांनीच त्याचे उत्तर देऊन ठवले आहे. त्याचा मथितार्थ एवढाच आहे की त्यांना सृष्टिनिरीक्षणाची हौस व साहित्याची आवड शालेय जीवनापासून लागली असली तरी ते हाडाचे शिक्षक होते. ज्ञान मिळवणे, चिंतन करणे व त्यातून जे निष्पन्न होईल ते वाटणे हे त्यांची प्रवृत्ती. भरीला स्वातंत्र्याची उत्कट लालसा, त्या प्रबल वासनेवर संतसाहित्याने अध्यात्माची पुटे चढवलेली. अशा या जीवनशैलीत ललितलेखनाचा मेळ कसा बसणार? पण जीवनकला ही ईश्वर देणगी आहे. ती अनंतरूपे धारण करते. त्यामुळे एवढ्या अनंत व्यापातही अधूनमधून ललित लेखन होत गेले. विरंगुळ्यासाठी.

काकासाहेबांच्या ह्या विरंगुळ्याचे रसिक खचितच ऋणी आहेत. हे निबंध वाचताना नेहमीप्रमाणे त्यांच्या समृद्ध व्यक्तिमत्त्वाची सोबत लाभते. त्यांच्या मनातील आस्तिक्यभावाच्या मंद दरवळाने त्यांच्या लेखनात, प्रार्थनास्थळासारखे शुचिर्भूत प्रसन्न वातावरण जाणवते. तिथे अनुभवसमृद्धीचे प्रदर्शन नाही. तर अनुभव व परंपरा ह्यांच्या जिवंत नात्याची रांगोळी काढलेली आहे.

काकासाहेबांच्या लेखनातला निवेदक हाही मोठा लोभस. गोष्टीवेल्हाळ गडी आहे. नर्मविनोदाने व खुशखुशीत शैलीने वाचणाऱ्याचे मन प्रसन्न करीत, कलात्मक अंतर राखून ही संवदेनांची चित्रमंजुषा तो वाचकांपुढे उलगडत जातो. क्वचित काकांच्यातला शिक्षक मध्येच डोकावून रसभंग करू पाहतो, पण हा निवेदक त्याला चटकन सावरून मागे सारतो.

संख्येने अल्प पण गुणांनी समृद्ध असलेले काकासाहेबांचे हे ललित निबंध साहित्याची लेणी आहेत.

अनुक्रमणिका

काकासाहेबांच्या साहित्यविश्वाचा पुढचा महत्त्वाचा भाग म्हणजे 'अनुवादा'चा वा 'आधारित साहित्या'चा. काकासाहेब साहित्यप्रेमी, तरुणपणापासून त्यांचे वाचन अफाट, वृत्तीने उत्कट, त्यामुळे प्रभावी पुस्तकाने ते भारून जायचे. वयही भारून जाण्याला अनुकूल, त्यामुळे वाचलेल्यांपैकी उत्तम पुस्तकांचे रसग्रहण, अनुवाद, भावार्थ कथन हे त्यांच्याकडून बरेचदा होत गेले.

बेळगावच्या वास्तव्यात 'नागेशराव गुणाजी' या साहित्यप्रेमी मित्रासोबत विवेकानंद, रामतीर्थ व संतसाहित्य यांचा अभ्यास, आस्वाद व चर्चा सुरू झाली. स्वामी रामतीर्थांच्या स्वतंत्र व तेजस्वी विचारांनी तर ते दोघे इतके प्रभावित झाले की त्यांनी हिंदी व इंग्रजी चरित्रे, वृत्तपत्रातील काही लेख यांच्या आधारे रामतीर्थांचे समग्र चरित्र मराठीत लिहून काढले. तसेच त्यांच्या लेखांचा पण अनुवाद केला. "स्वामी विवेकानंदांप्रमाणे वेदान्तासारखा गहन विषय विशद करण्याची हातोटी व इमर्सनच्या भाषेचा खोचदार सुबकपणा यांचा मिलाफ रामतीर्थांच्या वाणीत होता," असे ते प्रस्तावनेत म्हणतात. त्यांच्या गीतांचा पण जमेल तसा अनुवाद लेखकद्वयींनी केला आहे. अर्थात् काकासाहेबांना लेखनाचा प्रथमपासून कंटाळा असल्यामुळे लेखनिकाचे काम गुणाजी करत असत.

विवेकानंदांचा प्रभाव तर काकासाहेबांवर जवळजवळ गांधींइतका होता. विवेकानंदांचे खरे मूल्यमापन अद्याप झालेलेच नाही, असे ते म्हणत. काकासाहेब म्हणतात, "त्यांच्या जीवनाचा विचार करताना काझे हृदय भक्तिभावाने गहिवरून येते. ईश्वरभक्ती, सदाचार यांच्या जोडीने तेजस्वी पुरुषार्थ, राजकीय अस्मिता, भौतिक ज्ञानोपासना आणि सामाजिक सुधारणा यांच्यावर भर देऊन त्यांनी सांस्कृतिक नवजीवन आणले," म्हणून त्यांच्या जीवनावर काकासाहेबांनी 'नवभारताचा उद्‌गाता' नावाचे पुस्तक लिहून तरुण पिढीला त्यांच्या विचारांचा परिचय करून दिला.

काकासाहेब बडोद्याच्या गंगनाथ विद्यालयात असताना तिथे त्यांनी निग्रो नेता बुकर टी. वॉशिंग्टनलिखित 'अप फ्रॉम स्लेव्हरी' व 'माय लार्जर एज्युकेशन' ह्या दोन पुस्तकांचा मित्रांच्या सहाय्याने मराठीत अनुवाद केला. 'माय लार्जर एज्युकेशन' ह्या पुस्तकावर तर प्रत्येक प्रकरणावर स्वतःचे चिंतन लिहून काढले. पुढे ती पुस्तके प्रकाशित केली. फ्रेंच लेखक पॉल रिशाच्या 'दि स्कर्ज ऑफ ख्राइस्ट' व डॉ. पेरी बर्जिस यांच्या 'हू वॉक्स अलोन'चा पण त्यांनी गुजरातीत अनुवाद केला. गांधीजींचे इंग्रजी लेखनही अनुवादित केले आहे.

त्यांचे आणखी एक महत्त्वाचे पुस्तक म्हणजे खलील जिब्रान या आर्मेनियन लेखकाच्या 'सॅन्ड ॲन्ड फोम' या इंग्रजी पुस्तकाचा केलेला मराठी अनुवाद होय! जिब्रान अमेरिकेत गेला असताना तेथील लोकांनी त्याला स्वाक्षरी व संदेश मागितले. ती चमकदार वाक्ये एकत्र करून 'बार्बारा यंग' नावाच्या लेखिकेने त्याचे पुस्तक केले. त्याचा अनुवाद काकासाहेबांनी आपल्या आजारपणात केला. नाव दिले, 'मृगजळातील मोती.' या सारगर्भ वचनांचा अनुवाद शब्दप्रभू काकासाहेबांनी सरस केला आहेच, पण त्या निमित्ते, 'रत्नांचे रुपांतर' या नावाने लिहिलेल्या प्रस्तावनेत त्यांनी भाषांतरकलेचे जे मर्म विशद करून सांगितले आहे ते विशेषच मननीय आहे. ते म्हणतात, "एखादा रुचकर विचार जर घोटीव व गोंडस शब्दांत मांडला गेला तर समाजात चलनी नाण्याप्रमाणे चालू लागतो. अशी बिलोरी काचेसारखी चमकदार वाक्ये लोकांच्या मनात ठसतात. पण अपरिचित अशा परकी भाषेतील अशा वाक्यांचे भाषांतर करणे फार कठीण असते. तशात मूळ लिखाण रत्नांच्या पैलूदार खड्याप्रमाणे रेखीव असेल तर त्याचे भाषांतर तितकेच पैलूदार झाले तर ते उपयोगी.

अनुक्रमणिका

कारण अशा सूक्तांची खुबी विचारांच्या गांभिर्यावर व प्रसादावर जितकी अवलंबून असते तितकीच, किंबहुना अधिक, भाषेचा सुभग आणि आल्हादक चमत्कृतीवर अवलंबून असते; असे खोल विचार ऐकून वाचक नुसतेच मंत्रमुग्ध न होता, त्यांच्यात खोलपणे विचार करण्याची वृत्ती जागृत झाली तरच कवीची खरी कदर केल्यासारखे होईल." जपानमध्ये गुरुदेव टागोरांनी दिलेल्या अशा संदेशांचा संग्रह चिमुकल्या हातपंख्यावर केला गेला आहे.

काकासाहेबांनी विविध वाङ्मयप्रकार नुसते हाताळलेच नाहीत तर त्या त्या प्रकारांचे मर्म, सामर्थ्य, खुब्या ह्यांचा पण मौलिक विचार केला आहे हे अशा प्रस्तावना वाचताना लक्षात येते. ह्या संग्रहातील वक्तव्ये अनुभूतीच्या खोलीतून वर आलेली, उदात्त आहेत तर काही रूढ वचनांना धक्का देऊन विचारांना नवीन दिशा दाखविणारी आहेत. पण मुख्य म्हणजे वाळूवरील, वाऱ्याने उडून जाणाऱ्या फेसाप्रमाणे ती आनंद व बोधही देतात आणि म्हणूनच काकासाहेबांना त्यांचा अनुवाद करण्याचा मोह झाला. वानगीदाखल त्यातली एक-दोन सूक्ते पाहा.

"मी जे बोलतो त्यापैकी अर्धे अर्थविहीन असते, पण ते बोलावेच लागते; कारण त्यांच्या मदतीनेच बाकीचे अर्धे तुम्हाला समजणार असते."

'केवढी नवलाईची गोष्ट की विशिष्ट प्रकारच्या सुखाची वांच्छा हीच माझ्या वेदनेचा एक अंश आहे."

इंग्रजीबरोबर संस्कृतचा व्यासंगही भरपूर असल्याने काकासाहेबांनी त्याही आधाराने काही लेखन केले आहे. तुरुंगात असताना त्यांनी भर्तृहरीच्या शृंगार, नीति व वैराग्यशतकातील १०८ श्लोक निवडून त्यांचे विद्यार्थ्यांसाठी सद्बोधशतकम् नावाचे एक पुस्तक तयार केले. दुसरे पुस्तक म्हणजे गीतेचा १६ व्या अध्यायावर आधारित 'गीतेचे समाजरचना शास्त्र' नावाचे पुस्तक त्यांनी सिंध-हैद्राबादमधील तुरुंगामध्ये असताना लिहून काढले, गीतेकडे आत्तापर्यंत सामान्यतः अध्यात्मिक दृष्टीनेच पाहिले गेले आहे, पण काकासाहेब जसे रसिक साहित्यिक होते तसेच तत्त्वज्ञ, समाजशास्त्रज्ञही होते. त्यामुळे गीतेतील दैवी संपत्तीच्या वर्णनात त्यांना नवसमाजनिर्मितीला उपयुक्त असे मौलिक समाजशास्त्र आढळले. ते म्हणतात, "गीतेत जी दैवी संपत्ती सांगितली आहे, त्या गुणांवर लोकचरण व लोकनीती जर आधारली तर समाजातील अनिष्ट प्रवृत्ती व दुरिते दूर होऊन साम्ययोग, सहयोग, सहानुभूती व आत्मौपम्य ह्यांवर आधारलेला शांतिप्रिय. पुरुषार्थी, पराक्रमी व अध्यात्मप्रवण नवा समाज तयार होईल. अशा समाजात स्वातंत्र्य, समता, बंधुभाव, नैतिक सदाचार, उच्च आध्यात्मिक मूल्ये साकार होऊ शकतील. गीतेत दर्शविलेली ही दैवी संपत्ती हाच आर्यांच्या समाजशास्त्रांचा किंवा लोकशास्त्रांचा पाया आहे. आजच्या समाजशास्त्राने मनुष्यप्राण्याचाच फक्त विचार केलेला आहे. मनुष्येतर प्राण्यांविषयी मानवाच्या नैतिक जबाबदारीला स्पर्श केलेला नाही. परंतु आर्यांचे लोकशास्त्र ह्याहून व्यापक आहे. सर्व विश्व चैतन्यमय आहे. म्हणून सर्वांविषयी आपली जबाबदारी आहे. जीवनाचा जितक्या प्रमाणात विकास झालेला असेल तितक्या प्रमाणात या जबाबदारीचे भान येते."

या व्यतिरिक्त गीतेतील शंभर गूढ शब्दांचा अर्थ आणि स्थलनिर्देश यांचा कोश करण्याचे काम गांधीजींनी सुरू केले होते. त्याचे संपादन, त्याची सुधारित आवृत्ती व 'गीता रत्नप्रभा' हे त्याचे हिंदी रुपांतर ही कामे काकासाहेबांनी केली. अशा प्रकारे आंग्ल साहित्य व पाश्चात्त्य तत्त्वज्ञान यांच्या जोडीने संस्कृत

अनुक्रमणिका

साहित्य आणि भारतीय तत्त्वज्ञान यांचे जे आगळेच आकलन त्यांच्या सौंदर्यप्रेमी रसिक वृत्तीने घडवले आहे ते रमणीय व आस्वाद्य ठरले आहे.

मराठीतील संतसाहित्य म्हणजे त्यांची अगदी मर्मबंधातली ठेव होती. त्यातही खास म्हणजे तुकाराम. त्यांचे ३६ अभंग निवडून त्यांच्यावर रसाळ निरूपण करणारे एक छोटेखानी पुस्तक त्यांनी लिहिले आहे. खरे तर त्यांचा संकल्प ५०० अभंगांचा होता, पण कार्यबाहुल्यामुळे त्यांना तो बाजूला सारावा लागला. प्रस्तावनेत तुकारामाच्या काव्यशक्तीचे मर्म सांगून ते पुढे म्हणतात, “समाजात वावरताना कधी क्षोभ होतो, त्यातून अशिष्ट भाषा लिहिली जाते. काही कच्चे विचार, काही एकांगी विचार तत्कालीन समाजपरिस्थितीला अनुलक्षून मांडले जातात. आज ते कालबाह्य व चुकीचे वाटू शकतात. म्हणून जेवढा भाग त्रिकालांबाधित, सर्व कल्याणकारी तेवढाच निवडून प्रचार करावा. वेदातीलसुद्धा काही भाग आज कालबाह्य व अमान्य ठरलेलाच आहे. अमुक एका मर्यादेपर्यंत सर्वच धर्मांत मतभेदाला अवकाश असतो.”

काकासाहेबांची नजर अशी नितळ, पारदर्शी व गाभ्याला पोहोचणारी होती. निरूपणाच्या ओघात अनेक पुराण –कथा, लोककथा, वैदिक संदर्भ, संतकालीन तपशील, वर्तमान आंदोलनाचे संदर्भ, संस्कृत वचने, श्लोक इत्यादींचा वापर केलेला आहे. तो काकासाहेबांच्या बहुश्रुततेचा, व्यासंगाचाच परिपाक आहे. रामदासांच्या श्लोकांवरही त्यांनी ‘मनोबोध’ नावाने पुस्तक लिहिले आहे.

त्यांच्या आधारित साहित्याचा सर्वात महत्त्वाचा भाग म्हणजे त्यांनी केलेला रवींद्र साहित्याचा अनुवाद व रसग्रहण, हा होय. रवींद्रनाथांच्या ज्या विश्वविजयी ‘गीतांजली’ ने त्यांना आयुष्याच्या पूर्वार्धात भारून टाकले होते त्यातील निवडक गीतांचा भावानुवाद, रसग्रहण व विवेचन करणारी तीन पुस्तके ‘रवींद्र मनन’, ‘रवींद्र वीणा’ व ‘रवींद्र झंकार’ या नावांनी त्यांनी शेवटच्या तुरुंगवासात लिहून काढली. रवींद्रांच्या ‘नैवेद्य’ ह्या भक्तिगीतांतील अनेक गीतांचे असेच विवेचन व अनुवाद त्यांनी ‘नैवेद्य’ या पुस्तकात केला आहे. ह्या पुस्तकांच्या प्रस्तावनांतून त्यांनी रवींद्र काव्यातील वैशिष्ट्ये, मौलिकता व प्रतिमाविलास यांची सुरेख विवेचन केले आहे. ‘रवींद्र मनन’च्या ‘पाठवणी’त ते म्हणतात, “रवींद्रनाथ भारतीय संस्कृतीच्या उज्ज्वल परंपरेचा प्रतिनिधी तर आहेतच, पण ते जागतिक संस्कृतीचे वाहक आहेत. पूर्वकालीन विचारांतील संकुचितता, प्रादेशिकता, पौराणिक संदर्भांची बंधने टाळून, भारतीय अनुभूतीला विश्वभोग्य करण्याची हातोटी त्यांच्याजवळ होती. त्यामुळेच त्यांची कविता अखिल मानवजातीच्या हृदयाला स्पर्श करू शकली.”

रवीबाबूंच्या कलाकृतीचा आस्वाद घेताना जे जीवनरहस्य त्यांना उलगडले ते मराठी माणसाला उलगडून दाखवावे ह्या हेतूने त्या पुस्तकांची निर्मिती झाली. आपल्या जीवनसृष्टीला व अभिरुचीला भिडणाऱ्या कवितांची निवड करताना त्यांना तुरुंगातील त्यांचे एक मित्र ‘श्री शिवबालक बिसेन’ ह्यांची मदत झाली. रवींद्रांच्या ‘लिपिकी’ ह्या गद्यकाव्याच्या संग्रहाचा काकांनी तुरुंगात असताना, शिवबालक बिसेन ह्यांच्या मदतीने भावानुवाद केला आहे. त्यातील प्रत्येक कथा-कवितेवर स्वतंत्र निरूपण केले आहे. काकासाहेब स्वतः कविहृदयाचे असल्याने ह्या प्रिय व गुरुतुल्य कवीच्या काव्याचे मर्म त्यांनी संवेदनशीलतेने उकलून दाखविले आहे. प्रस्तावनेत ते म्हणतात, “रवींद्रांचा गूढवाद किवा शुन्यवाद आम्हाला मुळीच समजत नाही, असे एक-दोन नामांकित लेखकांनी जाहीरपणे म्हटलेले आहे. पण ज्या महाराष्ट्राला संतांच्या अध्यात्मिक अज्ञेयवादी (Mystic) परंपरेचा वारसा मिळाला आहे,ज्यांना बुद्धिग्राह्य अतींद्रिय सत्याच्या साक्षात्काराची खणखणीत वाणी ऐकायला मिळाली आहे त्यांना ही रवींद्रांची आत्मानुभूती गूढवादी,

अनाकलनीय वाटू नये.” ह्या संग्रहाच्या प्रस्तावनेत रवींद्रनाथांनी म्हटले आहे, ‘बाबांनो, घेणेकऱ्याप्रमाणे माझ्या मागे अर्थांचा तगादा लावू नका. आपापल्या अनुभूती व अभिरुचीप्रमाणे त्यातून हवा तो अर्थ व आनंद वाचकाने घ्यावा,’ त्याची आठवण देऊन काकासाहेब मिस्किलपणे आपल्या प्रस्तावनेत म्हणतात, “एवढे मोठे ‘आर्थिक’ स्वातंत्र्य मिळाल्यावर संकोच का करावा? म्हणून मी भावानुवादाचे आनंदमय काम हाती घेतले.”

ह्या अनुवादातून रवींद्रांच्या काव्याचे हृद्‌गत, त्यातल्या सर्व अर्थच्छटा यांचे स्फटिकाप्रमाणे स्वच्छ दर्शन घडते. पुढे ते लिहितात “कारागृहात स्वान्तसुखाय लिहिलेले हे विवेचन भीत भीत रसिकांपुढे पाठवतोय. कारण महाराष्ट्र-रसिक चोखंदळ असतात. साहित्यकृती कसून तपासण्याची त्यांची परंपरा आहे. त्यांचा कसोटीला माझे मनन उतरेल का? अशी भीती, छे! खात्रीच आहे!”

दुर्दैवाने काकासाहेबांच्या या सर्व रवींद्र साहित्याचे महाराष्ट्राने म्हणावे तसे स्वागत केलेले दिसत नाही याची साक्ष कालेलकरांनी अनुवादित केलेल्या ह्या पुस्तकांचे प्रकाशक श्री रामदास भटकळ यांच्या निवदेनात सापडते. ते म्हणतात, ‘ह्या पुस्तकांची एक आवृत्ती खपायला वीस-पंचवीस वर्षे लागली. ‘जीवनलीला’ व ‘खेळकर पाने’ या पुस्तकांना पण थंड प्रतिसाद लाभला. त्यावरून पुस्तकाचे मोल आणि त्याला मिळणारा प्रतिसाद यात किती तफावत असते हे प्रत्यक्ष शिकलो.”

ज्याला पूर्णपणे अनुवाद म्हणता येईल असे आणखी एक पुस्तक म्हणजे रवींद्रांच्या ‘मालंच’ (पुष्पवाटिका) ह्या रमणीय कादंबरीचा अनुवाद होय. हा अनुवाद त्यांनी विश्वभारतीला अर्पण केला आहे. ह्या कादंबरिकेत मनुष्यस्वभावाची गहराई, सुष्टदुष्ट प्रकृतिविकृतीचे अटळ मिश्रण, त्यातून निर्माण होणाऱ्या गुंतागुंती, ओढाताण यांचे सुंदर दर्शन घडविले आहे. शेवटी तिचे रसग्रहण पण काकासाहेबांनी केले आहे.
काकासाहेबांनी हाताळलेला शेवटचा ललित वाङ्मयप्रकार म्हणजे त्यांचे ‘आत्मपर लेखन.’ ह्यात, त्यांनी लिहिलेले आत्मनिवेदन ‘स्मरणयात्रा’, त्यांच्या डायऱ्या, पत्रे इत्यादींचा समावेश होतो. पैकी सर्वात महत्त्वाचे पुस्तक म्हणजे त्यांची ‘स्मरणयात्रा.’ वस्तुतः याचे लेखन दोन भागांत झाले. पहिल्या भागात वयाच्या १८ व्या वर्षापर्यंतचा आपला प्रवास काकासाहेबांनी नोंदविला आहे. दुसऱ्या भागात उत्तरायुष्याची संस्मरणे आहेत.

पहिल्या भागात आपल्या बालपणीच्या ठळक आठवणी काकासाहेबांनी अतिशय रसाळपणे व मिस्किलपणे टिपल्या आहेत. मात्र या बालपणीच्या प्रसंगांच्या निखळ आठवणी नाहीत तर बालमनाला भोवतालच्या जगाचे ज्ञान हळूहळू कसे होत जाते याचे अतिशय सूक्ष्म, मजेशीर दर्शन त्यातून घडते. बालपणीची निर्व्याज विचारपद्धती, स्वतंत्र तर्कपद्धती काकासाहेबांनी नेमकेपणाने रंगवून बालमनाचे एक जग आपल्यापुढे उभे केले आहे. ती गुजरातीतील एक लक्षणीय कृती मानली जाते. त्यात असाधारण प्रसंग नसूनही भूतकालाच्या हळुवार निरूपणाने वाचक तिच्याशी तद्रूप होतात. नर्म विनोदाचा स्पर्श असलेली ती एक हृदयस्पर्शी कलाकृती आहे. ह्या पुस्तकाविषयी हिंदीतील एका लेखिकेने लिहिले आहे, म्हणतात, “स्मरण यात्रा”. ‘शामची आई’ ही दोन पुस्तके वाचताना माणूस त्यात हरवून जातो. जुन्या हिंदू कौटुंबिक जीवनातील मंगलमय व सहज वातावरण डोळ्यापुढे तरळत राहते. त्यात जावेसे वाटते. मागे जाता येत नाही तर निदान ते पुस्तकरूपाने असेच जतन केले पाहिजे. वरील पुस्तके आपल्या मातीचा मोहक, मंद, सुवास व त्याचे गमक विसरू देत नाहीत.”

अनुक्रमणिका

अशा आत्मपर लिखाणाचे महत्त्व सांगताना काकासाहेब म्हणतात, “विद्यार्थ्यांचा संकोच दूर करून त्यांना बोलते करायचे असेल, आत्मपरीक्षण करायला लावायचे असेल तर एक महत्त्वाचे साधन म्हणजे मोठ्यांनी आपल्या बालपणाच्या आठवणी, आपल्या चुका, आपल्या खोड्या, या सर्वांचे प्रांजळ चित्रण त्यांच्यासमोर ठेवावे. ते वाचून त्यांना विश्वास वाटतो की चुका, अज्ञान तर मोठ्यांजवळपण होते. त्यातून ते मोठे झाले. तेव्हा आपणही मोठे बनू शकू.” आणखीही एक प्रयोजन काकासाहेब पुस्तकाच्या प्रस्तावनेत सांगतात, म्हणतात, ‘हे पुस्तक वाचून लोक मला ओळखण्यापेक्षा स्वतःला अधिक ओळखायला शिकतील व अभिव्यक्ती करायला शिकतील.”

काकासाहेबांची ‘स्मरणयात्रा’ हे उद्दिष्ट नक्कीच पूर्ण करू शकेल, काकासाहेबांचे एक स्नेही, अहमदाबादच्या झेवियर्स महाविद्यालयातील विद्वान गणितज्ञ, फादर वॉलेस यांचा काकासाहेबांच्या तीन-चार पुस्तकांविषयीचा अभिप्राय अतिशय बोलका असल्याने नोंदविण्याचा मोह होत आहे.’गुजरात’ही फादर वॉलेस यांनी आपली कर्मभूमी ठरविल्यावर त्यांना गुजराती भाषा शिकणे अपरिहार्य होते.ते म्हणतात, ‘गुजराती शिकण्याच्या प्रयासात ‘स्मरणयात्रा’ हातात आली. वाचू लागलो तर लक्षात आले की, माझे लक्ष शब्द, वाक्यरचना, म्हणी वगैरेऐवजी, त्यात रेखाटलेल्या व्यक्तिचित्रांनी आकर्षित झाले होते. एका प्रतीकात्मक संस्कारी हिंदू कुटुंबाचे मला त्यात दर्शन झाले. खरे सांगायचे तर भारताच्या आत्म्याचे प्रथम दर्शन मला तिथेच घडले. भारताचा इतिहास, संस्कृती, धर्म, रीतिरिवाज, सण, यांविषयी खूप वाचले होते; पण वक्त्याचे भाषण व त्याच्याशी केलेल्या जिव्हाळ्याच्या गप्पागोष्टी यात किती अंतर असते! स्मरणयात्रा वाचताना मला गप्पांचा आनंद मिळाला आणि त्या गप्पा सुद्धा किती सरळ, मोहक व हृदयस्पर्शी होत्या! हे वाचून हिंदू धर्माविषयी खरा आदर वाटला तसेच भारत देशाविषयी खऱ्या ममतेने मी माझ्या कार्यात तन्मय झालो. भारतरूपी मंदिराच्या गर्भगृहाचे द्वार उघडून देण्याचे श्रेय या छोट्या पुस्तिकेलाच आहे. भारताचा परिचय, भूगोल, पाठ्यपुस्तके, मानचित्रे व थोडाफार प्रवास यातूनच झाला होता, पण नद्यांचा स्नेह, हिमालयाची साधना, भटकंतीचा आनंद हे सारे काकासाहेबांच्या प्रवासवर्णनानेच दिले. उत्सव व सणांची वर्णने वाचली होती. काही सण पाहिलेही होते; परंतु सण जिवंत झाले, ‘जिवंत व्रतोत्सवा’तूनच!’

काकासाहेबांचे दुसरे आत्मपर पुस्तक म्हणजे त्यांची डायरी. त्यांच्या शब्दात ‘वासरी’ हे पण त्यांनी दोनदा लिहिलेली आहे.पहिली डायरी गुजरातीत आहे आणि १९७१ साली लिहिलेली दुसरी डायरी मराठीत आहे. तिचे नाव आहे ‘आंतरजगातील यात्रा.’ तिच्या प्रस्तावनेत ते म्हणतात, “स्वतःचेच विचार बऱ्याच काळानंतर तटस्थपणे वाचण्यात एक प्रकारचा आनंद असतो. त्यामुळे जीवन चिंतनदेखील शुद्ध आणि समृद्ध होऊ शकते. चुका टाळता येतात.” त्यांच्या चिंतनाचे, निरीक्षणाचे उत्तम नमुने त्यांच्या या वासरीतही सापडतात. त्यात त्यांचे आंतरिक जीवन प्रतिबिंबित झाले आहे. तिथे केवळ दिवसभरात काय केले याचा तपशील नसून दिवसभर व्याख्यान, लेखन, चर्चा, गप्पा यांतून जे चिंतन झाले असेल त्याचे सार लिहिले आहे.

काकासाहेबांचा तिसरा आत्मपर लेखनाचा आविष्कार म्हणजे, त्यांचे पत्र-संग्रह. आतापर्यंत त्यांचे तीन पत्रसंग्रह प्रसिद्ध झाले आहेत. त्या त्या संग्रहांना प्रस्तावना लिहिताना, काकासाहेबांनी पत्र-साहित्याविषयीची आपली भूमिका स्पष्टपणे मांडली आहे. ‘सप्रेम वंदेमातरम्’ या पात्रांच्या संग्रहाच्या प्रस्तावनेत ‘खुलासा’त-ते म्हणतात, “पत्रे छापण्यापूर्वी संपादन व्हायला हवे. विखुरलेल्या पत्रांचा कालक्रम

अनुक्रमणिका

सांभाळायला हवा. दुर्बोध ठिकाणी तळटीप दिली पाहिजे. प्रसंग असतील तर ते विस्ताराने समजावले पाहिजेत. उल्लेखिलेल्या व्यक्तींची उपयोगी असल्यास माहिती दिली पाहिजे. संपादन म्हणजे हे हवेच."

साहित्यप्रकार म्हणून कित्येक लोक पत्रांच्या रूपाने निबंध, वर्णने, गोष्टी लिहितात. ही पत्रे खरीखुरी नसून तो एक धारण केलला वेष असतो. हा साहित्यप्रकार सौंदर्याच्या दृष्टीने टाकाऊ नाही. साहित्य म्हणून त्याची कदर झालीच पाहिजे. पण खरीखुरी पत्रे हा विश्रब्ध वार्तालापाचा प्रकार आहे. अशा पत्रांमध्ये साहित्याची रससिद्धी नसते. जीवनगत संबंधांची केवळ पारमार्थिकताच असते.लेखक साहित्यिक असेल तर अशा पत्रांतही लेखनगुण चमकून जातात. बऱ्याच काळाने वाचणाऱ्याला त्यात सामाजिक परिस्थितीचे प्रतिबिंबही दिसेल, पण खऱ्या पत्राचे स्वाभाविक आकर्षण ऐतिहासिक व साहित्यिक नसून जीवनविषयकच असते.

काकासाहेबांची पत्रे ही दुसऱ्या प्रकारची असून त्यातून त्यांचे मन, त्यांची ध्येयनिष्ठा, पत्र लिहिलेल्या व्यक्तीशी असलेले त्यांचे कमी-अधिक गहिरे नाते इत्यादींचे दर्शन घडते. या पत्रसंग्रहाच्या संपादनावर त्यांनी हात फिरविलेला असला तरी या स्वतःच्या संपादनाविषयी ते फारसे समाधानी राहिलेले नाहीत.उत्तरायुष्यात, पुंडलिकजी कातगडे ह्या गांधी-अनुयायी पत्रलेखकाच्या 'अनुग्रह' या पत्रसंग्रहावर अभिप्राय देताना 'पत्रसंग्रह' ह्या साहित्यप्रकाराविषयी, मार्मिक निवेदन काकासाहेबांनी केलेले आहे ते त्यांच्याच शब्दांत वाचावे; "मी आतापर्यंत माझ्या पात्रांचे तीन संग्रह प्रकाशित होऊ दिले. माझ्या कल्पनेप्रमाणे माझे संपादन याथायोग्य होते, पण त्यानंतर इंग्रजी, मराठी, हिंदी, आणि गुजराती असे विविध पत्रसाहित्य अवलोकिले. आणि आता वाटते की संपादनाची माझी दृष्टी बरीच कच्ची होती. वाचकसमाजावर ओझे होणार नाही, साहित्यक्षेत्रात निष्कारण गर्दी होणार नाही आणि पात्रांशी संबंध असलेल्या व्यक्तींचा परिचय यथार्थ होईल, हे तीन हेतू साधण्याला उच्च अभिरुची आणि अनुभवी दृष्टीच असावी लागते."

काकासाहेबांचे हे प्रांजल व मार्मिक निवेदन ह्या साहित्यप्रकाराच्या स्वरूपावर पुरेसा प्रकाश टाकणारे आहे. पत्रसाहित्याकडे पाहण्याची वाचकांची वृत्ती ही कशी सुसंस्कृत असावी ह्याचे पण मौलिक भान काकासाहेबांनी आपल्या 'वात्सल्याची प्रसाददीक्षा' या पुस्तकाच्या प्रस्तावनेत जागे केलेले आहे.

अशा तऱ्हेने सकस, विपुल व विविध प्रकारचे ललित अनुवादित साहित्य काकासाहेबांनी लिहिले असून त्यांद्वारे गांधीवाद्यांच्या 'रुक्षगंभीर' अशा सर्वसामान्य प्रतिमेला छेद देणारी स्वतःची 'रसिक व सौंदर्यवादी' अशी अपवादात्मक श्रीमंत प्रतिमा उभी केलेले आहे.

अनुक्रमणिका

९.

# वैचारिक साहित्य

काकासाहेबांची ललित साहित्यनिर्मिती आनंद हे एकमात्र प्रयोजन असलेली, संख्येने मर्यादित आणि साहित्यगुणांनी समृद्ध अशी आहे. थोडसे ह्या उलट चित्र काकासाहेबांच्या 'वैचारिक निबंधां'चे दिसते. संख्या विपुल, प्रयोजन प्रबोधनाने भारलेले आणि वैचारिकतेचा प्रचंड पैस लाभलेले असे हे निबंध आहेत. ह्या दोन प्रकारांतील वैशिष्ट्यभेद सांगताना एक गुजराती समीक्षक लिहितात, 'निसर्गावरील ललितनिबंध हे काकासाहेबांच्या सर्जक संभाराचे 'आरण्यकपर्व' आहे व वैचारिक निबंध हे 'उद्योगपर्व' आहे.' स्वतः काकासाहेब म्हणतात "निव्वळ चवीसाठी म्हणून आयुष्यात जसा कधी आहार केला नाही,देहपोषणासाठीच केला,तशीच केवळ करमणुकीसाठी माझी लेखणी कधी शिणवली नाही. समाजाला नवे ज्ञान, नवे विचार द्यावेत हीच माझी प्रेरणा होती."

ह्याच प्रेरणेतून त्यांनी उदंड वैचारिक लेखन केले. मानवी जीवन उन्नत, सुंदर,सृजनशील व पुरुषार्थी कसे होईल ह्याचा मागोवा घेण्यात त्यांनी आपले सर्व जीवन व्यतीत केले. ह्या अर्थाने ते जीवनकेंद्री विचारवंत होते.

काकासाहेब शिक्षक होते. शिक्षणतज्ज्ञ होते, पत्रकार होते, सृजनशील लेखक होते, गांधीविचारांचे भाष्यकार होते, स्वदेशीचे उद्‌गाते होते, सक्रिय स्वातंत्र्यसैनिक होते,उत्तम कलाविवेचक होते.विनोबाजी म्हणतात त्याप्रमाणे 'ते काय होते ह्याच्यापेक्षा ते काय नव्हते हाच प्रश्न आहे.शिवाय ते जे होते ते उत्तम होते. पण या साऱ्या पैलूंपेक्षा त्यांचा 'चिंतक काकासाहेब' हा पैलू सर्वात आकर्षक होता. जीवनातील एकही अंग असे नसेल की काकासाहेबांनी त्याविषयी सखोल चिंतन केले नसेल आणि नव्या परिप्रेक्ष्यातून त्याला मौलिकता प्रदान केली नसेल. सूक्ष्मातिसुक्ष्म व खोलातील खोल जीवनरहस्याचे सहजपणे आकलन करण्याची व साध्या सरळ शब्दांत त्याचे निरूपण करण्याची त्यांची क्षमता अद्भुत होती.'

त्यांच्या बऱ्याच पुस्तकांच्या शीर्षकाचा प्रारंभ 'जीवन' ह्या नावानेच होतो. उदा. 'जीवन-विकास', 'जीवन-भारती', 'जीवनसंस्कृती', 'जीवनव्यवस्था', 'जीवनयोग', 'जीवन-विहार', 'जीवनचिंतन' इत्यादी. ह्या दृष्टीने ते 'जीवनऋषीच' होते. त्यांच्या ह्या प्रचंड साहित्यसंपदेत पत्रकार काकासाहेबांचे योगदान फार मोठे आहे. 'नवजीवन' पासून सुरुवात करून अनेकानेक वृत्तपत्रातून अनेक विषयांवर त्यांनी चिंतनात्मक व प्रबोधनात्मक लेखन केले आहे. ह्या पद्धतीच्या लेखनामुळे त्यात 'स्फुट' ता येणे अपरिहार्य होते. तशात त्यांच्या वृत्तीची पण एक मर्यादा होती असे श्रीपाद जोशी सांगतात. ते म्हणतात, 'काकासाहेब गांधी परिवारातले असले तरी त्यांचा मूळ पिंड साहित्य-संगीत-कला ह्यात रमणारा. ह्यामुळे शिक्षणासारखा वैज्ञानिक विषयातही त्यांचे विचार शास्त्रापेक्षा काव्यात्मकतेकडे अधिक झुकतात.एखादा विषय घेऊन शास्त्रशुद्ध पद्धतीने त्याचे सर्वांगपरिपूर्ण विवेचन करण्याची सवय त्यांच्या प्रतिभासंपन्न मनाला नाही. त्यामुळे त्यांचे बहुतेक लेखन स्फुट स्वरूपाचे राहिले.'

काही प्रमाणात हे म्हणणे खरे असले तरी काकासाहेबांच्या लेखनात विचारांची मौलिकता असल्यामुळे हे स्फुट लेखनही मोलाचे ठरले आहे. त्यांचे विषयवार संकलन करून ग्रंथ प्रसिद्ध करण्यात आले आहेत. 'जीवन विकास' हा शिक्षणविषयक, 'जीवन भारती' हा साहित्यविषयक, 'जीवन संस्कृती' हा

अनुक्रमणिका

सामाजिक समस्या व सामाजिक बांधणीविषयक, 'जीवनयोग' हा धर्म व तत्त्वज्ञानात्मक प्रश्नांचा सर्वांगीण ऊहापोह करणारा, असे हे ग्रंथ आहेत. ह्यांपैकी सामाजिक प्रश्नांचे विश्लेषण करणाऱ्या लेखांची अनेक संकलने मराठीत अनुवादित झालेली आहेत. वयाच्या ८४ व्या वर्षी लिहिलेल्या 'जीवनयोग' ह्या पुस्तकात सततच्या चिंतनाने ते कुठवर जाऊन पोहोचले होते याचा प्रत्यय मिळतो आणि त्यांची प्रखर जीवननिष्ठा पण झळकून जाते.

ते म्हणतात "आत्म्याचा शोध हा जीवनातील सर्वश्रेष्ठ शोध आहे. पण ते काही संपूर्ण जीवन होऊ शकत नाही.अत्तरात फुलाचे सारसर्वस्व आहे. पण अत्तर म्हणजे फूल नव्हे. सुभग आकृती, ताजेपणा, कोमलता, रंग, सुगंध ह्या सर्वांबरोबर क्षणजीवित्व मिळून फूल बनते. ह्या फुलाचा आनंद अत्तर देऊ शकत नाही. तद्वत नुसत्या आत्म्याचा शोध जीवनसर्वस्व होऊ शकत नाही. 'सार' महत्त्वाचे खरे, पण त्यात जीवनाची कितीतरी सूक्ष्म व चैतन्यमय तत्त्वे नष्ट होऊन जातात; म्हणूनच जीवनाचा आस्वाद घेत त्यातूनच सारापर्यंत पोहोचले पाहिजे.

अध्यात्मिक उदात्तता व जीवनिष्ठा, कल्पनारमणीयता व बुद्धिगम्यता ह्यांचे मधुर रसायन असलेली ही काकासाहेबांची जीवनदृष्टी वाचकांच्या मनावर स्वतंत्र ठसा उमटवते. संस्कृतीने माणूस पशुपातळीहून वर जातो. ही संस्कृती म्हणजे काय? ती कशी घडते? काय सांगते, कालानुरूप ती कशी विकसित व्हावी, भूतकालीन वारसा पुरुषार्थी वर्तमानकाळात कसा रुजवता येईल, की जेणेकरून भविष्यात समृद्ध पीक हाती येईल. ह्यासंबंधीचे चिंतन करणाऱ्या 'जीवनव्यवस्था' ह्या ग्रंथाला १९६६ मध्ये सर्वोत्तम पुस्तकाचा पुरस्कार साहित्य अकादमीकडून मिळाला. काकासाहेबांचे ही गुजराती वाङ्मयाची सेवा पाहून समीक्षक 'सुंदर' म्हणतात, 'गुजराती साहित्यातील ते एक महदाश्चर्य ठरले आहेत. गुजरातने त्यांना आपले मानले. त्याची त्यांनी अशी फेड करून गुजरात व गुजराती वाङ्मयाला उपकृत करून ठेवले आहे.'

ह्यानंतरचे त्यांचे महत्त्वाचे पुस्तक म्हणजे 'धर्मोदय'. भारतवर्षातील आध्यात्मिक साधना ज्या वेद, उपनिषदे, गीता, ब्रह्मसूत्र, संतसाहित्य ह्यांतून विकसित झालेली आहे त्याच परंपरेत काकासाहेबांचे व्यक्तित्व फुलले आहे. ते म्हणतात "प्राचीन साहित्याच्या अभ्यासातून, प्रत्येक पिढीत विकसित होत गेलेल्या संस्कृतीचा अभ्यास करताना, मला नवी धर्मदृष्टी आली. वर्तमानातील आपल्या ध्येयाची दिशा सापडली. इतकेच नव्हे तर भविष्याची अंधुक कल्पना आली. परंपरा म्हणजे केवळ भूतकालीन आदर्शांना चिकटून राहणे नव्हे. परंपरा पाळणे म्हणजे जुन्या इमारतीवर नवे मजले उभे करणे आणि त्या उंचीवरून दूरवर पाहण्याची शक्यता कमावणे, हेच होय. परंपरेचा अर्थ, संशोधन व परिवर्तनाचा स्वीकार करणारा अखंड स्रोतच होय." अशी भूमिका असल्याने जुन्या संस्कृतीतील चांगल्या गोष्टी वर्तमान जीवनाच्या संदर्भात ते अशा वेगळ्या तऱ्हेने समजावून देतात की जुने मोडून काही नवे सांगताहेत हे लक्षातही येत नाही. "जुन्या कलेवरात नवीन प्राणतत्त्व ओतले पाहिजे.म्हणजे नवे चैतन्य वाढू लागते व जुने कलेवर नव्याच्या मागणीनुसार अपोआप बदलत जाते." ह्यालाच काकासाहेब 'जीवन विकास' असं म्हणतात.

काकासाहेबांच्या जीवनासंबंधीच्या सर्वच चिंतनाला एक केंद्रीय आधारकल्पना आहे व ती म्हणजे 'धर्म'; पण काकासाहेब 'धर्म' हा शब्द व्यापक अर्थाने वापरतात. जगातील सर्व संस्कृती धर्मप्रधानच आहेत. संस्कृतीला प्रेरणा देणाऱ्या नवनवीन जीवनदृष्टी ह्यांनासुद्धा एक प्रकारे धर्मच आहेत. विज्ञानाने दिलेली नवी जीवनदृष्टी, साम्यवादी जीवनदृष्टी, ह्यांनासुद्धा ते एक जडवादी धर्मच मानतात. ईश्वरविषयक वा

अनुक्रमणिका

चमत्कारस्वरूप अनुभव ह्यांना लोक धर्मानुभव मानतात. पण काकासाहेबांच्या मते ज्या अनुभवांनी हृदयाचा, आत्म्याचा विकास होतो, व्यक्तित्व उंचावते, ऐंद्रियसुखाची लालसा सोडून माणूस उदात्त होत जातो, ते धार्मिक अनुभव होत. त्यांच्या 'धर्मोदय' पुस्तकात त्यांची ही धर्मविषयक नवी संकल्पना व धर्मानुभवाची संस्मरणे आली आहे. फार पूर्वी म्हणजे १९३४ साली हिंडलग्याच्या तुरुंगात असताना, त्यांनी सामाजिक प्रश्नांविषयी व धर्माविषयी जे चिंतन केले त्यावर आधारित एक पुस्तक 'हिंडलग्याच्या प्रवास' लिहिले आहे. त्यात खेडेगावाचे उपेक्षित प्रश्न, आश्रमशिक्षण पद्धती, परलोकविषयक व्यवहार्य स्पष्टीकरणे, गीताचर्चा इ. विषय आले आहेत. ह्यातील कोणतेही विवेचन वरील ग्रंथांइतके परिपूर्ण नाही. तरी पुरेसे दिशासूचक आहे.

महाराष्ट्राला काकांची माहिती वर्तमानपत्रांवरूनच थोडीफार आहे. त्यांच्या विचारांची, विचार करण्याच्या पद्धीतीची, सखोल दृष्टीची आणि तत्त्वनिष्ठेची ओळख महाराष्ट्रातील गांधीवादी कार्यकर्त्यांनासुद्धा नाही. म्हणून ती करून देण्यासाठी ह्या पुस्तकाला त्यांचे गुरुस्वरूप व टिळकांचे अनुयायी 'गंगाधरराव देशपांडे' ह्यांनी प्रस्तावना लिहिली आहे. ते म्हणतात, 'आपल्या सर्व चळवळी आपल्या मातृभाषेत साध्या व सोप्या शब्दांत चालवून लोकमान्यांनी, स्वराज्य हे वास्तविक गोरगरिबांकरता व खेड्यापाड्यातील लोकांकरिता आहे हे शिकवले. त्याच शिकवणुकीला काकासाहेबांनी गांधीविचारांनी उत्कट व विस्तृत रूप देऊन, तरुणांना ग्रामहिताची प्रेरणा दिली आहे.'

दुसऱ्या भागात 'महाभारताची आस्वाद' हा एक फार सुंदर लेख आहे. त्यात महाभारताचे सुरेख विश्लेषण केलेले आहे. त्यात ते म्हणतात, "आर्यभव्य रामायण विणामधुर आहे. तर महाभारत मेघगंभीर वाटते." कृष्णाविषयी काकासाहेब म्हणतात, "धर्माच्या सिद्धान्तांच्या मुळाशी जाऊन, तत्त्वार्थाच्या पालनार्थ शब्दार्थाच्या विरुद्ध कसे जावे लागते याचा श्रीकृष्णांनी अभ्यास केला असावा. स्वतःचे बुद्धिसर्वस्व खर्चून विद्वानांनी बचाव केल्याशिवाय श्रीकृष्णाच्या एकाही कृत्याची योग्यता समजायची नाही." धृतराष्ट्राविषयी ते म्हणतात, "चरित्रचित्रणामध्ये भारतकारांचे सर्व वैभव धृतराष्ट्राला रंगविण्यात खर्च झाले आहे. हा आंधळा राजा काही करत नाही. सर्वांचे केवळ ऐकतो. तरीही प्रथमपासून शेवटपर्यंत याला आपल्या नजरेसमोरून दूर करणे शक्य नाही. पावलोपावली ह्या दैवाची महती तो गातो त्या दैवाची प्रत्यक्ष मूर्तीच असा हा राजा आहे. सर्व जाणून उमजून दैव जसे आंधळे असते तसाच हा धृतराष्ट्र आहे... हॅम्लेटप्रमाणे तो क्षीणसंकल्प आहे." ह्याच भागात शुद्ध इस्लामधर्म, हिंदुधर्मातील अवतारवाद, पारलौकिक जीवन वगैरे संकल्पनांचेसुद्धा त्यांनी व्यावहारिक भूमिकेवरून, पण रसाळ विवेचन केले आहे. काकांची भाषा तात्त्विक, पण सोपी आहे. एखाद्या विषयाच्या बुडाशी नेऊन जबाबदारीने विचार करावयास लावण्याचे सामर्थ्य तिच्यात आहे.

ह्या व्यतिरिक्त त्यांची आणखी दोन चिंतनात्मक, पण चित्तवेधक पुस्तके आहेत. एक 'परमसखा मृत्यू' व दुसरे 'जिवंत व्रतोत्सव'.

गांधींजींच्या साबरमती आश्रमात असताना वेळ मिळाला की ते भोवतालच्या विशाल परिसरात कुतूहलाने खूप हिंडायचे. त्यावेळी त्यांना आश्रमाच्या उत्तरेकडील साबरमती तुरुंगाच्या भिंतीपल्याड व दक्षिणेकडील दुधेश्वराच्या स्मशानापलीकडे काय आहे ह्याचे खूप कुतूहल वाटे. पहिल्या प्रश्नाचे उत्तर लवकरच सापडले व त्यावर त्यांनी 'उत्तरेकडील भिंती' हे सुंदर अनुभवकथात्मक' पुस्तक लिहले. दुसऱ्याच्या उत्तराच्या आंतरिक शोधातून त्यांना जे गवसले ते त्यांनी 'परमसखा मृत्यू'त नोंदवले आहे.

अनुक्रमणिका

मृत्यूचे रहस्य, मृत्यूचे स्वरूप, स्वेच्छामरण, अनायास मरण, मरणदान, मरणाची तयारी अशा मृत्यूच्या अनेक पैलूंविषयी काकासाहेबांनी ह्या पुस्तकात लिहिले आहे. ते म्हणतात, “मृत्यू हे जीवनाचे अटळ सत्य आहे. त्याला विसरून माणूस जगू लागला तर ते पशूचे जगणे होय. मुत्यूच्या जाणिवेत जगतानाच माणूस जीवनाचा अर्थ शोधू शकतो. उत्कटपणे जगू शकतो. उत्कटपणे जगणे हेच खरे जगणे होय. मरणाला भिऊन सशासारखे पळत राहणे शोभादायक नाही. मरण येईपर्यंत त्याच्या स्वागतासाठी, अर्थपूर्ण जगण्याचा फुलांचा हार तयार झाला पाहिजे.” हीच प्रेरणा देण्यासाठी त्यांनी हे मृत्युचे तत्त्वज्ञान मांडले आहे. स्वतः काकासाहेब असेच जीवन जगले व तसेच शांतपणे मृत्यूला सामोरे गेले. त्यांनी ‘उत्तरेकडील भिंती’च्या प्रस्तावनेत सांगूनही ठेवले होते, “खेळ संपल्यावर भांडणं-बिंडणं झाली तरी, मुलं खेळाबद्दल आनंद व कृतज्ञताच अनुभवतात. ही दुनिया सोडून जाताना मी पण तशाच आनंद व कृतज्ञतेच्या भावनेने जाईन.”

काकासाहेब आत्महत्येला मात्र जीवनद्रोह मानतात. म्हणूनच सानेगुरुजींची नैराश्यग्रस्त आत्महत्या त्यांना भित्रेपाणाची व पराभूत मनोवृत्तीची वाटली. आपल्या अपरोक्ष ह्या पराभूत मृत्यूवर आपल्या सहकाऱ्याने आपल्या ‘मंगलप्रभात’मध्ये लेख लिहिला, म्हणून ते नाराजही झाले होते. तथापि स्वेच्छामरणाचे ते पुरस्कर्ते होते. व्याधिग्रस्त, उपयोगशून्य वा जीवनहेतू सफल झालेल्या जीवनाची स्वेच्छेने समाप्ती करण्यात त्यांना काहीच हरकत दिसत नाही. तहानलेल्याला पाणी देणे, आजाऱ्याला औषध देणे, भ्यालेल्याला अभयदान देणे, ह्याच दृष्टीने, ज्याच्या जगण्याला यत्किंचित अर्थ उरला नाही अशा रोग्याला मरणदान देणे हे सेवेचेच अंग आहे असे ते म्हणतात.

अशा तऱ्हेने मृत्यूविषयक अनेक प्रश्न उपस्थित करून त्याला त्यांनी जी उत्तरे शोधली आहेत ती फार माननीय आहेत. याबाबत रवींद्र केळेकर म्हणतात की, ‘मृत्यूविषयी इतके सखोल चिंतन करणारे दुसरे पुस्तक विश्वसाहित्यातही सापडणे दुर्मिळच आहे. ह्या पुस्तकाची अर्पणपत्रिका पण समर्पक व कल्पक अशी आहे.

“अत्यंत आदराने आणि नम्रपणे— युवा नचिकेतास, ज्यांचे स्वतः मृत्यूच्याच तोंडून त्याचे रहस्य ऐकले आणि ते मिळवलेही.”

आजची लंपट संस्कृती ही अपूर्ण संस्कृती आहे असे काकासाहेब सांगतात. तिच्या जागी मृत्यूला जीवनाची कृतार्थता मानणारी पूर्ण संस्कृती लवकरच यावी ही त्यांची इच्छा होती. त्यांना वाटे, “पराक्रम जर जीवनाचा अर्क असेल तर उपशम, शांती जीवनाचा सुगंध आहे. ज्या जीवनात संतोष, कल्याणकारिता यांचेच तरंग असतील असे जीवन समाजासाठी हितकार ठरते. अशा जीवनाला मृत्यू हा ‘प्रस्थाना’साठी आवश्यक असा विरामच वाटेल.”

आणखी एका छोट्याशा पुस्तिकेचा उल्लेख केल्याशिवाय काकांच्या चिंतनशील वैचारिक लेखनाला पूर्णविराम देता येणार नाही आणि ते पुस्तक म्हणजे ‘जिवंत व्रतोत्सव’ ही छोटी पुस्तिका. समाजिक जीवनात सणांना असाधारण महत्त्व आहे. ह्या सणाउत्सवांतून समाजाची सांस्कृतिक अभिव्यक्ती होत असते. अनेक सणांआडून भारताचा इतिहास डोकावत असतो. अशा सणांचे ऐतिहासिक महत्त्व काय? आज त्यातील कोणते सण टिकवण्यालायक आहेत, ते कसे साजरे करावेत, नवे कोणकोणते सण सुरू करावयास हवेत इत्यादीचे मौलिक व रसिक विवेचन ह्या पुस्तिकेत काकासाहेबांनी केले आहे. ह्या पुस्तकाचे हिंदी, मराठी,

मल्याळम् भाषेतही अनुवाद झाले आहेत. ते म्हणतात, “हे पुस्तक वाचून वाचकाला, भारतातील प्रांतीय भेद किती वरवरचे आहेत, भेदतत्त्वे किती परिमित व अल्पजीवी आहेत, ह्या क्षणजीवी तरंगांच्या खाली ऐक्याचा, समानतेचा, विशाल, गंभीर, सनातन महासागर कसा भरलेला आहे ही जाण येईल.”

पुस्तकाच्या प्रारंभीच्या निवेदनात ते लिहितात, “समाजाची जीवनशक्ती त्यांच्या संस्कृतीमधून व्यक्त होत असते. या जीवनशक्तीची जोपासना, ज्या निरनिराळ्या संस्थांमधून आपण करतो त्यांपैकी सण-उत्सव-व्रते ही एक संस्था. सण जन्माला येतात, मोठे होतात, राज्ये मिळवतात, लयाला जातात. त्यांची माहिती मिळवणे, बोध घेणे महत्त्वाचेच. पण त्यांचे काव्य अनुभवणे हे त्याहून अधिक महत्त्वाचे. सण जुने झाले म्हणजे त्यांच्यात एक प्रकारचे सौम्य सौंदर्य आणि प्रसन्न गांभीर्य येत असते. अशा सणांचा पौष्टिक आहार ज्या जीवनाला मिळाला ते जीवन सुदृढ आणि समृद्ध व्हायचेच! आपला समाज अशा संस्कृती-सात्त्विक आहारावरच जगलेला आहे. आता तो आहार कमी होऊ लागला आहे. हा तुटवडा भरून काढण्यासाठी जो काही नवीन पुरुषार्थ समाजाकडून झाला पाहिजे तो सध्या होत नाही. म्हणून त्यांना स्मरणांजली अर्पण करून जुन्या व्रतांना उजाळा देत आहे.”

आणखी एके ठिकाणी ते सांगतात, “आपल्याला आपली संस्कृती कशीबशी जगवायची नसून तिला देशोन्नतीसाठी सर्वसमर्थ करायची आहे. जुन्या कथा, व्रत वगैरेंचा सखोल अभ्यास व चिंतन केल्यास, मानवसमाज कसा विकसित होत आला आहे ह्याचे रहस्य अधिक स्पष्ट होऊन त्यातून भविष्याची दिशा प्रकट होऊ शकते. कन्हय्यालाल मुन्शी व श्री. म. माटे यांनी परशुराम कथेवर चिंतन करून त्यातून आर्यवंश विकासाचे सूत्र मांडून दाखवले आहे.”

काकासाहेबांच्या ह्या वैचारिक लेखनात त्यांनी कला व साहित्यविषयक पण बरेच विवेचन केलेले आहे. ते वाचताना प्रत्यक्षात साहित्यिक व स्वातंत्र्यसेनानी ह्या दोन भूमिका जीव तोडून पार पडणाऱ्या ह्या व्यक्तीला इतर अनेक कलांचीही किती सखोल जाण होती व त्यांची कलाविषयक मते देखील किती अभ्यासू व चिंतनपूर्वक बनलेली होती ह्याची कल्पना येते.

‘जीवन विहार’ ह्या ग्रंथात व ‘जीवनातील आनंद’ ह्या ग्रंथाच्या चौथ्या खंडात त्यांचे कला व साहित्यविषयक विचार संग्रहित झाले आहेत. साहित्यसंमेलने, संगीतसंमेलने, युवकसप्ताह आदींच्या अध्यक्षस्थानावरूनही त्यांनी जे कलाविषयक विचार मांडले तेही ह्या संग्रहात समाविष्ट आहेत. त्या निबंधांच्या शिर्षाकांवरून जरी नुसती नजर फिरवली तरी त्यांनी कलेच्या किती अंगांना स्पर्श केला आहे ह्याची कल्पना येईल. कलाकार,चित्रगुरू, लोकसंगीताचे क्षेत्र, कलेचे प्रयोजन, संगीतकाराचे जीवन, जपानची कला, साहित्य, संगीत आणि कला, कलेचे मर्म, कला, जीवन आणि तत्त्वज्ञान असे अनेक विषय त्यांनी हाताळले आहेत काकासाहेबांच्या कलाविचारांचा मूळ गाभा असा आहे; धर्म, नीती, साहित्य, संगीत, कला ही सर्व जीवनाची प्रतिष्ठा वाढवणारी साधनं आहेत. साधनं कितीही सुंदर असोत, संपूर्ण असोत, ती साधनंच असतात. साध्य बनू शकत नाहीत. साध्य असते जीवन, जीवनशुद्धी, जीवनसमृद्धी! साहित्याचा उगम जीवनात आहे व त्याचे फलही जीवनाचा आनंद, जीवनाची संस्कारिता, जीवनाची कृतार्थता, हेच आहे. साहित्य बुद्धीची प्रगल्भता दाखवते. मनोभाव सूक्ष्म करते. अनुभवांचे विश्लेषण करते. धर्मबुद्धी जागृत करते. हृदयाच्या वेदनेला तेजस्वी बनवते आणि आनंदाला स्थायी रूप देते. म्हणून साहित्याविषयी माझ्या मनात आदर आहे. पण ती माझी इष्टदेवता नाही.”

अनुक्रमणिका

म्हणून ते स्वतःला साहित्यकार न म्हणता साहित्यप्रेमीच म्हणत असत. साहित्यप्रेमी काकासाहेबांनी टागोरांपासून प्रेरणा घेऊन लोकसाहित्यावरही बरेच चिंतन व विवेचन करणारे लेख लिहिले आहेत. लोकसाहित्य हे लोपलेल्या जगाचे प्रतिध्वनी आहेत. जानपद जीवनाचे अस्सल दर्शन त्यातून घडते. त्यावर काकासाहेबांनी 'लोकसाहित्याची मीमांसा', 'रसास्वाद', 'लोककथेची भाषाशैली', 'सार्वभौम कथा', 'लोककथांवरील आक्षेप' इ. लेख लिहून लोकसाहित्याच्या अंगोपांगांची सविस्तर व मौलिक चर्चा केली आहे. ते म्हणतात, "ह्या जानपद साहित्यात कल्पनाविलास नाही. अर्थगौरव नाही, पदलालित्य नाही. पण दाटून आलेल्या असीम भावनांची उसळी त्यात असते." काकासाहेबांनी लोकसाहित्याची परंपरा, पुरण जातककथांपर्यंत नेऊन दाखवली आहे.

साहित्याच्या जोडीने त्यांचा चित्रकला, संगीतकला, लोककला ह्यांचाही अभ्यास सूक्ष्म होता. एका मर्यादित अर्थाने ते कलेची स्वायत्तता मानत होते. एका निबंधात ते म्हणतात, "कलेसाठी कला हा आदर्श मी समजू शकतो. ज्याप्रमाणे जीवन निष्कामवृत्तीनेच कृतार्थ होते, त्याचप्रमाणे कलेतून बाजारूवृत्ती, धन वा कीर्तिलालसा काढून टाकली, उपदेशकाचा असंस्कारी आव काढून टाकला, तिला सत्ताधाऱ्यांच्या हातात जाऊ न देता ती आपली काळजी वाहण्यास समर्थ आहे असे मानले, थोडक्यात कलेपेक्षा हलक्या प्रतीचा आदर्श कलाविलासात नसावा असे म्हटले तर 'कलेसाठी कला' मानायला मी तयार आहे. पण जे लोक स्वातंत्र्याच्या नावाखाली स्वैरतेचा पुरस्कार करतात त्यांच्या संपर्कात समाज तर नाहीच, पण कलासुद्धा सुरक्षित राहू शकणार नाही."

थोडक्यात काकासाहेब विशुद्ध कलेचे पुरस्कर्ते होते असे म्हणता येईल.

"मात्र कलेने मिळणारा आनंद इंद्रियाद्वारे मिळत असला तरी ते इंद्रियसुख नव्हे. तो आनंद निर्हेतुक असतो. अतींद्रिय स्वरूपाचा असतो. त्यात तादात्म्य व ताटस्थ्य ह्या दोन्ही परस्परविरोधी वाटणाऱ्या वृत्तींचे मीलन होत असते. त्यातून आत्म्याचा विकास होत असतो. मी कलेचा, सौंदर्याचा पूजक आहे पण सौंदर्य व भोगविलास यांच्या परिणामांत स्वर्ग आणि नरक एवढे अंतर आहे, हे मी जाणतो. कला इंद्रियांना भोगपराङ्मुख करून सौंदर्यपूजक बनवते. मोक्षाच्या मार्गात जशी सिद्धी आड येते, तशी कलेच्या प्राप्तीत विलासिता आड येते. सौंदर्याशी भावाचे मीलन झाले की त्यातून सर्जनशक्ती जागृत होत असते. ती आपल्या प्रतिभेने नवीनवी रूपे, नव्यानव्या आकृती निर्माण करते. भावांची जागृती, त्यांची नवनिर्मिती, त्यांचे व्यक्त होणे आणि त्या अवस्थेतून प्राप्त होणारी तृप्ती हे कलानिर्मितीचे स्वरूप आहे. त्यासाठी माध्यम म्हणून कोणती वस्तू वापरली जाते ही गोष्ट गौण आहे. माती, दगड, काच, मेण इथपासून शब्द, सूर, रेखारंग, अभिनयापर्यंत कला एकच असते."

कलाप्रेमी काकासाहेबांनी संगीतकलेचाही सूक्ष्म विचार केला होता. ते म्हणतात, "संगीत ही स्वतंत्र भाषा आहे. तिचे व्याकरण वेगळे आहे. शब्दांपेक्षा संगीताचे आलाप अधिक व्यापक आणि अधिक परिणामकारक असतात." त्यांच्या संगीतविचारांची चुणूक त्यांच्या लोकसंगीतावरील लेखात आढळते.

"संगीत ही अंतःकरणाची भाषा आहे आणि मानवी समुदायाचे जसे पौर व जानपद असे दोन स्वाभाविक भाग असतात तसे संगीतातही रामायणकाळापासून मार्गी-संगीत व देशी संगीत असे दोन प्रवाह

वाहताना दिसून येतात. या दोन प्रवाहांचा संबंध सोने व दागिने यांच्या संबंधासारखा आहे. लोकसंगीत सामान्य माणसांच्या जीवनप्रवाहाला अनुकून होऊन वाहत राहते. त्याच्या वाढीचे नियम नक्की करता येत नाहीत. ढगांनी कोणते आकार, रंग धारण करावे, ही जशी आपल्या नियंत्रणाबाहेरची गोष्ट आहे त्याचप्रमाणे लोकसंगीताचे नियम मुक्रर करणे अशक्य. लोकसंगीत ही समाजाच्या अंतर्गत तेजाची इंद्रियगम्य मूर्ती आहे. निरोगी बालकाच्या चेहेऱ्यावरील गुलाबी छटेप्रमाणे शीलवान, प्राणवान समाजाचे लोकसंगीत विकसित होत राहते. धर्म हा आपल्या सामाजाचा प्राण आहे. हिंदुस्थानात ज्या ज्या वेळी धार्मिक भावनेचा पुनुरुद्धार झाला त्यावेळी लोकसंगीताचा प्रवाह पुरासारखा वाहिला आहे. पंजाबच्या लोकसंगीताचा उगम शीख गुरूंच्या कृपाप्रसादात आहे. कालीमातेच्या भक्तांनी, गौरांग प्रभूंच्या वैष्णव संतांनी बंगालचे लोकसंगीत परिपुष्ट केले. महाराष्ट्र, गुजरातचा लोकसंगीताचा खजिना संतांच्या वाणीत साठविला आहे. हिंदीतील लोकसंगीतसागर तुलसी, कबीर, सूरदासाच्या अमृतवाणीने उचंबळत आहे. ज्यांना लोकांच्या अंतः करणात नवीन चैतन्य ओतता येते तेच लोकसंगीताचे निर्माते होत."

चित्रकलेबाबत ते म्हणतात, "चित्रसृष्टी शब्दसृष्टीप्रमाणेच एक स्वतंत्र भाषा आहे आणि ती भाषा मानवी विचार, विकार, कल्पना व भावना सर्वांची समर्थ वाहक आहे. शास्त्रीय शिक्षणात व औद्योगिक शिक्षणातही चित्रकलेची खूप मदत होते. म्हणूनच शिक्षणात, साहित्यइतकेच चित्रकलेला महत्त्व दिले गेले पाहिजे."

प्रायोजित कला व शुद्ध कला यांच्या नात्यांबद्दलचेही काकासाहेबांचे विवेचन माननीय आहे. ते लिहितात "कला जीवनव्यापी असल्यामुळे कलेची दैनंदिन जीवनाशी व उपयोगाच्या वस्तूंशी फारकत होऊ नये. तसे झाले तर उपयोगी वस्तू कुरूप, बेढब व हिणकस बनण्याचा संभव आहे. उपयोगाच्या वस्तू सुंदर, स्वच्छ, आकर्षक असल्या तर भोवतीचे वातावारणही सुंदर, रोचक, मनोहर बनते. त्यामुळे जीवनाचा आनंद वाढत राहतो.

खरे तर सुतार, लोहार, गवंडी हेही कलावंत असतात. प्रत्येक प्रामाणिक, जीवनपोषक व मनःपूर्वक केलेल्या मजुरीत कलेचा शुद्ध आनंद वसत असतो. कलेने श्रमाचा तिरस्कार करता कामा नये. उपयुक्त वस्तूत व कृतीतही सौंदर्य निर्माण करून जीवन अधिक रसमय करण्याची कला भारतीय लोकांत आहे. नक्षीदार वाद्ये, कलापूर्ण कोरीव तांब्यापितळेची भांडी, रांगोळ्या इत्यादी."

थोडक्यात कला जीवनासाठी असून तिचे जीवन उन्नत व शुद्ध केले पाहिजे असे ते मानतात. म्हणूनच कलावंतांचे वैयक्तिक आचरण हे नीतिशुद्ध व विकारमुक्त हवे असा त्यांचा आग्रह असे. "कला ही यदृच्छया प्राप्त होणारी वस्तू नाही. तिच्यासाठी तपस्या करायला हवी. म्हणूनच चांगली कला व कलावंतांचे आचार-जीवन यात विसंवाद असता कामा नये."

काकासाहेबांचे वाचन बहुविध व अफाट होते. आपल्या वाचनातील काही उत्तम पुस्तकांवर त्यांनी रसग्रहणात्मक लेखनही केले आहे. समीक्षा त्यांची मूलवृत्ती नव्हती तरी पण त्यांनी जी काही साहित्यसमीक्षा केली ती दर्जेदार असून त्यावर त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची छाप आहे. गुजरातीचे एक समीक्षक रमणलाल जोशी म्हणतात, "काकासाहेबांच्या समीक्षापद्धतीवर समकालीन समीक्षाप्रवाहांचा प्रभाव क्वचितच बघायला मिळेल

कारण त्यांची समीक्षाशैली त्यांनी स्वतः निर्माण केली होती. तिच्यावर कोणाची छाप असेल तर ती त्यांची स्वतःचीच होती.'

रवींद्रनाथांच्या निर्मितीचे रसग्रहण व मूल्यमापन करणारे 'रवींद्र छवीनु उपस्थान अने तर्पण' हे एक छोटेखानी पुस्तक लिहून जीवनसापेक्ष दृष्टीकोनातून साहित्याचे परीक्षण करण्याची नवी समीक्षापद्धत त्यांनी निर्माण केली. याव्यतिरिक्त काकासाहेबांनी वेळोवेळी दिलेली भाषणे, असंख्य पुस्तकांना दिलेल्या प्रस्तावना ह्यासुद्धा, वैचारिक व समीक्षात्मक साहित्याचा एक भाग मानता येईल. १९२० मध्ये रवींद्रनाथ अहमदाबादला 'गुजराती साहित्य परिषदे'साठी आले असताना काकासाहेबांनीच त्यांचा परिचय गुजराती रसिकांना करून दिला. त्यांचे हे भाषण म्हणजे देशातील एक थोर कवीचा परिचय अन्य भाषेतील रसिकांना कसा औचित्यपूर्ण व प्रतिष्ठापूर्ण करून द्यावा याचा हा एक वस्तुपाठच ठरला.

काकासाहेबांचे आणखी एक रूप त्यांच्या औपचारिक, पण जिव्हाळ्याच्या गप्पांमधून प्रकट होत असे. त्या गप्पा कोणीतरी जपायला हव्या होत्या. रवींद्र केळेकरांनी ह्या दृष्टीने केलेला उपक्रम (ज्ञाननिधीच्या सानिध्यात) स्तुत्य आहे.

त्यांचे उल्लेखनीय असे आणखी एक पुस्तक म्हणजे 'पुण्यभूमि गोमंतक,' हे पुस्तक लिहून भाषिक प्रश्नाबाबतची आपली भूमिका (भाषा, उपभाषा, बोली, स्वतंत्र भाषा इत्यादी) त्यांनी विस्तृतपणे मांडली आहे.

काकासाहेबांच्या कला व साहित्यसमीक्षेवरच नव्हे तर त्यांच्या एकूणच विचारविश्वात गांधीवादी जीवनदृष्टीचा फार प्रभाव आहे. त्यांच्या वैचारिक लेखनातील एक उपभाग म्हणता येईल इतके अमाप लेखन त्यांनी, 'गांधीविचारदर्शन' म्हणून केले आहे.

काहींच्या मते काकासाहेब जरी गांधीविचारांचे 'निष्ठावान प्रवक्ते 'असले तरी ते विचारवंत नव्हते. गांधींचे म्हणणे सजवून फुलवून मांडण्यात त्यांचे जास्त कौशल्य होते.

कदाचित तसे असेलही. पण गांधीविचार त्यांच्या डौलदार, रसाळ व चमकदार शैलीमुळे वाचनीय होऊन सामान्य माणसांपर्यंत पोहोचला यात संशय नाही.

गांधीशोध हा त्यांच्या जीवनातला लेखनाचा महत्त्वाचा विषय बनला. हिमालयातील भव्य-दिव्य दृश्यांबद्दल बोलायला वा लिहायला त्यांना जसा कधी कंटाळा आला नाही तद्वत 'गांधीजी' हा विषय ते अथकपणे हाताळत राहिले. मात्र गांधीजींना त्यांच्याविषयी वैयक्तिक भक्तिभावपूर्ण लिहिलेले आवडत नसल्याने त्यांच्याविषयी त्यांच्या जिवंतपणी काकासाहेबांनी फार कमी लिहिले. परंतु गांधीजींच्या मृत्यूनंतर संधिसाधू लोक सत्तेत घुसून, 'आता गांधीजींचा काळ संपला, त्यांचे मार्ग कालबाह्य झाले' असे म्हणू लागले, तेव्हा मात्र काकांनी आपली लेखणी उचलून उत्कट ओजस्वीपणे गांधीजींचे व्यक्तिमत्त्व, त्यांचे सिद्धांत, त्यांचे कार्यक्रम यांविषयी बरेच लेखन केले. 'गांधी-चरित्र कीर्तन', 'आश्रम-संहिता', अहिंसेची जीवनदृष्टी', गांधींचे रचनात्मक क्रांतिशास्त्र', 'सत्याग्रह आणि युद्धनीती', 'नमकके प्रभावसे', 'बापूंचा पत्र-संग्रह' आदी अनेक पुस्तके त्यांनी लिहिली. त्यांपैकी मराठीत फक्त,'वात्सल्याची प्रसाददीक्षा' 'बापूंची ओझरती दर्शने' अशी दोन-तीनच पुस्तके अनुवादित झाली आहेत.

अनुक्रमणिका

यांपैकी, बापूजींच्या आठवणी ते सिवनी जेलमध्ये असताना सांगत, त्याचेच पुढे पुस्तक झाले. ते म्हणतात, “खरे तर मला १०८ आठवणींची माळ गुंफायची होती, पण १०१ झाल्यावर तुरुंगातून सुटकाच झाली. पुढे मला कळले की काही जपमाला १०१ मण्यांच्या पण असतात आणि बरे वाटले.” अशी होती बापूंजीविषयी काकासाहेबांची श्रद्धा भावना!

या पुस्तकाविषयी फादर वॉलेस म्हणतात, ‘मी गांधीजीविषयी अनेक पुस्तके वाचली होती, पण कुठे इतर पुस्तकांतून गोळा झालेली ढीगभर माहिती नि कुठे काकासाहेबांनी रेखाटलेले चिरस्मरणीय चित्र!’

‘वात्सल्याची प्रसाददीक्षा’ हा काकासाहेबांनी संपादित केलेला, गांधीजींनी आपल्या एका शिष्येला लिहिलेल्या पत्रांचा संग्रह आहे. पत्रे खाजगी आहेत. पण एका मोठ्या माणसाची आहेत तेव्हा वाचताना ती हीन कुतूहलवृत्तीची पूर्ती व उथळ गप्पांचे साधन बनवली जाऊ नयेत, ही वाचकांची जबाबदारी आहे असे त्यांनी आपल्या प्रस्तावनेत—‘प्रार्थने’त सुचवले आहे. ते लिहितात “खाजगी पत्रांत विविध प्रकारच्या गंभीर प्रश्नांची थोडक्यात चर्चा असली तरी ते काही लघुनिबंध नव्हेत. एका अधिकारी व्यक्तीने आत्मीय भावनेने स्वजनांना लिहिलेली पत्रे समाजाला कितीही बोधप्रद असली, तरी त्यात खाजगीपणा कमी नसतो. पत्र लिहिणारा व वाचणारा यांच्यातील आपलेपणा उत्कट व विश्वब्ध असतो. त्यांनी ह्या पवित्र वातावरणाचे दर्शन घेण्याची संधी दिली म्हणून उपकार मानण्याऐवजी, आपल्यावर टाकलेल्या जबाबदारीचे भानच वाचकाला घेरते. कुणी आदराने जेवायला बोलविले तर त्या विश्वासाला पात्र होण्याची जबाबदारी पाहुण्यांना दाखवावीच लागते.”

ह्या व्यतिरिक्त काकासाहेबांची गांधींवरील पुस्तके मराठीत आलेली दिसत नाहीत. गांधींचा प्रभाव महाराष्ट्रावर फारसा नसल्याने असे झाले की काकांचे गांधींवरील रसाळ साहित्य महाराष्ट्रात न आल्याने, येथे गांधीवाद जनसामान्यात रुजण्याची प्रक्रिया वेग धरू शकली नाही? असा गमतीचा प्रश्न मनात येतो. कारण गुजरातबाबत असे म्हणतात की गांधीयुगाने तेथील राजनैतिकच नव्हे तर सामाजिक, सांस्कृतिक चेतना प्रफुल्लित झाली आणि त्याचे अग्रदूत काकासाहेब होते. हा मराठी माणूस महाराष्ट्रात रुळला असता तर कदाचित गांधीवादाबाबत महाराष्ट्राचे मानसचित्र थोडे बदललेही असते.

औद्योगिक क्रांतीने, तंत्रज्ञानाच्या अफाट विकासाने आजच्या मानवी समाजात अनेक गुंतागुंती व समस्या निर्माण झाल्या आहेत. त्यांपासून मानवी जीवन मुक्त व सुखमय ठेवण्यासाठी गांधीवाद हा एक ठोस मार्ग आहे हे आज पाश्चिमात्य विद्वानांनाही मान्य झाले आहे. काकासाहेबांनी हे त्या काळीच ओळखून गांधींनी सुचविलेल्या अनेक उपायांची बुद्धिनिष्ठ व आधुनिक परिभाषेत मांडणी केली. आजच्या युगातील पराकोटीच्या व्यापारी वृत्तीपासून समाजाला वाचवण्यासाठी त्याला अध्यात्मिक बैठक देणे आवश्यक आहे हे न्या. रानडे-गोखल्यांचे सूत्र, गांधीजींनी समाजापुढे आपल्या आचारविचारातून ठेवले व काकासाहेबांनी तेच सूत्र अतिशय सुसूत्रपणे व विस्ताराने आपल्या लेखांतून मांडले.

म्हणूनच काकासाहेबांच्या चिंतनाचे एक गाढे अभ्यासक ग.ना.जोशी आपल्या ‘आचार्य काका कालेलकरांचे जीवन चिंतन’ या ग्रंथात म्हणतात ‘आजच्या जाहिरातबाजीच्या, ऐहिकवादी युगात तरुण पिढी विलासी व उपभोगी वृत्तीची बनत चालली आहे. जीवनाचा अर्थ, ध्येय, हेतू हरवून बसली आहे. चंगळवादाच्या

प्रचंड लोंढ्यात भरकटत चालली आहे. आत्मकेंद्रित स्वार्थी वृत्तीमुळे सारे जगच विनाशाच्या व हिंसेच्या आवर्तात गरगरत आहे. अशा वेळी मानवजातीला, विशेषतः भारतीयांना ह्या संभाव्य विनाशापासून वाचवण्यासाठी आपल्या आर्ष व चिरंतन अशा विचारांची नव्याने उजळन करणाऱ्या काकासाहेब कालेलकरांची ऋषिवाणी निश्चितच पथप्रदर्शक ठरू शकेल. म्हणूनच त्यांना आधुनिक संस्कृतीचे थोर प्रणेते ऋषी असे म्हणतात.'

तरुण पिढीच्या उल्लेखाबरोबर एक कुतूहलवजा प्रश्न मनात जागा झाला. काकासाहेबांनी इतक्या विविध विषयांवर लेखन केले, पण प्रेमाविषयी फारसे कसे लिहिलेले नाही? त्याबद्दल विचारता त्यांनी काकासाहेबांचे पुढील विचार सांगितले. "कॉलेजात असताना वेळ वाचविण्यासाठी कथा –कादंबऱ्या न वाचण्याचा मी नियम केला होता. विशेष आकर्षण पण नव्हते. पुढे जेव्हा प्रौढ शिक्षक झालो, तरुणतरुणींच्या प्रश्नांवर विचार करणे भाग झाले तेव्हा गांधीजींनी सांगितले, तरुण पिढीला मदत, मार्गदर्शन करायचे असेल तर त्यांचे मानस, त्यांच्या आवडी-निवडी, ते काय वाचतात हे समजावून घेतले पाहिजे. मलाही वाटू लागले, नवीन बंडखोर तरुण असे का लिहितात तेही समजून घेतले पाहिजे. ते कळलं तरच त्याचे मन सहानुभूतीने समजून घेऊ शकेन. म्हणून मग 'सायकॉलॉजी ऑफ सेक्स' सारखी पुस्तके वाचली. लैंगिक प्रश्नावरील खळबळजनक इंग्रजी-मराठी कादंबऱ्या वाचल्या."

ह्याबद्दल काकासाहेबांनी एक गमतीदार आठवण सांगितली आहे. ते सांगतात "मी एकदा विनोबांना सांगितले की मी अलीकडे असले साहित्य यथेच्छ वाचून काढले आहे. त्यामुळे मला नव्या पिढीचे मानस समजू लागले आहे." त्यावर विनोबा चतुरपणे म्हणाले, 'हा विषय समजून घेण्यासाठी शंकराचार्यांना परकाया प्रवेश करावा लागला होता. तुमचे पुस्तकांवर भागले म्हणजे मिळवली,' ह्यावर आम्ही पोटभर हसलो,' काकासाहेब पुढे म्हणतात, "सीमॉ द बोव्हाचे Second sex हे पुस्तक वाचल्यावर वाटलं, 'निष्कर्ष वाटल्यास मान्य करू नका. पण बाई तळमळीची, बुद्धिमान आहे. आधुनिक भारतीय साहित्यिकांनी मात्र लैंगिक प्रश्नांवर मौलिक विचार केलेला दिसत नाही. बहुतेकजण पश्चिमेचे शिष्य! र. धों. कर्वे त्याला एक अपवाद.

माणसाचे मन बदलत असते. बदलणे हा निसर्गाचा नियम आहे. हे बदलते मन साहित्यातून व्यक्त होत असते. म्हणून साहित्याचे स्वरूप बदलताना दिसते. हा बदल जाणून घेणे आवश्यक आहे. मी हा बदल जेव्हा समजून घेतो तेव्हा वाटते, आज साऱ्या जगात लोकसंख्या विस्फोटासारखा कामवासनेचा स्फोट झाला आहे. आता स्त्री-पुरुष संबंधांविषयी जुने नियम चालायचे नाहीत. त्यात कालानुरूप इष्ट बदल व्हायलाच हवा. तथापि पैशासाठी साहित्यकाराने उच्छृंखल लेखन करून समाजाला उद्दीपित करणे योग्य नव्हे. कमजोरीचे समर्थन व वासनेचे सौंदर्यीकरण ही भूमिका तर साहित्यिकाने घेताच कामा नये. मानवी मनाचे सूक्ष्म चलनवलन दाखविणे हे आमचे काम आहे. नीतिरक्षण आमचे क्षेत्र नव्हे असेही म्हणणे योग्य नव्हे. नुसते प्रश्न, नुसती वस्तुस्थिती दाखवून चालणार नाही. मग उत्तर कोणी द्यायचे? समाजाचे मार्गदर्शन दोनच शक्ती करू शकतात, शिक्षक व साहित्यिक, यांनी उत्तर द्यायलाच हवे. नाहीतर स्वतःला साहित्यिक न म्हणवता नट विदुषकाप्रमाणे लोकरंजन करून पैसे मिळवितो हे कबुल करावे."

आजच्या साहित्यातील प्रणयचित्रण वाढता वाढता विकृती व हिंसक मार्गाकडे वळले आहे असे सांगून ते म्हणतात, "या लोकांनी एवढे लक्षात ठेवले पाहिजे की नर-मादी आकर्षण सर्वच प्राण्यात आहे.... जे आकर्षण सर्व सुलभ व सार्वभौम आहे त्याच्या प्राथमिक रसाला फारशी साहित्यिक किंमत नाही. तसे पाहू

अनुक्रमणिका

गेल्यास खाणे-पिणे, निजणे यातही रस असतोच. त्याचे वर्णन किती करायचे? त्यात विविधता आणून आणून किती आणायची तेच तेच वाचून साऱ्या गोष्टी Tame व नीरस वाटायला लागतात. एकच आशा बाकी आहे. जाप्रमाणे महात्मा बनणे सोपे नाही त्याचप्रमाणे दुरात्मा बनणेही मनुष्याला सोपे नाही. जी वस्तू हितकारक ती निश्चितपणे हळूहळू वाढू लागले. जी वस्तू मारक असते ती कितीही रोचक असली तरी शेवटी तेवढी आकर्षक राहत नाही. दुराचारी मनुष्य देखील केव्हाना केव्हा दुराचाराला कंटाळतोच. तोच न्याय इथे लागू आहे. जेव्हा असे दिवस येतील तेव्हा साहित्य आपल्या स्थानावर जाऊन बसेलच. जीवन अपोआप निरोगी होईल नवे युग नव्या अनुभवाच्या जोरावर स्वतःला अनुकूल अशी नवी संस्कृती जन्माला घालील."

अशा तऱ्हेने सकस, विपुल व विविध प्रकारचे साहित्य काकासाहेबांनी लिहिले आहे. मात्र महाराष्ट्रात म्हणावा तसा प्रतिसाद त्यांच्या साहित्याला लाभला नाही. मायमराठीने आपली योग्य ती कदर न केल्याची खंत त्यांच्या बोलण्यातून कधी कधी स्पष्ट होत असे.

श्रीपाद जोशींचा त्यांच्या साहित्याबद्दलचा अभिप्राय थोडा वेगळा आहे. ते म्हणतात, 'स्वातंत्र्यपूर्व कालातील काका नंतरच्यापेक्षा वेगळे होते. त्यांचे स्वातंत्र्योत्तर जीवन राज्यकर्त्यांच्या सावलीत सुखासीन होत गेले. पूर्वीचे जीवन व साहित्य ताजे, टवटवीत व तेजस्वी होते. खेळकर पाने, स्मरणयात्रा, उत्तरेकडील भिंती, हिमालयाचा प्रवास, लोकमाता ही स्वातंत्र्यापूर्वीची पुस्तके जसे मन वेधून घेतात तशी नंतरची प्राणवान वाटत नाहीत.' मात्र त्यांना आवडलेल्या पुस्तकाबाबत ते म्हणतात. 'काकासाहेबांनी कथा, **[काकासाहेबांनी नाटक, कादंबऱ्या लिहिल्या नसल्या तरी ते माडखोलकरांच्या विनंतीवरून ज्योत्स्ना मासिकासाठी काही काळ दर महिन्याला एक अशा कथा लिहून पाठवीत होते. पुढे त्याचे 'कलाहीन कथांचा संग्रह' या नावाने दोन संग्रह प्रसिद्ध झाले. टीकाकारांच्या म्हणण्याप्रमाणे त्यातील काही कथा उत्कृष्ट होत्या असे प्रा. वि. ह. कुलकर्णी आपल्या "आनंदयात्री" या लेखात लिहितात. (लोकप्रभा २० सप्टेंबर ८१) मात्र हे संग्रह मिळू शकले नाहीत.]** नाटक, कादंबरी यासारख्या रूढ ललित साहित्यप्रकारांचा अवलंब केला नाही, परंतु आपल्या आत्मकथनपर लिखाणात व प्रवासवर्णनात त्यांनी ह्या रूढ ललित साहित्यप्रकारांचा प्रभाव निर्माण केला. त्यामुळे वाचकाला आपण कादंबरीच वाचतो असे वाटत राहते.'

ग. त्र्यं.माडखोलकर म्हणतात 'भारतीय संस्कृतीतील सगळी रुचिरता वाङ्मयरूप देऊन ह्या रसयोग्याने उभी केली आहे.'

श्री. ना. बनहट्टींच्या मते एकात्म भारतीय संस्कृतीचे व साहित्याचे काका सच्चे प्रतिनिधी होते.

पण असे तुरळक लेख सोडल्यास मराठी वाचकांनी व टीकाकारांनी काकासाहेबांच्या साहित्याला फार गांभीर्याने वा उत्साहाने प्रतिसाद दिलेला दिसत नाही.

गुजराती साहित्यात मात्र काकासाहेबांना अग्रपूजेचा मान मिळालेला आहे. गुजरातच्या पडीक भूमीत त्यांच्या प्रेरणेने साहित्याचे नंदनवन उभे झाले आहे. गुजराती साहित्याचे इतिहासकार व समीक्षक धीरूभाई ठक्कर यांनी केलेले काकासाहेबांच्या साहित्याचे मूल्यमापन फार मार्मिक आहे. ते म्हणतात, 'कालेलकरांइतके गद्य स्वामित्व गुजराती लेखकात खूप थोड्यांना लाभलेले आहे.त्यांच्या गद्य शैलीत बालकाची निरागसता आहे आणि पौरुषाचे तेजही आहे. जेवढी प्रगल्भता आहे तेवढाच प्रसादगुण आहे. शैली अलंकारपूर्ण असूनही त्यांच्या गद्याची जी सात्त्विक मुद्रा आहे तिला बाधा येत नाही. शिवाची पूजा आहे नि

अनुक्रमणिका

सौंदर्याची उपासना पण आहे. पुन्हा सौंदर्य-दर्शनाच्या कैफात औचित्यबुद्धी कधीही हरपत नाही. भाषेच्या आवेगात अर्थ आणि विचाराचे गांभीर्य मंदावत नाही.'

त्यांचे विद्यार्थी व गुजरातचे प्रतिभावान ज्ञानपीठ पारितोषिक विजेते कवी उमाशंकर जोशी त्यांच्या साहित्यशैलीचे विवेचन करताना म्हणतात 'काकांच्या सर्व प्रवृत्तींमधून उठून दिसणारे त्यांचे एकमात्र व अविभक्त स्वरूप म्हणजे कवीचे. त्यांची कविता गद्य रूपाने अवतीर्ण झाली आहे इतकेच. त्यांच्यातील ह्या कवित्वशक्तीमुळेच ते गुजरातला सुंदर, कृष्णलाल, श्रीधराणी, उमाशंकर यांसारखे संस्कारी प्रतिभावान कवी देऊ शकले.' सुप्रसिद्ध गुजराती समीक्षक ब. का.ठाकोर आपल्या 'कविता समृद्धी' ग्रंथात काकासाहेबांचा समावेश गुजरातीतील जेष्ठ दहा लेखकांत करतात.

गुजरातेत आजही काकासाहेब लोकप्रिय आहेत. साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षपदाचा मान त्यांना मिळालेला आहे. त्यांच्या पुस्तकांची गुजराती वाचक आजही वाट पाहत असतात. हा वाचक काकासाहेबांच्या लेखनाने इतका भारावलेला आहे की त्यांचे पुस्तक निघाले की वर्षा-दोन वर्षांत आवृत्ती संपते. जवळ जुनी आवृत्ती असली तरी लोक नवी आवृत्ती घेतात (थोडाफार संस्करण नव्या आवृत्तीत असते म्हणून) पुस्तकाच्या खपाच्या बाबतीत गांधीजींच्या साहित्याखालोखाल काकासाहेबांचा नंबर लागतो. त्यांच्या लोकप्रियतेचे श्रीपाद जोशींनी केलेले विश्लेषण असे आहे. 'नवसाहित्याच्या झंझावातातही काकासाहेबांच्या लोकप्रियतेची पणती टिकून आहे याचे कारण त्यांनी गुजराती जनतेला सात्त्विक आनंदाचा नवा मार्ग मिळवून दिला. त्यांच्या ललितलेखनात कसलाही भडकपणा नाही. गुजरातच्या सौम्यप्रकृती प्रजेला त्यांच्या लाघवी शैलीने मोहून टाकले. लहानसहान गोष्टीतून जीवनाचा आनंद कसा मिळवता येतो हे काकासाहेबांनी त्यांना शिकविले. जीवनाकडे खेळकरपणे पाहण्याची व त्याचबरोबर समाजाशी असणाऱ्या आपल्या बांधीलकीचा विसर न पडू देण्याची जी किमया त्यांना साधली तीतच त्यांच्या लोकप्रियतेचे रहस्य साठविले आहे.'

काकासाहेबांनी कधी काव्य लिहिले नाही पण जो काव्य लिहितो त्यापेक्षा जो काव्य जगतो तो कवी, या दृष्टीने ते कवी होते. गुजराती जनमानसावर त्यांची प्रतिमा कोरली गेली आहे ती कवी, सौंदर्यपूजक व सर्जक साहित्यकार म्हणूनच. काकासाहेबांनी इतके अपरंपार लेखन केले. पण लेखनाचा त्यांनी कधी बाऊ केला नाही. सहज पडल्या पडल्या कोणत्याही विषयावर ते डिक्टेशन देऊ शकत. मध्येच कोणी भेटायला आले तर त्यांना व्यत्यय वा समाधिभंग वाटत नसे. आरामात गप्पा-चर्चा करत. तो गेला की मागचे सूत्र उचलून नेमकेपणाने पुनः सांगणे सुरू करत, त्यांना संदर्भग्रंथांची क्वचितच गरज पडे. ते म्हणत, "लेखनाला स्फूर्ती अवश्य हवी, पण स्फूर्ती म्हणजे कोणी दुराराध्य देवता वगैरे मी मानत नाही. माझे चिंतन सतत चालू असतेच. लेखनिक भेटला की लेखन सूरू होते. जे सांगावेसे वाटते त्याबाबतचा उत्साह जितका उत्कट असेल तेवढी शैली प्रासादिक होत जाते. उपमा, उत्प्रेक्षा, तर्क अपोआपच समोर येत जातात." एकदा तर मंगेश पाडगावकर त्यांच्याजवळ बसले होते. पाऊस धुवांधार कोसळत होता. पाडगावकर म्हणाले, 'तुम्ही वर्षाऋतूवर फारसे लिहिले नाहीत.' लगेच काकासाहेब म्हणाले, "आहेस तयार? आता लिहून टाकू." अर्ध्या-पाऊण तासात, 'वर्षागान' लेख लिहून झाला. लेख परिष्कृत करण्याची त्यांना आवश्यकता नसे. तो सरळ प्रेसमध्ये जाई. लहान-मोठा वाटला तर प्रेसच्या गरजेप्रमाणे आठ-दहा ओळी कमीजास्त ते सहज करून टाकत.

अनुक्रमणिका

ते लेखक म्हणून वेगळे असे कधी जगलेच नाहीत. चांगले विचार संयमित शैलीत व्यक्त करण्यात आनंद होतो म्हणून लिहायचे, जमेल तेव्हा आणि त्या त्या वेळी जमेल तसे.

काकासाहेबांचे साहित्यावर अपरंपार प्रेम होते. दिक्कालाची अंतरे तोडून लोकांना जवळ आणण्याची व आनंद देण्याची जी शक्ती साहित्यात आहे त्याचे काकासाहेबांना फार अप्रूप होते. लिहिताना आपण केवळ समकालीनांसाठीच नव्हे तर पुढच्या पिढ्यांसाठी लिहितो ह्या जाणिवेने ते लिहीत असत. “साहित्य ही त्रिकालव्यापी संस्कृतिसेवा आहे,” ही त्यांची साहित्याबाबतची धारणा होती.

असा हा सर्जनशील, सहजप्रसव व बहुरंगी साहित्यिक मराठी सारस्वतांच्या दरबारात मात्र बराचसा अपरिचितच राहून गेला हे मान्य करायलाच हवे.

अनुक्रमणिका

१०.

## समन्वय साधना

काकासाहेबांची साहित्यानिर्मिती त्यांचा आयुष्याच्या अखेरीपर्यंत उस्फूर्तपणे चालू होती; आणखीही एक कार्य ते शेवटपर्यंत अथकपणे करत राहिले होते ते म्हणजे संस्कृतिसमन्वयाचे कार्य!

संस्कृतीकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन तारतम्याचा होता. ते म्हणत, "घर जेवढे जुने तेवढ्या त्यात जुनाट मोडक्या वस्तू अधिक जमतात. तेच संस्कृतीचे घडते. सामाजिक, सांस्कृतिक जीवनात खूप तण-कचरा जमतो. शेतातले तण जसे वेचावे लागते तसाच हा कचरा काढायला हवा. पण तसे होत नाही. परिणामतः समस्यांतून विकृती निर्माण होते." हे वाचताना लक्षात येते की काकासाहेब हे केवळ संस्कृतिपूजकच नव्हते तर ते संस्कृतिशोधकही होते. आपल्यातल्या ह्या द्विधारेविषयी ते स्वतःच्या 'वासरी'त लिहितात, "मी शास्त्रनिष्ठा, वचननिष्ठा, ग्रंथनिष्ठा वगैरेचा विरोध करणारा विचित्र सनातनी आहे. सर्व धर्मांच्या ग्रंथांविषयी मला आदर आहे. सर्व संतांविषयी पूज्यभाव आहे. अध्यात्मिक अनुभवांविषयी अविश्वास नाही. मंत्रशक्तीबद्दल अनादर नाही. तरीही काही जुन्या निष्ठा अध्यात्माला बाधक आहेत असे मानणारा मी आहे. सत्याप्रमाण्य, प्रयोगनिष्ठा आणि अनुभवनिष्ठा यांच्याच आधारे मी चालणारा आहे."

आपल्या संस्कृतीचे सतत परिष्करण करायला हवे हे सांगताना, अन्य संस्कृतीतील चांगल्याचा शोध घेत संस्कृतिसमन्वय साधायला हवा, हेही ते सतत सांगत आले आहेत. कारण त्यातूनच आजच्या जगात विश्वशांती निर्माण होऊ शकेल ही त्यांची भूमिका होती.

राष्ट्रभाषाप्रचाराच्या कार्यातून काकासाहेबांनी हळूहळू अंग काढून घेण्यात सुरुवात केल्यानंतर त्यांनी आपले लक्ष, देशाची सामाजिक व राष्ट्रीय दुखणी कोणती? त्यावर इलाज काय? तो कशा प्रकारे करता येईल? ह्यावरील चिंतनात केंद्रित केले आणि त्यांना जाणवले की ह्या बहुभाषी, बहुधर्मी, बहुवंशी राष्ट्राच्या चार हजार वर्षांच्या इतिहासातून जे सार निघते व भारतभाग्यविधात्याने आपल्याला साधनेची दीक्षा देऊन ज्या कार्यासाठी तयार केले ते कार्य म्हणजे 'सर्वधर्मसमभावाचे गंभीर युगकार्य' होय. ही धारणा मनात पक्की झाल्यामुळे आपल्या उर्वरित आयुष्यात ते रवींद्रांसारखे विश्वसमन्वयाच्या 'मिशन'चा हिरिरीने पुरस्कार करत जगभर हिंडत राहिले. जणू काही भविष्यकाळच्या विश्वसंस्कृतीचे बीज पेरण्यासाठी ते जमीन नांगरीत आहेत असे वाटावे.

खूप पूर्वी म्हणजे १९३७ मध्ये रामकृष्ण मिशनने कलकत्त्याला 'सर्वधर्मपरिषद' बोलावली होती. ऐनवेळी आजारी पडल्याने गांधींनी आपल्या जागी तिथे प्रमुख अतिथी म्हणून काकासाहेबांना पाठवले होते. तिथे त्यांनी जो प्रबंध वाचला, त्यात हाच विचार मांडला होता. ते बीज पुढील चिंतनात रुजून आले. ह्या परिषेदेत त्यांची ओळख करून देताना, गुरुतुल्य रवीन्द्रांनी काकासाहेबांचा परिचय, 'आधुनिक काळातील एक ऋषी' म्हणून करून दिला. ह्या आधुनिक ऋषीने धर्मसमन्वयाचे कार्य उर्वरित जीवितकार्य म्हणून ठरवले होते.आयुष्याच्या उत्तरार्धात हा निर्णय अधिकाधिक दृढ होत गेला.दिल्लीतील उर्वरित आयुष्य त्यांनी याच कार्यात व्यतीत केले.

अनुक्रमणिका

ही धर्म, भाषा, जाती समन्वयाची वृत्ती त्यांच्यात पूर्वीपासूनच होती. बालपणी वडिलांबरोबर त्यांनी खूप प्रवास केला. त्याचा त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर समन्वयपोषक असा परिणाम झाला. प्रवासात त्यांना भिन्नभिन्न रीतिरिवाज, चालीरीती, भाषा असलेले समुदाय भेटले. त्यातून उदार मनोवृत्ती वाढत गेली. भिन्नतेतून एकच धर्मानुभव माणूस घेऊ शकतो हे त्यांना जाणवले. भिन्न लोकांविषयी मनःपूर्वक तादात्म्य अनुभवणे त्यांना सहज शक्य होत गेले. ते साबरमती तुरुंगात असतानाचा एक प्रसंग ह्या दृष्टीने विशेष हृद्य आहे.

खिलाफत चळवळीतील एक मौलाना त्याच तुरुंगात होते. रोज नमाजापूर्वी प्रथेप्रमाणे ते मोठ्याने अजान म्हणत असत. यावर काहींनी अक्षेप घेतल्यामुळे तुरुंगाधिकाऱ्यांनी बंदी आणली. मौलानांनी निषेध म्हणून उपवास सुरू केला. धार्मिक अधिकारांच्या रक्षणासाठी म्हणून काकासाहेबांनीही उपवास सुरू केला. परिणामतः मौलानांना मोठ्याने अजान म्हणायची परवानगी मिळाली. पण उपवास करण्याच्या गुन्ह्याबद्दल ह्या दोघांना एका अलग कोठडीत ठेवण्यात आले. जवळ फक्त एकच धार्मिक पुस्तक ठेवण्याची सवलत देण्यात आली. काकासाहेबांनी विचार केला, अनायसे संधी आलीच आहे तर मौलानांच्या सोबतीने कुराण का वाचू नये? तुरुंगाधिकाऱ्याला नवल वाटले. एक हिंदू माणूस एकच धार्मिक पुस्तक म्हणून कुराण मागतो. त्यावर काकासाहेब म्हणाले, “मी सर्वधर्मसमभावी हिंदू आहे. इतर धर्मांची ओळख करून घेण्यात मला रस आहे.” कुराणामधील काही भाग त्यांना रुचला नाही. तथापि त्यातील अविचल ईश्वरभक्ती त्यांना फार प्रभावी वाटली. काकांचे विचार व कृती ह्यांमध्ये जे एकरूपता होती तीवर प्रकाश टाकणारा हा प्रसंग आहे.

पुढे राष्ट्रभाषाप्रचाराचे काम करताना त्यांनी, हिंदुमुस्लिम समन्वयाचे धोरण सातत्याने ठेवले. हिंदुस्थानीचा मध्यममार्ग पुरस्कारताना ते म्हणत, “आपण उर्दू शिकली पाहिजे. मुसलमानी समाजाला आपल्याविषयी काय वाटते? त्यांची सुखदुःखे काय आहेत, आदर्श कोणते आहेत? हे कळून घेतले पाहिजे. मुसलमानांचे राष्ट्रीय जीवनातील महत्त्व नाकारून चालणार नाही. हा शहामृगी आंधळेपणा काय कामाचा? परस्पर परिचय वाढला की भीती, शंका दूर होते.”

ख्रिस्ती समाजाला सुद्धा त्यांनी हीच समन्वयाची भूमिका सांगायचा प्रयत्न केला. ते म्हणत, “गांधीजींच्या प्रचारामुळे स्वराज्योत्तर हिंदुसमाजात ख्रिस्ती समजाविषयी आपुलकी निर्माण झाली आहे. तिचा फायदा ह्या लोकांनी करून घेतला पाहिजे. त्यांनी धर्मकुटुंब वृत्ती वाढवायला हवी. तथापि त्यांच्यातील धर्मधुरीणांचा आग्रह, ‘आपले वैशिष्ट्य टिकवण्यातच जीवनसर्वस्व आहे.’- असा दिसतो, पण त्यामुळे हा समाज आपले नुकसान करून घेणार आहे. मुसलमानांइतकाच हा समाज हिंदूंना दूरचा वाटू लागेल व त्यातून धर्मविद्वेषी लोकांचे प्राबल्य वाढेल.”

हिंदूंना ते सतत सांगत आले की, “विधात्याने इस्लाम, ईसाईधर्म ह्या देशात आणले ते आम्हांला धडा शिकवायला. जो आमचा आम्ही शिकत नव्हतो. त्याप्रमाणे त्या धर्मांना पण आत्मशुद्धी व नवी प्रेरणा लाभावी हा पण विधात्याचा उद्देश होता. इथे जवळजवळ सर्व प्रमुख धर्मांचे रहिवासी आहेत. तेव्हा पारिवारिक समन्वय निर्माण करणे, हीच भारताची इतिहासापासून शिकलेली साधना व्हायला हवी. ह्यासाठी हिंदूनी वडीलधाऱ्या माणसासारखा पुढाकार घेऊन इतरांच्या मनात प्रेमभाव निर्माण करायला हवा. भूतकाळ पुन्हा येत नसतो, आणायचा प्रयत्न केला तर तो असफल होणार. नव्या धर्मांचा स्वीकार कधीतरी व्हायला हवा. स्वकीयांनीच

ते धर्म स्वीकारले न? इतके दिवस नांदले. तेव्हा किती दिवस त्यांना परके मानणार? त्यांना स्वकीय मानूनच यापुढे समाजकारण सुरू केले पाहिजे. त्यातच संस्कृतीची कृतार्थता आहे.”

पारसीधर्मीय लोक ज्या सहजतेने ह्या समाजात एकरस झाले आहेत त्याचे काकासाहेबांना फार कौतुक वाटे. आपली स्वधर्मनिष्ठा दृढ असूनही, इतर धर्मांतील चांगले घेऊनच आपले जीवन समृद्ध करणाऱ्या पारसीधर्मीयांचे ते नेहमी जाहीरपणे कौतुक करत असत व त्यांचे उदाहरण इतरांना देत असत.

बुद्धधर्मीयांकडे पाहण्याचा पण असाच व्यापक व विशाल दृष्टिकोन त्यांनी मांडला आहे. ते म्हणतात, “बुद्धधर्मीय तिबेटी लोकांना आपण पारशांसारखे आपलेसे केले पाहिजे. बौधिगयेला अनेक बुद्धधर्मीय राष्ट्रांचे मठ आहेत. तिथे आशियाई भाषांच्या अध्ययनाचे उत्तम केन्द्र सहज चालवता येण्यासारखे आहे; पण तिथे शिकणार कोण? नोकरीसाठी कुणी शिकायला आला तर गोष्ट वेगळी. एरवी आपला बौद्धिक पुरुषार्थ क्षीण झाला आहे; भारतात आलेले हे तिबेटी लोक संख्येने मूठभर असले तरी जगातल्या तीन प्रमुख धर्मांपैकी एकाचे प्रतिनिधी आहेत. त्यांच्या मागे त्यांचे एक जग उभे आहे. त्यांच्याद्वार आपल्याला ते जग आपलेसे करायचे आहे. राजकीयदृष्ट्या ह्या गोष्टीला फार महत्व आहे.

खरेतर हे लोक आपलेच आहेत. आपले पूर्वज तिबेटला देवभूमी मानत. सांस्कृतिकदृष्ट्या तिबेट ही आपली वसाहत आहे. आपली अनेक तीर्थक्षेत्रे, आपल्या मोठ्यामोठ्या नद्यांचे उगम तिथेच आहेत. आपलाच बुद्धधर्म तिथे गेला आहे. आपल्या पुराणातला धनपती कुबेर व त्याचा लहान भाऊ रावण हे मूळचे तिथलेच; ह्यांना आपण विशाल भारतीय कुटुंबात आत्मसात करून घेतले तर साऱ्या बौद्धजगतावर आपला प्रभाव वाढेल आणि ह्याचीच भीती पाश्चात्त्यांना वाटते. बौद्धांना आपलेसे करण्यात राष्ट्राचे हित आहे. दुर्दैवाने आपल्या नेत्यांना हे कळत नाही. आपले धार्मिक नेतृत्व निरुपयोगी, राजकीय नेतृत्व आंधळे, विरोधी पक्षातील नेत्यांना कॉंग्रेसला पदच्युत कसे करावे एवढाच घोर. या परिस्थितीत हाती आलेली एक उत्तम संधी हातची निघून जाईल, याची मला भीती वाटते. हिंदू समाजाला ही समन्वयाची नवी दृष्टी दिली पाहिजे. तेच मी यथाशक्ती करत असतो.”

ह्या धर्मसमन्वयासाठी ते त्यांच्याकडे येणाऱ्या प्रत्येकाला उद्बोधन करीत असत. भेटीला आलेला एक अमेरिकन गृहस्थ काकांचे समन्वयाचे विचार ऐकून भारावून गेला. ‘भविष्यकाळचा मानवधर्म कसा असेल’ ह्या त्याच्या प्रश्नाला काकासाहेबांनी दिलेले उत्तर त्यांच्या दूरदृष्टीचे द्योतक वाटते. ते म्हणतात, “जगातील सारे प्रचलित धर्म आज रुपांतराच्या अवस्थेत आहेत. त्यांच्या समन्वयानेच भविष्यकाळच्या धर्माचा उद्भव होईल. माझी श्रद्धा मला सांगते की भविष्यकालचा मानवधर्म शिक्षणपद्धीतीचे स्वरूप धारण करील.”

काकांची ही वेळोवेळी व्यक्त झालेली भूमिका बघताना लक्षात येते की ह्याच दूरदृष्टीमुळे त्यांनी भविष्यकाळाबाबत अनेक नेमकी निदाने केलेली आढळतात. हिंदुधर्माच्या भविष्यातील ध्रुवीकरणाबाबतचे त्यांचे एक निदान पाहा, “हिंदू-मुस्लिम हा जर आजचा प्रश्न असेल तर पांढरपेशे व अंत्यज हा उद्याचा प्रश्न राहील. हे स्पष्ट दिसत असताना स्वस्थ कसे बसावे? ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद ब्राह्मणांनी उदारपणे पड खाऊन मोडला पाहिजे. प्रत्येक ब्राह्मणाने होईल ती अंत्यजसेवा केली तर खरेखुरे हिंदुसंघटन होईल.” काकासाहेबांचे हे ध्रुवीकरणाचे निदान आज हळूहळू खरे ठरताना आपण अनुभवत आहोत.

अनुक्रमणिका

धर्माप्रमाणेच भाषेबाबतही त्यांनी सहकाराचा पुरस्कार सतत केला. ते स्वतः बहुभाषिक होते व इतरांनीही भाषांबाबत भगिनीभाव जोपासावा असा त्यांचा सतत प्रयत्न असे. एकदा कराचीत गुजराती समुदायापुढे बोलताना ते म्हणाले, "गुर्जरमध्ये आल्याबरोबर मी गुजराती भाषा आपलीशी केली. त्या भाषेत लिहू-बोलू लागलो. असे करण्यात मी स्वभाषेचा द्रोह केला असे तुम्हाला वाटत नाही ना? मराठीवरचे प्रेम कायम ठेवून मी गुजराती भाषेवर प्रेम करू शकलो, माझा महाराष्ट्रीपणा कायम ठेवण्यासाठी मला तुमच्याशी दुजाभाव ठेवण्याची आवश्यकता वाटली नाही. तर तुम्ही सिंधमध्ये येऊन स्थायी झाल्यावर तुम्हाला सिंधी भाषा शिकायला नको का? सिंधी लोकांशी एकजीव व्हायला नको का ? हिंदुस्थानात इतक्या भाषा आहेत हे आपले सुदैव आहे. त्यांचे अध्ययन करून आपण आपापल्या भाषा समृद्ध केल्या पाहिजेत."

समाजातील हरप्रकारे वाढत्या फुटीरतेबद्दल त्यांना फार वाईट वाटे. ते सांगतात, "बेळगाव समाचार प्रेसमधील कितीतरी पुस्तके पूर्वी कानडी भाषा व नागरी लिपी अशी छापली जात. आज आपल्या देशात विभक्त आणि संकुचित होण्याची जी जी तत्त्वे सापडतील ती ती काही लोकांकडून भुकाळल्याप्रमाणे पकडली जातात." ह्यातून वाढत जाणारे विघटन थोपवण्यासाठी त्यांचे समन्वयाचे प्रयत्न सतत चालू होते.

अहमदाबाद येथील साहित्य संमेलनाच्या कलाशाखेच्या अध्यक्षपदावरून बोलताना, "कलेच्या महत्तेचे मर्म ह्या समन्वयसाधक वृत्तीतच आहे," असे ते सांगतात. ते म्हणतात "कलेच्या उपासनेत सांप्रदायिकतेला वाव नाही. त्यामुळे हिंदू, मुसलमान, पारसी, ख्रिस्ती, खोजा, मोमीन सर्व पंथाचे, धर्मांचे लोक, कलेच्या उपासनेसाठी एकत्र जमू शकतात. 'समानस्तु वो मनः सामना हृदयानि व : " अशी समन्वयसाधकता सार्वभौम कलेत असते." आणि म्हणूनच ते सर्व प्रकारच्या कलांना कृतार्थ जीवनकलेचा महत्त्वाचा भाग मानतात.

'हिंदुस्थानी प्रचार सभे'द्वारे सांस्कृतिक एकता निर्माण करण्याच्या त्यांच्या प्रयत्नाला जेव्हा कोणत्याही प्रांतिक सरकारकडून साहाय्य मिळेना तेव्हा त्यांच्या आशावादी मनाने पुढीलप्रमाणे विचार केला, "भाषा व लिपीद्वारे एकता साधणार नसेल तर मार्ग बदलूया. आपला एक सर्वधर्मी आध्यात्मिक परिवार स्थापन करून त्याद्वारे सांस्कृतिक एकतेचे कार्य करून पाहू. सर्व शक्ती एकत्रित करून काय केल्यास काही न काही फळ मिळेलच. सर्वधर्मसमभावाची साधना अनेक वर्ष ते करतच होते. जवळजवळ सर्व धर्मांच्या ग्रंथांचे त्यांनी अध्ययनही केले होते. पण आता त्यांना वाटू लागले, धर्म म्हणजे केवळ ग्रंथ नव्हेत. तर त्या धर्माचे पालन करणारे लोक, त्यांच्या चालीरीती, सणवार, त्यांच्या आवडीनिवडीद्वारे व्यक्त होणारे त्यांचे मनोभाव, हे सारे आपण आपलेसे केले व हळूहळू समाजात रुजवले तरच खरी सर्वधर्मसमभावाची साधना होईल."

याचा गोड अनुभव वैयक्तिक जीवनात ते घेतच होते. अनेक पारसी कुटुंबांशी त्यांचा घनिष्ट स्नेह होता. पुण्यातील लालकाकांची मुलगी आलुबेन ही काकांची मुलगीच बनून गेली होती. बडोद्याच्या अब्बास तय्यबजींची बेटी रैहाना व जस्टिस धीरजलाल नानावटींची मुलगी सरोजबेन या दोन मानसकन्या तर त्यांच्याजवळच राहत होत्या. रैहाना अत्यंत कृष्णभक्त होती. तर सरोजबेनचा मुस्लिम संस्कृती व मशिदीबाबत खास अभ्यास व आकर्षण होते. त्यांच्या ह्या खऱ्याखुऱ्या हिंदुमुस्लिम समन्वयामुळे गांधीजी व विनोबा काकासाहेबांवर खूप प्रसन्न झाले होते.

अनुक्रमणिका

गांधी-परिवारातील लोकांच्या ह्या मानसकन्यांच्या नातेसंबंधाबाबत काहीच्या मनात एक किंतु असतो.ह्या संदर्भात काकांचे सचिव म्हणून बरीच वर्षे काम केलेले व त्यांचे स्पष्टवक्ते टीकाकार श्रीपाद जोशी म्हणाले, 'इतर काही मतभेद असले तरी काकासाहेबांच्या चारित्र्याविषयी कधीच कोणी शंका घेऊ शकणार नाही.त्यांना स्वतःला मुलगी नव्हती. बाप व मुलगी ह्या नात्यातली मानसिक निकटतेची उणीव त्यांना जाणवत असे आणि म्हणून उतारवयात लाभलेल्या ह्या मुलींवर त्यांनी स्वतःच्या लेकीप्रमाणे प्रेम केले. सरोजबेन तर त्यांना पिताजी म्हणूनच हाक मारत असे.' देशसेवेसाठी कुटुंबजीवानाचा त्याग केलेल्या ह्या माणसांना कुटुंबजीवानाची थोडीशी ऊब आणि सेवा ह्या त्यांच्या मानसकन्यांकडून लाभत असावी.

आपली ही 'आध्यात्मिक परिवारा' ची योजना गांधीजींसमोर ठेवण्यासाठी ते दिल्लीला गेले होते. पण गांधीजींना उदास पाहून ते इतरच बोलून परतले नि लवकरच गांधीजींची हत्या झाली. ती भयानक बातमी ऐकून ते काही काळ दिङ्मूढ झाले. त्यांच्या आयुष्याचा अर्थच हरवल्यासारखा झाला. क्षणभर त्यांना वाटले, सम्राटाच्या मृत्यूनंतर त्याचे अधिकारी हाराकिरी करतात ते खरोखरच योग्य आहे. ज्या धन्याने आपल्यावर पूर्णपणे विश्वास टाकला व जनसेवेसाठी संधी उपलब्ध करून दिली त्याच्या मागे सारे बलच हरवून जाते. ते म्हणतात, "बातमी ऐकून माझे डोळे वाहू लागले. खरंतर मी मोडूनच पडायचा. पण माझा धाकटा मुलगा बाळ एकदम बेशुद्ध झाला. त्याला सावरण्यात मी गुंतलो. मन सावरलं नी ठरवलं – त्यांचा झेंडा खाली पडून द्यायचा नाही. हिंदु – मुसलमान एकाच वंशाचे, एकाच राष्ट्रातले, समान संस्कृतीचे, समान हितसंबंध असलेले. इंग्रजांनी त्यांच्यातली तेढ वाढवली. आपण आपल्याकडून ही तेढ कमी करण्याचा प्रयत्न मरेपर्यंत उत्कटपणे करत राहायचे. उपनिषदकालीन ऋषी म्हणत, 'दीर्घं पश्यत मा ऱ्हस्वम्' तसे दूरच्या कल्याणासाठी प्रयत्न करीत राहायचे."

मात्र एव्हाना त्यांची साठी उलटली होती. व्यक्तींच्या मागे संस्थाची कशी अवनती होते हे त्यांनी पहिले होते. म्हणून कोणतीही संस्था स्थापन न करता व्यक्तिशः भाषण, लेखन, चर्चा, पत्रे इत्यादींद्वारा होता होईतो ते कार्य करावे अशी भूमिका त्यांनी स्वीकारली.

काकासाहेब वृत्तीने भटके प्रवासी. पण स्वराज्य मिळेपर्यंत ते परदेशी गेले नाहीत. आपण गुलाम आहोत ह्याचा त्यांना संकोच वाटे. ब्रम्हदेश व सिलोनला तेवढे एकेकदा गेले होते. पण बुद्ध धर्मामुळे ती राष्ट्रं त्यांना कधी विदेशी वाटली नाहीत. पण स्वराज्योत्तर काळात जेथे भारतीय वसाहती आहेत असे, जवळजवळ सर्व देश त्यांनी पायाखाली घातले. सर्वप्रथम १९५० साली त्यांनी पूर्व आफ्रिकेतील देशांची यात्रा केली. केनिया, युगांडा,झांजीबार, टांगानिका – मध्य आफ्रिकेतील थेट रूआंडा – उरुंडीपर्यंत जाऊन आले. बोटीवर दोन वेळा ते सर्व धर्मांच्या प्रार्थना करत असत व विशेष म्हणजे सर्वधर्मीय कर्मचारी त्यात आनंदाने सहभागी होत असत. ते म्हणत, "ह्या भूमीवर 'युरोप, आशिया व आफ्रिका' ह्या तिन्ही राष्ट्रांच्या प्रजेचा सहयोग चालू आहे. मानवजातीच्या भविष्यासाठी हे फार महत्त्वाचे आहे."सहयोग, सहजीवन, सहअस्तित्व, सहानुभव ह्यांतून एकतेकडे जाणे ही त्यांची एक अक्षय जीवनदृष्टी होती. त्यांच्या संपूर्ण जीवनकार्याचा तो पायाच होता.

त्यावेळी आफ्रिकेत आप्पासाहेब पंत भारताचे राजदूत म्हणून राहत होते. त्यांनीच नेहरूंच्या विनंतीनुसार काकासाहेबांना प्रदेश दाखवला.ते म्हणतात,'ह्या उद्याच्या महाद्वीपावर मानवसमूहाचे स्वातंत्र्यासाठी जे विशाल नाटक खेळले जात आहे त्यातील सूक्ष्मतर व सखोल रहस्यांचे आकलन

काकासाहेबांची बुद्धी ज्या वेगाने व हुशारीने करत होती ते पाहून मी मंत्रमुग्ध झालो.' आप्पासाहेबांनी असे म्हटले आहे की, 'काकासाहेबांना धर्म, वंश आणि संस्कृती यांतील भेद माणसामाणसांतील स्नेहबंध निर्माण करण्यासाठी कधीच बाधक वाटले नाहीत. उलट ह्या विविधरंगी जीवनाचे ते एक अतिशय सुंदर, बहुरंगी व आनंददायी चित्र निर्माण करीत.' तेथील इंग्रजी, भारतीय, अरबी, आफ्रिकी श्रोत्यांसमोर ह्या विषयाचे ते अतिशय हृदयस्पर्शी भाषेत सौंदर्यपूर्ण विवेचन करीत. त्या वेळच्या ज्योम्यो केन्याटो, न्येरेरे, माबोया यांच्यासारख्या आफ्रिकी नेत्यांपासून ते सामान्य नोकरांपर्यंत सारे त्यांच्या भाषणाने मुग्ध होत असत. त्यांनी आपल्या घरी निमंत्रित करून त्यांच्या ज्ञानाचा, गप्पांचा रसास्वाद घेण्यास उत्सुक असत. त्यांच्याशी काकासाहेब कविता, संगीत, जीवन, सौंदर्य इ. विषयांवर बोलत असत. युरोपिअन लोकसुद्धा त्यांच्या भाषणांना उत्साहाने येत असत. आपल्या प्रवासाचा उपयोग ते संस्कृतीसमन्वयासाठी करत होते. त्यावेळी भारत व आफ्रिका संबंधांचा श्रीगणेशा घातला जात होता. काकासाहेबांनी ह्या संबंधांच्या विकासाला नवेच मार्मिक परिमाण दिले.

मॉरिशसच्या भेटीतील आपले विचार नोंदवताना काकासाहेब लिहितात, "इथल्या लोकांनी जर शिक्षणात प्रगती केली तर अनेकवंशी, अनेकभाषी, अनेकधर्मी अशी जी मानावसंस्कृती दुनियेत जागोजाग नियतीच्या योजनेनुसार विकसित होते आहे तिच्यात हा देश मोलाची भर घालू शकेल."

काकासाहेब असे जगभर हिंडले. त्या त्या देशातील थोर पुढाऱ्यांचा त्यांनी स्नेह मिळवला. भारतीय संस्कृती व गांधी विचार त्यांनी त्या त्या देशात गप्पांतून, व्याख्यानांतून पसरवला. आफ्रिकेतील त्यांच्या व्याख्यानांचे वर्णन करताना तेथील राजदूत आप्पासाहेब पंतांनी म्हटले आहे. 'आपल्या वेगवेगळ्या सभांत वेगवेगळ्या समुदायासमोर झालेली त्यांची मराठी, गुजराती, इंग्रजी भाषेतील सौम्यभाषी, ताज्या विचारांची भाषणे ऐकणाऱ्याला स्पर्धा, संघर्ष आणि दुर्दशेच्या जगातून खूप दूर घेऊन जात असत. आफ्रिकी मनुष्य केवळ नोकर व गुलाम नसून त्याच्या हृदयातही स्नेह व सौंदर्य वसत असते ही दृष्टी काकासाहेबांनीच आफ्रिकेतील भारतीय व आफ्रिकेतर लोकांना प्रथम दिली. त्यामुळे आफ्रिकन लोकांना तर ते ईश्वराचे दूतच वाटत असत.'

हे सर्व वाचताना मनात येते,भारतीय संस्कृतीच्या ह्या परीव्राजक आचार्याने भारतासाठी जगभरातून किती आदर व प्रेम मिळवले आहे! काकासाहेब स्वतः म्हणतात, "फुलपाखरू जसे एका फुलावरून दुसऱ्यावर उडत राहते व त्यातून अनेक वनस्पतींना सफल करते तद्वत प्रवासी एका देशातून भिन्न भिन्न देशांत जाऊन संस्कृतीचा, ज्ञानाचा विनिमय करून सर्वांनाच समृद्ध करतो. नारद, परशुराम, बलराम, दत्तात्रय ही आपल्या भूगोलवेत्त्या परिव्राजकांची परंपरा आहे. मी त्यातलाच एक आहे. वर्षाऋतूच्या प्रारंभी सांड जसा आपल्या शिंगांनी जमीन उकरून मातीचा गंध हुंगु लागतो तसे प्रवासाची संधी मिळाली की माझे पाय चालू लागतात जाणे, चालणे, नव्यानव्या अनुभूती घेणे बस्स. माझा उद्देश इतकाच. डोळे तहानलेले असतात. शरीर आसुसलेले असते. म्हणून पाय चालतात. ते जोवर चालताहेत तोवर माझी ह्या विपुला पृथ्वीची परिक्रमा चालतच राहणार."

त्यांच्या पहिल्या सफरीचा झालेला सुपरिणाम पाहून सरकारने त्यांना पुन्हा आफ्रिकेत सद्भावना मिशनवर पाठविले. जाताना वाटेत ते लिस्बनला थांबले. गोवामुक्ती आंदोलनातील सत्याग्रहींना तेथे डांबून ठेवले होते. त्यांच्याशी झालेल्या भेटीत काकासाहेबांनी त्यांना सुचविले की "अनायासे तुम्ही ह्या देशात आला आहात. इथले साहित्य वाचा. इथल्या संस्कृतीचा अभ्यास करा आणि इथल्या सत्तेशी जणू तुम्ही भारताचे

अनुक्रमणिका

सांस्कृतिक दूत आहात अशाच भावनेने वागत राहा." अर्थात हे कुणाला जमले नाही हा भाग वेगळा. पण सांस्कृतिक सलोखा व जवळिकीतून समस्या सुटू शकतील असा काकासाहेबांचा दृढ विश्वास सूचनेमागे होता.

एकदा आफ्रिकेत प्रवास करताना तेथील राजनैतिक क्षेत्रात हिंदुमुसलमानांचा झगडा त्यांनी पाहिला. त्यावर काकासाहेब त्यांना सांगतात. "मी गांधींचा माणूस, सर्वधर्मी. मला एक अल्पकालिक व्यावहारिक उपाय सुचतो. तुम्ही आपापसात लढून इथल्या राजकारणात किती स्थान मिळवू शकणार आहात? इंग्रजी व आफ्रिकी यांच्या संख्याबलात तुमचे अस्तित्व कितीसे असणार? व त्या अल्पशक्तीने तुम्ही इथल्या राज्यव्यवस्थेवर कितपत प्रभाव पाडू शकणार? तेव्हा आपसात ओढताणीपेक्षा हिंदुस्थानी लोकांसाठी जितक्या जागा आहेत त्यावर आपण चांगले आफ्रिकी लोकच का निवडून देऊ नयेत? त्यामुळे आपला आफ्रिकी लोकांवर विश्वास आहे हे पण सिद्ध होईल व त्यांचे मत आपल्याविषयी अनुकूल होईल."

काकासाहेबांची समन्वयसाधकवृत्ती या प्रकारची होती. त्यामुळे हरएक समस्येवर त्यांच्यापाशी त्यांच्या पध्दतीचा तोडगा असायचा.

शेवटपर्यंत त्यांचे एक दृढ मत होते."जोपर्यंत देशातील सांस्कृतिक समस्या सोडवल्या जात नाहीत तोपर्यंत कितीही सत्तांतरे झाली, आर्थिक विकास झाला तरी देशाची परिस्थिती सुधारायची नाही. आज धार्मिक नेत्यांच्या जशा नुसत्या गाद्या उरल्या आहेत तशीच परिस्थिती उद्या राजकीय नेत्यांची होणार आहे. उद्याच्या जगाचे नेतृत्व सांस्कृतिक धुरीणांकडे जाणार आहे."ह्या दृढ विश्वासापोटीच ते जगभर सांस्कृतिक सलोख्याचे, समन्वयाचे वातावरण निर्माण करण्यासाठी झटत, फिरत राहिले. मात्र काकांनी अभिप्रेत असलेला समन्वय म्हणजे संधिसाधू तडजोड नव्हे. तडजोडीने राजकारण जसे अंती फसते, तशीच तडजोडीची तत्त्वज्ञानेही शेवटी लज्जित झाल्याशिवाय राहत नाहीत.

समन्वय ही उच्च प्रकारची ज्ञानप्रक्रिया आहे. ह्या प्रक्रियेत जीवनातील विविध आणि विरोधी विभागांतही जे एकत्वदर्शक सत्य लपलेले असते; ते शोधक बुद्धीने हुडकून काढायचे असते. जीवनाची शक्ती विविधतेने भांबावून जाऊ नये व व्यर्थ विरोधाने क्षीण होऊ नये म्हणून तिला दिग्दर्शन करायचे असते. असत्य अशांचा कठोरपणे त्याग करून सात्यांशांचा उच्च पातळीवर एकत्र समावेश करावा लागतो व अभिनव सत्य निर्माण करण्याची शक्ती दाखवावी लागते. हा ह्या समन्वयबुद्धीचा प्राण असतो.

अशी प्राणवान समन्वयबुद्धी काकासाहेबांजवळ होती. लिस्बनहून ते घाना व नायजेरिया ह्या दोन स्वातंत्र्योन्मुख देशांत गेले. ह्याच दोन देशांचा प्रभाव पुढे इतर आफ्रिकी देशांवर पडणार होता. घानाचे नेते एन्क्रुमो यांच्याशी काकासाहेबांचा गाढ स्नेह जुळला. त्यांचे सांस्कृतिक सहयोगाचे उदार विचार सर्वांनाच आकर्षित करीत होते. परतताना ते कैरोत उतरले. तिन्ही खंडांचा कैरो हा स्पर्शबिंदू. त्यामुळे तिन्ही खंडातील समस्यांचा त्यांना इथे एकत्रितपणे अभ्यास करता आला. जपानला तर काकासाहेब १९५४ ते १९७२ ह्या काळात सहा वेळा गेले. खरेतर लहानपणी चीन, रशियासारख्या बलाढ्य राष्ट्रांना हरवणारे ते चिमुकले राष्ट्र म्हणून राष्ट्रवादी युवकांना जपान प्रेरक ठरला होता. पण मोठेपणी काकासाहेबांना जपानला जाण्याची तशी उत्सुकता नव्हती. जपानमधील काही बौद्धभिक्षूंचे सेवाग्राममध्ये बरेच येणेजाणे होते. चिकित्सक व जिज्ञासू वृत्तीमुळे काकासाहेबांचा तिथे त्यांच्याशी संबंध आला होता. १९५४ मध्ये जपानने विश्वशांती परिषद बोलावली

होती. काकासाहेब तेव्हा मागासवर्गीयांच्या आयोगाच्या कामात गुंतलेले होते. तथापि अत्याग्रहाने पुन्हा पुन्हा बोलावणे आल्यामुळे शेवटी ते गेले व त्या वास्तव्यात जपानशी त्यांचे ऋणानुबंध जुळून गेले.

जपानच्या अनेकानेक गुणांमुळे ते भारले गेले व जपानशी केवळ राजकीय संबंध ठेवणे पुरेसे नाही, अनौपचारिक पातळीवर सांस्कृतिक संबंध वाढवायला हवेत असे त्यांना तीव्रपणे वाटू लागले.

इंग्रजीच्या अभिशापामुळे 'एशियाई संस्कृती' ह्या संकल्पनेवरचा आमचा विश्वास उडाला ही शोकान्तिका आहे, असे काकासाहेबाचे स्पष्ट मत होते. अशी ही एशियाई संस्कृती उभी करण्यासाठी ह्या राष्ट्रांना जवळ आणून भाषिक दळणवळण इंग्रजीच्या माध्यमातून नव्हे तर स्वतंत्रपणे वाढायला हवे असे त्यांना वाटत होते आणि म्हणून त्यांनी जपानी युवकयुवतींना सेवाग्रामला बोलावून हिंदी शिकविण्याची सोय केली. असे कितीतरी युवकयुवती आज जपानमध्ये सांस्कृतिक कामे करीत आहेत. त्यांनी आपला सहकारी 'नरेश मंत्री' ह्याला जपानला पाठविले. त्याला जपानी भाषा व तिच्याद्वारे जपानी संस्कृतीचा परिचय करून घेण्यास लावले आणि दळणवळणाचा राजमार्ग उघडा करून दिला. गेली चोवीस वर्षे ते तिकडे राहून जपान-भारत मैत्रीचे काम मनःपूर्वक करत आहेत.

बुद्धधर्म भारतात निर्माण झाला. पण त्याचा विकास जपान, चीन इ. पूर्व एशियातील देशांत झाला. या गोष्टींचा आपण आदर करावा अशी धर्मसमन्वयक दृष्टी काकासाहेबांजवळ होती. "ज्याप्रमाणे आपण गंगोत्रीपासूनची संपूर्ण गंगा पवित्र व महत्त्वाची मानतो, उलट पुढेच तिचा विकास अधिक झालेला पाहतो, तद्वत् धर्मगंगेचा हा विकास कुतूहलाने व आदराने पाहिला पाहिजे.

आज जागतिक सत्तेचे केंद्र हळूहळू पूर्वेकडे सरकत चालले आहे. चीन, जपान, कोरिया, हॉंगकॉंग ही राष्ट्रे उद्याच्या जगातील शांती निर्धारित करणार आहेत आणि म्हणून स्वतःच्या अस्तित्वासाठी भारताने आशियातील राष्ट्रांशी वेगवेगळ्या पातळीवर सलोख्याचे नातेसंबंध जोडणे आवश्यक होत चालले आहे. असे आज राजकीय अभ्यासक व निरीक्षक गांभीर्याने सांगू लागले आहेत. आश्चर्याची गोष्ट म्हणजे हे भान काकासाहेबांना फार पूर्वीच म्हणजे ज्यावेळी सत्ताकेंद्र पाश्चात्य राष्ट्रे होती तेव्हाच आले होते. हे एशियाई ऐक्य साधण्यासाठी हिंदी भाषाच माध्यमभाषा होऊ शकेल असा त्यांचा होरा होता. भारतीय लोक संपूर्ण एशियाई राष्ट्रांत पसरलेले आहेत. त्यांच्यापासून हिंदी रुजवणे सुरू केल्यास आशियाभर हिंदी 'संपर्कभाषा' म्हणून हळूहळू मान्य होईल असे ते म्हणत. 'योजकस्तत्र दुर्लभः' हेच शेवटी खरं ठरलं आहे. जपानहून परतताना ते एकदा चीनमध्ये राहिले. तेथील नेत्यांमध्ये बौद्ध संस्कृतीबद्दल जराही आदर उरलेला नाही याची त्यांच्या संस्कृति समन्वयक मनाने नोंद घेतली. पण लोकांच्या मनातील बुद्धसंस्कार नष्ट झालेले नाहीत असेही त्यांना जाणवले कारण राज्य वा समाजक्रांतीत मुळासकट नष्ट होईल इतकी संस्कृती तकलादू नसते हेही त्यांना ठामपणे ठाऊक होते आणि म्हणूनच चाऊ-एन-लायशी झालेल्या भेटीत काकासाहेबांनी त्यांना स्पष्ट सांगितले, "तुम्हाला रूसी साम्यवादाची गरजच नव्हती. तुमच्याजवळ बौद्धमत होते. त्यातील दोष काढून टाकले असतेत तर तुम्हाला देशी साम्यवाद मिळाला असता. बौद्ध साम्यवाद व आमचा गांधीप्रणीत अहिंसक साम्यवाद एकत्र येते तर साऱ्या जगाचा चेहेरा आपण बदलून टाकला असता."

तेथील दबावयुक्त राजकीय वातावरण व बौद्धधर्माची सत्तेकडून चाललेली अवहेलनाही काकासाहेबांना जाणवली. शेवटच्या दिवशी निरोपाच्या भाषणात त्यांनी सांगितले "तुमच्या पूर्वजांनी परकीय

आक्रमणापासून संरक्षण म्हणून भिंत बांधली. पण मी तर तिला विराट विफलताच म्हणेन. तिबेटी व भारत यात निसर्गाने हिमालयासारखी दुर्भेद्य भिंत उभी केली आहे. पण ही भिंतसुद्धा ह्यू-एन्-त्संगला इकडे येण्यास व इकडच्या बौद्ध भिक्षूंना तिकडे जाण्यास रोखू शकली नाही. कोणतीही मोठी भिंत विचारांना रोखू शकत नाही."

पं. नेहरूंना काकासाहेबांच्या परदेशी प्रवासाविषयी फार आस्था होती. तो सुखकर व्हावा म्हणून ते स्वतः प्रत्येक ठिकाणच्या राजदूतांना पत्रे देत असत. कारण त्यांच्या मते काकासाहेब केवळ प्रवासी नव्हते. ते भारतीय संस्कृतीचे राजदूत होते व विश्वसंस्कृतीचे संघटक होते.

एके ठिकाणी काकासाहेब म्हणतात, "भारतात माणसांना गुलाम म्हणून विकण्याची प्रथा नव्हती. तरीपण निग्रोंचा गुलामी व्यवहार थांबल्यावर, परकीयांना भारतीय माणसं गुलामासारखी राबवायला कशी मिळत गेली? खरे तर आपणाकडे राजा, समाजातील पुढारी व व्यापारी यांनी सामाजिक जबाबदारीविषयी नेहमीच उपेक्षा दाखवली आहे. कोण परकीय येतात? का येतात? कोणती प्रलोभने दाखवून आमची माणसं बाहेर कशी नेतात, नेल्यावर पुढे त्यांचे काय होते? ती कशी जगतात? त्यांच्यावर कोणते अत्याचार होतात ह्यांविषयी त्यांनी कधीही आस्था दाखवलेली नाही.वरिष्ठांच्या ह्या अनास्थेमुळेच खालच्या जातीची माणसं परदेशी गेली."

मॉरिशस भेटीत, मजूर म्हणून आलेल्या अनेक भारतीय लोकांना पाहून काकासाहेबांना वाटते, "परदेशी बरे दिवस येतील ह्या आशेने मजूर म्हणून आलेली ही माणसं परिस्थितीशी कसा सामना करतात, तो करताना त्यांच्यात कोणत्या शक्ती विकसित झाल्या? तेथल्या भूमीत त्यांनी आपली मूळं किती खोलवर पसरवली आहेत, तेथील लोकजीवनात ते किती मिसळले आहेत हे सर्व बघायला हवे. ईश्वरानेच ह्या छोट्यामोठ्या प्रयोगशाळांतून संस्कृतिसमन्वयाचे प्रयोग चालवले आहेत ते बघावे."

ते १९५८ मध्ये वेस्ट इंडीज, त्रिनिदाद, ब्रिटिश गिआना, सुरीनाम, मादागास्कर इ. ठिकाणी जाऊन आले. ह्या साऱ्या प्रवासांवर प्रवासवर्णनाची पुस्तके तर त्यांनी लिहिलीच आहेत, पण जोडीने संस्कृतिसमन्वय कसा साधला जातो ह्याचा अभ्यासही ते सतत करताना दिसतात.

अमेरिकेत ते गांधीवादी निग्रो नेते डॉ. मार्टिन ल्यूथर किंग यांच्या घरी दोन दिवस राहिले होते. प्रत्यक्ष गांधींबरोबर काम केलेला, त्यांच्या तत्त्वज्ञानाचा सक्रिय व्याखाता भेटल्यामुळे डॉ.किंग यांना खूप आनंद झाला. त्यांच्या पत्नी म्हणतात, 'मार्टिन यांची काकासाहेबांबरोबर जी सखोल चर्चा झाली, तीमुळे त्यांच्या जीवनप्रवाहाला एक नवेच वळण लागले. त्यांच्या नेतृत्वातील स्फूर्तिदायक तत्त्वांचा विकास झाला.'

भारतासारख्या प्राचीन संस्कृतीचा अभ्यासक असलेल्या काकासाहेबांच्या आगमनाने अमेरिकेला खूप लाभ होईल असा अमेरिकेतील लोकचळवळीच्या अनेक नेत्यांचा विश्वास होता. त्यामुळे वयाचे बंधन दूर सारून त्यांनी काकासाहेबांना अमेरिकेला बोलावले. अमेरिकेतील तत्कालीन अनेक जेष्ठ राजकीय नेते, सामाजिक संस्था, सांस्कृतिक चळवळींशी काकासाहेबांच्या भेटी घडविण्यात आल्या. जागोजाग त्यांची भाषणे व चर्चा झाल्या. यांबाबत 'टेक्निकल मिशन टु इंडिया' चे डेप्युटी डायरेक्टर –हेन्री नाईल्स म्हणतात-

अनुक्रमणिका

‘कोणत्याही परदेशी अधिकाऱ्याला दुर्मिळ असे भारताचे एक अनोखे दर्शन मला काकासाहेबांच्या घनिष्ट परिचयामुळे होऊ शकले.’

काकासाहेबांच्या व्यक्तित्वाइतकीच त्यांच्या ज्ञानपूर्ण व आत्मीयतापूर्ण भाषणांची छाप अमेरिकन जनतेवर पडत असे. याबाबतची एक आठवण अमेरिकन क्वेकर पंथाचे एक नेते— सेंट झेवियर्समधील इन्स्टिटयूट ऑफ इंडियन हिस्ट्री अँड कल्चरचे संचालक ए. ॲस्टेलर सांगतात, “ख्रिश्चन लोकांना हिंदू विचारशैलीची वैशिष्ट्ये चांगल्या तऱ्हेने सांगू शकेल असा वक्ता बी.बी.सी. ला हवा होता. मी तत्काळ काकासाहेबांचे नाव सुचवले. त्यांच्या भाषणाने बी.बी.सी. चे अधिकारी त्यावेळी खूप प्रभावित झाले. काकासाहेबांची मैत्री व सहवास मला लाभला ही मला फार अभिमानाची गोष्ट वाटते.’ अमेरिकेच्या प्रवासानंतर काकासाहेबांनी अमेरिकन जीवनाविषयी केलेली टिप्पणी फारच मार्मिक आहे. अमेरिकेच्या सहवासामुळे भारतात आधुनिकता येईल आणि भारतीय संस्कृतीच्या सखोल परिचयामुळे अमेरिकेत अध्यात्मिकता रुजेल असा भविष्याबद्दलचा अंदाज त्यांनी व्यक्त केला आहे.

काकासाहेबांनी प्रवासामुळे जगभर थोर ज्ञानी विचारी मंडळींचे मैत्र लाभले. त्यांच्यामुळे गांधीजींच्या तत्त्वज्ञानाचा प्रभाव पसरला. त्यांच्या समन्वयविचारांची सौहार्दाचे वातावरण निर्माण झाले. सखोल व दूरदृष्टीची समन्वयसाधकता असणारा अस्सल सांस्कृतिक राजदूत काय काय साधू शकतो ह्याचा हा वस्तुपाठच मानता येईल.

गांधीजी टॉलस्टॉयला आपला मानसगुरू मानत. काकासाहेब रशियात टॉलस्टॉयच्या समाधीचे दर्शन घेण्यासाठी गेले असताना, ह्या वस्तुस्थितीला अनुलक्षून म्हणाले—“आम्ही येथे परके म्हणून आलो नाहीत. तर भक्त म्हणून आलो आहोत. एक श्रद्धाळू तीर्थयात्री आपल्या परात्पर गुरूच्या भेटीला आला आहे.”

हिंदीचे प्रसिद्ध लेखक ‘विष्णू प्रभाकर’ आपली एक आठवण सांगतात. ते म्हणतात, ‘मास्कोतील शांती संमेलनाला मी काकासाहेबांबरोबर गेलो होतो. क्रेमलिनमधील कॉन्फरन्स भवनात दोनच व्यक्तींभोवती मनस्वी गर्दी जमली होती. एक चित्राविचित्र देशी पेहराव केलेली लॅटवियाची सुंदरी व दुसरे काकासाहेब. पांढरीशुभ्र दाढी व पोषाख यांमुळे ते एखाद्या प्राचीन ऋषीसारखे भासत होते.’

प्राचीन काळापासून भारतीय लोक मानव्याचा आदर्श म्हणून येथल्या ऋषिवर्गाकडेच पाहत आले आहेत. तो मान मुत्सद्दी, शूर यौद्धे, पराक्रमी सम्राट, सद्‌गुणी थोर पुरुष ह्यांना कधीच लाभला नाही. विशेष म्हणजे काकासाहेबांची ऋषितुल्य मूर्ती व आचरण स्वदेशातच नव्हे तर विदेशांतही आदरास पात्र होत गेले. प्राचीन कालापासून भारतीयांच्या मनात रुजलेला हा ऋषिवर्गाच्या आत्मबलासंबंधीचा आदर गांधीजींनीच पुन्हा जागृत केला होता. अफाट वाचन, चिंतन, अनुभव आणि ज्ञान व मुख्य म्हणजे उदारमनस्कता ह्या शिदोरीवर काकासाहेबांना परदेशी माणसांची मनं जोडून घेण्याची सिद्धी सहजसाध्य झाली. म्हणूनच ते सांस्कृतिक, धार्मिक, राजकीय समन्वयाचे उद्‌गाते म्हणून ओळखले जाऊ लागले. काकांनी सारे प्रदेश व भाषा यांतील चांगल्या बाबी व चांगुलपणा एका प्रदेशातून व भाषेतून अन्य प्रदेशात व भाषेत पोहोचवला. सांस्कृतिक मूल्यांच्या देवाण-घेवाणीचे बहुमोल कार्य केले. ते चिरप्रवासी, चिरयात्रिक होते. खऱ्या अर्थाने वेगवेगळ्या लोकांना व प्रदेशांना एकत्र आणणारे लोकदूत होते.

अनुक्रमणिका

त्यांच्या ह्या अतुल कार्याचा गौरव करावा म्हणून १९६५ मध्ये त्यांनी जेव्हा वयाची ८० वर्षे पूर्ण केली तेव्हा त्यांच्या मित्रांनी 'संस्कृति के परिव्राजक' नावाचा अभिनंदन ग्रंथ त्यांना अर्पित केला. अर्पण समारंभ राष्ट्रपतिभवनात होता. तिथे जाताना ह्यानंतर निवृत्ती स्वीकारायची व तशी घोषणा आज करायची असे ठरवून ते गेले होते. पण भवनात पाऊल टाकताच त्यांना एक अद्भुत अनुभव आला. एक अशरीरी आवाज त्यांच्या कानांत घुमला, 'अद्याप निवृत्ती नको. समन्वयाचा विचार देशासाठी महत्त्वाचा आहे. काम सुरू करा. कोणी ना कोणी येऊन पुढे उचलेलच.' आणि त्यानुसार वयाच्या ८० व्या वर्षी त्यांनी 'विश्वसमन्वय संघाची' स्थापना केली. पूर्वीसारखेच देशभर दौरे करून, भाषणे देऊन, लेखन करून, ह्या विचारांचा प्रचार ते आणखीही काही वर्षे करत राहिले. जणू गांधीजीच त्यांच्या देहात प्रवेशले असा भास त्यांना होत राहिला.

काकासाहेबांच्या ह्या प्रदीर्घ देशसेवेचे व समाजसेवेचे फळ अनेक मानसन्मानांच्या रूपाने उत्तरायुष्यात त्यांना लाभले. १९४६ साली अहमदाबादमध्ये त्यांच्या षष्ट्यब्दीपूर्तिनिमित्त अनेक समारंभ झाले. १९५८ साली गुजराती साहित्य परिषदेच्या अहमदाबाद अधिवेशनाचे ते अध्यक्ष झाले. १९६० मध्ये केन्द्रीय सरकारच्या हिंदी विश्वकोष समितीचे ते सदस्य म्हणून निवडले गेले. १९५२ व १९५८ मध्ये दोनदा राज्यसभेचे सन्माननीय सदस्यत्व त्यांना दिले गेले. १९६४ मध्ये पद्मविभूषण किताबाने सन्मानित केले गेले. १९६६ मध्ये जीवनव्यवस्था' ह्या निबंधसंग्रहास साहित्य अकादमीचे पारितोषिक मिळाले. १९७१ मध्ये अकादमीची फेलोशिप देऊन गौरविण्यात आले. गुजरात व काशी विद्यापीठांनी डी. लिट्.ची पदवी देऊन त्यांचा सन्मान केला.

सरकारदरबारी काकासाहेबांचे चांगले वजन होते. ज्या राष्ट्रभाषाप्रचार समितीशी त्यांचे तीव्र मतभेत झाले, त्यांनीच काकासाहेबांना १९५९ मध्ये आपला सर्वश्रेष्ठ महात्मा गांधी पुरस्कार देऊन व १९६८ मध्ये 'साहित्यवाचस्पति' असा पुरस्कार देऊन त्यांचा बहुमान केला. १९६१ मध्ये त्यांच्या पंचाहत्तरीनिमित्त, अहमदाबादमध्ये, 'कालेलकर अध्ययन ग्रंथ' अर्पित करण्यात आला. १९६५ मध्ये ८० व्या वाढदिवशी डॉ. राधाकृष्णन् यांच्या हस्ते, 'संस्कृति के परिव्राजक' नावाचा अभिनंदन ग्रंथ अर्पण करण्यात आला. १९७९ मध्ये त्यांच्या वयाच्या ९५ व्या वाढदिवशी त्यांच्या मित्रांनी 'समन्वय के साधक' नावाचा आणखी एक अभिनंदन ग्रंथ अर्पित केला. ह्यांव्यतिरिक्त अनेक संस्था-मंडळांवर त्यांची वेगवेगळया अधिकारांवर नियुक्ती झाली होती.

थोडक्यात सामान्यतः दुर्मिळ असणारे, राजमान्य आणि लोकमान्य असे कृतार्थ जीवन काकासाहेबांना लाभले.

अनुक्रमणिका

## ११.
## महाराष्ट्र व काकासाहेब

महाराष्ट्र व काकासाहेब यांच्यामधील गुंतागुंतीच्या भावसंबंधांची चर्चा एका स्वतंत्र प्रकरणात करणे आवश्यकच आहे.

काकासाहेबांचे बहुतेक वास्तव्य महाराष्ट्राबाहेर गुजरात, दिल्लीत झालेले; त्यांचे बहुसंख्य लेखन गुजरातीत. त्यांचे वर्ध्याच्या गांधी आश्रमातील वास्तव्य हे नावापुरते महाराष्ट्रातले म्हणायचे. कारण 'वर्धा आश्रम' हे एक स्वतंत्र राष्ट्रीय केन्द्रच होते.

काकासाहेबांनी गांधीजींचे गुरुत्व अनन्यभावाने स्वीकारलेले आणि गांधीजींचा व महाराष्ट्राचा पुष्कळसा अन्तस्थ दुरावाच होता. त्याची करणे अनेक आहेत. त्यांपैकी काही स्वतः कालेलकरांनीच 'ज्ञाननिधीच्या सान्निध्यात' – (रवीन्द्र केळेकर) मध्ये सांगितले आहेत. ते म्हणतात—"गांधीजींचे युगकार्य सुरू झाल्याबरोबर गांधीनिंदेचा एक मोठा कारखाना महाराष्ट्रात सुरू झाला. लोकमान्यांच्या प्रभावामुळे त्यांच्याकडे परावर्तित पुढारीपण आले होते त्यांना वाटले, गांधींनी आपले नेतृत्व हिसकावून घेतले. पुन्हा लोकमान्य जरी 'घटनात्मक राजकारण' चालवीत असले तरी मनापासून 'रणावीण स्वातंत्र्य' कोणा मिळाले' असेच मानणारे आणि गांधीजी तर 'रणावीण स्वातंत्र्य' मिळवायला निघालेले. ही गांधीजींची दोन मोठी 'पापे' त्यात भर म्हणजे गांधीजी 'गोखल्यां'ना गुरू मानू लागले. त्यामुळे तर लोकमान्यभक्त महाराष्ट्र गांधीजींवर नाराज होता. महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनात मतभेद व शिष्टाचार यांची सांगड घालून देणाऱ्या नेत्यांचा प्रभाव कधी पडलाच नाही. अर्थात्च ह्याचा परिणाम म्हणजे गांधींच्या शिष्यांविषयीही—मराठी शिष्यांविषयी तर- मराठी माणूस जास्तच कडवट बोलत असे."

काकासाहेबांच्या वाट्यालाही हा 'राग' भरपूर आलेला. ते म्हणतात, "महाराष्ट्रातील टिळकपंथीय, सावरकरपंथीय, आंबेडकरवादी व साम्यवादी, सर्वच गांधीविरोधक होते. गांधीवाद्यांचे व महाराष्ट्राचे कधीच जुळले नाही. पण प्रत्यक्ष गांधींवर प्रहार करणे शक्य नसल्याने गांधींच्या शिष्यांची उणीदुणी शोधून त्यावर हल्ला चढवत असतात. माझा मुलगा सरकारी कॉलेजात शिकला त्यामुळे माझ्या मराठी टीकाकारांना मला दांभिक ठरवायला चांगले निमित्त मिळाले."

पुढे काकासाहेब म्हणतात,"महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनाचा विशेष म्हणजे महाराष्ट्राने सगळ्यांना छळले आहे. सगळ्या संतसज्जनांना, समाजसुधारकांना महाराष्ट्राने छळले." मराठी माणसाच्या आणखी एका वृत्तीवर बोट ठेवताना प्रसिद्ध हिंदी लेखक प्रभाकर माचवे म्हणतात, 'महाराष्ट्राचा मोठेपणा असा की, त्याने विविध भाषिक प्रांतांना मराठी लेखक मिळवून दिले (काका, बेन्द्रे, पराडकर, मुक्तिबोध, देऊसकर इ.) पण बाहेर जाऊन ज्यांनी अन्य भाषा, प्रांत, देश, धर्म ह्यांत पराक्रम केला त्यांना महाराष्ट्राने जरा दूरच ठेवले. आपले मानले नाही.'

गांधी आश्रमातील कॉलऱ्याच्या प्रसंगी महाराष्ट्राने जी भूमिका घेतली, कोत्या मनाने गांधीजींवर जे आरोप केले त्यामुळे काकासाहेबही महाराष्ट्रावर नाराज झाले होते. काही काळ ते महाराष्ट्राशी रुक्षपणेच वागले. एवढा इतिहास मागे असूनसुद्धा काकासाहेबांचे महाराष्ट्राशी नाते अन्तस्थ जिव्हाळ्याचे होते.

अनुक्रमणिका

ह्याबाबत त्यांच्या मानसकन्या सरोजबेन नानावटी एका भेटीत मला म्हणाल्या, ‘मी एकदा काकांना प्रश्न केला,’ आपण महाराष्ट्राचेच दोष जास्त का दाखवता?’ त्यावर ते मला म्हणाले, “मी मूळचा मराठी. महाराष्ट्र मला जास्त जवळचा. पण ह्या आपलेपणातून नकळत अपेक्षा जास्त वाढतात. इतरांबाबत आपल्याला थोडी उदारता घेता येते. दुर्लक्ष साधते. महाराष्ट्राचे हृदय मी जाणतो. त्याने मोठ्या लोकांची नेहमीच कठोर परीक्षा घेतली आहे. अण्णासाहेब कर्व्यांना त्यांनी काय कमी त्रास दिला? पण त्याच महाराष्ट्राने कर्व्यांना पुढे महर्षिपद बहाल केले नाही का? माझी खात्री आहे की आज ना उद्या एक दिवस महाराष्ट्राला गांधीजींचे मोठेपण मान्य होईल आणि तेव्हा त्यांचे अनुसरण करण्यात तो सर्वांच्या पुढे राहील. आज सुद्धा महाराष्ट्राने गांधींजींना उत्तमोत्तम सहकारी दिलेले नाहीत का?”

गांधीजींना महाराष्ट्राविषयी असाच विश्वास होता. स्वतः काकासाहेबांनी गांधीजींचे ते उद्‌गार सांगितले आहेत. गांधीजी म्हणत, ‘माझा अहिंसेचा सिद्धान्त जर मला महाराष्ट्राला पटवून देता आला तर पुढची कोणतीच चिन्ता करण्याची मला जरूर राहणार नाही. मी खुशाल झोपी जाईन. केवढी कार्यशक्ती आहे त्या प्रांतात. पण काय करावे, महाराष्ट्रात श्रद्धेची उणीव आहे. पण हे लोक जे काम हाती घेतील ते पुरे केल्याशिवाय सोडत नाहीत. राष्ट्रसेवेसाठी जीवन अर्पण करण्याची उज्ज्वल परंपरा आहे ह्या प्रांतात.’

काकांनी महाराष्ट्र सोडला व ते गुजरातेत गेले ह्याला कारण गांधींचे नेतृत्व आपला स्वराज्याचा संकल्प पूर्ण करण्याला पर्याप्त आहे असा त्यांचा दृढ विश्वास झाला म्हणून; पण आणखीही एक कारण दिसते. पूर्वी ते बडोद्याच्या राष्ट्रीय शाळेत हेडमास्तर म्हणून गेले होते. त्यामागची आपली भूमिका सांगताना ते म्हणतात, “बरेच दिवसापासून माझ्या मनात येत असे की, मराठी माणसाचा इतिहास गौरवाचा आहे. इथल्या संतांनी तर भक्तिभावाची व समतेची शिकवण देऊन ऐहिक व पारमार्थिक जीवनध्येयाचा सुंदर मेळ साधला आहे. मराठी माणूस मनानेही संकुचित नाही. प्रांतीय अहंकार त्याचात फार कमी आहे. तरीपण बाहेरच्या प्रांतात मराठी माणसाची प्रतिमा चांगली नाही. ती दूर करायची असेल तर महाराष्ट्रीयांनी स्वतःला निर्यात केले पाहिजे. परप्रांती जाऊन सेवाकार्य केले पाहिजे.”

या भावनेने काकासाहेब गांधीजींमागोमाग गुजरातेत गेले. तेथील साबरमती आश्रमात मुलांना शिकवण्याचे काम करताना हळूहळू गुजराती शिकले. ज्यावेळी गांधींजींना ‘नवजीवन’ साप्ताहिकासाठी लिहायला वेळ नसे तेव्हा ते काम काकांना करावे लागे. त्यामुळेही त्यांचे गुजराती लेखन सुरू झाले व त्यात त्यांच्या समन्वयक प्रवृत्तीला काही गैरही वाटले नाही. ते आपल्या १९७१ मध्ये लिहिलेल्या ‘वासरी’ (आंतरजगातील यात्रा) च्या प्रस्तावनेत आपले मनोगत सांगतात.

“मी जन्माने मराठीभाषी. शिक्षणही महाराष्ट्रात. विशेष म्हणजे महाराष्ट्रीय संतांच्या आणि विरपुरुषांच्या मराठी साहित्याने संस्कारित झालो आहे. माझी मराठीभक्ती कमी नाही. पण हिंदी व गुजराती भाषेची भक्ती उत्कटपणे केली तर मराठीचा द्रोह होतो हे मला पटत नाही. मातृभक्तीने कधी शिकवले नाही की मावशीला परके मानावे. मावशीचे प्रेम मी उत्तम मिळवले आहे. पण राहिलो आहे आईजवळच. मी साहित्य लिहितो ते समाजासाठी. साहजिकच ज्या समाजात राहिले त्यांच्याच भाषेत लिहिणे अपरिहार्य ठरले. लेखनाची भाषा सोयीप्रमाणे निवडावी लागते. पण माणूस रोजनिशी लिहितो ती स्वतःसाठी. तो एक आत्मनेपदी साहित्यप्रकार आहे. मी ज्या अर्थी जन्माने महाराष्ट्रीय आहे त्या अर्थी माझी रोजनिशी मराठीतच लिहिणे योग्य वाटते.”

अनुक्रमणिका

काकासाहेबांनी गुजरातीला जवळ केले व ते मातृभाषेला विसरले, गौण मानू लागले, हे त्यांच्यावरील आरोप गैरसमजातून आलेले व म्हणून अनाठायी आहेत हे वरील विवेचनातून लक्षात येईल. ज्याला लोकसेवा करायची असते त्याला त्या लोकांची भाषा शिकणे अपरिहार्य असते. आपली भाषा त्याला मागे सारावीच लागते आणि तसे केले तरच तो लोकांच्या मनात स्थान मिळवू शकतो. हे त्यांनी स्पॅनिश मिशनरी फादर वालेस ह्याची ओळख इतरांना करून देऊन स्पष्ट केले होते.

काकासाहेबांचे गुजराती पुढे विकसित होत गेले. तेव्हा गांधीजी त्यांना कौतुकाने “सवाई गुजराती” म्हणत. त्याबद्दलही काकासाहेबांना रास्त अभिमान वाटत राहिला. कारण त्या द्वारे, भाषाभिगीनींत सामंजस्य स्थापन करण्याच्या त्यांच्या समन्वयवादी धोरणातील त्यांची भूमिका पार पडत होती. “यात्रा का आनंद” ह्या आपल्या पुस्तकातील ‘आशियात भारताचे स्थान’ ह्या लेखात ते म्हणतात, “ज्याप्रमाणे अधिकांश जीवन महाराष्ट्राच्या बाहेर काढून एका प्रकारे मी महाराष्ट्राची अनन्यनिष्ठेने सेवाच केली, त्याप्रमाणे दुनियेतील अनेक देशांच्या बरोबर हार्दिक प्रेमाची व आत्मिक ऐक्याची साधना करून मी भारताचीच भक्ती केली आहे. आपल्या देशाच्या बाहेर जाऊन विशाल मानवपरिवाराचा अनुभव घेतल्यावरच आपल्या देशाचा खरा साक्षात्कार होतो.”

कार्यबाहुल्यामुळे पुढेपुढे त्यांना स्वतः मराठीत लिहिण्यास वेळ मिळत नसे. स्वतः हाताने लिहिण्याची मनस्वी कंटाळा असल्यामुळे व हाताशी गुजराती लेखनिक सहज उपलब्ध असल्याने, गुजरातीतून लेखन जास्त होत गेले. तथापि आपल्या प्रवासवर्णनातून त्यांनी जे महाराष्ट्रदर्शन घडवले आहे ते साहित्यमूल्य म्हणून तर उत्तम आहेच, पण त्यातून ठायीठायी त्यांची महाराष्ट्राविषयीची आत्मीयता, जिव्हाळा व अभिमान डोकावत असतात. आपला ‘खेळकर पाने’ हा अप्रतिम ललित निबंधसंग्रह त्यांनी महाराष्ट्राच्या निसर्गालाच अर्पण केला आहे. त्या अर्पणपत्रिकेत ते म्हणतात, “महाराष्ट्राच्या ज्या निसर्गाने मला निरीक्षणाची बालपणीच गोडी लावली आणि महाराष्ट्राच्या ज्या संतकवींनी मला संस्कारिता दिली, त्यांचेविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी मी असल्या निबंधांहून दुसरे कोणते अर्घ्य वापरणार?”

इथे आपल्या जडणघडणीतले महाराष्ट्राचे ऋण काकासाहेबांनी मनमोकळेपणे व्यक्त केले आहे; जे प्रेम भूमीबद्दल तेच अंगभूत प्रेम मराठीबद्दल त्यांच्या अन्तर्यामी वसत असावे.

कर्नाटकातील गोमटेश्वराच्या दर्शनाला ते गेले असताना बाहुबलीच्या मूर्तीखाली खोदलेली दोन वाक्ये त्यांनी पाहिली. वाक्य एकच होते. पण एक जुन्या कानडी लिपीत तर दुसरे वाक्य जुन्या नागरी लिपीत खोदलेले होते. ह्यावरून ह्या दोन्ही भाषा व दोन्ही लिपी एकाच काळी सख्ख्या बहिणींसारख्या वावरत असाव्यात अशा निष्कर्षाप्रत ते पोहोचले. पुढे ते म्हणतात, “माझ्या गोड, साध्याभोळ्या मराठी भाषेचे हे द्विविध दर्शन पाहून मी सद्‌गदित झालो. मराठी भाषेचा उगम इथूनच झालेला. मराठीच्या ह्या गंगोत्रीत न्हाऊन मी पावन झालो.”

‘चरित्र संकीर्तन’ ह्या ग्रंथात त्यांनी भारतसेवक गोखले, डॉ.भांडारकर, कोशकार प्रा. नीलकंठ बाबाजी रानडे, उपन्याससम्राट वा. म. जोशी, इतिहाससंशोधक राजवाडे, मातृभक्त नाना आठवले, यादवाडकर पटवर्धन, पुण्यश्लोक पंडितजी विष्णू दिगंबर पलुस्कर, सेवामूर्ती गोविंदराव याळगी, चरित्रघनसेवामूर्ती पांडुरंग भुर्के, प्रतिभाशाली शीघ्र लिपिकार गजानन दाबके, भारतीय लोकतंत्राच्या विशुद्ध

परंपरेचे आद्य संस्थापक सेवाकुशल दादासाहेब मावळंकर इ. मराठी मंडळींवर फार सुंदर भावपूर्ण लेख लिहिले आहेत. न्या. रानडे व नामदार गोपाळराव गोखले ह्यांचे आपल्यावरील ऋण त्यांनी बऱ्याच ठिकाणी स्पष्टपणे नमूद करून ठेवले आहे.

'नारी जीवन परिमल' ह्या नावाने लिहिलेल्या स्त्री-व्यक्तिरेखाटनात,आपल्या प्रिय आई व बहिणीव्यतिरिक्त, अध्यात्मिक संस्कृतीची सेवक रामदासशिष्या वेणूबाई, मराठी स्त्री जातीतील सर्वोत्तम कन्यारत्न बहिणाबाई, ताराबाई मोडक आदी मराठी स्त्रियांची आदरपूर्वक रेखाटलेली चित्रणे वाचताना काकासाहेबांचे मराठी संचित प्रकर्षाने जाणवते.

'लोकमाता' ह्या अपूर्व पुस्तकात महाराष्ट्रातल्या नद्या, भारतदर्शन ह्या पुस्तकात महाराष्ट्र भूमी, महाराष्ट्रातली नवी जुनी शहरे, किल्ले, देवस्थाने, तीर्थस्थाने ह्यांची चित्रे रेखाटताना, त्या त्या स्थळांचा भूगोल, इतिहास, सांस्कृतिक वैशिष्ट्य, निसर्ग व साऱ्यांतून उमलणारे सखोल चिंतन, ह्या साऱ्याचा एखाद्या जरतारी पैठणीसारखा सुंदर पट विणला गेला हे. काकासाहेबांच्या नजरेतून, महाराष्ट्राचे भूत – वर्तमान – भविष्य उलगडलेले पाहताना, महाराष्ट्राची बलस्थाने व मर्मस्थाने न्याहाळताना, आपल्याला आपल्याच महाराष्ट्राची ओळख नव्याने झालीशी वाटते. काकासाहेबांचे हे महाराष्ट्रावरचे ऋणच होय. पण हे सारे उभे करताना त्यामध्ये, काकासाहेब व्यापक भारतीय संदर्भ-सूत्र कधीच सुटू देत नाहीत, हे त्यांचे फार मोठे वैशिष्ट्य आहे. शिवाय त्यामुळे त्यांच्या महाराष्ट्रदर्शनाला एक व्यापक परिप्रेक्ष्यही लाभते.

'संत-मानस तुकाराम' ह्या आपल्या पुस्तकात तुकारामाच्या निवडक ३६ अभंगांवर त्यांनी रसाळ निरूपण केले आहे. सुरुवातीला ते म्हणतात, "महाराष्ट्रभूमीवर ईश्वराची विशेष कृपा दिसते. इथे इतके श्रेष्ठ संत निर्माण झाले की कुणीही हेवा करावा. त्यातील ज्ञानदेव व तुकाराम ही नावे सर्वांत जास्त पसंत आहेत. कारण त्यांच्या पोटात सर्व संत सामावले आहेत." तुकारामाविषयी पुढे ते लिहितात "त्याची वाणी अर्थ समजण्यासाठी नसून जीवन –रहस्य समजून घेण्यासाठी आहे." त्यांचे हृदय रामदासांना पण वगळू शकत नाही. रामदासांच्या श्लोकांवर त्यांनी 'मनोबोध' नावाचे पुस्तक लिहिले आहेच.

महाराष्ट्रातील संत जीवनाचे काकासाहेबांनी किती सखोल परिशीलन केले होते व त्यांचा संस्कार काकांवर किती उत्कट होता हे अशा अनेक संदर्भातून लक्षात येते.

आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीतही काकासाहेबांचे योगदान जसे मोठे आहे तेसेच वैशिष्ट्यपूर्णही आहे.

कविवर्य बोरकरांनी देखील काकासाहेबांचे रसिक व मौलिक प्रोत्साहन लाभले होते. त्यांच्या 'दूधसागर' ह्या १९४७ मध्ये प्रकाशित झालेल्या काव्यसंग्रहाची, काकासाहेबांनी लिहिलेली समग्र प्रस्तावना ह्या दृष्टीने वाचण्यासारखी आहे. त्यात एके ठिकाणी ते म्हणतात, "संस्कृत शृंगारिक साहित्य भोगप्रधान आहे. पण त्यात संस्कृत संस्कारिता असल्यामुळे ते अभिजातच वाटते. ती संस्कारिता गेल्याने शाहिरीकाव्य थोडे घसरले. बोरकरांत हा तोल पुन्हा साधला गेला आहे. त्यांचे शृंगारिक काव्य जास्त भावनाप्रधान आहे. भोगाचे तिला वावडे नाही. पण ती भोगवृत्ती अभिजात आहे. जीवनप्रवाह विकृत होऊ न देता, जीवनात सर्वत्र भरलेल्या सौंदर्याचा आस्वाद घेणारे रवीन्द्रनाथ हे एक जीवनसाधक होते. हाच आदर्श बोरकरांनी स्वतःपुढे

अनुक्रमणिका

ठेवलेला दिसतो..... आज त्यांची कविता रसपरिपक्व असली तरी तिने स्वतःचा उच्चांक गाठलेला नाही. अनुभूतिसमृद्ध जीवनातूनच समाजाचा युगात्मा व्यक्त होत राहतो. तो युगात्मा कवी बोरकरांना पसंत करो हीच प्रार्थना." बोरकरांच्या कवितेचा वरचेवर रसिकतेने व कौतुकाने आस्वाद घेणाऱ्या काकासाहेबांनी तिचे बलस्थान तर मार्मिकपणे टिपले आहेच, पण त्याचबरोबर तिला गाठता येण्यासारख्या उंचीचे दिशासूचनही केले आहे व प्रेरणाही अचूकपणे दिली आहे.

बोरकर तर काकासाहेबांना आपले गुरूच मानत. कवी मंगेश पाडगावकरांनी १९६० मध्ये संपादित केलेल्या 'बोरकरांच्या कविते'त एक कविता आहे. 'गुरुवर अनुसर रे' पाडगावकर मला म्हणाले, 'ही कविता काकासाहेबांना उद्देशून लिहिली आहे आणि हे मी खात्रीने म्हणतो, ह्यांचे कारण ती कविता लिहिली तेव्हा मी तिथेच, म्हणजे वर्ध्याला काकावाडीतच होतो. ह्या कवितेतून बोरकरांचा कालेलकरांविषयी आदर व भक्ती प्रकट होते.'

'गुरुवर अनुसर रे मन, गुरुच्या ठायी 'दत्त' निरंतर ब्रह्मा हरिहर रे!' ह्यातील दत्त शब्दातून काकासाहेबांचे 'दत्तात्रय' नाव सूचित झालेले आहे. बोरकरांनी प्रस्तावनेत म्हटले आहे, "झाला तो प्रवास साधकावस्थेचा झाला. 'सिद्धप्रज्ञेचे नि लाभे मनचि सारस्वत दुभे' अशी अवस्था येईल तोच खरा सोनियाचा दिवस. काकासाहेब, वा.म.जोशी, न.चिं. केळकर— अशा अनेक जेष्ठ आणि श्रेष्ठ साहित्यिकांनी, माझ्या कवितेबद्दल आशेचे, कौतुकाचे उद्‌गार काढून माझ्या एकाकी साधनेत मला धीर दिला."

बोरकरांच्या अप्रकाशित आत्मचरित्रातही काकासाहेबांच्या मार्गदर्शनाचे कृतज्ञ उल्लेख जागोजागी वाचावयास मिळतात. एके ठिकाणी ते म्हणतात "एकदा मी काकासाहेबांना म्हणालो, 'गांधीदर्शनात सत्य व शिवाचा जसा विचार आहे तेवढा सुंदराचा दिसत नाही.' त्यावर त्यांनी मला सांगितले, "गांधीजी सौंदर्याबद्दल क्वचितच बोलले असले तरी त्यांचे जीवन सर्वांगसुंदर आहे. ते कर्मयोगी आहेत. त्यामुळे त्यांच्या शब्दांपेक्षा त्यांचे कर्म अधिक प्रेरणादायी आहे. गांधी, टागोर आणि अरविंद या तिघांचे आश्रम ही नवभारताची तीन प्रमुख तीर्थस्थाने आहेत. त्यांच्या विचारधारा ह्या आजच्या आपल्या गंगा, यमुना, सरस्वती आहेत. तुमच्यासारख्यांनी आपल्या जीवनात त्यांची त्रिवेणी साधली पाहिजे. यासाठी ह्या तीन आश्रमांची वारी तुम्ही कराच. मात्र ही 'देवमाणसे' असली तरी 'माणसे' आहेत, देव नाहीत हे लक्षात ठेवा." पुढे बोरकर म्हणतात— 'काकासाहेबांचा कृपाप्रसाद असा मला नेहमीच लाभत राहिला. त्यांच्यामुळेच मला गांधींजींचे जवळून दर्शन घेता आले.' (पृष्ठ १३४)

काकासाहेबांप्रमाणे बोरकरही गांधीजींच्या व्यक्तिमत्त्वाने भारले गेले. 'अंतरी तंबोरा लागल्यागत ते हाती घेतलेल्या कामात निमग्न असत.' अशी गांधींविषयी सुंदर प्रतिक्रिया त्यांनी नोंदवलेली आहे. ह्यातूनच गांधींजींच्या जीवनावर 'महात्मायन' नावाचे महाकाव्य लिहिण्याची प्रेरणा त्यांना झाली. दुर्दैवाने ते पूर्ण होऊ शकले नाही. "इये मराठीचियेनगरी, गांधीजी"— ह्या आपल्या प्रबंधात लेखक अनंतराव जगताप म्हणतात— 'मराठी साहित्यातील गांधीवादी प्रेरणांचा मुलस्त्रोत पुष्कळदा काकासाहेबांशी भिडलेला दिसतो. बोरकरांचा १८००० ओव्यांच्या 'महात्मायन' काव्याचा संकल्प कालेलकरांच्या प्रभावातून आला असावा. बुद्ध आणि येशू ह्यांचा सुंदर समन्वय असलेली गांधीजींची व्यक्तिरेखा कालेलकारांच्या गांधीभक्तीतून बोरकरांच्या मनात पुष्ट होत गेली असेल का?' असा भावात्मक प्रश्न जगतापांनी मांडला आहे.

अनुक्रमणिका

ह्या संदर्भात स्वतः कवी मंगेश पाडगावकर भरभरून बोलले. म्हणाले... 'त्यावेळी मी लहान होतो. माझा एकच काव्यसंग्रह (धारानृत्य) प्रसिद्ध झालेला. तोही तसा फारसा गाजला नव्हता. पण काकांनी मला प्रोत्साहन दिलं. ते खूप मनःपूर्वक माझ्या कविता ऐकत. म्हणून घेत, दाद देत. त्या काळात एवढ्या मोठ्या माणसानं दिलेली दाद फार मोलाची होती. त्यांनी मला फार सन्मानानं वागवलं. कलावंतांविषयी, प्रतिभावंतांविषयी काकासाहेबांना प्रचंड आकर्षण होतं. मीरा, सूरदास व कबीर मराठीत आणायची सूचना त्यांनीच मला केली होती.'

पुढे १९६५ मध्ये 'मीरा' हा पाडगावकरांचा भावानुवाद प्रसिद्ध झाला. त्याला काकासाहेबांनी अतिशय अभिजात व विश्लेषक प्रस्तावना लिहिली आहे. त्यात काकासाहेब म्हणतात, "सर्व संतांत तुकाराम व मीरा ह्यांचे मला असाधारण आकर्षण आहे. खरं तर दोन्ही व्यक्तिमत्त्वे सर्वस्वी भिन्न आहेत. जीवनक्रमही भिन्न आहे. पण स्वतःच्या अनुभूतीविषयी अपार निष्ठा बाळगण्यात दोघांमध्ये अद्भुत साम्य आहे.. भारतीय नारीजातीच्या हृदयाला व्यक्त करणारी मीरेची कविता आजवर मराठी भाषेत आली नाही हेच आश्चर्य. प्रेमभक्तीचा, मधुराभक्तीचा हा दरवाजा शृंगाररसाच्या वाढत्या आवडीच्या काळात पाडगावकरांना उघडावासा वाटला ही आनंदाची गोष्ट आहे. हिंदी साहित्यातली अध्यात्मिक संपदा भारतभर पसरली पाहिजे. तिचा हा शुभारंभ आहे."

काकासाहेबांच्या सूचनेनुसार कविवर्य पाडगावकरांनी कबीराचा भावानुवादही पूर्ण केलाय. शिवाय सूरदास मराठीत आणायचा संकल्पही सोडलेला आहे. हे अनुवाद म्हणजे काकासाहेबांच्या प्रेरणादायी समन्वयसाधक वृत्तीचे संपन्न फलित नव्हे काय? पुढे आपल्या 'खेळकर पाने' ह्या ललितसुंदर निबंधसंग्रहाला काकासाहेबांनी मंगेश पाडगावकरांकडून प्रस्तावना लिहून मागितली. पाडगावकर म्हणतात, 'एवढ्या मोठ्या साहित्यिकाच्या पुस्तकाला प्रस्तावना लिहिण्याचे धाडस करण्याचा प्रथम मला संकोच वाटला. पण आपल्या स्नेहगुरूच्या मागणीचा अव्हेर करणे उचित वाटेना.' आणि म्हणून त्यांनी 'खेळकर पाने' ह्या संग्रहाला तितकीच मार्मिक, कृतज्ञ व रसपूर्ण प्रस्तावना लिहून दिली. एक तरुण नवकवी पाहता पाहता साहित्यपंढरीत काकासाहेबांच्या पायरीवर येऊन स्थिरावला. ह्या विकसनाचा उत्थानबिंदू काकासाहेबांच्या रसिक गुणग्राहकतेशी टेकलेला आहे ही स्मरणीय बाब आहे. बोरकरांप्रमाणे कवी अनिलही काकासाहेबांकडे येत असत व त्यांच्यात मनमोकळ्या आणि मिस्कील गप्पा व चर्चा चालत असत, असे पाडगावकर सांगतात.

ह्या दृष्टीने 'दिवे लामणदिवे' ह्या पुस्तकात रवीन्द्र पिंग्यांनी काकांवर लिहिलेल्या लेखातला एक परिच्छेद वाचण्यासारखा आहे. पिंगे लिहितात, 'गुजरातमधील अनेक लेखकांना काकासाहेबांनी ऐन निगराणीच्या काळात खतपाणी घातलं. तद्वत पु.मं.लाड ह्या साहित्यप्रेमी मराठी सनदी अधिकाऱ्याला दिल्लीत योग्य आसन कुणी मिळवून दिलं? काकांनी! दूधसागराच्या परिसरातल्या नारळीपोफळीच्या आगरात गुरफटलेल्या बोरकर कवींना गोवामुक्तिसंग्रामाच्या निमित्ताने बाहेर काढून त्यांना राष्ट्रीय पातळीवर झोकून द्यायला कुणी लावलं? काकांनीच. शिक्षणाला टाळं ठोकून बेघरावस्थेत फिरणाऱ्या नरेश मंत्रीला वर्ध्याला आपल्यापाशी थारा दिला काकांनी. त्याच्यावर आईचं प्रेम केलं नि बौद्ध भिक्षूंबरोबरच्या सत्संगासाठी व भारत-जपान संस्कृतिसंपर्क वाढवण्यासाठी त्याला जपानला पाठवलं. हात हलवीत गेलेल्या बहुभाषिक नरेशनं पुढं जपानी भाषा नि साहित्य आत्मसात करून तिथल्या विद्यापीठाची डी.लिट्. पदवी मिळवली. काका त्याला कधीच न भेटते तर? गळ्यात संसार आहे नि नोकरी-धंदा तर नाही अशा त्रिशंकू अवस्थेतल्या तेव्हाच्या तरुण मंगेश पाडगावकरला काकांनीच हात धरून वर्ध्याला काकावाडीत नेलं. हिंदी साहित्याचा

मुक्त स्वाध्याय करण्यासाठी छोटीशी मासिक शिष्यवृत्ती वळती केली. निश्चिंत केलं आणि मुख्य म्हणजे त्या कवीला लिहितं केलं. टवटवीत ठेवलं.'

रवीन्द्र पिंगे आपल्या ह्या लेखाच्या शेवटी म्हणतात, 'चराचरांत थबथबलेलं चैतन्य- तत्त्व निरखून पाहण्याचे, आणि शक्य तर त्याची यथामति शाब्दिक नोंद करून ठेवण्याचे एक-दोन अहंकारशून्य पाठ देऊन काकांनी आमच्या हृदयात सदाची दिवेलागण करून टाकली.' पिंग्यांचे प्रवासप्रेम, त्यांची प्रवासवर्णने शब्दबद्ध करण्यातला आनंदोत्साह व त्यांची शैली, हिच्या मागचा काकांचा प्रभाव त्यांनीच मान्य केलेला आहे.

काकासाहेबांच्या सहवासात घडलेले आणखी एक महत्त्वाचे लेखक म्हणजे श्रीपाद जोशी. श्रीपाद जोशी काकासाहेबांचे स्वीय सचिव म्हणून अनेक वर्षे काकासाहेबांबरोबर राहिले. ह्या काळात काकासाहेबांच्या व्यक्तिमत्त्वातले काही कंगोरे त्यांना दुखवून गेल्याचे त्यांनी आपल्या आत्मचरित्रात (उलगाउलगा) नमूद केले आहे. ह्यातील व्यक्तिमत्त्वभिन्नतेचा, अपेक्षाभिन्नतेचा भाग सोडून दिला तरी, लेखक बनण्यात काकासाहेबांचे आपल्यावर किती ऋण आहे हे त्यांनीही मोकळेपणाने सांगितले आहे. ते म्हणतात,—'काकासाहेबांनी मला ज्या राष्ट्रभाषाप्रचाराच्या कामात गुंतवले, ते माझ्यातल्या सुप्त साहित्यिकाला अनुकूल ठरले... त्यांच्यामुळे गांधीजी व इतर श्रेष्ठ व्यक्तींशी संपर्क आला. साहित्यविषयी प्रेम मनात रूजलं. शब्दांच्या सामर्थ्यावरील विश्वास दृढ झाला. त्यांच्या सहवासात साहित्यनिर्मितीच्या क्षीण प्रेरणेला खतपाणी मिळून ती अंकुरली. मातृभाषेच्या कोशात न राहता फुलपाखरू बनून इतर भाषांतील साहित्याचा रसास्वाद घ्यायला शिकलो. इतर भाषा आत्मसात करून त्यात लेखन करायला त्यांच्यामुळेच शिकलो. ह्या भाषाशिक्षणाचा भावी आयुष्यात मला खूप उपयोग झाला. सर्वभाषासमभावनं माणसाचं मन व्यापक बनतं. त्यातून त्याचा विकास होतो. जातिधर्मांच्या बाबतीतही अशीच गोष्ट घडली.सर्व जातिजमातींविषयी एक प्रकारचा आपलेपणा माझ्या मनात निर्माण होण्यास काकासाहेबांच्या भोवतालचं सर्वधर्मसमन्वयाचं वातावरण बऱ्याच अंशी कारणीभूत झालं.त्याचप्रमाणे मला प्रवास व प्रवासवर्णनाची प्रेरणा काकासाहेबांकडून मिळाली.'

श्रीपाद जोशींनी मराठी माणसावरील काकासाहेबांच्या संस्काराचा एक वेगळा पैलू सांगितला आहे. ते म्हणतात, 'आनंदयात्री रवीन्द्रनाथांच्या अनेक कथा, कवितांचा जीवनप्रेमी काकासाहेबांनी मराठीतून अनुवाद केला आहे. त्याचे पुस्तकांचे स्वागत मराठी माणसांनी फारसे केलेले नसले तरी, जीवनाकडे रसिकतेने पाहण्याचा रविन्द्रांचा दृष्टिकोन मराठी वाचकांना परिचित करून देण्यात काकासाहेबांचा महत्त्वाचा वाटा आहे.'

रवीन्द्रनाथांच्या 'गीतांजली'ला १९१८ साली नोबेल पुरस्कार मिळाला. त्यानंतर अनेक मराठी लेखक व कवी रवीन्द्रनाथांकडे आकर्षित झाले. हरिभाऊ आपटे, गोविंदराव कानिटकर वगैरे अनेकांनी गीतांजलीचे पद्य-गद्य अनुवाद केले; पण रवीन्द्रांचा तरल व गूढ सौंदर्यवाद कुणालाच फारसा पेलता आला नाही. मात्र काकासाहेबांच्या मनाच्या तारा रवीन्द्रनाथांशी खूपशा जुळणाऱ्या असल्यामुळे रवीन्द्रनाथांच्या काव्यातला 'गाभा' काकांच्या रसिक लेखणीला खूपसा उलगडून दाखवला आहे. त्यामुळे रवीन्द्रांच्या गुढमधुर काव्याची ओळख व गोडी काकासाहेबांमुळे महाराष्ट्रात रुजली,असे म्हणता येते.

अनुक्रमणिका

काकासाहेबांकडून प्रेरणा घेतलेला आणखी एक थोर लेखक म्हणजे पं. महादेवशास्त्री जोशी. काकासाहेबांचे निकटवर्ती अनुयायी व लेखक श्री. रवीन्द्र केळेकर आपल्या पत्रात लिहितात, 'काकासाहेबांची प्रवासवर्णने मराठीत अनुवादरूपाने अवतरली असली तरी त्यावर त्यांचा हात फिरलेला आहे.त्यामुळे ती मराठीच मानायला हरकत नाही.हीच प्रवासवर्णने वाचून पं. महादेवशास्त्री जोशींना प्रवासवर्णने, किल्लेडोंगरांची भ्रमणे शब्दबद्ध करण्याची प्रेरणा लाभली.' लक्ष्मीबाई टिळकांचे नातू व स्वतः लेखक असलेले श्री. अशोक टिळक सांगतात, 'स्मृतिचित्रे' ची अभिनव आवृत्ती काकांना आवडली. त्यांनी मला लिहिले_ "एवढ्याने आमचे समाधान होत नाही. पुढील गोष्टी सांगणारे एखादे पुस्तक मिळेल का?" मी लिहिले 'एका अटीवर. पुरस्कार आचार्य 'कालेलकरांचा हवा.' पुढे 'शांतिसदन' ह्या माझ्या पुस्तकाला त्यांचा पुरस्कार लाभलाही. पण त्यावेळी त्यांनी नव्वदी ओलांडलेली. थकले होते. म्हणून म्हणाले 'थोडे शब्द पाठवतो. आशीर्वाद म्हणा.' त्यांनी लिहिले, "सर्वधर्मसमन्वयाला अनुकूल असे एक संस्कारी कुटुंब म्हणून ह्या कुटुंबाविषयी मला आदर आहे. सर्वच कुटुंबीयांची रसिकता व उदारता कौतुकास्पद आहे"...

महाराष्ट्राच्या प्रागतिक घडणीत काकासाहेबांचा अप्रत्यक्ष प्रभाव कसा पडला आहे ह्याची आणखी एक नोंद सापडते.भारताचे राजदूत म्हणून सत्तावीस वर्षे विदेशात काम केलेले औंधचे उत्तराधिकारी आप्पासाहेब पंत, 'समन्वय के साधक' ह्या अभिनंदनग्रंथात काकासाहेबांना आदरांजली वाहताना लिहितात, 'श्री. काकासाहेब व माझे पिताजी यांचा परिचय खूप जुना होता. त्यांनी राजपदाचा त्याग करून राज्याचा 'प्रथम सेवक' म्हणून राहण्याचे ठरवल्यावर ते सेवाग्राममध्ये गांधीजींचे मार्गदर्शन घेण्यासाठी गेले होते.त्या आठवड्यात राज्यत्यागाच्या तात्त्विक व आध्यात्मिक पैलूंबाबत त्यांची व काकासाहेबांची रोज चर्चा चालत असे.. ह्या संस्मरणीय भेटीनंतर जेव्हा जेव्हा मी सेवाग्रामला जात असे तेव्हा तेव्हा काकासाहेबांचे सच्चे व प्रेरक मार्गदर्शन घेत असे. १९४२ मधील 'भारत छोडो' आंदोलनाचे वेळी आमचे औंध संस्थान प्रतिसरकारचे केन्द्र बनले होते. त्यावेळी वेगवेगळे नेते आमच्या औंधमध्ये आश्रय घेत असत. त्यावेळी काकासाहेबांच्या प्रबोधक मार्गदर्शनाने आमच्या आंदोलनाला उद्दिष्टांची योग्य दिशा दाखवली होती..... आफ्रिकेतील त्यांचे सहा महिन्यांचे वास्तव्य, राजदूत म्हणून मला फार प्रेरणादायी वाटले. त्यांनी दिलेल्या आधारशीलेवर काम करणे मला जीवनभर सोपे गेले. म्हणून मी व्यक्तिशः त्यांचा ऋणी आहे.'

महाराष्ट्रातील एक प्रसिद्ध गांधीवादी लेखिका मृणालिनी देसाई आपला अनुभव असा सांगतात, 'काकासाहेबांच्या बरोबर अनेकदा भेट व बातचीत होई. दर वेळी अनुभव येई, आपण दर भेटीत अधिक समृद्ध होऊन परत जातो आहोत. माझं माहेरचं 'धनेश्वर' नाव सार्थ होतंय असं वाटे. 'सहजानंद' हा जीवनाचा मूलमंत्र मला काकासाहेबांकडूनच मिळाला आहे. निराशा, विफलता वगैरे शब्द तर जणू त्यांच्या कोशात लिहिलेलेच नव्हते. त्यांच्या आनंदरूप अस्तित्वात माझ्यासारख्या भेटायला गेलेल्यांची निराशा पण विरघळून जात असे.'

काकासाहेबांचे महाराष्ट्रात फारसे वास्तव्य झालेले नाही.त्यामुळे महाराष्ट्रातील संस्थांशी संस्थापक व प्रेरक म्हणून त्यांचा प्रत्यक्ष संबंध जरी आलेला नसला तरी राष्ट्रीय शिक्षणाबाबत त्यांनी वेळोवेळी दिलेल्या व्याख्यानांतून महाराष्ट्रातील अनेक शिक्षक,शिक्षणतज्ज्ञ व शिक्षण संस्था यांच्यावर त्यांचा प्रभाव पडलेला होता हे आपण पाहिलेच आहे.

अनुक्रमणिका

ह्या संदर्भात आचार्य दादा धर्माधिकाऱ्यांचा, त्यांच्या 'पहाटतारे' ह्या पुस्तकातील काकासाहेबांवरील लेख वाचण्यासारखा आहे. काकासाहेबांपेक्षा दादा बरेच लहान होते. ते राष्ट्रीय शिक्षण देणाऱ्या शाळेतून शिक्षकाचे काम करत होते. एकदा काकासाहेब त्यांच्या शाळेत भाषण द्यायला आले होते. त्यातले काही विचार, विशेषतः इंग्रजी हटवण्याबाबत, दादांना पटले नाहीत. त्यांनी आपली भूमिका नम्रपणे काकासाहेबांपुढे मांडली. पुढे ते लिहितात, 'त्यांच्या मनात तीव्र विरोध असूनही त्यांनी माझे म्हणणे उदारपणे व शांततापूर्वक ऐकले. या बौद्धिक उदारतेला मी बुद्धिनिष्ठेचे प्रमुख लक्षण मानतो... काकासाहेबांचे भंडाऱ्याला राष्ट्रीय शाळेतील भाषण ऐकल्यावर, त्यांची राष्ट्रीय शिक्षणाची कल्पना किती व्यापक व विशाल होती हे मला समजून आले.... गुजरात विद्यालयातील 'राष्ट्रीय- शिक्षण सामेलना'त काकासाहेबांनी राष्ट्रीय शिक्षणाच्या विविध अंगप्रत्यंगांची व्याप्ती व विश्लेषण, यांचे जे विवेचन केले त्यामुळे मी फारच प्रभावित झालो..... काकासाहेबांच्या सोबत हिंदीचा प्रचार करण्यासाठी.... अनेक प्रांतांतून हिंडण्याचा सुयोग प्राप्त झाला. काकासाहेबांचे व्यक्तिमत्त्व एखाद्या जिवंत, चालत्याबोलत्या शब्दकोशासारखे वाटे. ते नित्य प्रगतिशील होते. असा चालताबोलता संदर्भग्रंथ फारच दुर्लभ असतो.' तो दादांना लाभला म्हणून त्यांना वाटणारी कृतज्ञता त्यांनी ह्या लेखात स्पष्टपणे नमूद केली आहे.

बालपणापासून काकासाहेबांच्या सहवासात आलेले दादांचे पुत्र, न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी, महाराष्ट्राच्या जडणघडणीतील काकासाहेबांचा प्रभाव स्पष्ट करताना म्हणतात, 'काकासाहेबांनी गांधीविचारांना सांस्कृतिक झालर लावली. त्यामुळे गांधीविचार महाराष्ट्रात काही प्रमाणात झिरपला गेला. गांधीवादी तत्त्वांच्या कर्मकांडनिष्ठेची थट्टा, महाराष्ट्रात झाली. पण काकासाहेबांच्या संयत व ललित स्पष्टीकरणामुळे त्या थट्टेची-टिंगलीची धार बोथट होण्यास मदत झाली. पुण्यातील 'महाराष्ट्र राष्ट्रभाषा प्रचार केन्द्र' काकासाहेबांच्यामुळेच स्थापन झाले. व तिच्याद्वारे महाराष्ट्रात राष्ट्रभाषेचा प्रसार बराच सुकर झाला. त्या संस्थेद्वारेच मराठी-हिंदी व हिंदी-मराठी असे दोन बृहद् शब्दकोश श्रीपाद जोशींनी तयार केले व आज ते अल्प किंमतीत अभ्यासकांना उपलब्ध झाले आहेत. गुजराती व मराठी ह्या दोन भाषा व भाषिकांमधील मानसिक दुरावा काकांमुळे कमी होण्यास मदत झाली. त्यांचे साहित्य हे ह्या दोन भाषिक गटांमधील सेतू ठरले आहे.

अशा तऱ्हेने महाराष्ट्रापासून दूर राहूनही काकासाहेब मराठी समाजावर आपला वैचारिक प्रभाव टाकत होते असे दिसते. त्यांचे अनुयायी –रवीन्द्र केळेकर म्हणतात, 'काकासाहेब जन्मभर गुजराती व हिंदीत लिहीत आले. पण आपण महाराष्ट्री आहोत व मराठी आपली जन्मभाषा आहे ह्यांचे त्यांना क्वचितच विस्मरण झाले असेल. एकदा गप्पांच्या ओघात ते मला म्हणाले, इतकी वर्ष गुजराती समाजात मिळून मिसळून राहिलो, जीवनाचा फार मोठा काल हिंदीच्या सेवेत वेचला तरी आजसुद्धा मला स्वप्नं मराठीतच पडतात. माझ्या स्वप्नांची भाषा मराठीच असते.'

पण ह्या साऱ्यापेक्षा आपल्या देशातील सौंदर्यस्थानांचे वर्णन करणाऱ्या 'भक्तिकुसुमे' ह्या निबंधसंग्रहाच्या उपसंहारात काकासाहेबांनी मराठी कवींना जे आवाहन केले आहे अतिशय महत्त्वाचे आहे. त्यांना महाराष्ट्राच्या प्राकृतिक वैभवाविषयी असणारे कौतुक, गौरवशाली इतिहासाबद्दल वाटणारा आदरभाव, संपन्न सांस्कृतिक संचिताबद्दल वाटणारा अभिमान हे सर्व तर त्यातून प्रकट होतेच पण त्यापेक्षा मराठी प्रतिभेला ते आवाहन जी प्रेरणा देऊ पहात आहेत ती फार मोलाची वाटते.

अनुक्रमणिका

सुरुवातीला सह्याद्रीच्या घाटातील भव्यतेचे, अनुपम निसर्गसौंदर्याचे तपशीलवार वर्णन करून शेवटी काकासाहेब प्रश्न करतात, "असे असता महाराष्ट्रातील कवींनी ह्या पर्वताच्या भव्य आणि रम्य विस्ताराचे वर्णन करून आपली वाणी आजवर का बरे पावन केली नाही? या अलौकिक सौंदर्याच्या दर्शनाने रसमत्त झालेल्या आपल्या वाक्सुधेचा आस्वाद घेण्यासाठी, त्यांनी रसिकजनांना निमंत्रण का केले नाही? ज्याच्या पाळण्यात शिवाजी, संभाजी राजारामासारखे वीर निर्माण झाले; धनाजी, बाजी, राघोबल्लाळासारखे राष्ट्रास्तंभ ज्या महाराष्ट्राच्या खडकातून कोरले गेले, त्याच राष्ट्रात उत्तुंग प्रतिभा व्यक्त करणारे कवी कसे निर्माण झाले नाहीत? या आनंदभुवनाचे यशोगान करणारी निसर्गकाव्ये विखुरलेली असलीच तर त्यांना एका कोंदणात बसवण्याचे कार्य का कुणी केले नाही? स्कॉटिश कवींनी तेथल्या प्रत्येक गुहा, दरेक शिखर, प्रत्येक बन, एकूण एक सरोवर, आपल्या कवित्वशक्तीने अमर बनवली आहेत. त्याप्रमाणे महाराष्ट्रात इतिहास, दंतकथा, चारित्र्यघन संत, रोमांचकारी लोककथा काही कमी नाहीत. मग महाराष्ट्र गिराच तेवढी कंगाल का? बालपणी सहयाद्रीतील घाट पाहत असे तेव्हा हृदय भरून येई. वाटे हे सारे सौंदर्य हृदयात ठेवू तरी कसे? कोणाला देऊ?... आता असे वाटते, अरेरे, सारा जन्म फुकट गेला. ही विशालता, ही दृढता,ही वीरता, हे सौंदर्य व्यक्त करण्यापुरती भाषा तरी आजवर का कमावली नाही? दक्खनच्या राणीतून येरझाऱ्या करणारे महाराष्ट्रबंधू काही कमी नाहीत. पण ह्या सहयाद्रीच्या चेतोहर भूभागाची एक स्वतंत्र चित्रमंजुषा (Album) अद्याप कोणी तयार केली नाही.... यात्राधामे सुलभ झाली की यात्रेचे पुण्य क्षीण होते म्हणतात. पण मग प्रतिभाही क्षीण व्हावी का? सह्याद्रीच्या कड्यांना, दऱ्यांना इंग्रजांनी आपले नाव देत राहावे व आपण इंग्रजी साहित्याकरवी त्या माहितीत निष्णात झालो अशी प्रौढी मिरवीत राहावे? माझे हे पत्र वाचून महाराष्ट्राभिमानी साहित्यवीर खवळतील, माझ्यात महाराष्ट्राभिमान उरला नाही असे म्हणून कुचेष्टा करतील. पण मला बचावाचे लेख नकोत. मी जे मागतो आहे तेच मला हवे आहे, हे त्यांना कोणत्या शब्दांत समजावू?"

काकासाहेबांनी जेव्हा हिमालयात जाण्याचा निर्णय घेतला होता आणि त्या उत्तरेतील प्रयाणासाठी ते मुंबईत आले होते त्या वेळची, त्यांनीच वर्णन केलेली, त्यांची व्याकूळ मनोवस्था, त्यांच्या व महाराष्ट्राच्या उत्कट अनुबंधावर प्रकाश टाकणारी आहे. ते लिहितात, "निघालो खरा, पण मुंबईतून माझा पाय निघेना, एकीकडे हिमालयाची ओढ, तर दुसरीकडे महाराष्ट्राचा मोह. हे महाराष्ट्राचे शेवटचे दर्शन. कदाचित परत येणार नाही. महाराष्ट्राचे मला इतके प्रेम आहे, मराठी मला इतकी प्रिय आहे, ह्याची मलाच कल्पना नव्हती, मी महाराष्ट्रीय आहे, ही भावना खऱ्या अर्थाने मुंबई सोडताना माझ्या मनात जागी झाली. मध्यभारतातून जाताना गरमीमुळे जीव कासावीस होत होता. तरीपण एका गोष्टीने मनाला शांतवन मिळत होते व ते म्हणजे, प्रत्येक स्टेशनवर मराठी कानावर पडत होती व ती पडते आहे तोपर्यंत मी महाराष्ट्रातच आहे ह्या विचाराने समाधान वाटत होते."

हे सर्व वाचल्यावर असा प्रश्न पडतो की, काकासाहेब एवढे महाराष्ट्राभिमानी व मराठी भाषाप्रेमी होते तर मग त्यांनी संयुक्त-महाराष्ट्र व कोकणी भाषेबाबत विरोधी भूमिका घेऊन महाराष्ट्राचा रोष स्वतःवर का ओढवून घेतला? काकांची समग्र जीवनदृष्टी जर नीट समजावून घेतली तर ह्या प्रश्नाचे उत्तर सापडण्यासारखे व समजण्यासारखे आहे.

काकासाहेबांच्या विचारसरणीचा आस सदैव देशहिताच्या ध्रुवताऱ्याकडे रोखलेला होता. संकुचितवृत्तीने व फुटीरपणे एखाद्या भागाच्या हिताचा विचार न करता, संपूर्ण देशाचे भविष्यात कल्याण

कशामुळे होईल ह्याचा विचार त्यांचे चिंतनशील मन सदैव सखोलपणे करीत असे व एकदा मनाची खात्री झाली की त्या विचारांचा निर्भीडपणे पुरस्कार करायला ते कचरत नसत.

संयुक्त-महाराष्ट्राला काकासाहेबांचा विरोध होता आणि स्वतंत्र गोवा आंदोलनाला त्यांचे आशीर्वाद होते म्हणून महाराष्ट्र त्यांच्यावर नाराज झाला होता. पण त्यांचा हा विरोध एका तात्त्विक भूमिकेवर आधरलेला होता हे आतातरी शांतपणे समजून घेतले जाईल असे वाटते. याबाबत काकासाहेब म्हणतात, "लोकशाहीत राज्यकारभार लोकांच्या भाषेतच चालायला हवा. भाषावार प्रांतरचना म्हणून हवीच. तथापि भारतीय जनतेचा स्वभाव छोट्या राज्यांना अनुकूल आहे. तो लोकस्वभाव व भारतीय इतिहास ह्या दोघांचा विचार करता, देशात छोटी राज्ये बनवणे जास्त हितकारक होईल. उदाहरणार्थ – गुजरात व महाराष्ट्राचे स्वाभाविक तीन तीन विभाग करायला हवेत. वैज्ञानिक दृष्टीने ह्या देशात राजकीय विभाजन कधी झालेच नाही. आता तरी ते करायला हवे. मात्र ह्या छोट्या एकभाषी विभागांना राज्य न म्हणता प्रांत म्हटले पाहिजे. अशा छोट्या प्रांतांमध्ये राज्यकर्ते व प्रजा ह्यांच्यात जिव्हाळ्याचे संबंध राहू शकतील. राज्यकारभार सुकर होईल. गुंतागुंत होणार नाही. लहान राज्याकडे अधिकार कमी. त्यामुळे केन्द्रसत्तेला पण बळ येईल. लहान राज्यात विधायक बुद्धीच्या व शक्तींच्या विकासासाठी अधिक लोकांना वाव मिळतो. शिवाय लहान राज्यांचे प्रशासन खर्चाळ नसते."

एका भाषेचे मोठे राज्य करण्याने 'निझाम' निर्माण होतील. संकुचित प्रादेशिकता वाढीला लागेल. हिंदी प्रांत मोठे झाल्याने शिरजोर होतील. तेव्हा देशाचे राज्यव्यवहाराच्या सोयीसाठी छोटे विभाग व कारखानदारीसाठी दोन-तीन प्रांतांचा मिळून एक 'झोन' बनवावा असा दूरदृष्टीचा प्रस्ताव राज्यसभेपुढे व राज्यपुनर्रचना मंडळापुढे काकासाहेबांनी ठेवला होता. पण 'लोकांची तशी कांही मागणी नाही' ह्या सबबीवर तो डावलला गेला.

"कमिशन हे लोकांच्या मागण्यांवर विचार करण्यासाठी नेमले आहे का देशहिताच्या दृष्टीने राज्यांची रचना कशी असावी, याचा विचार करण्यासाठी नियुक्त झाले आहे?" ह्या काकासाहेबांच्या खणखणीत प्रश्नालाही उत्तर दिले गेले नाही. काकासाहेबांचा संयुक्त महाराष्ट्राला विरोध वा स्वतंत्र गोवा राज्याच्या निर्मितीला पाठिंबा, ह्यामागे अशी तात्त्विक भूमिका होती. काकासाहेबांनी त्याच वेळी दिलेला आणखी एक इशाराही लक्षात घेण्याजोगा आहे. काकासाहेब म्हणतात, "राष्ट्रीय वृत्तीच्या सज्जनांकडून आलेल्या सूचनेचा विचार करण्याची सरकारची तयारी नाही. पण संकुचित मनाच्या लोकांनी हीच सूचना मनावर घेतली व तिच्यासाठी हिंसक मार्गाचा ते अवलंब करू लागले की तुम्ही लाचारीने तिचा स्वीकार कराल. पण तोपर्यंत ती सूचना विकृत होऊन गेलेली असेल व लोकांचे नेतृत्व संकुचित मनोवृत्तीच्या लोकांच्या हातात गेलेले असेल. तेव्हा मात्र तुम्ही मूळ सूचना मांडणाऱ्या सज्जनांच्या माथी सर्वांचे खापर फोडायला तयार व्हाल."

काकासाहेबांच्या ह्या धोक्याच्या इशाऱ्याचा प्रत्यय आज आपल्याला पदोपदी येत आहे. दूरगामी देशहिताचा फारसा विचार न करता, केवळ लोकानुनयासाठी, भल्याबुऱ्या योजना— त्याही कशाबशा अंमलात आणून, आज जी गुंतागुंत उभी केली जात आहे, ती पाहता, काकासाहेबांसारख्या चिंतनशील राष्ट्रपुरुषाच्या मार्गदर्शनाचे मोल अधिकच जाणवते. शेवटी शेवटी जयप्रकाशजी पण काकासाहेबांच्या ह्या छोट्या प्रांत-विभाजन योजनेला अनुकूल झाले होते. पण तोपर्यंत खूप उशीर झाला होता.

अनुक्रमणिका

जी गोष्ट भाषावार प्रांतरचनेची तीच गोष्ट कोकणीवादाची सुरुवातीला ते कोकणी-मराठी वादात मराठीचा पक्ष घेत होते. पण पुढे पुढे कोकणीशी अधिक परिचय करून घेतल्यावर, ती मराठीची उपभाषा नसून स्वतंत्र भाषा ठरण्याइतकी संस्कारी, लवचिक, विपुलार्थवाही, समृद्ध आणि कल्पक भाषा आहे असे त्यांचे मत बनत गेले. खूप शतकांपूर्वीचा गीतेचा एक कोकणी अनुवाद पण त्यांच्या पाहण्यात आला होता. शहापूरला असताना कोकणी भाषेचे माधुर्य त्यांच्या लक्षात आले होते. पुढे सर्जकशक्तीला पेलण्याची तिची ताकद त्यांना जाणवली. ते म्हणतात, "एखाद्या भाषेतील साहित्य समृद्ध नसले तरी जर ती संस्कारी व पुरुषार्थी लोकांच्या बोलण्यात येत असेल तर तिची अर्थवाहकता सहज ओळखली जाते. ज्या समाजाची अनुभूती विशाल, विविध व सखोल, त्याची भाषा समृद्ध व समर्थ असावयाचीच."

जे प्रामाणिकपणे पटले ते ऋजू शब्दांत पण ठामपणे मांडणे, हा त्यांचा स्वभाव असल्याने, महाराष्ट्रीयांचा रोष पत्करूनही ते कोकणीचा पुरस्कार करू लागले. पण ही झाली वरवरची कारणपरंपरा. त्यांच्या कोकणी पुरस्कारामागे अधिक सखोल असेही काही स्तर होते.

वडिलांच्या निधनानंतर ते जेव्हा बेळगाव सोडून गोव्यात वास्तव्यासाठी म्हणून गेले तेव्हा त्यांनी तेथील जनजीवनाचे सखोल निरीक्षण केले. उर्वरित भारतासारख्या सर्व समस्या इथेही दिसल्या. पण विशेष म्हणजे हिंदू, मुस्लिम ईसाई संस्कृतींच्या बरोबरीने भोगप्रधान व आरामप्रिय अशा लॅटिन संस्कृतीचा प्रभावही इथल्या जनजीवनावर बराच पडलेला दिसला. शेवटी ते अशा निष्कर्षाप्रत आले की, "इथली संस्कृती उच्चकोटीचे कलाकार व इनामदार नोकरशहा निर्माण करू शकेल, पण तेजस्वी राष्ट्रीय नेतृत्व इथून उभे राहू शकणार नाही. बदलत्या परिस्थितीने इथल्या लोकांत स्वाधीनतेचा भाव उरलेला नाही. ह्याचा एक परिणाम म्हणजे ह्या लोकांची जी भाषा कोकणी, ती अतिमधुर व सूक्ष्मतर भाव व्यक्त करण्यास समर्थ असूनही त्या भाषेत साहित्य उपलब्ध नाही. ते लिहितात ते शासकांच्या भाषेत. स्वतःच्या भाषेत लिहिण्याची प्रेरणाच उरलेली नाही. ती आली पाहिजे. भाषेत तेजस्वी साहित्य निर्माण होईल तेव्हाच समाजात तेजस्विता येऊ शकेल. भाषा केवळ साहित्याचे माध्यम नसून सांस्कृतिक व सामाजिक जीवनाचे एक अंग आहे. म्हणून ह्या राजाभिमुख समाजाला प्रजाभिमुख करायला हवे. ह्यासाठी त्यांना 'जनभाषे'चे महत्त्व कळायला हवे. त्याद्वारे त्यांचे स्वत्व जागृत व्हायला हवे. ह्या जनभाषेमार्फत युग-संस्कृतीचे लोण बहुजनांपर्यंत पोहोचवायला हवे. तरच हा समाज सत्त्वयुक्त व तेजस्वी होईल."

हा बीजरूप विचार पुढे विकसित होऊन पस्तीस वर्षानंतर त्यांनी कोकणीचा पुरस्कार सुरू केला. पुढे समन्वयसाधकाच्या भूमिकेतून त्यांचे चिंतन वाढू लागले, तसा ह्या कोकणी पुरस्काराचा आणखी एक पदर त्यांना उलगडला. ते आपल्या एक्काहत्तर सालच्या वासरीत लिहितात, "कोकणीचा वाद आता संपला आहे. कोकणी भाषेचा स्वीकार आता झाला आहे. गोव्यातील हिंदू व ख्रिस्ती दोन्ही समाजांची ती जनभाषा आहे. आता तिच्यात उभयविध जनतेच्या हृदयाला आपलेसे करील, असे साहित्य निर्माण केले पाहिजे व त्याच्या आधारे हिंदुकिरिस्ताव मिश्र शक्ती उभी झाली पाहिजे."

धर्मसमन्वयाखेरीज भारताचा उद्धार होणार नाही ही त्यांची खात्रीच होती.गोवा ही तर त्यांच्या मते नियतीने समन्वयाची प्रयोगभूमीच केलेली आहे. ते लिहितात, "येथील विविधतेत जर आपण ऐक्य स्थापन केले नाही तर देश कमजोर होत जाईल. स्वातंत्र्योत्तर लोकतंत्रात 'बहुसंख्ये'चा सिद्धांत धोकादायक ठरला आहे. आज हिंदू जरी बहुसंख असले तरी इतर सर्व धर्म आपण आपले शत्रू मानू लागलो तर आपणच

अनुक्रमणिका

अल्पसंख्येत जाऊ, हे हिंदू मानसिकतेने वेळीच ओळखले पाहिजे. पारसी जसे आपल्याशी एकरूप झालेत तसे इतर धर्मांना प्रेमाचा हात देऊन एकरस केले पाहिजे. तसे झाले तर शैव वा वैष्णवांची संख्या जशी आपण मोजत नाही, तसे इतर धर्मीयांबाबत होऊन संख्येचे घातकी राजकारण आपोआप दूर होईल.”

थोडक्यात, काकासाहेब कोकणी भाषेकडे गोव्याच्या सांस्कृतिक, सामाजिक व धार्मिक संघटनेचे एक साधन म्हणून पाहत होते. ते जीवनभर देशकल्याणाचा असाच व्यापक विचार करत आले होते. तत्कालीन ब्राह्मणी मराठीचा रान वा आपल्या सारस्वत समाजाची भाषा म्हणून कोकणी प्रेम, अशा संकुचितपणाला त्यांच्या विचारसरणीत थारा नसावा. महाराष्ट्राला हितवाद कधी न कधी पटतोच हाही त्यांचा विश्वास होता. काकासाहेबांनी कोकणीचा पुरस्कार हिरीरीने केला तरी मराठीवर त्यांचे तितकेच प्रेम होते. मराठीचा ‘विद्वेष सूक्ष्मपणे जरी कुणी व्यक्त केला तरी जवळच्या त्या कोकणीवादी मित्रांना त्यांनी जाहीरपणे समज दिलेली आहे. ‘पुण्यभूमि गोमांतक’ मध्ये ते म्हणतात. “कोकणी माझ्या वाडवडिलांची जन्मभाषा असली तरी मराठी माझी जन्मभाषा आहे. म्हणून तिच्यासंबंधी अनादर प्रकट करणे मला रुचण्याजोगे नाही.” कोकणीचा पुरस्कार म्हणजे मराठीचा विद्वेष व नाश असे मानणाऱ्यांना काका सांगत, “कोकणीच्या पुरस्कारानेच गोव्यात मराठी प्रगती करू शकेल. भाषांचे परस्परसंबंध स्पर्धेच्या स्वरूपाचे भासू लागावेत हा जीवनकलहाचे पाश्च्यात तत्त्वज्ञान अंगी मुरल्याचा परिणाम आहे... हिंदुस्थानचे भवितव्य बहुभाषाकोविदांच्या हाती असणार आहे. प्रांताप्रांतामध्ये सलोखा उत्पन्न करून भारतीय संस्कृती परिपुष्ट व समर्थ करण्याचे भाग्य ह्या बहुभाषिकांनाच लाभणार आहे. सर्वधर्मसमभावाप्रमाणे सर्वभाषासहभाव, नव्हे सर्वभाषाममभाव ही आपली नीती असायला हवी.”

काकासाहेबांचे निकटवर्ती कोकणप्रेमी श्री रवीन्द्र केळेकर अभिनंदनपर ग्रंथातील लेखात म्हणतात, ‘त्या दिवशी मी त्यांच्या ‘सर्वभाषाममभाव’ हा शब्द ऐकला, माझी भाषाविषयक सारी भूमिका आमूल बदलून गेली. माझ्यासारख्या मराठीविरोधी माणसाला मराठीविषयी- सर्व भाषांविषयी प्रेम वाटायला लागणे. ही काकासाहेबांच्या समन्वयवृत्तीचीच करामत आहे.’ अशाप्रकारे महाराष्ट्रापासून दूर राहूनही काकासाहेबांनी महाराष्ट्राच्या जडणघडणीत अप्रत्यक्षपणे आपला प्रभाव टाकलेला दिसतो.

प्रत्यक्षात मात्र महाराष्ट्र, गांधीभक्त काकासाहेबांना सदैव नाकारतच राहिला. पण त्यामुळे महाराष्ट्र बरेच काही गमावून बसला आहे. सुरुवातीपासूनच सनातनी व सुधारक किवा जहाल-मवाळ अशा द्वंद्वात ठामपणे विभागला गेलेला महाराष्ट्र, दोन्हींचा समन्वय साधणारा, सनातन संस्कृतीतला शाश्वत गाभा उचलून त्यात युगानुकूल नवतेचा प्राण फुंकणारा काकासाहेबांचा मध्यममार्ग ओळखू शकला नाही,पचवू शकला नाही. त्यामुळे एकीकडून परंपरेचे जीवनदायी सूत्र हरवून बसला तर दुसरीकडे चुकीच्या परंपरांना कवटाळणाऱ्या आंधळ्या घर्मवादाशी जखडला गेला. दुसरे म्हणजे राकट, कणखर महाराष्ट्रदेशी उत्कट सौंदर्याची पालवी रुजण्याची शक्यता उणावत गेली. तिसरे म्हणजे काकासाहेबांच्या रसिक मनाने असंख्य प्रवाहांनी, रमणीय व मधुर शैलीतून गांधींच्या विचारधारेचा जो प्रसार केला त्याला आणि काकासाहेबांना नाकारताना ह्या रसिक समन्वयसाधक प्रवाहालाच महाराष्ट्र मुकला. परिणामी खूपसा रुक्ष, पोथीनिष्ठ गांधीवाद महाराष्ट्रात उरला व जनसामान्यांच्या उपेक्षेचा धनी झाला.

खरे तर काकासाहेबांचे कार्य राष्ट्रीय पातळीवरचे कार्य आहे. धर्म, भाषा, संस्कृती, उद्योग, अर्थकारण सर्वच क्षेत्रांतील गांधीविचारांचे चिंतन करून त्यांनी त्यांचा जन्मभर आपल्या लेखनाद्वारे प्रसार

अनुक्रमणिका

केला. जगातील मोठमोठ्या शास्त्रज्ञांनी व विचारवंतांनी आज गांधी-विचारांचा अभ्यास सुरू केला आहे. पर्यावरण, चंगळवाद, हिंसाचार ह्या साऱ्यांनी भेदरलेल्या 'उद्याच्या जगा'साठीचा दिलासा त्यांना गांधीवादी जीवनदृष्टीत सापडत आहे. अशावेळी गांधींच्या जीवनदृष्टीचे समर्पक व प्रभावी भाषेत विवरण करणारे काकासाहेबांचे साहित्य उद्याच्या भारताच्या व महाराष्ट्राच्या जडणघडणीत अधिकच महत्त्वाची भूमिका बजावेल असा विश्वास मला वाटतो.

अनुक्रमणिका

१२.
## उत्तरायण

गांधीजींच्या उदयापूर्वीचे आपल्या देशातील काहीसे उग्र असे विचार-मंथन-युग, त्यावेळचे आणि त्यानंतरचे प्रत्यक्ष स्वातंत्र्यसंग्रामाच्या वेळचे तेजस्वी पुरुषार्थ युग, आणि स्वातंत्र्योत्तर काळातील समस्यांना सामोरे जाणारे कसोटीचे युग, ह्या तिन्ही कालखंडांना सक्रिय साक्षी असलेल्या, चैतन्याने सळसळणाऱ्या काकासाहेब नामक अश्वत्थाची अखंड सळसळ वयोमानानुसार हळूहळू मंदावत गेली.

गांधीजींच्या मृत्यूनंतर जणू त्यांच्या अंतरातील चैतन्यस्रोताचा खळाळही काहीसा स्थिरावला.

स्वातंत्र्योत्तर कालात हा गांधीजींचा सच्चा अनुगामी, सत्तेपासून अलग राहून आपले देशसेवेचे व्रत, अकर्मण्य वृत्तीने व अविरतपणे आचरत राहिला. जे काम पुढ्यात येईल, जे कर्तव्य सोपवले जाईल, जे साहाय्य अपेक्षित असेल ते निर्ममपणे करीत राहिला.

गांधीजींच्या मृत्यूनंतर सहा महिन्यांनी सेवाग्रामला एक सभा भरून तिच्यात गांधींजींच्या सर्व वस्तूंचे संग्रहालय करायची योजना ठरली. काकासाहेबांना ही कल्पना आवडली पण त्यांना भारतीयांची वृत्ती परिचीत होती. कोणत्याही महान व्यक्तीचे मंदिर बनवायचे. मग तिने सांगितलेल्या आदर्शांचे पालन करण्याच्या जबाबदारीतून मुक्त व्हायचे. गांधीजींचे असे होऊ नये म्हणून त्यांच्या वस्तूंच्या संग्रहालयाबरोबर एक पुस्तकालयही उभे करावे असे त्यांनी सुचवले. तिथे गांधीजींसंबंधी जे जे साहित्य उपलब्ध असेल, त्यांनी लिहिलेले, त्यांच्या जवळच्या माणसांनी लिहिलेले, त्यांच्या विरोधकांनी लिहिलेले, सर्व साहित्य एकत्र करायचे; म्हणजे पुढेमागे त्यांचे खरेखुरे चरित्र कुणाला लिहावेसे वाटले तर सर्व साधने उपलब्ध होतील. एरवी भारतीय लोकांना चरित्राऐवजी माहात्म्य लिहिण्याची खोड आहे व त्यातून चमत्काराच्या खोट्या कथा पसरू लागतात. तेव्हा वेळीच कोणताही तपशील, सत्यघटना विस्मृत होण्यापूर्वीच आपल त्या एकत्र करून ठेवायच्या असे त्यांनी ठरविले. ह्या कामासाठी साहजिकच त्यांनी स्थलांतर केले; त्यांचे वास्तव्य आयुष्याच्या उर्वरित काळात राजधानीतच राहिले. सातत्याने पाच वर्षे काम करून त्यांनी गांधींचे वस्तुसंग्रहालय व पुस्तकालय राजघाटावर व्यवस्थितपणे उभे केले.

राष्ट्रपतींनी काकासाहेबांची १९५२ मध्ये राज्यसभेवर नियुक्ती केली; तिथून पुढे ते जवळजवळ सर्व आयुष्य राजसत्तेच्या बाजूने भीष्माप्रमाणे सल्लागार म्हणून काम करीत राहिले. पण त्यामुळे काही लोकांची तीव्र नाराजी व कुचेष्टाही त्यांना सहन करावी लागली. त्यांच्या मते काकासाहेबांनी आपली गांधीनिष्ठा स्मरून सत्तापक्षात असे मिसळून जायला नको होते.

सरकारने मागासवर्गीयांच्या स्थितीचे अध्ययन करून, त्यावर उपाय सुचविण्यासाठी १९५३ मध्ये एक आयोग नेमला. त्याचे अध्यक्ष झाल्यावर काकांनी पुन्हा एकदा देशभर प्रवास करून दोन वर्षांत संपूर्ण अहवाल सादर केला. हरिजन-गिरिजनांविषयी त्यांच्या मनात प्रथमपासून जिव्हाळा होताच. त्यांच्या मनात प्रश्न येई, मी ह्या देशाचा खरा, कारण त्याने मला जन्म दिला, पालनपोषण केले. पण हा माझा देश आहे, असे मी म्हणू शकतो का? ह्या देशासाठी मी काय केले आहे? ह्या रुखरुखीमुळे, देशातील दीन-दुर्बलांविषयी काही करण्याची संधी मिळाल्यास त्यांना खूप बरे वाटे. जिथे जातील तिथल्या लोकांशी ते एकरूप होत असत.

अनुक्रमणिका

त्यांचे जीवन, त्यांच्या अडचणी जाणून घेत व आपल्या लेखातून समाजापुढे मांडत. मागासवर्गीयांच्या स्थितीचा अभ्यास केल्यावर, त्यांनी त्यांचे वर्गीकरण अस्पृश्य, आदिवासी व मागास असे तीन गटांत केले आणि आज ते सर्वत्र स्वीकृत झालेले आहे. अस्पृश्य व अदिवासी ही समस्या अल्पसंख्याकांची आहे तर मागासवर्गीयांची समस्या ही बहुसंख्यांकांची आहे. ह्या सर्वांच्या उद्धारासाठी काही गोष्टी सरकारने तर काही गोष्टी आम जनतेने करावयाच्या आहेत असे त्यांचे मत होते.

काकासाहेबांच्या रूपाने समाजविज्ञानाची सखोल जाण असणाऱ्या एका क्रियाशील चिंतकाची अध्यक्षता या आयोगाला लाभली होती हे त्यांनी केलेल्या काही सूचना बघताना सहज लक्षात येते. (१) राज्यकारभार लोकांच्या भाषेत चालावा. म्हणजे मागासवर्गीयांचे राजकारणाविषयीचे ज्ञान वाढेल व सरकारी नोकरीपर्यंत ते पोहोचू शकतील. (२) शिक्षण खेड्यापर्यंत गेलेच पाहिजे व ह्या लोकांना आतापासून इंग्रजी शिकविण्याची काही गरज नाही. (३) ग्रामोद्योगांना, लोककलांना ऊर्जितावस्था आणली पाहिजे. (४) भिन्न धर्म, जाती, पंथाच्या लोकांचे सहजीवन (खाणे, पिणे, वावरणे) वाढवले पाहिजे. ह्या मौलिक सूचना जर मनःपूर्वक अमलात येत गेल्या असत्या तर आजची जातीय गुंतागुंत इतकी जटिल झालीच नसती.

ह्या संदर्भातील काकासाहेबांची आणखी काही मार्मिक निरीक्षणे पाहा. ते म्हणतात, “मागासवर्गातील काही लोक सुधारलेले आहेत व तेच आपल्या वर्गातील लोकांना त्रास देत असतात. अशांवर अंकुश ठेवायला हवा.” दुसरे म्हणजे काकासाहेबांनी उच्चवर्गीय व संपन्न स्त्रियांची गणनाही आजच्या सामाजिक रचनेत मागसवर्गातच केली आहे. ते म्हणतात, भले त्या आपल्याबरोबर राहतात, पण घरात वा समाजात त्यांना नेहमीच गौण स्थान मिळालेले आहे.” लोकशाहीबाबत ते म्हणतात,”एवढी प्रचंड लोकशाही हे भारताच्या इतिहासातील अनोखे पर्व आहे. ह्या अनोख्या प्रजातंत्राच्या अनोख्या भवितव्यासाठी आपण आपली मानसिकता पूर्ण बदलायला हवी. कारण आज हजारो वर्षांच्या इतिहासाकडे पाहिल्यास लक्षात येते की, भारतीय मानसिकता विशिष्ट ढंगाची आहे. राजाकडून तिच्या अपेक्षाच नसतात. तो बरावाईट कसाही असला तरी ते त्याच्या बाजूने वा विरुद्ध उभे ठाकत नाहीत. आपल्या वाट्याला येणाऱ्या जीवनात व्यस्त असतात. लोककल्याणापेक्षा निवडणुका जिंकण्यासाठीच जणू अस्तित्वात असणाऱ्या सरकारवर अशा प्रजेकडून दबाव येणार कसा? देशरक्षणाची जबाबदारी केवळ राजांवर व क्षत्रियांवर नसून आम जनतेवर आहे ही नवी दृष्टी लोकांना घ्यायलाच हवी. भिन्न जातीधर्माच्या कुंपणामुळे देश एकत्र येऊन कधी देशरक्षणाला उभाच राहिला नाही. म्हणून सतत हार व गुलामीच भोगतो आहोत. इतिहासापासून काही शिकायचेच नाही--- ही मानसिकता पण आता बदलायलाच हवी. पण त्याऐवजी, आजचे राज्यकर्ते ह्या भिन्न गटांना वेगवेगळेच ठेवत आहेत. ज्यांना आजची स्थिती अनुकून नाही, त्यांना खास सवलती देण्याच्या ‘इंग्रजी इलाजा’ मुळे आम्ही आमची फुटीरता अधिकच दृढ करत आहोत. कुणाला नवा मार्ग सुचत नाही व सुचला तर समाजापुढे ठेवायची हिंमत नाही,”

मतभेद मिटवण्याचे काम देशाची चिंता असणाऱ्या व राजकीय स्पर्धेत रस नसणाऱ्या विचारवंतांनीच करावयाचे असते असे त्यांना वाटत असल्यामुळे काकासाहेबांनी दिल्लीला स्थलांतर केल्यावर १९५० ते १९७६ पर्यंत ‘मंगलप्रभात’ नावाची पत्रिका काढून त्यातून सातत्याने प्रबोधन केले. त्यात काकासाहेबांच्या परिपक्व प्रतिभेचे व चिंतनाचे सार विचाररूपाने उतरले आहे. राष्ट्रीय जीवनाचे एकही अंग, एकही प्रश्न नसेल, की ज्याला ह्या पत्रिकेतून काकासाहेबांनी स्पर्श केला नाही वा त्यावर मौलिक चिंतनपर विचार मांडले नाहीत.

अनुक्रमणिका

काकासाहेब वृत्तीने शिक्षक. पत्रकारिता हे त्यांच्या दृष्टीने राष्ट्रीय शिक्षणाचेच एक अंग होते. त्यांच्याजवळ ज्ञानाचा एक अखंडित स्रोत होता व कामधेनूप्रमाणे कोणत्याही प्रश्नावर त्यांची लेखणी अप्रतिहत प्रवाहित होत असे.त्या काळी समाजात दोन प्रकारचे पत्रकार होते,एक लेखनाद्वारे सांस्कृतिक सेवा करणारा तर दुसरा देशसेवेची प्रेरणा देणारे लेखन करून त्यातच पत्रकारितेची सफलता मानणारा. काकासाहेब दुसऱ्या प्रकारचे पत्रकार होते. 'राष्ट्रमत'पासून सुरू करून 'नवजीवन', 'सर्वोदय', 'मंगलप्रभात'- अशा अनेक वृत्तपत्रांतून त्यांनी देशहिताचे विषय सांगोपांग हाताळले. देशाला,समाजाला उपयोगी असणारे कोणतेही कटू सत्य सांगण्यास त्यांनी कधी मागेपुढे पाहिले नाही. ही गांधीवादी वृत्तपत्रे देशभर प्रसारित होत असल्याने त्यांच्या लेखनाचा प्रभाव महाराष्ट्रातील पत्रकारितेवरही पडला.

आंतरभारताची साने गुरुजींची संकल्पना काकांच्या समन्वय संस्कृतीला बरीच जवळची आहे.खरे सांगायचे तर काकासाहेबांचे सर्व जीवनच 'आंतरभारती' स्वरूपाचे होते. जन्म कारवार म्हणजेच कर्नाटक,शिक्षण व कार्यारंभ महाराष्ट्रात, अनौपचारिक शिक्षण देशभराच्या प्रवासात,साहित्यिक संस्कार बंगालचे, कार्यप्रेरणा व कर्तृत्व गुजरातेत, राष्ट्रभाषाप्रचार दक्षिणेत, उत्तरायुष्य दिल्लीत. थोडक्यात हे एक अन्तर्बाह्य 'भारतीय' व्यक्तिमत्त्व होते. जन्मभर ह्या विशाल भारतातील लोकांना, भाषांना, धर्मांना, जातींना एकत्र आणण्यासाठी, त्यांच्या मनोमीलनासाठी त्यांनी आपला देह व वाणी शेवटपर्यंत झिजवली. पुन्हा हे सर्व अलिप्त वृत्तीने व नम्र मनाने.त्यांच्या ह्या 'कर्मसु कौशलं'चे वर्णन त्यांचे गांधीवादी स्नेही व लेखक वामनराव चोरघडे यांनी फार नेमकेपणाने केले आहे. ते म्हणतात, 'एखाद्या उमद्या खेळाडूने मन व शरीर थकून जाईपर्यंत स्वच्छंद खेळावे, त्यामुळे विकारमुक्त होऊन विसावावे,अशावेळी भोवतालच्या भल्याबुऱ्या घटनांकडे तो तृप्त पण निर्भय वृत्तीने हसत पाहत राहतो तसे त्यांचे जीवन होते. खूप प्रवास, खूप योगसाधना, येथेष्ट देशकार्य करून मन,बुध्दी,शरीर तृप्त व श्रान्त झाले होते. आवश्यक,पोषक तेवढेच ग्रहण करण्याची वृत्ती बनली होती. मात्र देशकार्य व निसर्गदर्शनाला केव्हाही शरीर व मन तत्पर असे.'

काकासाहेबांचे वर्णन रवीन्द्र पिंग्यांनी त्यांच्या खास शैलीत केले आहे. ते असे, काका साक्षात ऋषी दिसत. सहा फूट उंचीचा धिप्पाड, कांतिमान देह..... सागाच्या झाडासारखे सरळसोट ताठ उभे राहिले की हाताचे पंजे थेट गुडघ्यांना टेकत असे लांब. 'कृपाळू हात. त्या हातांची सावली किती भाग्यवंताना लाभली' मोठेपणाचं ओझं तर काकांनी केव्हाच सोडलं होतं. तापस जनांपाशी हमखास असतो तो खरखरमुंडेपणा टाळला. आकस नाही, आग्रह नाही, अवसान नाही, अवडंबर नाही. साधं-सोपं जगत आमच्यासारख्या रांगणाऱ्या लेखकांची इटुकली आयुष्यं आनंदवाटिका कशा होतील ह्याचं दिशासूचन ममत्वानं केलं.' प्रकाशक रामदास भटकळांनी लिहिले आहे. 'त्यांना भेटणं म्हणजे एखाद्या बर्फाच्छादित पर्वताच्या सान्निध्यात असल्यासारखं वाटायचं, शांत तृप्त, भव्य काही जाणवायचं. नेहमी शुभ्र खादीचे परीटघडी कपडे, तशीच शुभ्र टागोरी दाढी. काकांच्या गोष्टी शांतपणे व्हायच्या.'

श्रीपाद जोशी मात्र काकांच्या स्वभावातील काही पैलूंबाबत नाराजीने लिहितात. ते म्हणतात, 'काकासाहेब खूपसे स्वान्त स्थित, आत्ममग्न, त्यामुळे घरापासून दूर आलेल्या माझ्यासारख्या कोवळ्या वयाच्या, साध्या मुलांच्या व्यावहारिक व मानसिक गरजा, एकाकीपणा, कष्ट ते समजून घेऊ शकले नाहीत. आत्यंतिक स्वच्छता, दर्जेदार राहणी व खाणेपिणे, गरीबश्रीमंत भेद इत्यादीमुळे त्यांचे सामान्य माणसांशी जमले नाही. नवीन पिढीशी, नवीन ज्ञानाशी त्यांनी कधी जुळते घेतले नाही. नवीन पिढीला ते कधी समजून घेत नसत.'

अनुक्रमणिका

ह्याउलट भास्कर नंदनवार म्हणतात, 'त्यांच्या मनाचा ताजेपणा थक्क करणारा आहे. तरुण पिढीशी समरस होण्यासाठी, त्यांच्याविषयी आस्था बाळगण्यासाठी मानसिक तारुण्याचा तो टवटवीतपण लागतो तो तजेला काकांजवळ होत.'

अशी परस्परविरोधी मते वाचताना लक्षात ठेवायला हवे की, कोणताच माणूस परिपूर्ण नसतो. स्वतः काका म्हणतात त्याप्रमाणे देवमाणसंसुद्धा शेवटी माणसं असतात हे विसरून चालणार नाही. मोठी माणसंसुद्धा वयाबरोबर, अनुभवानुसार वाढत, बदलत जातात; ज्या वयात ज्याला जसा नि जेवढा अनुभव येतो त्याच्यापुरते ते सत्य असते, हेच शेवटी खरे!

ह्या संदर्भात स्वतः काकासाहेबांनी श्रीपाद जोशींना १९३८ साली पाठवलेले पत्र लक्षात घेण्याजोगे आहे. श्रीपाद जोशी जेव्हा आजारपणामुळे घरी निघून गेले होते तेव्हाच्या पत्रात काकासाहेब म्हणतात, "समाजात तरुणांची प्रतिष्ठा बेताची असते. पण माझ्याजवळ तरुणांची हृदये म्हणजे पवित्र वस्तू असते. तरुणांवर असलेल्या अलोट विश्वासामुळेच जर्जरित शरीरातसुद्धा मी तरुण राहिलो आहे. तरुणांचे दोष त्यांच्या उत्कट भावनेमध्येच असतात. म्हणून त्यांना आपले विचार बदलण्याची मोकळीक ठेवली पाहिजे. म्हणून तुम्हाला मी निक्षून सांगतो की मी तुमच्याशी बांधलेला आहे. पण तुम्ही मात्र मुक्तच आहात- माझ्या सहवासात तुम्ही दीर्घकाळ राहिला म्हणजे माझ्यातील रुक्षता तुमचा नजरेत येईल. तोवर माझा उपयोग आहे. कितीतरी तरुण माझ्याजवळ येऊन राहिले व यथावकाश सोडून गेले. माझे काम तुम्हाला योग्य क्षेत्रात नेऊन सोडणे हे आहे."

पत्र फार बोलके वाटते. स्वतः काकांनीच उभयपक्षाची बलस्थाने व मर्यादा रेखून ठेवल्या आहेत.

आणखीही एके ठिकाणी ते म्हणतात, "जो इतरांच्या बाबतीत तटस्थ असतो, त्याच्या बाबतीत लोकही तटस्थ बनतात. माझं तसं झालं आहे." एका पत्रात काकासाहेब असेही सांगतात, "पूर्वी लोकांचे माझ्याविषयी खूप गैरसमज व्हायचे. तेव्हा मला फार वाईट वाटे. आता कळते, प्रत्येकाची दुनिया वेगळी असते. त्यामुळे गैरसमज असण्यात अनैसर्गिक काहीच नाही."

गांधीनिधनानंतर काकासाहेबांनी उर्वरित आयुष्य दिल्लीतच घालवले. राजघाटावरील गांधीजींच्या समाधीपासून हाकेच्या अंतरावर त्यांचा सन्निधी नावाचा छोटासा बंगला होता. जवळच गांधी-स्मारक-निधीच्या कचेऱ्या होत्या. तिथे ते व त्यांची मानसकन्या सरोजबेन नानावटी राहत असत. येथील उर्वरित सर्व आयुष्य काकासाहेबांनी वाचन, चिंतन,लेखन, ज्ञानदान व जमेल तेवढा प्रवास ह्यात घालवले. गांधीवादी कार्यकर्त, सांस्कृतिक शिष्टमंडळाचे लोक, गांधीविचारांचे अभ्यासक, जो कोणी भेटायला येईल त्यांच्याशी ते हातातले लेखन बाजूला सारून मनमोकळ्या गप्पा मारत. मार्गदर्शन करत. सर्व प्रकारच्या प्रश्नांना, जीज्ञासांना अचूक माहिती, संदर्भ ते देऊ शकत. म्हणूनच श्रीपाद जोशी म्हणतात, 'चार-सहा वर्षांत आजच्या विद्यापीठांत, रक्त व पैसा आटवून जितके ज्ञान मिळते त्याच्या कितीतरी पटीने महत्त्वाचे, शुद्ध आणि संस्कारी ज्ञान काकांजवळ एखादे वर्ष राहून प्राप्त होते. जे जवळ असले की निर्जीव ज्ञानकोशाची गरजच वाटत नाही. तेच एक चालता बोलता विश्वकोश होते. त्यांची स्मरणशक्ती इतकी अलौकिक होती की कुठल्या विषयांसंबंधी, कुठल्या पुस्तकात, कुणी काय म्हटलंय हे ते अचूक सांगत.'

अनुक्रमणिका

स्वातंत्र्योत्तर काळातील, भारतीय जीवनातील अनेक अंगांनी चाललेली मूल्यांची घसरण पाहून काकासाहेब दुःखी झाले तरी निराश झाले नाहीत. ते म्हणत, "गांधींजींनी मूल्यांची बीज पेरली आहेत. आज ना उद्या उगवल्याखेरीज राहणार नाहीत. गांधीजी हे भूतकाळाचे प्रतिनिधी नव्हतेच मुळी. ते भविष्यकाळाचे प्रतिनिधी आहेत," असा अमर आशावाद त्यांच्याजवळ होता.

समोर येणाऱ्या व्यक्तीसमोर संकल्प उभवण्याची असामान्य शक्तीही काकांजवळ होती. एखादा संस्कृत पंडित भेटायला आला तर व्याकरणाची सुबोध आवृत्ती काढण्याचा आत्मविश्वास त्याच्या ठायी निर्माण करतील. रसिक भेटायला आला तर कालिदासाचा एखादा सुंदर ग्रंथ वाचून त्याची संक्षिप्त आवृत्ती करून मागतील. म्हणतील, "त्यातले सुंदर श्लोक तसेच ठेवा. बाकीच्याबद्दल कालिदासाच्या शब्दांत सारांश द्या. रसिक दुवा देतील." अशी कामे करवून घेण्याची हातोटी ते गांधीजींकडून शिकले असावेत.

त्यांचे घर पुस्तकांनी भरलेले असायचे. एकवीस हजारांवर ग्रंथ त्यांनी संग्रहित केले होते व त्यातले बहुसंख्य वाचलेले होते. ते गमतीने म्हणत, "घरातले खरे यजमान पुस्तकेच आहेत. मी आपला प्रवासी पाहुणा." त्यांच्याकडे नाना भाषेतील पुस्तके होती. ज्या प्रांतात जातील तिथून येताना नाना विषयांवरील पुस्तके आणीत. त्यांना जीवनातील असंख्य विषयांत रस होता. त्यांच्या एका सहकाऱ्याची मुलगी भाषाशास्त्राची अभ्यासक होती. ती एकदा भेटायला आली तर तिला लगेच म्हणाले, "भाषाशास्त्राची पुस्तके घेऊन दिल्लीला ये. तुझ्या मदतीने ह्या विषयाचा आनंद मला घ्यायचा आहे."

जीवनाच्या सर्वच क्षेत्रांत अनासक्तीने रस घेणे त्यांना साधले होते. मग तो आइनस्टाइनचा सापेक्षतावाद असो वा खगोलशास्त्राचे अध्ययन असो. काकांना त्यात गती असेच. मैलभर चालून जीवनदर्शन होणार असेल तर त्यांची श्रम घ्यायची केव्हाही तयारी असे. नाना प्रकारच्या शास्त्रांप्रमाणेच नाना कलांतही त्यांना रुची व गती होती. त्यांनी स्वतः काव्य लिहिले नाही.. पण त्यांची काव्याची रसग्रहणे मौलिक असत. काव्यातील गुणदोषांचे विवेचन ते हळुवारपणे पण स्पष्ट रीतीने करत.

काकासाहेबांनी आश्रमीय जीवन स्वीकारले होते. तरी त्यातील रुक्षपणाचा स्पर्श त्यांना झालेला दिसत नाही. सौंदर्य व कलेची अनासक्त पूजा ही त्यांची सहजप्रवृत्ती होती. 'त्यांच्या प्रत्येक हालचालीत कलासौंदर्याची दृष्टी दिसे.' असे वामनराव चोरघडे म्हणतात. ग.त्र्यं. माडखोलकर आपली आठवण सांगतात, 'एकदा आम्ही बसलो असताना मी पुढ्यातले संत्रे भसकन सोलू लागलो. त्यांनी संत्रे माझ्या हातातून घेऊन इतक्या कलापूर्णतेने सोलले की त्यांच्या धारदार वाट्या व सुंदर फुले दिसू लागली. मोसंबीच्या सालीचा साप, कंधारी, डाळिंबाचे कमळ, पोपईची नाव असे अनेक प्रकार ते सफाईने करत असत. ते म्हणत, "माणसेही खातात आणि पशूही खातात. पण माणसाने आपल्या आहाराचे शास्त्र आणि कला बनवली आहे. आपण खाताना पण रसिकता टिकवली पाहिजे."

मरणाच्या वाटेवरही त्यांची कलादृष्टी किती सजग होती ह्याची एक आठवण वामनराव चोरघडे सांगतात. ते लिहितात, 'जिवावरच्या दुखण्याने ते एकदा आजारी असताना त्यांना इन्ट्राव्हेनस इन्जेक्शन दिले. तेव्हा थोडे रक्त आले. काका त्या बिंदूकडे टक लावून पाहत होते. एकदम म्हणाले, "डॉक्टर, अगोदर पुसून टाका ते. किती अकलात्मक दिसतंय." बाकी मृत्यूच्या वाटेवर भयभीत होण्याचे त्यांना कारणच नव्हते.

अनुक्रमणिका

कारण ते मृत्यूला 'परमसखा'च मानत. नव्या प्रस्थानासाठी आवश्यक असा तो विरामच आहे, असे ते म्हणत. मृत्यूविषयक हा सहजभाव प्रत्यक्ष वेळ आली असताना पण टिकून राहिला होता. नीरा प्रकरणानंतर डॉक्टरांनी त्यांना अंडे घेतल्याशिवाय इलाज नाही असे सांगितले. तेव्हा काकासाहेब शांतपणे म्हणाले, "जर दुसरा पर्यायच नसेल तर मग मृत्यूचे स्वागत करीन." त्यांची व्रतनिष्ठा मृत्यूविषयक मैत्र असे होते.

त्यांच्या रसिकतेबाबत श्रीपाद जोशीही आपला अनुभव सांगताना म्हणतात, 'पत्राची सुबक घडी कशी घालावी, लिहिताना शब्दांत अंतर कसे सोडावे, शिरोरेखा न देताही अक्षर कसे सुंदर दिसू शकते हे सर्व मी त्यांच्याकडेच शिकलो.'

जीवनातील प्रत्येक गोष्टीबद्दल अशी अदम्य रसिकतेची नजर असल्यामुळेच काकासाहेबांचे अध्यात्मही जीवनविन्मुख नाही. अध्यात्मसाधनेलाही ते जीवनयोग-साधनच मानतात. ते म्हणतात, "जीवन जगताजगताच ज्ञान प्राप्त होते. उत्कटतेने जगतानाच ध्यान एकाग्रता सिद्ध होत जाते. यमनियमही जगताजगतानाच पक्के होत जातात व त्यातूनच विवेक वाढत जातो. जीवनसाधनेतून योगसाधना पुष्ट होते. आत्मदर्शन घडू लागते. जीवनसाधना करतानाच योगसाधना साधणे हेच 'जीवन-योगा'चे वैशिष्ट्य आहे." आणि म्हणूनच त्यांच्या जीवनदृष्टीत मानसिक उन्नयनाला महत्त्व असले तरी शरीराला ते तुच्छ मानत नाहीत. तपाच्या नावाखाली शरीराला दंड देणे, त्याच्या गरजा दुर्लक्षित करणे हे त्यांना मान्य नव्हते. ते म्हणतात, "शरीर तर आपला निष्ठावान चिरसाथी आहे. देशदेशांतर केले तरी तोच आपल्याला साथ देत असतो. तो कोणाच्या खोड्या करत नसतो. खादाडपणा, जाग्रणं, स्वैर वागणं, हे सारे मनाचे अत्याचार आहेत. त्याची शिक्षा मात्र देहाला मिळत राहते."

अशा प्रकारे जीवनातील अनेक घटनांबद्दल मौलिक व स्वतंत्र चिंतन करून आपली मते त्यांनी सिद्ध केली आहेत. त्याप्रमाणे सहवासात आलेल्या मोठमोठ्या व्यक्तींबाबतही त्यांनी अचूक मूल्यमापन केले आहे. त्यातून त्या त्या व्यक्तीच्या मूलगामी वैशिष्ट्याचे दर्शन सहजपणे घडते.

स्वातंत्र्य आंदोलनात सहभागी झाल्याने व पुढे गांधीजींच्या जवळ राहिल्याने काकासाहेबांचा अनेक लोकांशी घनिष्ट संबंध आला. त्यातले सर्वात निकटचे सहकारी विनोबाजी. काकांच्याच शिफारशीवरून गांधीजींनी विनोबांना वर्ध्याच्या नव्या आश्रमात पाठवले. दोघेही स्वतंत्र विचाराचे असूनही पंचवीस वर्षे ते गांधीजींच्या वैचारिक भूमिकेशी तद्रूप राहिले. काकांचे वाचन अफाट होते. वाचताना ते खुणा करून ठेवत व विनोबा तेवढेच वाचत असत असे सांगतात. दोघांचे आदर्श एकच होते, कार्य एक होते. मात्र कार्यपद्धती आपापली वेगळी होती. विनोबा काकांपेक्षा दहा वर्षांनी लहान होते. पण त्यांच्याविषयी काकांना आदर व वात्सल्य दोन्ही वाटत असे. ते म्हणतात, "मी वयाने व संकल्प आणि क्रमाच्या बाबतीत त्यांच्याहून थोडा पुढे असलो तरी गांधीजींच्या कामाचा प्रसार व विस्तार ह्यात ते सिनिअर मोस्ट आहेत." काकासाहेब पुढे म्हणतात, "तरीपण विनोबात गांधीजी एक तृतीयांशच आहेत. उरलेले दोन तृतीयांश शंकराचार्य व ज्ञानेश्वर सामावले आहोत. म्हणूनच सर्वोदय कल्पना ते पूर्णपणे अंतःकरणपूर्वक स्वीकारू शकले नाहीत."

काकासाहेब व विनोबाजी ह्या गांधीजींच्या दोन मराठी शिष्योत्तमातील भेद माडखोलकरांनी नेमका मांडला आहे. ते म्हणतात, 'विनोबांनी आपल्या जीवन व साहित्याच्या रूपाने उपनिषदांचा परिपाक सादर

केला. तर काकासाहेबांनी भारतीय संस्कृतीतील सगळी रुचिरता व मंगलता वाङ्मयरूप देऊन उभी केली.' माडखोलकर म्हणूनच काकासाहेबांना 'रसयोगी' असेही म्हणतात.

जवाहरलाल नेहरूंचा व काकासाहेबांचा निकट संबंध होता. जवाहरलालजी, गांधीजींचे सच्चे अनुयायी नव्हते. त्यांचे मार्ग वेगळे होते. गांधीजींचे ग्रामोद्योग, अर्थकारण त्यांना मान्य नव्हते. तरी काकासाहेबांना जवाहरलालजींविषयी आत्मीयता होती. आपल मतभेद जवाहरलालजी स्पष्टपणे मांडत. हा त्यांचा प्रामाणिकपणा काकासाहेबांना भावे.दुसरे म्हणजे नेहरू हे धर्म, जाती,भाषा, प्रांत ह्या साऱ्यापलीकडचे खरे 'भारतीय व्यक्तिमत्त्व' असे त्यांना वाटे. समन्वयसाधक काकासाहेबांना त्यांचा हा पैलू मोलाचा वाटल्यास नवल नाही.मात्र जवाहरलालजींच्या स्वभावातील कच्चेपणावर काकासाहेबांनी नेमके बोट ठेवले आहे.ते म्हणतात, "ते महत्त्वाच्या प्रश्नांची उपेक्षा करतात.अनेक गंभीर समस्यांबाबत तटस्थपणाची भूमिका घेऊन पाहत राहतात."

चीनच्या मैत्रीभेटीहून परतल्यावर नेहरू चीनच्या प्रगतीने भारले गेले होते. तेव्हा त्यांना धोक्याचा इशारा देताना काकासाहेबांनी म्हटले होते "हा देश सैन्यवादात सर्वात जास्त विश्वास ठेवतो. त्याचा सैन्यवाद सर्व क्षेत्रांत सफल झाला आहे. तेव्हा त्याचापासून आपल्यालाच नव्हे तर रशियाला पण धोका संभवतो." तरीपण पुढे जे घडले त्याबद्दल ते जवाहरलालजीनांच केवळ दोष देत नाहीत. ते म्हणत, "सारे राष्ट्राच गाफील होते. शिवाय राष्ट्राचे सामर्थ्य वाढलेले नाही, तोपर्यंत थोडफार दैवावर विश्वास ठेवून राज्यकर्त्यांना चालावेच लागते." ह्या व्यतिरिक्त साने गुरुजी, वल्लभभाई, दादा धर्माधिकारी, ईश्वरलाल मश्रूवाला आदी सहकाऱ्यांनाबाबतही त्यांनी मार्मिक विश्लेषण केले आहे.

गांधीजींचे एकनिष्ठ अनुयायी, भक्त ही काकासाहेबांची भूमिका शेवटपर्यंत प्रबळ होती. गांधीजींना जीवनातील मांगल्य, पावित्र्य, कल्याणप्रद, उदात्त, सुंदर असे सर्व ह्या भूमीवर नांदावे असे वाटे. म्हणूनच की काय, भारतीय संस्कृतीतील जे जे मंगल- उदात्त, त्याचा परिचय आपल्या जगण्यातून व साहित्यातून लोकांना घडवून काकासाहेबांनी गांधीजींना खरी श्रद्धांजली वाहिली. आयुष्याच्या अखेरीस सारा भूतकाळ विस्मरणात गेला होता. पण गांधीजींना मात्र ते विसरू शकले नव्हते, "खूप दिवस झाले, गांधीजींना भेटलो नाही एकदा भेटायला जाऊ या"असे ते शेवटच्या दिवसांत भ्रमात पुटपुटत असत.

जीवनाकडे पाहण्याचा काकासाहेबांचा दृष्टिकोनही वाढत्या वाचन-चिंतनाने व गांधीजींच्या सहवासात राहिल्याने हळूहळू विकसित झालेला दिसतो. त्यांची स्त्रीविषयक आदराची भावना त्यांच्या 'नारी जीवन परिमल' ह्या देशीविदेशीच्या स्त्रियांच्या व्यक्तिरेखाटनात्मक पुस्तकातून दिसून येते. काकासाहेबांनी एवढे विपुल लेखन केले, पण त्यात स्त्रीपुरुष प्रेमाबाबत फारसे लिहिलेले नाही. तरीही उत्तरायुष्यात आपल्या वासरीतील नोंदीत ते म्हणतात, "स्त्री केवळ भगिनी, माता, पत्नी, पुत्री एवढाच विचार करून चालणार नाही. भावजय, मेहुणी व प्रिया या संबंधांचा पण विचार करायला हवा. जो संबंध समाजमान्य नाही, पण ज्याच्यामुळे कुटुंबाचा, समाजाचा नाश होतो त्याचा विचार आंधळेपणाने न करता त्यावर योग्य उपाय शोधणे शक्य आहे." बदलत जाणाऱ्या समाजव्यवस्थेत मोकळ्या होत चाललेल्या स्त्री-पुरुष संबंधाची दखल घेणे क्रमप्राप्त आहे, ह्याची जाणीव व्यक्त करण्याइतके काकासाहेबांचे विचार उदार होत गेले. स्त्रीशोषणाबाबत वासरीतच ते लिहितात, "युद्धाऐवजी सहयोग जेव्हा रूढ होईल, स्पर्धा व शोषण जाऊन समन्वय युगधर्म होईल तेव्हा

स्त्रियांना समानता प्राप्त होईल. मगच खऱ्या संस्कृतीचा प्रारंभ होईल. त्यावेळी त्याग, बलिदान, सेवा प्रतिष्ठित होऊन स्त्रीचे श्रेष्ठत्व निश्चितपणे सिद्ध होईल!"

या संदर्भात शेवटचा प्रश्न उपस्थित होतो की, गांधीजींना एकनिष्ठ व विचारवंत अनुयायांची फार मोठी परंपरा महाराष्ट्रात लाभली आहे. त्या परंपरेत काकासाहेबांचे वेगळेपण, स्वतंत्रपण,नेमके काय आहे? सर्वात महत्त्वाचा पहिला भेद म्हणजे विनोबा, काकासाहेब व दादा धर्माधिकारी हे तीनच गांधीवादी विचारवंत गांधीजींच्या निकटच्या सहवासात राहिलेले आहेत. बाकी सर्व महाराष्ट्रात आपापल्या भागात राहून गांधी तत्त्वज्ञानाचे चिंतन, अभ्यास, आचार व प्रचार करत होते. ह्या तिघांतही काकासाहेब वयाने जेष्ठ व गांधीजींकडे सर्वप्रथम अनुयायी म्हणून गेलेल्या लोकांपैकी एक जुने, जाणते गांधीवादी मानले जातात. ते गांधीजींचे अनन्य भक्त असले, गांधीजींच्या तत्त्वज्ञानावर त्यांच्या अश्रामजीवनावर त्यांची श्रद्धा असली तरी त्यांनी विनोबाजी, शंकरराव देव यांच्याप्रमाणे कडक वैराग्ययुक्त अश्रामजीवनसरणी कधीही अनुसरली नव्हती.

त्यांच्या ह्या वैशिष्ट्याचे वर्णन करताना त्यांच्या छोटेखानी चरित्रात गांधीवादी लेखक वामनराव चोरघडे म्हणतात, 'जबरीचा संयम वा निकडीचा अत्मानिरोध करण्याची त्यांच्यावर पाळी आली नाही. फलाहारावर राहिले तर त्याचे उच्चारित प्रदर्शन त्यांनी कधी केले नाही. गांधीजींचे भक्त, पण पंचा लावून राहण्याची गरज त्यांना वाटली नाही. अतिरिक्त संयमाने स्वभावावर फाजील ताण पडून जी कठोरता येते ती त्यांच्या व्यक्तिमत्त्वात कधी आली नाही. तपस्व्याची सारी लक्षणे, पण त्यांत कधी दंडन नव्हते, साधेपणा होता पण त्याचे आडंबर नव्हते. म्हणूनच ते 'काका' ह्या घरगुती नावानेच ओळखले जात. ह्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे ते गांधी परिवारातले, पण त्यांचा पिंड मूलतः वेगळा होता. गांधीवादी मंडळींत अभावाने आढळणारी विलक्षण रसिक व सौंदर्यपूजक वृत्ती त्यांच्यात मूलतःच होती. सौंदर्याची व कलेची अनासक्त पूजा हीच त्यांची सहजवृत्ती होती. रामदास भटकळ आपल्या लहानपणच्या आठवणी सांगताना म्हणतात, 'त्या वेळी आम्हाला परिचित इतर गांधीवादी आचार्यांच्या तुलनेत काकासाहेब इतके रसिक कसे याचे आश्चर्य वाटायचे.'

निसर्गसौंदर्याइतकेच मानवी जीवनातील, विविध कलांतील सौंदर्य त्यांच्या संवेदनशील व समृद्ध मनाला तरंगित करीत असे. तशात रवीन्द्रांच्या प्रभावामुळे, उपनिषदांच्या परीचयामुळे, जीवनातील चैतन्याच्या आनंदलहरीशी ते एकतान झाले होते. त्यातूनच त्यांची अत्यंत सुंदर व लालित्यपूर्ण साहित्यनिर्मिती झालेली आहे. ती त्यांना इतर गांधीवादी विचारवंतांपासून ठळकपणे वेगळे करते. गांधीजींच्या प्रभावातील प्रज्ञावान व प्रतिभाशाली व्यक्तिमत्त्वात काकासाहेब त्यांच्या सर्जक, साहित्यसेवेमुळे तळपून उठतात. म्हणूनच एक गुजराती लेखक, डॉ. जयंत पटेल म्हणतात, 'गांभीर्य आणि रसिकता, चिंतनदृष्टी आणि सर्जकदृष्टी दोन्हींचा आपल्या साहित्यात समन्वय करून काकासाहेबांनी गांधीमार्गीयांत अनन्यता सिद्ध केली आहे.'

श्री. श्रीपाद जोशी त्यांचे वेगळेपण निराळ्याच दृष्टिकोनातून सांगतात. म्हणतात, 'डोळ्यात खुपण्याइतके विलासी व भपकेदार नसले तरी इतर गांधीवादी कार्यकर्त्यांच्या मानाने काकांचे जीवन काहीसे ऐषआरामी किंवा सुखवस्तू होते. ह्याचे एक कारण सरोजबेन नानावटी व रैहाना तय्यबजी ह्या दोघी मैत्रिणी, काकासाहेबांजवळ १९३६ सालापासूनच मानसकन्या म्हणून राहू लागल्या होत्या. बहुधा त्यांच्या प्रभावामुळे

काकासाहेब आश्रमीय न राहता जणू सुखवस्तू गृहस्थ बनून गेले होते. इतर आश्रमवासीयांच्या दृष्टीने ते थोडेसे उपहासास्पद बनले होते. दुसरे कारण म्हणजे ते क्षयरोगी होते.त्यामुळे त्यांना जरा पौष्टिक आहार आवश्यक होता. श्रमाची कामे झेपण्यासारखी नव्हती. गांधीजींच्या विधायक कामांपैकी त्यांनी जे राष्ट्रभाषा प्रचाराचे व शिक्षणाचे काम स्वीकारले होते त्याचे स्वरूप खूपसे पुस्तकी व पांढरपेशी होते. देशभर दौरे काढणे, भाषणे देणे, लोकसंपर्क साधणे, पत्रव्यवहाराद्वारे प्रचाराची संघटना मजबूत करणे- हे त्यांच्या कामाचे मुख्य स्वरूप राहिले.'

काकासाहेब व महाराष्ट्रातील इतर गांधीवादी यांच्यातील आणखी एक फरक सांगताना श्रीपाद जोशी म्हणतात, 'दादा धर्माधिकारी, स.ज.भागवत, विनोबा भावे, आचार्य जावडेकर, शंकरराव देव, अण्णा सहस्रबुद्धे, अप्पासाहेब पटवर्धन इ. विचारवंतांनी गांधीवादी विचारात जशी मौलिक भर टाकली तशी काकासाहेबांनी टाकलेली नाही. गांधींचे विचार सामान्यांना उमगतील असे फुलवून मांडण्यात त्यांचा हातखंडा होता. त्यामुळे विनोबा, जावडेकर, भागवत, शंकरराव देव यांना महाराष्ट्राने गांधीवादाचे खरे प्रवक्ते मानले.'

श्रीपाद जोशींच्या मते, काकांची खरी ओळख 'प्रतिभावान साहित्यकार, ललितशैलीकार, शब्दसृष्टीचे ईश्वर, भटके अथक प्रवासी ही आहे. ह्याबाबतीत ते मोठे होते. त्यामुळे ते गांधींपेक्षा टागोरांचेच अनुयायी वाटतात.'

असा हा रसिक गांधीवादी तत्त्वचिंतक! वयाच्या नव्वदीपर्यंत त्यांचे वाचन, लेखन, चिंतन, चर्चा, पत्रोत्तरे वैगरे कार्यक्रम पूर्वीच्याच उत्साहात चालू होते. वृद्धत्वाचे कोणतेही कटुचिन्ह त्यांच्या देहावर उमटले नव्हते. शरीर ताठ होते, केस पांढरे झाले होते पण ते त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला उठावच देत होते. फक्त श्रवणशक्ती कमी झाली होती. पण आपल्या उपजत नर्मविनोदबुद्धीमुळे ह्याकडेदेखील ते गमतीने पाहू शकत. ह्याबाबत सुप्रसिद्ध लेखिका, मृणालिनी देसाई आपली एक आठवण सांगतात. त्या म्हणतात, 'जगण्याची इच्छा कितीही उत्कट असली तरी वृद्धत्व सर्वानाच नकोसे असते. पण काकासाहेबांजवळ येऊन वृद्धत्व किती प्रसन्न व सुंदर झाले होते! वृद्धापकाळात शारीरिक क्षमता क्षीण होत जातात. ह्या वस्तुस्थितीचा स्वीकारसुद्धा त्यांनी किती सहजतेने केला होता! कानांनी कमी ऐकू येऊ लागले होते. तर म्हणत, आता तर मी अर्धा प्रोफेसरच बनून गेलो आहे. कुणाचं काहीच ऐकायचं नाही. निःशंकपणे बोलत मात्र  राहायचे. पुढे पूर्ण बहिरेपण आल्यावर हसून म्हणत, आता मी पूर्ण योगी झालो. शेवटपर्यंत त्यांच्या चेहऱ्यावर तृप्त मनाचे एक शांत मधुर तेज असे.'

उतारवयात ते सतत प्रवास करत राहिले. सतत कर्मशील राहिले. एकदा त्यांना कुणीतरी विचारले. ह्या वयातही तुम्ही इतके प्रवास करता. त्रास होत नाही का? त्यावर त्यांनी दिलेले उत्तर मार्मिक आहे. ते म्हणाले, "इतके विविध सुंदर वृक्ष देवाने निर्माण केले. पण त्यात एक उणीव राहिली. त्यांना वाचा व गती नव्हती. म्हणून मन देवाने ह्या देणग्या देऊन माणूस निर्माण केला. वृक्ष एका जागी राहून विकसित होतात. पण माणूस हिंडण्याफिरण्यानेच विकसित होतो. ऋग्वेदाचे पहिले ऋषी मधुच्छंद यांना त्यांच्या गुरुने मंत्र दिला 'चर'. बस्स. माझाही तोच जीवनानंद आहे."

स्वतःच्या दीर्घायुष्याचे गमतीदार कारण काकासाहेब सांगत, "वार्धक्य वा मृत्यू मला पकडायला आले तरी माझ्या भटकंतीमुळे मी त्यांना सापडतच नाही. मी काही त्यांना टाळायचा प्रयत्न करत नाही. किवा त्यांना भेटण्याची मला उत्कंठा पण नाही. जुने मित्र आहेत. जरूर भेटतीलच. जितका उशीर होईल तेवढे अधिक प्रेमाने भेटू."

नव्वदीनंतर त्यांचे शरीर थकले. क्षमता क्षीण झाल्या. आठवण दगा देऊ लागली. तेव्हा मात्र त्यांनी संपूर्ण निवृत्ती स्वीकारली. लेखन, भाषण, प्रवास, कामे, सर्व बंद केले, भोवतालच्या घटनांपासून अलिप्त होऊ लागले. १९७६ मध्ये देशात आणीबाणी जाहीर झाली. इंदिरा गांधींविषयी प्रेम, कौतुक असले तरीपण त्यांचा हा निर्णय काकासाहेबांना आवडला नाही. विनोबांनी मध्यस्थी करावी असा त्यांनी प्रयत्न केला; पण 'अद्याप ती वेळ आलेली नाही' – हे विनोबांचे उत्तर कळले ते निराश झाले. त्यांनी वृत्तपत्र वाचणेच बंद करून टाकले. तरी वातावरणातून वाढती दुरवस्था जाणवे. ते म्हणत, "कुणीतरी त्यांना समजवा रे. ते चुकीच्या रस्त्याने निघालेत."

भेटायला, सल्ला घ्यायला येणाऱ्यांची वर्दळ कमी होत चाललेली. पण आता ते मानसन्मानातच नव्हे तर आपल्या भूतकाळापासूनसुद्धा पूर्णपणे अलिप्त होऊन एक प्रकारच्या ब्राम्ही अवस्थेत वावरू लागले होते. मात्र त्यांच्या अंतरंगातील कृतार्थ तृप्तीची आभा त्यांच्या चेहऱ्यावर निरंतर पसरलेली असे. म्हातारपणसुद्धा किती सुंदर असू शकतं असं पाहणाऱ्याला वाटावं इतकं शानदार व्यक्तिमत्त्व त्यांना शेवटच्या काळात सुद्धा लाभलं होतं. जीवनभर देशसेवेच्या दृष्टीने, जी जी कर्तव्ये त्यांच्या सदसद्विवेकबुद्धीला वाटली, ती त्यांनी तनमनधन अर्पून पार पाडण्याची पराकाष्ठा केली. शेवटच्या वर्षात सर्व भार परमेश्वरावर टाकून मुक्त मनाने, तृप्त हृदयाने ते ईश्वरी साधेनेत मग्न राहत होते. ते म्हणत, "माझ्या मनात जराही असंतोष नाही. कुणाविषयी तक्रारी नाहीत. मी अंतर्यामी तृप्त आहे."

भावी नेतृत्वासाठी काकासाहेबांनी खूप मार्गदर्शक विचार लिहून ठेवले आहेत. त्यांची चिंतनशीलता शेवटपर्यंत ताजी राहिली होती. आचार्य ह्या शब्दाचा अर्थ – जो जीवनमूल्यांचे अध्ययन करतो, प्रतिपादन करतो व स्वतः आचरण करतो तो – असा आहे. त्या दृष्टीने काकासाहेब खरोखरच आचार्य होते. त्यांच्यातला शिक्षकही शेवटपर्यंत सजग होता. झोपेतही ते कुणालातरी शिकवत असत. मृत्यूपूर्वी काही दिवस अगोदर सकाळच्या ग्लानीत ते ईशावास्योपनिषदातील एक श्लोक- 'शतवर्ष कर्मशीलतेचे जीवन जग' कुणालातरी समजावून सांगत होते व तो पण आपल्या मातृभाषेत, मराठीत.

काकासाहेबांनी 'परमसखा मृत्यू' नावाचे मृत्यूशी निगडित विविध पैलूंवर चिंतन करणारे एक ललितसुंदर पुस्तक लिहिले आहे. त्यात ते म्हणतात, "मरण हे एक अद्भुत कोडे आहे. मरण नसते तर ज्ञानाची भूक मानवला लागलीच नसती. मरणात नेहमीच जीवनद्रोह असतो असे नाही. बहुतकरून मरणातच जीवनाची परिपूर्ती व सार्थकता असते. मनुष्य मेल्यानंतरही आपल्या विचारांनी, आपल्या भावनांनी, आपल्या संकल्पनांनी आणि आपल्या पुरुषार्थप्रेरक कार्यांनी समाजात जिवंत राहतो. हे मृत्यूनंतरचे जीवन मरणापूर्वीच्या जीवनाइतकेच महत्त्वाचे असते. मरण शापरूप बनवणे किवा पवित्र आशीर्वादासारखे सुगंधित करणे आपल्याच हाती असते. मृत्यूचे स्मरण अष्टौप्रहर मी करत असतो. त्यामुळे हर्षशोकापलीकडचा जो आनंद आहे त्याचा साक्षात्कार मी करू शकलो आहे. त्यामुळे माझे चित्त प्रसन्न असते."

अनुक्रमणिका

स्वतःच्या मरणाविषयी काकासाहेबांनी खूप विचार केला होता. ते म्हणत, "मरणाचे भय का करावे? थकलेल्या शरीराला झोप जितकी आवश्यक आहे तितकीच जीवनप्रवृत्तींनी शिणलेल्या मनाला चिरनिद्रेची गरज असते. झोपेत मरण यावे हे मला अजिबात आवडणार नाही. मी मरत असावे आणि माझ्या जीवनातल्या ह्या सर्वात मोठ्या घटनेची मला जाणीवही असू नये? छे : देवा,माझी अशी फसवणूक होऊ देऊ नकोस." पुढे ते म्हणतात, "मरणसमयी, आपण मरत आहोत याचे भान जागृत असावे. एकामागे एक अवयव बधीर होत चालले आहेत, छातीत फक्त श्वास चालला आहे. मन-प्राण जागरूकपणे गतआयुष्याचा आढावा घेत आहेत. असे स्वस्थचित्त मरण मला देवाने द्यावे."

सुदैवाने काकासाहेबांना असेच स्वस्थ, सभान भरण आले. शेवटी चार-सहा दिवसांच्या आजाराचे निमित्त होऊन २१ ऑगस्ट १९८१ रोजी त्यांचा अंतरात्मा दिगंतराच्या प्रवासाला निघून गेला.

'ईशावास्योपनिषदा'त म्हटले आहे की- 'इहलोकी कर्मे करीत करीत शंभर वर्षे जगण्याची इच्छा धरावी-'त्यानुसार वयाची पंचाण्णव वर्षे कर्मयोगात रंगून शेवटी हा आनंदयात्री अनंताच्या यात्रेला तृप्त मनाने निघून गेला.

अनुक्रमणिका

## परिशिष्ट - १
## चरित्रपट

| | |
|---|---|
| १ डिसेंबर १८८५ | जन्म- सातारा |
| १८९२ ते १९०३ | शिक्षण- कारवार, पुणे, शहापूर, धारवाड, सावनूर |
| १९०२ | विवाह (सुंदर शिरोडकर/विवाहानंतर ‘लक्ष्मीबाई’) |
| १९०३ | मॅट्रिक पास |
| १९०४ ते १९०७ | फर्गसन कॉलेज पुणे. बी. ए. (तत्त्वज्ञान) पास. |
| १९०८ | गणेश विद्यालय बेळगाव येथे पहिली नोकरी, शिक्षकाची. |
| १९०८ | आईचा मृत्यू. नोकरी सोडून मुंबईत एल. एल. बी. चा अभ्यास.(प्रथम परीक्षा पास) |
| १९०९ | प्रथमपुत्र ‘शंकर’ चा जन्म. |
| १९०९ | दैनिक ‘राष्ट्रमत’ मध्ये कार्यारंभ. |
| १९१० | ‘राष्ट्रमत’ बंद. |
| १९१० | वडिलांचा मृत्यू. |
| १९१० | गंगनाथ विद्यालय (बडोदे) येथे शिक्षक. |
| १९११ | गंगनाथ विद्यालय बंद. हिमालयात प्रयाण. |
| १९१२ | द्वितीयपुत्र ‘बाळ’चा जन्म. |
| १९१३ | ऋषिकुल (हरिद्वार) मुख्यपद. |
| १९१४ | शांतिनिकेतन. |
| १९१५ | शांतिनिकेतनात गांधी भेट. |
| १९१६ | बडोदे येथे गंगाधरराव देशपांड्यांबरोबर ग्रामसेवा. |
| १९१७ | गांधीजींच्या कोचवर आश्रमात दाखल. |
| १९२० | गुजरात विद्यापीठ स्थापना. गांधीजी कुलनायक. |
| १९२० | गुजराती साहित्य संमेलन. टागोर अध्यक्ष. परिचय काकासाहेब. |
| १९२२ | गांधीजींच्या ‘नवजीवन’ मध्ये लेखन सुरू |
| १९२३ | ‘नवजीवन’ मधील स्फोटक लेखाबद्दल प्रथम कारावास एक वर्ष. |
| १९२५ | आजारानंतर चिंचवड, सिंहगड येथे विश्रांती. |
| १९२७ | गांधीजींबरोबर दक्षिणभारतात व श्रीलंकेत प्रवास. |
| १९२८ | गुजरात विद्यापीठ पुनर्रचना. काकासाहेब कुलनायक. |
| १९२९ | गुजरात विद्यापीठाद्वारे गुजराती जोडणीकोश प्रकाशन. |
| ७ ऑक्टोबर १९२९ | काकींचे देहावसान. |
| १९३० | विद्यापीठात राष्ट्रीय शिक्षा संमेलन. येरवडा जेलमध्ये काही काळ. |
| १९३२ | स्वातंत्र्य संग्राम. कारावास- हिंडलगा कारागृह.‘हिंडलग्याचा प्रसाद’ पुस्तक. |
| १९३३ | हैद्राबाद जेल, डांगे यांच्यासह. त्यांच्या हस्ते गीताधर्म लिहवून घेतले. |
| १९३४ | गुजरात सोडून वर्धा येथे वास्तव्य. |
| १९३५ | हिंदी साहित्य संमेलन. लिपिसुधार समितीचे अध्यक्ष. |
| १९३६ | १२ वे गुजराती साहित्य संमेलन. कलाविभागाचे अध्यक्ष. |

अनुक्रमणिका

| | |
|---|---|
| १९३६ | 'नवजीवन' प्रकाशनाने काकासाहेबांच्या गुजराती लेखांचे विषयवार प्रकाशन सुरू केले. (जीवन विकास.) |
| १९३७ | वर्धा शिक्षण योजना समितीचे सदस्य. राष्ट्रभाषाप्रचारकार्य. |
| १९३८ | 'सर्वोदय' मासिक सुरू. काका प्रमुख संपादक. |
| १९३९ | 'सबकी बोली' प्रकाशित. राष्ट्रभाषेच्या वैज्ञानिक शीघ्रलिपीचा शोध. |
| १९४२ | 'हिंदुस्थानी' प्रचारसभेची स्थापना. |
| १९४३ – ४४ | कारावास. (मध्यप्रदेश व दक्षिणभारत.) |
| १९४५ | 'हिंदुस्थानी'चे प्रचारकार्य सुरू. |
| १९४६ | षष्ट्यब्दीपूर्तीचे अनेक कार्यक्रम. |
| १९४७-४८ | स्वातंत्र्य, गांधीवध. |
| १९४७-४८ | हिंदी शॉर्टहॅन्ड व टाईपरायटिंग समितीचे अध्यक्ष. |
| १९५० | पूर्व आफ्रिका यात्रा. 'इंडिअन कौन्सिल फॉर कल्चरल रिलेशन्स' चे उपाध्यक्ष. |
| १९५१ | गांधीस्मारक संग्रहालयाचे संचालक म्हणून दिल्ली येथे प्रयाण. |
| १९५२ | राज्यसभेचे मानद सभासदत्व. |
| १९५२ | पहिली युरोप यात्रा व पश्चिम आफ्रिका यात्रा. |
| १९५३ | मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष.त्यानिमित्ताने भारतभ्रमण. |
| १९५४ | पहिली जपान यात्रा व भारतभ्रमण. |
| १९५५ | मागासवर्गीय आयोगाचा अहवाल प्रकाशित. |
| १९५६ | गांधीवाङ्मय प्रकाशन योजनेवर नियुक्ती. |
| १९५७ | दुसरी जपान यात्रा, चीन यात्रा, थायलंड व कम्बोडिया यात्रा. |
| १९५८ | इंग्लंड, वेस्ट इंडिज, त्रिनिदाद, गियाना, सुरीनाम, मॉरिशस यात्रा. |
| १९५८ | राजसभेत दुसऱ्यांदा नियुक्ती. |
| १९५९ | विसाव्या गुजराती साहित्य परिषदेचे अध्यक्ष. |
| १९६० | सरकारी हिंदी विश्वकोश समितीचे अध्यक्ष. |
| १९६१ | 'कालेलकर अध्ययन ग्रंथ' अर्पण. (पंचाहत्तराव्या वर्षाच्या निमित्ताने). |
| १९६२ | जपानची तिसरी यात्रा. |
| १९६२ | रशिया भेट. |
| १९६४ | राज्यसभेतून निवृत्त. राष्ट्रपतींकडून 'पद्मविभूषण' किताब. |
| १९६५ | समन्वय आश्रमाच्या विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष. |
| १९६५ | ८० वर्षे पूर्ण. त्यानिमित्ताने राष्ट्रपती भवनात 'संस्कृति के परिव्राजक'ग्रंथ अर्पित. |
| १९६६ | 'जीवनव्यवस्था'ह्या गुजराती ग्रंथाला साहित्य अकादमीचे पारितोषिक. |
| १९६६ | 'परमसखा मृत्यू'ह्या हिंदी पुस्तकाला उत्तरप्रदेश सरकारचे पारितोषिक. |
| १९६७ | चौथी जपान यात्रा. गांधी विद्यापीठ (बेछडी) स्थापना, काकासाहेब कुलपती. आणंद येथील सरदार पटेल युनिव्हर्सिटीकडून डी.लिट्. पदवी. |
| १९६७ | १० जुलै रोजी 'विश्व समन्वय संघा'ची स्थापना. |
| १९६८ | पाचवी जपान यात्रा. (निमंत्रित) |
| १९६९ | मुंबईत 'रेखा प्रकाशन' तर्फे ८५ वा वाढदिवस साजरा. |
| १९७० | ईशान्य भारताची यात्रा. दक्षिणभारत यात्रा. |

अनुक्रमणिका

| | |
|---|---|
| १९७० | ८६ व्या वाढदिवशी ‘सूतांजली’ सन्मान. |
| १९७१ | गुजरात युनिव्हर्सिटीतर्फे डी. लिट्.पदवी व साहित्य अकादमीची फेलोशिप. |
| १९७१ | गांधी संस्थेतर्फे ८७ वा वाढदिवस साजरा. |
| १९७२ | बौद्ध भिक्षू फुजीई गुरुजींकडून सहाव्या जपान यात्रेचे निमंत्रण. |
| १९७४ | काशी विद्यापीठातर्फे सन्मान. |
| १९७४ | द्वितीय पुत्र बाळ यांचे निधन. |
| १९७५ | मानसकन्या रैहाना तय्यबजी हिचा मृत्यू. |
| १९७५ | ९१ व्या वाढदिवसानिमित्त ‘प्रकृति का संगीत’ या पुस्तकाचे पंतप्रधान इंदिरा गांधींच्या हस्ते प्रकाशन. |
| १९७६ | हिंदुस्थानी साहित्यसभा व मंगलप्रभात पत्रिकेतून निवृत्ती. |
| १९७७ | ९३ व्या वाढदिवशी ‘उपनिषदांचा बोध’ पुस्तकाचे प्रकाशन. |
| १९७९ | ९५ व्या वाढदिवशी ‘समन्वय के साधक’ नावाचा अभिनंदन ग्रंथ उपराष्ट्रपती हिदायतुल्ला यांच्या हस्ते अर्पित. |
| २१ ऑगस्ट १९८१ | दिल्ली येथे देहावसान. |

अनुक्रमणिका

## परिशिष्ट - २
## साहित्यसूची

**(अ) काकासाहेब कालेलकरांची मराठी पुस्तके**

| | | |
|---|---|---|
| १ | स्वामी रामतीर्थ जीवन चरित्र | १९०७ |
| २ | गीतेचे समाजरचनाशास्त्र | १९३३ |
| ३ | हिंडलग्याचा प्रसाद | १९३४ |
| ४ | साहित्याचे मूलधन | १९३८ |
| ५ | साहित्याची कामगिरी | १९४८ |
| ६ | स्मरणयात्रा | १९४९ |
| ७ | रवीन्द्रप्रतिभेचे कोवळे किरण | १९५५ |
| ८ | पुण्यभूमि गोमंतक | १९५८ |
| ९ | खेळकर पाने | १९६४ |
| १० | भारतदर्शन (सात भाग) | संपादन : रवींद्र केळेकर) |
| | १ महाराष्ट्र भूमी | १९६५ |
| | २ दक्षिण भारत | १९६६ |
| | ३ मध्य भारत | १९६७ |
| | ४ हिमशिखरांच्या सान्निध्यात | १९६७ |
| | ५ अर्णवाचे आमंत्रण | १९६८ |
| | ६ जीवनाचा कायोत्सर्ग | १९७० |
| | ७ निसर्गहास्य | १९७० |
| ११ | संत मानस तुकाराम | १९६७ |
| १२ | नवभारताचा उद्गाता (विवेकानंद) | १९७२ |
| १३ | आंतरजगातील यात्री (वासरी) | १९७३ |
| १४ | सप्रेम वंदेमातरम् (पत्रसंग्रह) | १९४७ संपादन : पुंडलिक कातगडे |

**(ब) काकासाहेब कालेलकर यांनी मराठीत अनुवाद केलेली पुस्तके.**

| | | |
|---|---|---|
| १ | मृगजळातील मोती (जिब्रान) | १९५१ |
| २ | मालंच (रवीन्द्रनाथ –कादंबरी) | १९५२ |
| ३ | रवीन्द्र मनन | १९५८ |
| ४ | रवीन्द्र विणा (रवीन्द्र गीते) | १९६१ |
| ५ | रवीन्द्र झंकार (रवीन्द्र गीते व सारग्रहण) | १९६२ |
| ६ | नैवेद्य (रवीन्द्र गीते) | १९६८ |

अनुक्रमणिका

**(क) काकासाहेब कालेलकरांची मराठीत अनुवादित झालेली पुस्तके.**

| | | | |
|---|---|---|---|
| | | | अनुवादक |
| १ | उत्तरेकडील भिंती | १९३४ | सतीश कालेलकर |
| २ | जिवंत व्रतोत्सव | १९४० | भाऊ धर्माधिकारी |
| ३ | हिमालयातील प्रवास | १९४२ | भाऊ धर्माधिकारी |
| ४ | जीवन विहार | १९४३ | श्रीपाद जोशी |
| ५ | ब्रह्मदेशाचा प्रवास | १९४३ | श्रीपाद जोशी |
| ६ | जीवन आणि समाज | १९४३ | श्रीपाद जोशी |
| ७ | समाज आणि समाजसेवा | १९४३ | श्रीपाद जोशी |
| ८ | जीवन संस्कृती | १९४३ | श्रीपाद जोशी |
| ९ | वनशोभा | १९४४ | काकासाहेब कालेलकर |
| १० | भक्तिकुसुमे | १९४४ | वामनराव चोरघडे, माधव सावंत |
| ११ | आमच्या देशाचे दर्शन | १९४४ | वामनराव चोरघडे, माधव सावंत |
| १२ | लाटांचे तांडव | १९४५ | वामनराव चोरघडे, माधव सावंत |
| १३ | हिंदूंचे समाजकारण | १९४५ | श्रीपाद जोशी |
| १४ | सामाजिक प्रश्न | १९४६ | श्रीपाद जोशी |
| १५ | लोकमाता | १९४७ | प्रेम कंटक |
| १६ | जीवनातील आनंद | १९४७ | पां.ग. देशपांडे |
| १७ | बापूजींची ओझरती दर्शने | १९५० | बा. भ. बोरकर |
| १८ | जीवनलीला | १९५८ | नरेश मंत्री |
| १९ | परमसखा मृत्यू | १९६८ | बाबाजी मोघे |
| २० | वात्सल्याची प्रसाददीक्षा (संपा.) | १९३८ | भाऊ धर्माधाकारी |
| २१ | बापूंची स्त्रियांस पत्रे (संपा.) | १९५० | पां.ग. देशपांडे |
| २२ | नागरी वर्ण लिपी बोध | १९५१ | काकासाहेब कालेलकर |

**गुजराती**

| | | |
|---|---|---|
| १ | स्वदेशी धर्म | १९२० |
| २ | कालेलकरना लेखो भाग-१ | १९२३ |
| ३ | गामडामां जईने शुं करीशुं? | १९२३ |
| ४ | पूर्वरंग (श्री नरहरि परीख यांच्या सहकार्याने) | १९२३ |
| ५ | हिमालयनो प्रवास | १९२४ |
| ६ | कालेलकरना लेखो भाग-२ | १९२५ |
| ७ | ओतराली दीवालो | १९२५ |
| ८ | करंडिया, बेकरी | |
| ९ | ब्रह्मदेशनो प्रवास | १९३१ |
| १० | जीवता तहेवारो | १९३४ |

अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| ११ | लोकमाता | १९३४ |
| १२ | स्मरण यात्रा | १९३४ |
| १३ | लोकजीवन (मराठी 'हिण्डलगयाचा प्रसाद'चा अनुवाद) | १९३५ |
| १४ | जीवननो आनन्द | १९३६ |
| १५ | जीवन-विकास | १९३६ |
| १६ | जीवन भारती | १९३७ |
| १७ | जीवन संस्कृति | १९३९ |
| १८ | सद्बोधशतकम् | १९४१ |
| १९ | गीताधर्म (मराठी 'गीतेचें समाज रचना-शास्त्र'च्या आधारावर | १९४४ |
| २० | संकलित भगवद्गीता | १९४५ |
| २१ | मानवीखंडियेरो (पेरी बरजेस यांच्या 'हू वॉक्स अलोन' या पुस्तकाचा श्री. कि. घ. मशरूवाला यांच्या सहकार्याने केलेला अनुवाद | १९४६ |
| २२ | गीतासार | १९४७ |
| २३ | श्री नेत्रमणिभाई ने | १९४७ |
| २४ | बापुनी झांकी (मूळ हिंदी पुस्तकाचा अनुवाद) | १९४९ |
| २५ | पूर्व आफ्रिका मां | १९५१ |
| २६ | धर्मोदय | १९५२ |
| २७ | रखडवानो आनन्द | १९५३ |
| २८ | जीवन लीला ('लोकमाता'ची सुधारित आवृत्ती) | १९५६ |
| २९ | जीवन प्रदीप | १९५६ |
| ३० | अवारनवार | १९५६ |
| ३१ | मधुसंचय | १९५७ |
| ३२ | उगमणो देश-जपान | १९५८ |
| ३३ | चि. चन्दनने | १९५८ |
| ३४ | जीवन-चिंतन | १९५९ |
| ३५ | मीठाना प्रतापे | १९५९ |
| ३६ | रवीन्द्र सौरभ (मराठी पुस्तकाचा अनुवाद) | १९५९ |
| ३७ | नारी गौरवनो कवि | १९६० |
| ३८ | शुद्ध जीवन दृष्टिनी भाषा-नीति | १९६० |
| ३९ | भारतीय संस्कृतिनो उद्गाता | १९६१ |
| ४० | साहित्यमां सार्वभौम जीवन | १९६१ |
| ४१ | चिंतन अने पुरुषार्थमां समन्वय | १९६१ |
| ४२ | रविच्छविनुं उपस्थान अने तर्पण | १९६१ |
| ४३ | शर्करा द्वीप मोरीशियस | १९६२ |
| ४४ | जीवन व्यवस्था | १९६३ |
| ४५ | विद्यार्थिनीने पत्रो | १९६४ |
| ४६ | स्मरण यात्रा (संक्षिप्त) | १९६७ |

अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| ४७ | भारत दर्शन भाग-१ | १९६७ |
| ४८ | भारत दर्शन भाग-२ | १९६७ |
| ४९ | भारत दर्शन भाग-३ | १९६८ |
| ५० | भारत दर्शन भाग-४ | १९६८ |
| ५१ | गुजरातमां गांधीयुग | १९६९ |
| ५२ | परमसखा मृत्यू (हिन्दी पुस्तकाचा अनुवाद) | १९६९ |
| ५३ | प्रासंगिक प्रतिसाद | १९७० |
| ५४ | विरल सहवास | १९७१ |
| ५५ | वात्सल्यमयी प्रसादी | १९७२ |
| ५६ | भजनांजलि | १९७४ |
| ५७ | गांधी युगना ज्योतिर्धरो (गांधी युग के जलते चिराग या पुस्तकाचा अनुवाद) | १९७५ |
| ५८ | नारी जीवन परिमल | १९७७ |
| ५९ | ज्यां दरेकने पहोचवुं छे | १९७७ |

**काकासाहेबांनी संपादित केलेली पुस्तके**

| | | |
|---|---|---|
| १ | बापुना पत्रो — १ आश्रमनी बहेनोने | १९४९ |
| २ | ” ”— ३ कुसुम बहेन देसाई ने | १९५४ |
| ३ | ” ” — ५ कु. प्रेमाबहन कंटकने | १९६० |
| ४ | ” ” — ६ गं-स्व. गंगाबहेनने | १९६० |
| ५ | गीता पदार्थ कोश | १९६० |
| ६ | बापू के पत्र- बीबी अमतुस्सलाम के नाम | १९६३ |

**हिन्दी**

| | | |
|---|---|---|
| १. | राष्ट्रीय शिक्षा के आदर्शो का विकास | १९२८ |
| २. | जिन्दा बनो | १९३० |
| ३. | सहजीवनकी समस्या | १९३७ |
| ४. | सप्त सरिता | १९३७ |
| ५. | कला : एक जीवन दर्शन | १९३७ |
| ६. | अजित वीर्य बाहुबलि (अनुवाद) | १९४२ |
| ७. | दो आम (अनुवाद) | १९४७ |
| ८. | जीवन का काव्य (अनुवाद) | १९४७ |
| ९. | जीवन-विहार (अनुवाद) | १९४७ |
| १०. | हिन्दुस्तानी की नीति | १९४७ |
| ११. | हिन्दुस्तानी के प्रचारक गांधीजी | १९४८ |
| १२. | बापू की झांकियां | १९४८ |

अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| १३. | हिमालय की यात्रा (अनुवाद) | १९४८ |
| १४. | नागरी वर्णलिपी बोध | १९५१ |
| १५. | उस पार के पडोसी | १९५१ |
| १६. | कैद की आजादी (उत्तर की दीवारें) | १९५१ |
| १७. | स्मरण-यात्रा (अनुवाद) | १९५३ |
| १८. | हिमालय निवसियों से | १९५४ |
| १९. | जीवन-साहित्य | १९५५ |
| २०. | लोक-जीवन | १९५५ |
| २१. | जीवन संस्कृति की बुनियाद | १९५५ |
| २२. | नक्षत्र माला | १९५८ |
| २३. | जीवन लीला | १९५८ |
| २४. | सूर्योदय का देश | १९५९ |
| २५. | गांधीजी की अध्यात्म –साधना | १९५९ |
| २६. | स्वराज्य-भाषा | १९५६ |
| २७. | सद्‌बोधशतकम् | १९६१ |
| २८. | कठोर कृपा | १९६१ |
| २९. | गीता-रत्न-प्रभा | १९६१ |
| ३०. | आश्रम-संहिता | १९६२ |
| ३१. | नमक के प्रभाव से | १९६२ |
| ३२. | प्रजा का राज प्रजा की भाषा में | १९६२ |
| ३३. | उडते फूल | १९६४ |
| ३४. | यात्रा का आनन्द | १९६५ |
| ३५. | समन्वय | १९६५ |
| ३६. | सत्याग्रह-विचार और युद्ध-नीति | १९६५ |
| ३७. | परमसखा मृत्यू | १९६६ |
| ३८. | शान्तिसेना और विश्वशान्ति | १९६६ |
| ३९. | समन्वय संस्कृति की ओर | १९६७ |
| ४०. | गीता के प्रेरक तत्त्व | १९६७ |
| ४१. | राष्ट्रभारती हिन्दी का प्रश्न | १९६७ |
| ४२. | युगमूर्ति रवीन्द्रनाथ | १९६९ |
| ४३. | जीवन–योग की साधना | १९६९ |
| ४४. | विनोबा और सर्वोदय क्रांती | १९७० |
| ४५. | गांधी-युग के जलते चिराग | १९७० |
| ४६. | गांधी चरित्र कीर्तन | १९७० |
| ४७. | गांधीजी का जीवन दर्शन | १९७० |
| ४८. | गांधीजी का रचनात्मक क्रान्तिशास्त्र (दो खण्डों मे) | १९७१ |
| ४९. | नवभारत के चन्द निर्माता | १९७२ |
| ५०. | युगानुकूल हिन्दू जीवन-दृष्टि | १९७२ |

अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| ५१. | स्वराज्य संस्कृति के संतरी | १९७३ |
| ५२. | प्रकृति का संगीत (मल्यालम् मध्येही अनुवादित) | १९७६ |
| ५३. | ईशावास्य उपनिषद् | १९७६ |
| ५४. | उपनिषदों का बोध | १९७७ |

**संपादित पुस्तकें**

| | | |
|---|---|---|
| १. | बापू के पत्र बजाज परिवार के नाम | १९५७ |
| २. | स्मरणांजलि | १९५७ |
| ३. | आश्रम की बहनों से | १९५७ |

**कोंकणी**

| | | |
|---|---|---|
| १. | उत्तर दिकाच्यो वणत्यो (अनुवाद) | १९५६ |

**उर्दू**

| | | |
|---|---|---|
| १. | बापू की झांकियां (अनुवाद) | १९५८ |

**बंगला**

| | | |
|---|---|---|
| १. | जीवन लीला (अनुवाद) | १९५८ |

**मल्यालम**

| | | |
|---|---|---|
| १. | गीता रत्न प्रभा | |
| २. | जीवन लीला | |

**इंग्रजी**

| | | |
|---|---|---|
| १. | स्ट्रचे ग्लिम्सेस ऑफ बापू | १९५० |
| २. | अवर नेक्स्ट शोर नेबर्स | १९५४ |
| ३. | ए ग्लिम्प्स ऑफ गांधीजी | १९६० |
| ४. | ईवन बिहाइण्ड दि बार्स | १९६१ |
| ५. | दि नागरी अल्फाबेट्स | १९६१ |
| ६ | दि गीता इज जीवन योग | १९६७ |

अनुक्रमणिका

**संदर्भ-सूची**


| | | | |
|---|---|---|---|
| १ | आधुनिक भारत के निर्माता काकासाहेब कालेलकर | चरित्र (हिंदी) | रवीन्द्र केळेकर |
| २ | ज्ञाननिधीच्या सान्निध्यात | वार्तालाप | रवीन्द्र केळेकर |
| ३ | ए गांधीयन पॅट्रिआर्क | चरित्र | श्री.माधोप्रसाद |
| ४ | आचार्य काकासाहेब कालेलकर (जीवनदर्शन) | चरित्रपुस्तिका | वामनराव चोरघडे |
| ५ | उलगाउलगा | आत्मचरित्र | श्रीपाद जोशी |
| ६ | काकासाहेब कालेलकर जीवन अने साहित्य | प्रबंध | डॉ.जयंत पटेल |
| ७ | पहाटतारे | लेखसंग्रह | दादा धर्माधिकारी |
| ८ | कालेलकर ग्रंथावली | गुजराती १५ खंड | |
| ९ | कालेलकर अध्ययन ग्रंथ | गौरवग्रंथ | |
| १० | संस्कृति के परिव्राजक | गौरवग्रंथ | |
| ११ | समन्वय के साधक | गौरवग्रंथ | |
| १२ | इये मराठीचिये नगरी : गांधीजी | प्रबंध | डॉ अनंतराव जगताप |
| १३ | गुजराती साहित्यनी विकास रेखा | समीक्षा ग्रंथ | धीरूभाई ठक्कर |
| १४ | समसंवदन | समीक्षा ग्रंथ | उमाशंकर जोशी |
| १५ | काका कालेलकरांचे जीवनचिंतन | संकलन | डॉ. ग.ना.जोशी |
| १६ | मराठीतील प्रवासवर्णने | प्रबंध | डॉ. चंद्रकांत वर्तक |
| १७ | सत्याग्रही महाराष्ट्र | - | प्रेम कंटक |
| १८ | दिवे लामणदिवे | लेखसंग्रह | रवीन्द्र पिंगे |
| १९ | अप्रकाशित आत्मचरित्र | - | बा.भ.बोरकर |
| २० | खेळकर पाने(काका कालेलकर) | लेखसंग्रहाची प्रस्तावना | मंगेश पाडगावकर |
| २१ | 'मीरा'(पाडगावकर ) | काव्यसंग्रहाची प्रस्तावना | काकासाहेब कालेलकर |
| २२ | रवीन्द्रनाथ | चरित्र | गं.दे.खानोलकर |
| २३ | साठी, पंच्याहातरी, नव्वदी,निमित्त विविध अंकात आलेले स्फुटलेखन. | | |


अनुक्रमणिका

## परिशिष्ट - ३

| अंक | वर्ष | लेखक |
|---|---|---|
| ध्रुव | १५ जून १९४५ | श्रीपाद जोशी |
| चित्रमय जगत | फेब्रु १९४६ | श्री. ना बनहट्टी |
| किर्लोस्कर | मे १९६४ | लेखक – सव्यसाची अनु. मंगेश पदकी |
| तरुण भारत | १ डिसें. १९८१ | भास्कर नंदनवार |
| पुरुषार्थ | दीपावली १९७४ | श्रीपाद जोशी |
| लोकप्रभा | २० सप्टें १९८१ | वि. ह. कुळकर्णी |
| तरुण भारत | २३ ऑगस्ट १९८१ | संपादकीय मृत्युलेख |
| नवशक्ती | २५ ऑगस्ट १९८५ | रमाकांत पाटील |
| महाराष्ट्र साहित्य परिषद | ऑक्टो, नोव्हे, डिसें. ८१ | श्रीपाद जोशी |
| लोकसत्ता | ७ जुलै १९८५ | काका कालेलकर अनु. शरद मंत्री |

अनुक्रमणिका

‘**अर्वाचीन महाराष्ट्राची जडणघडण**’ या मालेतील पुस्तके

१) महाराष्ट्र साहित्य परिषद : म. श्री. दीक्षित

पृष्ठे ११४, मूल्य ५० रुपये.

२) मोरो केशव दामले : व्यक्ती आणि कार्य : कृष्ण. श्री. अर्जुनवाडकर.

पृष्ठे १०३, मूल्य ५० रुपये.

३) गंगाधर बाळकृष्ण सरदार : व्यक्ती आणि कार्य : हेमंत वि. इनामदार

पृष्ठे १०८, मूल्य ६० रुपये.

४) आचार्य काका कालेलकर : व्यक्ती आणि कार्य : मृणालिनी जोगळेकर

पृष्ठे १८०, मूल्य १५० रुपये.

**आगामी**

५) बालगंधर्व : व्यक्ती आणि कार्य : मोहिनी वर्दे

मूल्य ६० रुपये.

अनुक्रमणिका

‘लोकमाता’ आणि ‘भारतदर्शन’ ह्या अपूर्व पुस्तकांमध्ये महाराष्ट्रातील नद्या, महाराष्ट्रभूमी, महाराष्ट्रातील नवी-जुनी शहरे आणि किल्ले, देवस्थाने, तीर्थस्थाने ह्यांची चित्रे रेखाटताना, त्या त्या स्थळांचा भूगोल, इतिहास, सांस्कृतिक वैशिष्ट्ये, तेथील निसर्ग व ह्या साऱ्यांतून उमलणारे सखोल चिंतन यांचा एखाद्या जरतारी पैठणीसारखा सुंदर पट विणला गेलेला आहे. काकासाहेबांच्या नजरेतून महाराष्ट्राचे भूत-वर्तमान-भविष्य उलगडलेले पाहताना, महाराष्ट्राची बलस्थाने व मर्मस्थाने न्याहाळताना, आपल्याला आपल्या महाराष्ट्राची ओळख नव्याने झाली असे वाटते. काकासाहेबांचे हे महाराष्ट्रावर ऋणच होय. पण हे सारे उभे करताना त्यातील व्यापक भारतीय संदर्भसूत्र काकासाहेब कधीच सुटू देत नाहीत, हे त्यांचे फार मोठे वैशिष्ट्य आहे. त्यामुळे त्यांच्या महाराष्ट्रदर्शनाला एक व्यापक परिप्रेक्ष्यही लाभते.

- **मृणालिनी जोगळेकर**

अनुक्रमणिका